# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी सूचना पुस्तिका

एप्रिल - २०१५

नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई ४०००३२

## ग्रामपंचायत निवडणुकांकरीता

P3/sameer/D.c/etc

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | प्रस्तावना | १ ते ४ |
| २) | मतदान केंद्रे | ५ ते ७ |
| ३) | मतदान कर्मचारीवृंद | ८ ते १३ |
| ४) | मतदान साहित्य | १४ ते १८ |
| ५) | नामनिर्देशन | १९ ते २७ |
| ६) | छाननी | २८ ते ३२ |
| ७) | उमेदवारी मागे घेणे | ३३ ते ३८ |
| ८) | निवडणूक चिन्हांचे वाटप | ३९ ते ४० |
| ९) | बिनविरोध निवडणूक | ४१ ते ४२ |
| १०) | मतदानाची तयारी | ४३ ते ४९ |
| ११) | मतदान | ५० ते ६९ |
| १२) | मतमोजणी | ७० ते ७३ |
| १३) | निवडणूक निकाल जाहिर करणे व प्रसिध्दी | ७४ ते ७९ |
| १४) | EVM द्वारे मतदान-ओळख | ८० ते ९३ |
| १५) | मतपत्रिका व मतदान यंत्रे | ९४ ते ९८ |
| १६) | मतदानाची तयारी | ९९ ते १०२ |
| १७) | मतदान यंत्रे कार्यान्वित करणे | १०३ ते १२२ |
| १८) | मतदान | १२३ ते १४९ |
| १९) | मतमोजणी | १५० ते १६९ |
| २०) | संकीर्ण (परिशिष्ट व जोडपत्र ) | भाग-२ |

# प्रकरण १
## प्रस्तावना.

१) **निवडणूक विषयक कायदेशीर तरतुदी व अंमलबजावणी :-** पंचायतींच्या निवडणुकांबाबत भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये अशा निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले असून संविधानाच्या खंड ९ मध्ये (अनुच्छेद २४३, २४३ए पासून २४३ ओ पर्यंत) तरतुदी आहेत. त्याचप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व त्याअंतर्गत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या तरतुदीनुसार निवडणुकांबाबत कार्यवाही केली जाते. प्रभाग रचना व आरक्षण याविषयीची कार्यवाही मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, गावाचे प्रभागात विभाजन व पदांचे आरक्षण) नियम १९६६ च्या तरतुदीनुसार केले जाते.

२) **निवडणूक अधिकारी यांची भुमिका / कार्यपध्दती :-**

ग्रामपंचायत नियम व निवडणूक प्रक्रियेची माहिति करुन घेणे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया सुरळीत व रितसरपणे पार पाडणे हे मुख्यत्वे करुन निवडणूक निर्णय अधिकारी व अधिनस्त कर्मचाऱ्यांवर अवलंबून आहे व छोटीशी चूक किंवा चुकीची कार्यपध्दती अथवा अपूर्ण माहिती किंवा गैरसमजूत/ चुकीचा अन्वयार्थ यामुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रिया रद्दबातल होऊ शकते याची नोंद घ्यावी.

ही मार्गदर्शक पुस्तिका माहितीकरीता व मार्गदर्शनाकरीता तयार करण्यात आली असून ती सर्वसमावेशक किंवा अधिनियम व नियमाला पर्याय नाही, हे लक्षात घ्यावे व त्यामुळे आवश्यकतेनुसार अधिनियम व नियमातील तरतुदी मुळात वाचणे व संदर्भासाठी तपासणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे राज्य निवडणूक आयोगाचे विविध आदेश, सूचना, परिपत्रके इत्यादी देखील संदर्भासाठी पहाणे आवश्यक आहे. तसेच निवडणुकीच्या कामाकरीता विहीत केलेले नमुने, प्रपत्रे इ. आवश्यकतेनुसार पुरेशा प्रमाणात तयार करुन ठेवणे आवश्यक आहे.

ग्रामपंचायत मतदार संघ, प्रभाग इ. ची पूर्ण भोगौलिक तसेच जनगणना, पदे, आरक्षण इ. बाबत ची माहिती, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला असणे आवश्यक आहे.

एकूण पदसंख्या व वर्गवारीनुसार आरक्षणाची पदे इ. बाबतची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला असणे आवश्यक आहे.

३) **कर्तव्याची रुपरेषा :-**

- मतदानाची व्यवस्था आणि कार्यक्रम याची मतदानास सुरुवात होण्यापूर्वीच व्यवस्थित आखणी करणे.
- पुरेशा प्रमाणात मतपेट्या / मतदान यंत्रे (EVM) व इतर साहित्य उपलब्ध करुन घेणे.
- निवडणुकीची अधिसुचना व जाहीर नोटीस देणे, नामनिर्देशनपत्रे व अनामत रक्कम स्वीकारणे, उमेदवाराकडून शपथपत्र / घोषणापत्र / हमीपत्र स्विकारणे.
- उमेदवाराच्या नामनिर्देशन पत्रातील व शपथपत्रातील माहिती प्रसिध्द करणे.
- नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे नामनिर्देशनपत्र नाकारण्याची कारणे संक्षिप्तपणे नमूद करणे.
- उमेदवारी मागे घेण्याच्या नोटीसांची पोच पावती देणे.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्हे वाटप करणे.
- नामनिर्देशनांची नोटीस, वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी व निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करणे व प्रसिध्द करणे.
- सर्विस व्होटरची यादी तयार करणे.
- मतपत्रिकांची (पोस्टल, बॅलट पेपर व सर्विस व्होटर मतपत्रिका इ. सह ) संख्या निश्चित करणे व छपाई व पुरवठ्याची / वितरणाची व्यवस्था करणे.
- स्वच्छ, निर्भय व निपक्षपाती रितसर निवडणुकांकरीता उमेदवार व राजकिय पक्षांशी आवश्यक तेवढा संपर्क ठेवणे.
- निवडणुका व्यवस्थित पार पाडणेकरीता कायदा व सुव्यवस्थची परिस्थिती यांचा आढावा घेणे व आचारसंहिता पालन / अंमलबजावणी याकरीता आवश्यक उपाययोजना करणे.

- मतदान यंत्राचा (EVM) वापर करणार असल्यास अशी EVM / मतदान यंत्रे वापरासाठी मतदानाच्या एक आठवडा अगोदर तयार (set) करणे.
- मतदान पथके, EVM / मतपेटी, मतदानाचे इतर साहित्य इ. च्या वाहतुकीची व्यवस्था करणे.
- मतदान पथके, मतपत्रिका, मतपेट्या / EVM व इतर साहित्य रवाना करणे.
- मतदानानंतर मतपेट्या / EVM सुरक्षितपणे ठेवण्याची व्यवस्था करणे.
- मतमोजणी कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
- निवडणूक कार्यक्रमाप्रमाणे मतमोजणी ठरलेल्या दिवशी ठरलेल्या ठिकाणी व वेळेस करणे.
- निकाल जाहीर करणे.
- मतमोजणीचा निकाल जाहीर झाल्यानंतर मतपेट्या / EVM व सर्व मतदान साहित्य सांविधानीक व असांविधानिक लिफाफे इत्यादींसह जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या ताब्यात देणे.
- परिणामकारक नियंत्रण.
- सर्वसाधारण पर्यवेक्षण.

**४) जिल्हा निवडणूक अधिकारी / जिल्हाधिकारी तसेच तहसिलदार यांनी करावयाची काही महत्वपूर्ण व्यवस्था.**

- जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगीने मतदान केंद्रे निश्चित करणे व मतदानासाठी सुस्थितीत ठेवणे.
- निवडणूक निर्णय अधिकारी (व आवश्यकतेनुसार सहायक निवडणूक निर्णय अधिकारी) प्रत्येक मतदान केंद्राकरीता केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची इतर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
- मतदान कर्मचाऱ्यांना (राखीव कर्मचाऱ्यांसह) सखोल व पूर्ण प्रशिक्षण देणे.

- आयोगाच्या विशेष सूचना, आदेश व परिपत्रके निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.
- सांविधानिक तरतुदी - तपासणी सूची तयार करणे व निवडणूक निर्णय अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे.
- सुधारीत मतपत्रिका / मतदान यंत्रे व कार्यपध्दती याबाबत सर्वसाधारण जनता, राजकिय पक्ष, उमेदवार व जनसंपर्क माध्यमे यांना अवगत करणे.
- अनुदान , मतपत्रिका, मतपेट्या, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, न पुसणारी शाई, निवडणूक साहित्य, विभेदक चिन्ह, पितळी सील इ. उपलब्ध करुन देणे.
- सर्व्हिस मतदारांसाठी टपाली मतपत्रिका छपाई करणे व अशा मतदारांना निर्गमित करणे.
- निवडणुका पूर्ण झाल्यानंतर मतपेट्या / EVM व निवडणूक कागदपत्रे व साहित्य सुरक्षित ठेवणे.
- निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे खर्चाचे हिशेब तपासणे व आयोगास सादर करणे.
- या सर्व प्रकारच्या कार्यवाहीकरीता व निवडणूका सुव्यवस्थितपणे पार पाडण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिल कार्यालयाशी नियमित संपर्कात रहाणे आवश्यक आहे.
- मतपेट्यांची व EVM ची सर्व गोपनीय कागदपत्रांची सुरक्षितता ही संबंधित तहसिल कार्यालयाची जबाबदारी राहील.

---

## प्रकरण २
## मतदान केंद्रे

१) **मतदान केंद्र व सहाय्यकारी मतदान केंद्रे :-** ग्रामपंचायत निवडणुकात प्रत्येक प्रभागात ***किमान*** १ याप्रमाणे मतदान केंद्रे राहतील. प्रत्येक मतदान केंद्राचे कार्यक्षेत्र निश्चित केलेले असेल आणि जास्तीत जास्त ८०० मतदार प्रत्येक मतदान केंद्राला जोडलेले असतील. यापेक्षा प्रभागाच्या मतदारांची संख्या अधिक असल्यास ***सहाय्यकारी (Auxiliary)*** मतदान केंद्र तयार करण्यात यावे. मात्र ही दोन्ही मतदान केंद्रे (मुख्य व सहाय्यकारी) एकाच इमारतीत असावीत.

प्रत्येक मतदान केंद्राला अनुक्रमांक देण्यात यावा व ज्यावेळी सहाय्यकारी मतदान केंद्र असेल त्याला (अ) (ब) इ. प्रमाणे क्रमांक देण्यात यावेत. कोणत्याही परिस्थितीत सहाय्यकारी मतदान केंद्राला वेगळा अनुक्रमांक देण्यात येऊ नये.

एका ग्रामपंचायतीमध्ये अनेक गावे वाड्या / वस्त्या समाविष्ठ असण्याची शक्यता असते. त्यामुळे एखाद्या प्रभागात अशा काही वस्त्या किंवा वाडया किंवा एकापेक्षा अधिक गावे समाविष्ठ असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशावेळी अशा वाडया वस्त्यांसाठी वेगळे मतदान केंद्र तयार करण्यास हरकत नाही. तसेच दुर्गम भागात आवश्यकतेनुसार एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे तयार करण्यास हरकत नाही. अशा मतदान केंद्राला वेगळा अनुक्रमांक दिला जाईल.

मतदान केंद्र निश्चित करतांना ते मतदानाच्या गोपनीयतेच्या व सुरक्षिततेच्यादृष्टीने तसेच मतदारांच्या सोयीच्यादृष्टीने निश्चित करण्यात यावे तसेच कायदा व सुव्यवस्थेचा मुद्दा देखिल विचारात घेण्यात यावा. तसेच किमान २० चौ.मी. चे क्षेत्र प्रत्येक मतदान केंद्रास आवश्यक आहे.

मतदान केंद्र हवेशीर व नैसर्गीक प्रकाश उपलब्ध असलेले असावे. तसेच शक्यतोवर मतदारांना आत जाण्याकरीता व बाहेर पडण्याकरीता स्वतंत्र दोन दरवाजे असावेत.

२) **मतदान केंद्राचे ठिकाण :-**

मतदान केंद्राचे ठिकाण हे शक्यतोवर कायमस्वरुपी असावे व त्यात वारंवार बदल करण्यात येऊ नये. तसेच कोणत्याही मतदारास दोन किलोमीटरपेक्षा अधिक अंतर प्रवास करावा लागणार नाही अशा अंतरावर मतदान केंद्र असावे.

एकाच इमारतीत २ पेक्षा अधिक मुख्य मतदान केंद्रे असू नयेत. मात्र २ मुख्य मतदान केंद्रे व त्याची सहाय्यकारी मतदान केंद्रे एकाच इमारतीत असू शकतात.

स्त्रीया व पुरुषांकरीता वेगळे मतदान केंद्र ठेवण्याची आवश्यकता नाही. मात्र स्त्री व पुरुष मतदारांच्या वेगवेगळ्या रांगा लावण्यात याव्यात. मतदान केंद्र हे शक्यतोवर शासकिय / निमशासकिय अथवा अनुदानित शाळेत किंवा शैक्षणिक इमारतीत असावे जेणेकरुन सर्व मतदारांना ते सामान्यतः ज्ञात असेल व आवश्यक ती बसण्याची व्यवस्था (टेबल, खुर्च्या इ.) उपलब्ध असेल. ***खाजगी इमारती मतदान केंद्राकरीता वापरण्यात येऊ नये व अपवादात्मक परिस्थितीत असे करणे आवश्यक झाल्यास इमारतीच्या मालकाची लेखी संमती घेण्यात यावी. मात्र अशी व्यक्ती कोणत्याही राजकिय अथवा धार्मिक पार्श्वभुमी असलेली असू नये. मतदानाच्या संपूर्ण प्रक्रियेत (दोन दिवस अगोदरपासून मतमोजणी पूर्ण होईपर्यंत) मतदान केंद्र निवडणूक निर्णय अधिकारी / तहसिल कार्यालयाच्या ताब्यात राहील.***

मतदान केंद्र व भोवतालचा सर्व परिसर मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षाच्या पूर्ण नियंत्रणाखाली राहील तसेच मतदान केंद्रावरील सुरक्षिततेची जबाबदारी ही राज्य शासनाच्या पोलीस दलाची असेल व असे पोलीस कर्मचारी मतदान केंद्राध्यक्षाच्या नियंत्रणाखाली काम करतील.

कोणत्याही परिस्थितीत कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही धार्मिक स्थळात किंवा पोलीस स्टेशन अथवा रुग्णालयात असणार नाही.

***अपवादात्मक परिस्थितीत जेथे कोणतीही सुयोग्य शासकिय इमारत उपलब्ध नसेल, अशावेळी मतदान केंद्र मंडपात तयार करता येईल. मात्र अशावेळी जिल्हाधिकारी कार्यालयाची विशेष परवानगी आवश्यक राहील.***

कुष्ठरोगी व्यक्तिंकरीता पुनर्वसन / सुधारगृह जेथे असेल, अशा मतदार संघात कुष्ठरोगी मतदारांकरीता वेगळे मतदान केंद्र अशा सुधारगृह / वसतीगृहाच्या इमारतीत निर्माण करण्यास हरकत नाही. अशावेळी अशा केंद्राचा कर्मचारी वर्ग मतदानाकरीता वापरण्यात यावा.

**३) मतदान केंद्राचा स्थाननिर्देश नकाशा (Location Map) व मार्ग नकाशा (Route Map) :-**

मतदान केंद्राची अनुक्रमांक व नावासहीत यादी ही निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर निश्चित करण्यात यावी. अशा यादीत मतदान केंद्राचा क्रमांक व इमारतीचे नाव नमूद करावे.

इमारतीस एकापेक्षा अधिक शाखा (wing) असल्यास ते ही नमूद करावे. प्रत्येक मतदान केंद्राची कार्यकक्षा निश्चित करण्यात यावी. मतदान केंद्राच्या यादीत कार्यकक्षेमध्ये मतदार यादीचा अनुक्रमांक, भाग क्रमांक, प्रभागाचे नाव इ. तपशील नमूद करावा. तसेच अशा मतदान केंद्राशी संलग्न मतदारांची संख्या देखील दर्शविण्यात यावी. जेणेकरुन मतदारांना आपण कोणत्या मतदान केंद्रावर मतदान करावयाचे आहे हे ज्ञात होईल.

ज्यावेळी एकाच इमारतीत एकाहून अधिक मतदान केंद्रे असतील, तेव्हा प्रत्येक मतदान केंद्राचे ठिकाण अनुक्रमांक, नाव व कार्यकक्षा वेगवेगळी नमूद करावी.

४) **मतदान केंद्रांची यादी :-** मतदान केंद्राची यादी ही ग्रामपंचायतनिहाय, प्रभागनिहाय, मतदान केंद्राच्या अनुक्रमांक नाव व तपशिलासह (शाह, महाविद्यालय, वर्ग, मजला इ.) असेल. तसेच सदर यादीसोबत मतदान केंद्राचा नकाशा असेल अशा नकाशा ग्रामपंचायतीच्या पूर्ण क्षेत्राचा असेल व अशा ग्रामपंचायतीच्या सर्व प्रभागांची सर्व मतदान केंद्रे त्यात दर्शविली जातील. त्यामध्ये अशा प्रत्येक मतदान केंद्राशी संलग्न प्रभाग, गाव, वाड्या वस्त्या, मतदारांची संख्या नमूद असेल तसेच मतदान केंद्राचे स्थान निर्देश असेल त्याचप्रमाणे अशा नकाशात मतदान पथके तसेच मतपेट्यांची वाहतुक करण्याकरीता निश्चित केलेला मार्ग दर्शविण्यात यावा.

५) **मतदान केंद्राच्या यादीची प्रसिध्दी :-** अशी यादी तहसिलदार कार्यालयात व संबंधित ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करावी.

६) **मतदान केंद्रात बदल :-** मतदान केंद्रात कोणत्याही कारणास्तव बदल करावयाचे झाल्यास त्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाची रितसर पूर्व मान्यता घेण्यात यावी व तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे.

७) **मतदान केंद्राचे इमारतीतील ठिकाण बदलणे :-** मतदान केंद्रात कोणत्याही कारणास्तव बदल करावयाचे झाल्यास त्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयाची रितसर पूर्व मान्यता घेण्यात यावी व तसे राज्य निवडणूक आयोगास अवगत करावे.

---

## प्रकरण ३
## मतदान (केंद्रावरील) कर्मचारी

निवडणूक नियम ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने प्रत्येक निवडणुकीच्या कारणाकरिता, निवडणुक घेण्यासाठी निवडणुक अधिकाऱ्याची आणि मतनोंदणीसाठी ठरविण्यात आलेल्या प्रत्येक ठिकाणाकरीता (ज्यांचा यात यापुढे मतदान केंद्र असा उल्लेख केला आहे) मतदान केंद्राध्यक्ष (अध्यासी अधिकाऱ्याची) (Presiding Officer) नेमणूक केली पाहिजे तसेच, त्यास निवडणुकीच्या कामात, अध्यासी अधिकारी (मतदान केंद्राध्यक्ष) व निवडणूक अधिकारी यांना मदत करण्यासाठी एक किंवा अधिक मतदान अधिकारी नेमण्याचा अधिकार आहे. अशा अधिका-यांची नेमणूक त्यांच्या नावाने किंवा अधिकारपरत्वे करण्याचा अधिकार आहे.

***रिटर्निंग ऑफिसर, प्रिसायडींग ऑफीसर व पोलिंग ऑफीसर या इंग्रजी शब्दाचे भाषांतर अनुक्रमे निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष (अध्यासी अधिकारी) तसेच मतदान अधिकारी (मताधिकारी) असे केलेले आहे. ते अधिकारी राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने*** **(तहसिलदार यांनी)** ***नेमावयाचे असतात.*** अशा अधिकाऱ्यांची नेमणूक त्यांच्या नावाने किंवा अधिकारपरत्वे करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचे प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास अधिकार आहे. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश दि. २७ जानेवारी, १९९५ अन्वये असे अधिकार तहसिलदार यांना देण्यात आले आहे. असे अधिकारी व कर्मचारी यांना प्राधिकृत अधिका-याने त्यांच्या नेमणुकीच्या पदाचे ओळखपत्र दिले पाहिजे व त्या ओळखपत्राचा वापर अधिकारी/कर्मचारी यांने निवडणुकीचे काम करतांना केला पाहिजे.

तालुक्यातील निवडणुका होत असलेल्या ग्रामपंचायतीची संख्या व मतदान केंद्रांची संख्या विचारात घेवून मतदान केंद्रांची स्थिती, मतदान पथकांची निवास व्यवस्था, मतदान पथके, मतपेटी, मतपत्रिका / मतदान यंत्रे इतर साहित्य यांचेसह मतदान केंद्रांवर व्यवस्थित पोहचली आहेत किंवा कसे याची माहिती घेणे, मतदानाच्या दिवशी वेळोवेळी आकडेवारी प्राप्त करुन घेणे, आवश्यकतेनुसार लेखन सामग्री पुरविणे, मतदान पूर्ण झाल्यानंतर मतपेटीच्या / मतदान यंत्राच्या वाहतुकीच्यादृष्टीने समन्वय साधणे इ. करीता वरिष्ठ दर्जाचे क्षेत्रिय अधिकारी नेमण्यात यावेत व त्यांना वाहने पुरविण्यात यावीत.

*कोणत्याही परिस्थितीत ज्या ग्रामपंचायतीची निवडणूक आहे त्या ग्रामपंचायतीचा रहिवासी अथवा मूळचा अधिवासी अशा ग्रामपंचायतीच्या निवडणूकीकरिता निवडणूक निर्णय अधिकारी, किंवा मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमले जाणार नाहीत, याची संबधित तहसिलदार कार्यालयाने दक्षता घ्यावी. तसेच बुरखाधारी स्त्री मतदारांची ओळख पटविण्याकरिता आवश्यकतेनुसार मतदान केंद्रावर स्त्री मतदान अधिकारी किंवा कर्मचारी नेमण्यात यावे.*

१) **नेमणूक विषयक प्राधिकारी व तरतुदी :-** मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष (प्रिसायडींग ऑफीसर), मतदान अधिकारी (पोलींग ऑफीसर), सहाय्यक केंद्राध्यक्ष (असिस्टंट प्रिसायडींग ऑफीसर), मतदान कर्मचारी (पोलींग स्टाफ) यांची नेमणूक तसे अधिकार तहसिलदार यांना प्रदान केले असल्याने तहसिलदार कार्यालयाकडून केली जाईल. ***(पहा आयोगाचे आदेश दि. २७/१/१९९५)***

**कर्मचारीवृंद :-** शक्यतोवर राज्य शासन व केंद्र शासनाचे तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचे सर्व उपलब्ध कर्मचारी निवडणूकीकरीता मतदान केंद्रावर नेमण्यात यावेत.आणि आवश्यकता भासल्यास विद्यापीठे, महाविद्यालये, शासकिय उद्योग समुह / उपक्रम (Government Company /Undertaking) राज्य शासन किंवा केंद्र शासनाच्या अनुदानित संस्था यांचे कर्मचारी मतदान केंद्रावर नेमण्यात यावेत. ***कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्ती मतदान केंद्रावर नेमण्यात येऊ नये.***

ज्यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी व कर्मचारी हे मतदान केंद्रावर नेमले जातील, त्यावेळी मतदान केंद्राध्यक्ष व पहिला मतदान अधिकारी हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकारी / कर्मचारी असू नयेत.

शक्यतो बँकेचे अधिकारी / कर्मचारी नेमण्यात येऊ नये.

अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक करतांना प्रत्येक बाबतीत वरिष्ठ अधिकाऱ्याला / कर्मचाऱ्याला त्याच्यापेक्षा दर्जात कनिष्ठ अधिकारी / कर्मचाऱ्याच्या हाताखाली नेमणूक देऊ नये.

मतदान केंद्राध्यक्ष / अधिकारी नेमतांना महिला कर्मचाऱ्यांची उपलब्धता विचारात घेवून ज्या मतदान केंद्रांवर महिला मतदारांची संख्या अधिक असेल अथवा पडदानशीन महिला मतदार असतील, अशा मतदान केंद्रांवर ***किमान १ महिला मतदान अधिकारी*** नेमणे आवश्यक आहे. महिला अधिकारी / कर्मचारी नेमतांना गर्भवती महिलांनी अथवा नवजात अपत्य असलेल्या महिलांनी

नेमणूक रद्द करण्याबाबत अर्ज केल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सहानुभुतीपूर्वक निर्णय घ्यावा. मात्र बदली महिला कर्मचारी नेमण्यात येईल असे पहावे.

महिला कर्मचाऱ्यांना नेमतांना त्यांच्याकरीता वेगळी रहाण्याची, प्रसाधनाची व इतर आवश्यक सुविधा मतदान केंद्राजवळ उपलब्ध होईल याची विशेष दक्षता घेणे व अशा महिला कर्मचाऱ्यांना त्याची पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे. **या गोष्टीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.**

अपंग कर्मचाऱ्याला, त्याच्या अपंगत्वामुळे मतदान केंद्राध्यक्ष / मतदान अधिकारी म्हणून त्याचे कर्तव्य व्यवस्थिपणे पार पाडता येणार नाही अशी जिल्हा निवडणूक अधिकारी / तहसिलदार / निवडणूक निर्णय अधिकारी यांची खात्री झाली, तरच मतदान केंद्रावर नेमणूक देण्यात येऊ नये.

## २) मतदान केंद्राध्यक्ष / अध्यासी अधिकारी :-

मतदान केंद्राध्यक्ष हा मतदान केंद्रावरील वरिष्ठ व प्रमुख अधिकारी असल्याने त्याची जबाबदारी सर्वात अधिक आहे. हा अधिकारी शक्यतो राजपत्रित अधिकारी असावा मात्र उपलब्धतेनुसार राजपत्रित अधिकारी उपलब्ध न झाल्यास वरिष्ठ दर्जाचा / पर्यवेक्षिय काम पहाणारा अधिकारी असावा. ***शक्यतोवर अशी व्यक्ती ज्या परिसरात रहात असेल त्या परिसरातील मतदान केंद्रावर त्याची नेमणूक करण्यात येऊ नये.***

कोणत्याही मानद दंडाधिकाऱ्यास जरी तो शासकिय अधिकारी असला तरीही मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमण्यात येऊ नये.

## ३) केंद्राध्यक्षाची गैरहजेरी, तातडीची उपाययोजना :-

अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्रावर उपस्थित राहू शकला नाही तर मतदान केंद्राध्यक्ष म्हणून त्याची कर्तव्ये पार पाडण्याकरीता एका मतदान अधिकाऱ्यास तात्काळ नामनिर्देशित करणे आवश्यक असते. याकरीता मतदान पथक निश्चित करतांनाच एका मतदान अधिकाऱ्याचे नाव निश्चित करण्यात यावे. शक्यतो प्रथम मतदान अधिकारी / सहायक मतदान केंद्राध्यक्ष (First Poling Officer/ Assistant Presiding Officer) या कर्तव्याकरिता नामनिर्देशित करण्यात यावा.

**४) कर्मचारी कोण असावेत :-**

मतदान पथकातील कर्मचारी हे वर नमूद केल्याप्रमाणे शासकिय / निमशासकिय कर्मचारी असावेत. स्वच्छ व निरपेक्ष निवडणुकांच्यादृष्टीने व कोणत्याही राजकिय पक्ष अथवा उमेदवाराकडून कोणताही आक्षेप येऊ नये याकरीता प्रत्येक मतदान केंद्रावरी मतदान कर्मचारी हे वेगवेगळ्या कार्यालयातील अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून घेण्यात आलेले असावेत. तसेच असे कर्मचारी / अधिकारी त्या ग्रामपंचायत हद्दीतील रहिवासी नसावेत.

**मतदान पथकांची संख्या / पथकातील व्यक्ती / स्त्री सहाय्यक व राखीव कर्मचारी :-**

जितकी मतदान केंद्रे असतील तितकी मतदान पथके तयार करण्यात येऊन अधिक १० टक्के राखीव कर्मचारी नेमण्यात यावेत. सर्वसाधारणपणे एका पथकात १ मतदान केंद्राध्यक्ष व ३ मतदान अधिकारी (सहायक मतदान केंद्राध्यक्षासह) असावेत मात्र ज्या मतदान केंद्रावर मतदारांची संख्या ८०० पेक्षा अधिक असेल अशा मतदान केंद्रावर १ मतदान अधिकारी अधिक देण्यात यावा. तसेच मतदान पथकात आवश्यकतेनुसार चतुर्थश्रेणी कर्मचारी समाविष्ठ असतील.

***मतदान केंद्राचा आराखडा / मांडणी याबाबतच्या सुचना तसेच मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पूर्ण माहिती घेणे आवश्यक आहे.***

**७) पोलीस संरक्षण :-** प्रत्येक मतदान पथकासोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्त मतपेटी / मतदान यंत्र, मतपत्रिका व इतर साहित्य याच्या सुरक्षिततेकरीता सतत असणे आवश्यक आहे. असे पोलीस कर्मचारी **मतदान पथक रवाना होण्याच्या वेळेपासून मतपेटी / मतदान यंत्र सुरक्षा कक्षात सुपूर्द करण्यात येईपर्यंत मतदान केंद्राध्यक्षाच्या नियंत्रणाखाली व आदेशांनुसार काम करतील.**

**८) मतदान पथकांची वाहन व्यवस्था :-** मतदान पथक हे मतदान केंद्रावर मतदानाच्या आदल्यादिवशी सायंकाळी पोहचतील अशाप्रकारे निर्गमित करण्यात यावे. मतदान पथकासोबत मतपत्रिका व मतपेटी / मतदान यंत्र, मतदार यादी इत्यादी साहित्य मतदान केंद्रावर पाठवावयाचे असल्याने योग्य ते वाहन व संरक्षणार्थ पोलीस कर्मचारी पुरविण्यात यावे. ***मतदान पथकाचा तहसिल कार्यालयातून मतदान केंद्रापर्यंत व मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्रातून तहसिल कार्यालय / मतपेटी जमा करण्याच्या सुरक्षा कक्षापर्यंतचा मार्ग सुनिश्चित असावा व***

त्याच मार्गाने मतदान पथकाची वाहतूक करण्यात यावी व त्याचा मार्गदर्शक नकाशा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे / तहसिल कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

९) **राहण्याची व्यवस्था व भोजन व्यवस्था :-** मतदान पथकाकरीता निवासाची, भोजनाची, पिण्याचे पाणी व प्रसाधन याची सोय मतदान केंद्राच्या इमारतीमध्येच करण्यात यावी. तसेच महिला कर्मचाऱ्यांकरीता वेगळी सुयोग्य सुविधा पुरविण्यात यावी. उन्हाळा व पावसाळ्याच्या दिवसात मतदान अधिकारी व मतदान अधिकाऱ्यांच्या निवासाकरीता तसेच मतदान केंद्रावर मतदारांना रांगेत उभे राहण्याकरीता आवश्यक तो निवारा / मंडप उभारण्यात यावा. याबाबत ***मतदानाच्या दिवसापूर्वी क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून पहाणी करण्यात येऊन निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने तसेच तहसिलदार यांनी योग्य ती व्यवस्था करावी.***

१०)**नेमणूक आदेशाचा नमुना :-** मतदान अधिकारी कर्मचाऱ्यांचे आदेश हे विहित केलेल्या नमुन्यात असावेत त्यात अधिकारी / कर्मचारी यांचे पूर्ण नांव, मूळ पदनाम, कार्यालयाचे नाव याबरोबरच नेमणुकीचे पद (केंद्राध्यक्ष, १ ला मतदान अधिकारी / सहायक केंद्राध्यक्ष, २ रा मतदान अधिकारी इ. ) व नेमणुकीचे मतदान केंद्र याचा तपशिल असावा. सदर आदेश हा तहसिलदाराच्या स्वाक्षरी व अधिकृत शिक्का (सील) ने निर्गमित करण्यात यावा.

मतदान पथकाची रचना मतदानाच्या तारखेपूर्वी किमान ८ दिवस अगोदर होईल, असे पहावे तसेच मतदान पथकातील सर्व व्यक्तींना आदेश किमान ३ दिवस अगोदर बजावले जातील याची दक्षता घ्यावी. मात्र असे करतांना मतदान केंद्र शक्यतो मतदानाच्या पूर्वी फक्त ३ दिवस अगोदरच कळविण्यात यावे. ***(याकरीता मतदान पथकाचे नेमणूकीचे आदेश ३ दिवसापेक्षा अधिक दिवस अगोदर निर्गमित करण्यात येत असतील तर अशा आदेशात मतदान केंद्र दर्शविण्याचा रकाना कोरा ठेवावा व मतदानापूर्वी २ दिवस अगोदर सदर मतदान केंद्र मतदान कर्मचाऱ्यास कळविण्यात यावे. )***

११) **नेमणूक नाकारता येणार नाही :-** नेमणुकीचे आदेश २ प्रतीमध्ये देण्यात यावेत. जेणेकरुन सदर व्यक्तीस टपाली मतपत्रिका मागणी करतांना १ प्रत उपयोगी होईल. (पहा टपाली मतपत्रिका आदेश दि. १६/४/२००१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १९, २०, २२, २३ व २५ च्या व याबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या तरतुदींचीही सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी नोंद घ्यावी. लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ च्या कलम २६ च्या तरतुदीच्या

अनुषंगाने असे स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक कामाकरीता विशेषत: मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी म्हणून नेमणूक करतांना सदर व्यक्तीची संमती घेण्याची आवश्यकता नाही किंबहुना अशी नेमणूक केल्यानंतर सदर व्यक्तीने नेमणूक नाकारल्यास अथवा काम करण्यास टाळटाळ केल्यास त्याचेविरुध्द कठोर कारवाई होऊ शकते हे तत्व नेमणूक केल्यानंतर घेण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गाला हजर रहाण्याबाबतही लागू होते.

---

## प्रकरण ४
## मतदान साहित्य.

ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये मतदान पूर्वापार पध्दतीनुसार मतपेटीद्वारे घेण्यात येत होते. **मात्र दि. ४ मे, २००५ च्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या अधिसूचनेद्वारे ग्रामपंचायत अधिनियमात सुधारणा करण्यात येऊन मतपेटी किंवा मतपत्रिका यात निवडणुकीच्यावेळी मते देण्याकरीता किंवा मतांची नोंदणी करण्याकरीता, वापरण्यात येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा समावेश होतो अशी सुधारणा तसेच निवडणुकीच्यावेळी मतदान, मतपत्रिकेद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करण्यात येईल अशी सुधारणा करण्यात आली आहे. अर्थात मतदान मतपत्रिका व मतपेटी याऐवजी EVM द्वारे देखील घेता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे.** त्यामुळे ज्यावेळी राज्य निवडणूक आयोगाच्या विशेष आदेशाद्वारे मतदान, मतदान यंत्राद्वारे घेण्यात येईल त्यावेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन) च्या वापराबाबत विशेष मार्गदर्शक सुचनांनुसार कार्यवाही करण्यात येईल. मात्र मतदान पूर्वापार पध्दतीनुसार मतपेटीद्वारे होणार असल्यास त्याबाबतची कार्यपध्दती खाली नमूद केल्याप्रमाणे राहील.

१) **मतपेट्या :-** ग्रामपंचायत निवडणुकांकरीता केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अखत्यारीतील व जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या ताब्यातील मतपेट्या तात्पुरत्या अधिग्रहीत करुन वापरण्यात येतात. त्याकरीता निवडणुका होणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या, मतदान केंद्रांची संख्या व प्रत्येक केंद्रावरील मतदारांची संख्या विचारात घेवून तहसिल कार्यालयाने जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अशा मतपेट्या वापरण्याची परवानगी पुरेसा कालावधी असतांना प्राप्त करुन घ्यावी. यामध्ये मतदारांच्या संख्येनुसार लहान, मध्यम, मोठ्या (जम्बो) मतपेट्याची आकडेवारी, मतपेट्यांवर कोरलेले अनुक्रमांक / सांकेतांक तसेच वाटप करण्यात आलेली मतदान केंद्रे व मतपेटी सुव्यवस्थित असून काम करीत आहे याचा उल्लेख असलेली नोंद वही ठेवणे व मतदान केंद्राध्यक्षाकडुन तसे प्रमाणपत्र घेणे या कार्यवाहीचा समावेश होतो. मतपेट्या ताब्यात मिळाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाला सुपूर्द करण्यापूर्वी सदर मतपेटी सुव्यवस्थित आहे व व्यवस्थितपणे उघडली जाते व बंद होते याची खात्री करावी तसेच आवश्यकतेनुसार मतपेटीची दुरुस्ती, तेलपाणी इ. करुन घ्यावे. मतपेटी सुपूर्द करतांना ती कोरडी आहे व तेल / वंगण मतपत्रिकांना लागणार नाही याची खात्री करावी.

२) **EVM (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे) :-**

निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या निवडणुकीसाठी मतदानाकरिता वापरावयाचे मशीन त्यालाच EVM म्हणतात.

या यंत्रात दोन भाग आहेत.

१) कंट्रोल युनिट (नियंत्रण विभाग)

२) बॅलटींग युनिट (मतदान विभाग)

हे दोन्ही भाग केबलद्वारे जोडले जातात.

**१) बॅलटींग युनिट (Balloting Unit)**

बॅलटींग युनिटवर उमेदवारांची नावे व चिन्हे असलेली मतपत्रिका लावली जाते व त्यासमोरील बटनाद्वारे योग्य त्या उमेदवारास मतदार आपले मत देऊ शकतो. मतदाराचा संबंध फक्त बॅलट युनिटशीच येतो.

बॅलटींग युनिटमधील भाग (Parts of Balloting Unit)

१) कंट्रोल युनिटला जोडणारी केबल

२) मतदान यंत्र मतदानासाठी तयार असल्याचे दर्शविणारा दिवा (Ready Lamp)

३) स्लाईड स्वीच पॅनेल

४) मतपत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग

५) १५ उमेदवारांची बटने व त्यासमोर १५ लाल दिवे

१६ वे बटन "End" बटन असते.

**२) कंट्रोल युनिट (Control Unit)**

कंट्रोल युनिटद्वारे मतदानाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जाते. कंट्रोल युनिटमध्ये ४ भाग असतात.

१) दर्शक भाग (Display Section)

२) कॅन्डीडेट सेट सेक्शन (Candidate Set Section)

३) रिझल्ट सेक्शन (Result Section)

४) बॅलॅट सेक्शन (Ballot Section)

**३) मतपत्रिका :-** ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाची सदस्य संख्या ३ पेक्षा जास्त व २ पेक्षा कमी असणार नाही अशी तरतूद मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभागात विभाजन आणि जागांचे आरक्षण ) नियम १९६६ च्या नियम ३ मध्ये आहे. त्यामुळे आरक्षणानुसार अनुसूचित जाती, जमाती, नागरिकांचा मागासप्रवर्ग व सर्वसाधारण तसेच या प्रत्येक वर्गवारीतील स्त्रियांच्या आरक्षणाच्या वेगवेगळ्या वर्गवारीतून निवडून द्यावयाचे सदस्य समाविष्ठ करुन प्रत्येक प्रभागातून २ किंवा ३ सदस्य निवडून दयावे लागतात. याकरीता मतदारांना प्रत्येक वर्गवारीतून निवडून दयावयाच्या उमेदवाराची माहिती व्हावी व मतदान करणे सुलभ व्हावे याकरीता आरक्षणाच्या वर्गवारीनिहाय वेगवेगळया रंगाची मतपत्रिका वापरली जाईल अशा सूचना राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र. रानिआ / ग्रापनि / २००५ / प्र.क्र.२६ / का.८, दि. १८ फेब्रुवारी, २००६ अन्वये देण्यात आल्या आहेत त्यानुसार अनुसूचित जातीच्या जागेकरीता फिका गुलाबी रंग, अनुसूचित जमातीच्या जागेकरीता फिका हिरवा रंग, नागरीकांचा मागास प्रवर्ग फिका पिवळा रंग, व सर्वसाधारण जागेकरीता पांढरा रंग अशा रंगाच्या मतपत्रिका असतील तसेच त्या त्या वर्गवारीतील स्त्री राखीव जागेकरीता त्याच रंगाची मात्र ज्यावर **स्त्री राखीव** असे ठळक छापलेले आहे अशी मतत्रिका असेल असे निश्चित केले आहे.

त्यामुळे मतपत्रिका छापतांना राज्य निवडणूक आयोगाच्या दि. १८ फेब्रुवारी, २००६ च्या आदेशाच्या सर्व तरतुदींचे काटेकोर पालन होईल याची निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दक्षता घ्यावी तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी मतपत्रिका ताब्यात घेतांना त्या मतदान केंद्रावर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या वर्गवारीनुसार निश्चित केलेल्या रंगात मतपत्रिका छापल्या आहेत व त्या त्या उमेदवारांची नावे त्या त्या वर्गवारीच्या मतपत्रिकेत नमूद केले आहेत आणि प्रत्येक उमेदवाराला वाटप केलेले चिन्हच त्याच्या नावासमोर छापलेले आहे याची खात्री करावी. त्याचप्रमाणे मतदान केंद्राला जोडलेल्या मतदारांच्या संख्येच्या पुढील दशकात पुर्णांकित केलेल्या संख्ये इतकी अधिक १० टक्के राखीव इतक्या मतपत्रिका मतदान केंद्राध्यक्षाला देण्यात यावा व तशा त्या मिळाल्याची मतदान केंद्राध्यक्षाने खात्री करावी व तशी पावती द्यावी असे करतांना फाटलेल्या, न छापलेल्या, चुकीच्या छापलेल्या, अनुक्रमांक नसलेल्या, चुकीचे अनुक्रमांक असलेल्या मतपत्रिका तहसिल कार्यालयाच्या संबंधित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. कोणत्याही प्रकारे अशा खराब मतपत्रिका मतदान केंद्रावर मतदारांना दिल्या जाणार नाहीत याची दक्षता मतदान केंद्राध्यक्षाने घ्यावयाची आहे.

३) **प्रपत्रे.**

**मतदानाशी संबंधित नमुने (निवडणूक नियमांतर्गत)**

१. निवडणूकीची नोटीस (नमुना अ अ) , नियम ७(२)

२. नामनिर्देशन पत्र (नमुना "अ") (सुधारित नमुना "अ")

३. मतपत्रिकेचा नमूना (नमुना "ब") (सुधारित नमुना)

४. अंध व अपंग मतदारांची यादी (नमुना "ब-१")

५. देऊ केलेल्या / प्रदत्त मतांची यादी (List of Tender Votes) (नमुना "क")

६. हरकत घेतलेल्या मतांची यादी (List of Challanged Votes) (नमुना "ड")

७. मतपत्रिकांचा हिशोब (Ballat Paper Account) (नमुना "इ")

**निवडणूक आयोगाने आदेशित केलेली प्रपत्रे / नमुने.**

१) गुन्हेगारी पार्श्वभूमी नसल्याबाबत व मालमत्तेबाबत घोषणापत्र (पहा आयोगाचे आदेश दि. १५/३/२००४)

२) अपत्यांबाबतचे घोषणापत्र (पहा आयोगाचे आदेश दि. १२ जुलै, २००१)

४) जाती पडताळणी समितीकडील वैधता प्रमाणपत्र नसल्यास करावयाचे हमीपत्र (पहा आयोगाचे आदेश दि. १३/६/२००७)

५) खर्चाचे विवरणपत्र व शपथपत्र (पहा आयोगाचे आदेश दि. ७/२/१९९५)

**प्रभाग रचनेसंबंधी प्रपत्रे (प्रभाग रचना नियमांतर्गत)**

१. नमुना अ- अधिसूचना आणि अनुसूची

२. नमुना ब- नोटीस व अनुसूची

३. सभेचे इतिवृत्त

**अधिक आवश्यक नमुने**

१. मतमोजणीचा निकाल

२. तपासणी सूची (भाग अ- मतदार यादी,
भाग ब- मतदान केंद्रांची यादी,
भाग क - मतदान साहित्य

भाग ड - मतदान पथकांविषयी

भाग इ - मतदान विषयक -भाग इ इ (फेरमतदान)

भाग फ - मतमोजणी व निकाल

भाग ग - आचारसंहिताविषयक

भाग ख - निवडणूक खर्चाचा हिशोब

३. मतदान केंद्रांची यादी

४. मतदान पथक आदेशाचा नमुना

५. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी- नमुना

६. उमेदवारांच्या स्वाक्षऱ्या व निवडणूक प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या

७. टपाली मतपत्रिकांची नोंदवही

८. टपाली मतपत्रिकेचा नमुना

९. मतदान केंद्राची आखणी /नकाशा

१०. मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे घोषणापत्र

मतदान सुरु होण्यापूर्वी- मतदान सुरु झाल्यानंतर- मतदान पूर्ण झाल्यानंतर

११. अंध किंवा अपंग मतदाराच्या मदतनिसाने करावयाचे घोषणापत्र

१२. मतदान केंद्राध्यक्षांची डायरी

१३. निवडणूक आयोगाकडे पाठवावयाच्या अहवालाचे नमुने

१४. ओळखपत्रे नमुने- निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, मतदान कर्मचारी, क्षेत्रीय अधिकारी, तहसिलदार / जिल्हा निवडणूक अधिकारी- निरीक्षक, मतमोजणी पर्यवेक्षक,मतमोजणी कर्मचारी, उमेदवार निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी

१५. निवडणूक प्रतिनिधी, मतदान प्रतिनिधी, मतमोजणी प्रतिनिधी यांच्या नेमणूकीकरीता अर्जाचा नमुना- आदेशाचे प्रारुप

१६. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा अंतिम अहवाल

# प्रकरण ५
# नामनिर्देशन

**प्रस्तावना :-** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम निर्गमित केला जातो. त्यामध्ये निवडणूक नियम ७ (२) खालील निवडणुकीची अधिसुचना / नोटीस **नमुना अअ** मध्ये प्रसिध्द करण्याचा दिनांक नमूद केलेला असतो. त्या दिनांकास निवडणुकीची अधिसुचना / नोटीस व राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक कार्यक्रम / आदेश हा नियम ७ (२-अ) च्या तरतुदीनुसार रितसर प्रसिध्द करण्यात यावा.

राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक कार्यक्रम / आदेशाच्या प्रती आणि पोट-नियम (२) खालील नोटीस, ग्रामपंचायतीच्या किंवा गावाच्या चावडीत किंवा गावात चावडी नसेल तर राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेला अधिकारी याबाबतीत नेमील अशा गावातील कोणत्याही इतर ठळक सार्वजनिक ठिकाणी चिकटवून, निश्चित केलेल्या दिवशी प्रसिध्द करण्यात येतील.

याबाबतीत नेमलेल्या तारखा, वेळा आणि ठिकाण किंवा ठिकाणे यात राज्य निवडणूक आयुक्ताच्या मंजूरीवाचून बदल करता कामा नये.

## १) ग्रामपंचायत निवडणुकीची अधिसुचना व जाहीर नोटीस प्रसिध्द करणे.

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या तरतुदीनुसार राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक कार्यक्रम निर्गमित केला जातो. त्यामध्ये निवडणूक नियम ७ (२) खालील निवडणुकीची अधिसुचना / नोटीस **नमुना अअ** मध्ये प्रसिध्द करण्याचा दिनांक नमूद केलेला असतो. त्या दिनांकास निवडणुकीची अधिसुचना / नोटीस व राज्य निवडणूक आयोगाचा निवडणूक कार्यक्रम / आदेश हा नियम ७ (२-अ) च्या तरतुदीनुसार रितसर प्रसिध्द करण्यात यावा. **(जोडपत्र १ /Appendix-1)**

## २) उमेदवाराचे नामनिर्देशन

गावातील दोन किंवा अधिक प्रभागांसाठी एकाच वेळी निवडणूक घेण्यात येईल, तेव्हा एका व्यक्तिस, अशा सर्व प्रभागातील किंवा अशा प्रभागांपैकी कोणत्याही प्रभागातील निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार असेल. ***मात्र एकच व्यक्ती / उमेदवार एकाच प्रभागातून एकापेक्षा अधिक***

*वर्गवारीतून नामनिर्देशनपत्र दाखल करु शकणार नाही / निवडणूक लढवू शकणार नाही. उदाहरणार्थ अनुसूचित जातीचा उमेदवार एकतर अनुसूचित जाती करीता राखीव जागेवर किंवा अराखीव जागेवर निवडणूक लढवू शकतो, दोन्ही जागांवर निवडणूक लढवू शकत नाही. तसेच, स्त्री उमेदवार, कोणत्याही वर्गवारीतील कोणत्याही एकाच पदाकरीता निवडणूक लढवू शकते. दोन किंवा अधिक पदांकरीता नाही. (पहा आयोगाचे आदेश दि. २१/०८/२००७)*

**(परिशिष्ट II / Annexure II)**

नामनिर्देशनाबाबत कार्यपध्दती निवडणूक नियम, १९५९ च्या नियम ८ व १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. नियम ८ (१) च्या तरतुदीनुसार उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निवडणूक कार्यक्रमात निश्चित केलेल्या व ***नमुना अअ*** मधील नोटीसमध्ये नमूद केलेल्या दिवशी आणि वेळेत आणि अशा नोटीसमध्ये नमूद केलेल्या ठिकाणी प्रत्येक उमेदवाराने ***नमुना अ*** मध्ये उमेदवाराच्या स्वाक्षरीने नामनिर्देशनपत्र स्वत: अथवा याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीकडून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास सादर केले पाहिजे आणि असे नामनिर्देशनपत्र सादर मिळाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक अधिकारी, ज्याच्याकडे ते सादर केले आहे, तो नामनिर्देशनपत्रावर अनुक्रमांक व ज्या तारखेस व ज्यावेळी ते प्राप्त झाले ती तारीख आणि ती वेळ नमूद करील आणि उमेदवाराची ओळख पटल्यावर स्वाक्षरी ऐवजी उमेदवाराने खूण केली असल्यास किंवा अंगठ्याचा ठसा उमटविला असल्यास तो त्याच व्यक्तीच्या अंगठ्याचा ठसा किंवा खूण आहे असे साक्षांकित करील.

***नामनिर्देशनपत्र तहसिल कार्यालयाकडून पुरविण्यात आलेल्या व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या छापील नमुन्यातच व अनामत रकमेसह तसेच आरक्षित जागांकरीता उमेदवारी असेल तर जातीप्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह आणि जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह तसेच जातप्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेल्या वैधता प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह व विहित घोषणापत्र / शपथपत्रांसह सादर केले पाहिजे.***

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये कलम १०-१अ (Sec. 10.1A) हे नवे कलम दाखल झाले आहे व त्या कलमातील तरतुदीनुसार राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी

समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद केली आहे. आणि ज्याअर्थी, ज्या उमेदवारांकडे जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जात पडताळणी समितीकडे, जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी दिल्याची पावती / पुरावा सोबत जोडण्याबाबत व जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून महिन्यांच्या कालावधीत सादर करण्याबाबत हमीपत्र देण्याची तरतुद केली आहे.

राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात यापूर्वी काढलेल्या आदेशांचे अंशतः अधिक्रमण करुन दि. १३/६/२००८ च्या आदेशान्वये ग्रामपंचायत निवडणुकांकरीता नामनिर्देशनपत्राचा नमुना ⊛ सदर आदेशाच्या परिशिष्ट-१ मध्ये व उमेदवाराने निवडून आल्याच्या दिनांकापासून ~~४~~ महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या हमीबाबतच्या, हमीपत्राचा नमुना सदर आदेशाच्या परिशिष्ट-२ मध्ये विहित केल्यानुसार राहील असे निश्चित केले आहे. आदेशाची प्रत आणि नामनिर्देशनपत्राचा व हमीपत्राचा सुधारीत नमुना या पुस्तिकेच्या शेवटी **परिशिष्ट I** (Annexure I) आणि **जोडपत्र २ व ३** मध्ये दिला आहे.

**३) सादर करण्याचे ठिकाण व वेळ :-** नामनिर्देशनपत्र सादर करण्याचा कालावधी हा राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमामध्ये नमूद केलेला असेल व नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या पहिल्या दिवसापासून नामनिर्देशनपत्र स्विकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत (दोन्ही दिवस धरुन मात्र रविवार व सार्वजनिक सुटीचा दिवस वगळून) असेल. ***या करीता सार्वजनिक सुटीचा दिवस याच्या व्याख्येत दुसरा किंवा चौथा शनिवार किंवा चारही शनिवार जे अनुक्रमे राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या कार्यालयांकरीता सुटीचे दिवस म्हणून निश्चित केले आहेत, त्यांचा समावेश होत नाही. अर्थात नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याच्या कालावधीत दुसरा किंवा चौथा शनिवार येत असला तर अशा शनिवारच्या दिवशी जरी कार्यालयांना सुटी असली तरी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे कार्यालय त्या दिवशी खुले राहील व नामनिर्देशनपत्रेही स्विकारण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत विहीत दिनांकाव्यतिरिक्त व विहीत वेळेपूर्वी किंवा नंतर नामनिर्देशनपत्रे स्विकारली जाणार नाहीत.***

**४) कोण सादर करु शकतो / सादर करण्यास पात्र व्यक्ती :-** नामनिर्देशनपत्र उमेदवाराने स्वाक्षरी केल्यानंतर उमेदवार स्वतः किंवा, त्याने स्वहस्ताक्षराने शाईने स्वाक्षरीत केलेल्या लेखी प्राधिकार पत्राच्या आधारे, अशी लेखी प्राधिकृत केलेली व्यक्ती सादर करु शकेल. याबाबत



⊛ याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/ग्रापानि २००८/प्र.क्र.२०/का.०८ दि. 29 ऑक्टोबर, 2008 चे सुधारीत आदेश पहावेत.
सर्व आदेश www.mahasec.maharashtra.gov.in वर

असे नामनिर्देशनपत्र अशा प्रकारे लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीने सादर केल्यास तसे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पावतीवर व नामनिर्देशनपत्रावर विहित जागी नमूद करावयाचे आहे.

५) **सहायक निवडणूक निर्णय अधिकारी :-** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला त्याच्या कामात सहाय्य करण्याकरीता आवश्कतेनुसार एक सहायक निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून किंवा तहसिलदाराकडून नेमता येईल. असा सहायक निवडणूक अधिकारी निवडणूक अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीत मात्र त्याच्या आदेशानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे काम पाहील मात्र असा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यास सक्षम असणार नाही. सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने कागदपत्रांवर स्वाक्षरी करतांना "निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकरीता" असे नमूद न करता **"सहायक निवडणूक निर्णय अधिकारी"** म्हणून स्वाक्षरी केली पाहिजे.

६) **नामनिर्देशनपत्रांची संख्या :-** एकावेळी कोणताही उमेदवार एका प्रभागातून जास्तीत जास्त **४ नामनिर्देशनपत्रे** सादर करु शकेल आणि अशी चारही नामनिर्देशनपत्रे स्वतंत्ररित्या छाननीचेवेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून छाननी केली जातील. अर्थात केवळ एक नामनिर्देशनपत्र जरी वैध ठरले व इतर नामनिर्देशनपत्रे अवैध ठरली तरी उमेदवाराच्या उमेदवारीस बाधा येत नाही. मात्र **उमेदवाराने उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीत एक जरी नामनिर्देशनपत्र मागे घेतले तरीही त्याने संपूर्ण उमेदवारी मागे घेतली आहे असा त्याचा अर्थ होईल.**

७) **नामनिर्देशनपत्रांना अनुक्रमांक देणे :-** पोट-नियम (२) मध्ये नमूद केल्याप्रमाणे नामनिर्देशनपत्र मिळाल्यावर निवडणूक अधिकाऱ्याने नामनिर्देशनपत्रावर त्याचा अनुक्रमांक लिहिला पाहिजे आणि त्यावर, ज्या तारखेस आणि ज्या निश्चित वेळी अर्ज त्याच्या स्वाधीन करण्यात आला असेल ती तारीख आणि ती वेळ नमूद करणार शेरा लिहून त्यावर सही केली पाहिजे. आणि असा अधिकारी, त्या व्यक्तीची ओळख पटल्यावर ती खूण किंवा अंगठयाचा ठसा हा त्याच व्यक्तीच्या अंगठयाचा ठसा किंवा खूण आहे असे साक्षांकीत करील.

***प्रत्येक नामनिर्देशनपत्राला ते सादर करताच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अथवा विनिर्दिष्टित सहायक निवडणूक अधिकाऱ्याने अनुक्रमांक दिला पाहिजे. याकरीता निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यामध्ये उत्तम समन्वय असणे***

***आवश्यक आहे, जेणेकरुन एकच अनुक्रमांक कोणत्याही दोन नामनिर्देशनपत्राला दिला जाणार नाही.***

**८) प्राथमिक छाननी :** - नामनिर्देशनपत्र सादर करताक्षणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सदर नामनिर्देशपत्र हे तांत्रिकदृष्टया तपासणे बंधनकारक आहे. यामध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

**अ)** उमेदवाराचे **मतदार यादीतील नाव व अनुक्रमांक** मतदार यादीवरुन तपासणे. याबाबत सदर मतदार यादी ही अधिसूचित दिनांकास अस्तित्वात असलेली मतदार यादी आहे याची खात्री करावी.

**ब)** उमेदवाराने नामनिर्देशपत्रावर आपली **स्वाक्षरी** केली आहे किंवा नाही हे तपासणे.

**क)** उमेदवाराचे **वय २१ वर्षे** आहे किंवा नाही हे तपासणे.

**ड)** नामनिर्देशनपत्रावरील उमेदवाराची जात / जमात ही अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्ग यापैकी असल्याचे उमेदवाराने नमूद केले असल्यास नामनिर्देशनपत्रासोबत उमेदवाराने त्या **जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र (साक्षांकित प्रती) जोडले आहे** किंवा कसे? याबाबतची खात्री करावी. तसे वैधता प्रमाणपत्र नसल्यास आवश्यक ते **हमीपत्र** सादर करणे आवश्यक आहे.

**इ)** उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत आवश्यक ती **अनामत रक्कम रोखीने** जमा केली आहे याची खात्री करावी.

**फ)** नामनिर्देशपत्र स्विकारतांना नामनिर्देशनपत्रात नमूद आरक्षणाचा तपशिल आरक्षणाबाबतच्या **अनुसूची अ** (प्रभाग रचनेच्यावेळी प्रसिध्द केलेल्या) प्रमाणे तपासून घ्यावे

***वरील प्राथमिक तपासणी ही नामनिर्देशनपत्राची छाननी नसून ती उमेदवाराने नामनिर्देशनपत्र सादर करतांना करावयाच्या तांत्रिक पूर्ततेची तपासणी आहे व अशी पूर्तता करण्याबाबत उमेदवाराला त्वरित सूचित करण्यात येऊन त्याचेकडून तशी त्वरित पूर्तता करुन घेणेकरीता करावयाची आहे.***

***मात्र अत्यंत महत्वाच्या स्वरुपाचा नसेल अशा कोणत्याही कारणास्तव नामनिर्देशनपत्र नाकारता येणार नाही. (पहा नियम ११ (२अ))***

**९) मतदार यादीतील चुका :-** उमेदवाराचे मतदार यादीतील वय २१ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक आहे मात्र सबळ पुराव्यानिशी, उमेदवाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी असल्याचा आक्षेप घेतल्यास

त्याबाबत उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र केवळ त्यामुद्दयावर नाकारता येणार नाही. कारण उमेदवाराच्या नावांची मतदार यादीतील नोंद हा, अन्य कोणत्याही कारणाकरीता उमेदवार अपात्र ठरत नसल्यास, उमेदवार नामनिर्देशनपत्र सादर करण्यास / उमेदवारी दाखल करण्यास सक्षम असल्याचा अंतिम पुरावा असेल. (नियम ११ (३)) ***मतदार यादीतील चुकीच्या नोंदीबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे आक्षेप घेता येत नाही.***

१०) **पोचपावती तसेच छाननी व चिन्ह वाटपाची नोटीस देणे :-** नामनिर्देशनपत्र सादर केल्याबरोबर त्वरीत उमेदवाराच्या नावे नामनिर्देशनपत्राची पावती ज्यामध्ये ग्रामपंचायतीचे नाव, प्रभाग क्रमांक, आरक्षणाचा तपशिल, उमेदवाराचे नाव नामनिर्देशपत्राचा अनुक्रमांक, नामनिर्देशनपत्र सादर करण्याचा दिनांक व वेळ व सादर करणाऱ्या व्यक्तीचे नाव इ. तपशिल नमूद केलेला असावा व त्यावर नामनिर्देशनपत्र स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याची अर्थात निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक अधिकारी (जर अशा स.नि.अ. यांनी नामनिर्देशनपत्र स्विकारले असेल तर) यांचा दिनांकीत स्वाक्षरी व शिक्का असावा.

११) **नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाची घोषणापत्रे / शपथपत्रे /हमीपत्रे**

ग्रामपंचायत निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र सादर करतांना उमेदवारास २ घोषणापत्रे (declarations) दाखल करावी लागतील यापैकी १) गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याबाबत व मालमत्तेच्या तपशिलाबाबत असून त्यासंबंधी आयोगाकडील अधिसूचना दि. १५ मार्च, २००४ अन्वये सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच २) उमेदवाराच्या हयात अपत्यांच्या संख्येबाबत आहे. त्यासंबंधी सुचना आयोगाचे परिपत्रक दि. १२ जुलै, २००१ अन्वये देण्यात आल्या आहेत. त्यानुसार ग्रामीण भागात शपथपत्र दाखल करण्याकरिता येणा-या अडचणी विशेषतः स्टॅम्प पेपर उपलब्ध नसणे हे विचारात घेता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायत निवडणूकांकरिता निवडणूक लढविणारा उमेदवार शपथपत्राऐवजी निवडणूक निर्णय अधिका-यासमोर घोषणापत्र दाखल करेल.

ग्रामपंचायत अधिनियमातील सुधारणेप्रमाणे आरक्षित जागेची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र तसेच जातपडताळणी

समितीकडून प्राप्त झालेले जातप्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. असे वैधताप्रमाणपत्र सादर न केल्यास ते ४ महिन्याच्या आंत सादर करण्याचे हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

नामनिर्देशनपत्रासोबत निवडणूक अधिका-याने उमेदवारांना घोषणापत्राचा नमूना दयावा व सदर घोषणापत्र उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिका-यासमोर स्वाक्षरीत करुन दाखल करावे. **त्याप्रमाणे घोषणापत्र सादर न करणे हे राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाचे उल्लंघन समजले जाईल व त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी छाननीच्यावेळी नामनिर्देशनपत्र नाकारु शकेल.** अशाप्रकारे घोषणापत्र सादर केल्यानंतर सदर घोषणापत्राची प्रत अधिसूचनेत निवडणूक निर्णय अधिकारी नमूद केल्याप्रमाणे प्रसिध्द करेल.

**अ) गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याचे घोषणापत्र :-** सदर घोषणापत्र दिनांक १५ मार्च,२००४ च्या अधिसूचनेसोबतच्या जोडपत्र-२ मध्ये विहित केलेल्या नमून्यात असेल. (परिशिष्ट- III )

**ब) मालमत्ता व दायित्वे यांचे विवरणपत्र सादर करणे :-** सदर घोषणापत्र दिनांक १५ मार्च,२००४ च्या अधिसूचनेसोबतच्या जोडपत्र-२ मध्ये विहित केलेल्या नमून्यात असेल. ( परिशिष्ट- III)

**क) अपत्यांच्या संख्येबाबत शपथपत्र / घोषणापत्र :-** सदर घोषणापत्र दि. १२ जुलै, २००१ च्या परिपत्रकाच्या सोबतच्या नमुन्यात असेल. (परिशिष्ट - IV )

## १२) नामनिर्देशनपत्रासोबत भरावयाची अनामत रक्कम.

नियम १० नुसार (१) उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी नेमलेल्या तारखेस किंवा ज्या तारखेपूर्वी प्रत्येक उमेदवाराने निवडणूक अधिकाऱ्याकडे रोख **पाचशे रुपये** अनामत ठेवले पाहिजेत किंवा ठेवण्याची व्यवस्था केली पाहिजे:

### अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या उमेदवारासाठी अनामत रक्कम :-

एखाद्या मतदारसंघात अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी एक किंवा अनेक जागा राखून ठेवलेल्या असतील त्याबाबतीत, अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग असलेल्या उमेदवाराने किंवा त्यांच्या वतीने अशारीतीने अनामत ठेवावयाची रक्कम ही **शंभर रुपये** असेल.

**हया पोट-नियमात उल्लेखिलेली रक्कम अनामत ठेवल्याखेरीज कोणत्याही उमेदवाराचे योग्य रीतीने नामनिर्देशन झाले आहे असे समजता कामा नये. (नियम १०(१))**

(२) ज्या उमेदवाराने किंवा ज्यांच्या वतीने अशी रक्कम अनामत ठेवली असेल तो उमेदवार नियम १३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने आणि मुदतीच्या आत त्याची उमेदवारी मागे घेईल किंवा अशा उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नाकारण्यात आले असेल तर, यथास्थिती, अशा उमेदवारास किंवा ज्या कोणत्याही इसमाने रक्कम अनामत ठेवली असेल त्या इसमास अनामत रक्कम परत दिली पाहिजे आणि जर कोणताही उमेदवार मतदानाच्या प्रारंभापूर्वी मरण पावेल तर अशी अनामत ठेवलेली रक्कम (अ) ती जर त्याने अनामत ठेवलेली असेल तर त्याच्या वैध प्रतिनिधीस किंवा (ब) उमेदवाराने अनामत ठेवलेली नसेल तर ज्या इसमाने ती अनामत ठेवली होती त्या इसमास परत दिली पाहिजे.

(३) ज्या उमेदवाराने किंवा ज्याच्या वतीने रक्कम अशी अनामत ठेवलेली असेल तो उमेदवार निवडून आला नसेल आणि त्याला मिळालेली मते, देण्यात आलेल्या एकूण मतांच्या संख्येस निवडून द्यावयाच्या उमेदवारांच्या संख्येने भागल्यानंतर एक-अष्टमांशापेक्षा कमी असतील तर अनामत रक्कम राज्य सरकारकडे जप्त होईल.

(४) पोट-नियम (३) च्या प्रयोजनाकरिता देण्यात आलेल्या मतांची संख्या ही खराब झ ालेल्या मतपत्रिकांखेरीज इतर मोजणी केलेल्या मतपत्रिकांची संख्या आहे असे समजण्यात आले पाहिजे.

(५) पोट-नियम (१) अन्वये अनामत ठेवलेली रक्कम, पोट-नियम (२) अन्वये परत दिली नसेल व किंवा पोट-नियम (३) अन्वये जप्त करण्यात आली नसेल तर ती यथास्थिती उमेदवारास किंवा ज्या इसमाने रक्कम अनामत ठेवली होती त्या इसमास, नियम ३७ अन्वये निवडणुकीचा निकाल प्रसिध्द करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर परत दिली पाहिजे.

**ज्या मतदार संघात सदर राखीव जागा नसतील त्या ठिकाणी स्त्री, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे उमेदवार तसेच नागरीकांचा मागासप्रवर्गाचे उमेदवार यांना रु. ५०० अनामत रक्कम ठेवावी लागते. अनामत रक्कम उमेदवाराने स्वतः अगर त्याचे तर्फेने दुसऱ्या इसमाने ठेवली तरी चालते. परंतु अनामत रक्कम किती ठेवली यावरुन उमेदवार हा राखीव जागेसाठी किंवा साधारण जागेसाठी उभा आहे हे ठरवता येत नाही. त्यासाठी नामनिर्देशनपत्रात स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक आहे.**

**१३) उमेदवारास आचारसंहितेबाबत व खर्चाच्या हिशेबाबाबत सुचना :-**

नामनिर्देशनपत्र सादर करताच उमेदवारास आदर्श आचारसंहितेची बंधने लागू होतात. त्यामुळे अशा आचारसंहितेबाबत राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी दिलेल्या सुचना व आदेश याची उमेदवाराने काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे याची उमेदवाराला लेखी नोटीस, उमेदवाराने नामनिर्देशनपत्र सादर करताच देण्यात यावी व अशी नोटीस मिळाल्याची पावती घेण्यात यावी.

उमेदवाराने नामनिर्देशनपत्र दाखल केल्यापासून त्याने अथवा त्याच्यावतीने त्याच्या मतदान प्रतिनिधीने केलेल्या खर्चाचा हिशेब अद्ययावत ठेवावयाचा आहे आणि असा हिशेब नामनिर्देशनपत्र सादर केल्याच्या दिनांक व वेळेपासून निकाल जाहीर केल्याच्या दिनांकापर्यंत ठेवावयाचा आहे. ***असा हिशेब ठेवण्याकरीता विहित नमुन्याची (परिशिष्ट V) तरतुद करण्यात आली असून त्या नमुन्यातच खर्चाची नोंदवही उमेदवाराने ठेवावयाची आहे***. त्याकरीता नमुन्याची प्रत उमेदवाराला देण्यात यावी. तसेच त्याची एक साक्षांकित प्रत निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत निवडणूक निर्णय अधिकारी किंवा ग्रामपंचायत निवडणुकीच्याबाबतीत तहसिलदार यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे याची उमेदवाराला लेखी नोटीस, उमेदवाराने नामनिर्देशनपत्र सादर करताच देण्यात यावी व अशी नोटीस मिळाल्याची पावती घेण्यात यावी. (पहा आयोगाचे आदेश दि. ७/२/१९९५)

**१४) प्राप्त नामनिर्देशपत्रांची सूचना प्रसिध्द करणे :-** नामनिर्देशनपत्रे सादर करण्याच्या कालावधीत दररोज दुपारी ३.०० वाजेपर्यंत प्राप्त झालेल्या नामनिर्देशनपत्रांची सूचना दुपारी ३.०० नंतर निवडणूक कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावी. एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर केली असल्यास त्या सर्वांची अशी सूचना प्रसिध्द करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या घोषणापत्राची प्रत देखिल सूचना फलकावर लावण्यात यावी.

## प्रकरण ६
## नामनिर्देशन पत्राची छाननी

१) **निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने करावयाची छाननी :-** ही छाननी (scrutiny) निवडणूक नियम, १९५९ च्या नियम ११ व नियम १२ च्या तरतुदीनुसार असेल. व **अशी छाननी राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या दिनांकास निश्चित केलेल्या वेळेत व नमुना अअ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी निवडणूक निर्णय अधिकारी स्वतः करील.**

२) **प्रवेश :-** नामनिर्देशनपत्राची छाननी करण्यासाठी नेमलेल्या वेळी व ठिकाणी निवडणुकीस इच्छूक उमेदवार आणि अशा इच्छूक उमेदवाराने योग्य रितीने लेखी प्राधिकृत केलेल्या कोणतीही इतर (एक) व्यक्ती यांनाच फक्त हजर राहण्याचा हक्क असेल.

३) **उमेदवारांना द्यावयाची संधी** :- निवडणूक अधिकाऱ्याने, निवडणुकीस इच्छूक उमेदवारांच्या नामनिर्देशनपत्रांची पाहणी करण्यासाठी अशा व्यक्तिंना वाजवी सवलती दिल्या पाहिजेत.

४) **सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी करावी :-** निवडणूक अधिकाऱ्याने, सर्व नामनिर्देशनपत्रे प्राप्त झाल्याच्या क्रमानुसार ***अनुक्रमांकानुसार*** तपासली पाहिजेत आणि प्राप्त झालेले कोणतेही नामनिर्देशनपत्र छाननी केल्याशिवाय ठेवू नये. अर्थात एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर केली असली तरी त्या सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी करणे आवश्यक आहे.

५) **आक्षेप व संक्षिप्त चौकशी, कारणे नमूद करणे :-** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, कोणत्याही नामनिर्देशनपत्रावर त्याच्या समोर ज्या हरकती घेण्यात येतील त्या सर्व हरकतींचा निर्णय केला पाहिजे आणि त्याला आवश्यक वाटेल अशी संक्षिप्त चौकशी केल्यानंतर अशा हरकतीच्या आधारे किंवा स्वविवेकानुसार पुढीलपैकी कोणत्याही मुद्यावर नामनिर्देशनपत्र नाकारण्याचा त्यास अधिकारआहे.--

(१) उमेदवार अधिनियमांन्वये किंवा हया नियमान्वये निवडणुकीस अपात्र ठरविण्यात आला आहे किंवा तो पात्र नाही; किंवा

(२) हया नियमान्वये किंवा अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात उमेदवाराने कसूर केली आहे;

मात्र निवडणूक अधिका-याने, कोणतेही नामनिर्देशनपत्र, त्यात महत्वाच्या स्वरुपाचा नसलेल्या कोणत्याही दोषाच्या कारणास्तव नाकारता कामा नये.

(३) मतदारांच्या यादीत केलेल्या नोंदीची प्रमाणित प्रत हजर करणे हा, उमेदवार अपात्र आहे असे सिध्द करण्यात येईपर्यन्त, त्या नोंदीत नाव असलेल्या कोणत्याही मतदाराला निवडणुकीला उभे राहण्याच्या हक्काबद्दल निर्णायक पुरावा असेल.

कोणत्याही कारणासाठी नाकारण्यात येणाऱ्या प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर नाकारण्याची कारणे नमूद करावीत. नामनिर्देशनपत्राची छाननी ही **न्यायिक चौकशी** असल्याने अवैध ठरविण्यात आल्याशिवाय व तसे नमूद केल्याशिवाय प्रत्येक नामनिर्देशनपत्र वैधच समजण्यात येईल. त्यामुळे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्विकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत स्वत:च्या दिनांकित स्वाक्षरीने शेरा ठेवला पाहिजे आणि तसे उमेदवाराला छाननी झाल्यानंतर लगेच कळविले पाहिजे.

***नामनिर्देशनपत्र स्विकारताना निवडणूक निर्णय अधिका-याने आरक्षणाबाबत तपशिल प्रसिध्द अनुसूची अ प्रमाणे तपासून घ्यावा. तसेच नामनिर्देशनपत्रासोबत दाखल केलेली अनामत रक्कम व जातीचे प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्राचे पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, आवश्यक घोषणापत्रे, हमीपत्रे इ. तसेच उमेदवाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक इत्यादी बाबी तपासून घ्याव्यात.*** **( याबाबत नामनिर्देशनपत्र याबाबतचे प्रकरण पहावे)**

**६) नामनिर्देशनपत्रे नाकारण्यास अपूरी कारणे :-** नामनिर्देशनपत्रात तांत्रिक अथवा टंकलेखनाची अथवा लिखाणाची चूक असल्यास केवळ त्या कारणाकरीता नामनिर्देशनपत्र नाकारता येणार नाही.

त्याचप्रमाणे नामनिर्देशनपत्रातील ग्रामपंचायतीचे नाव, निवडणुकीचे वर्ष, उमेदवाराचे नाव, वय अथवा मतदार यादीचा भाग क्रमांक, अनुक्रमांक यामधील किरकोळ चुकांकरीता नामनिर्देशनपत्र नाकारता येणार नाही.

तसेच नामनिर्देशनपत्र सादर करणारा उमेदवार किंवा त्याचा कोणताही अधिकृत प्रतिनिधी छाननीचेवेळी उपस्थित नाही याकारणास्तव नामनिर्देशनपत्र नाकारता येणार नाही.

तसेच नामनिर्देशनपत्र छाननी करतांना अनामत रकमेची पावती तपासून बँकेत किंवा कोषागारात अशी अनामत रक्कम रोख भरल्याबाबत बँकेचा किंवा कोषगाराचा शिक्का व दिनांक तसेच रक्कम स्विकारणाऱ्या अधिकाऱ्याची स्वाक्षरी आहे याची खात्री करावी. अर्थात प्रत्येक नामनिर्देशनपत्र हे उपलब्ध सर्व कागदपत्रांच्या आधारे त्याच्या नियमाच्या तरतुदीनुसार छाननी

करण्यात येऊन त्याच्या गुणवत्तेनुसार स्विकारण्यात किंवा नाकारण्यात यावे व असा निर्णय लेखी नमूद करावा.

**७) नामनिर्देशनपत्रे नाकारण्यास पुरेशी कारणे :-**

*अ)* मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या अथवा निवडणूक नियमाच्या तरतुदीनुसार उमेदवार निवडणूकीस अपात्र ठरविण्यात आला आहे किंवा तो पात्र नाही. या कारणाकरीता नामनिर्देशन पत्र नाकारता येईल. (मात्र याबाबत निवडणूक निर्णय अधिका-यासमोर आवश्यक तो पुरावा सादर करण्यात आला पाहिजे.)

*ब)* निवडणूक नियमान्वये किंवा अधिनियमान्वये आवश्यक असल्याप्रमाणे कोणत्याही उपबंधाचे पालन करण्यात उमेदवाराने कसूर केले आहे तर उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नाकारता येईल.

**क)** *नामनिर्देशन पत्र मुदतीत हजर (सादर) केले नाही (सकाळी ११ ते दुपारी ३.००)*

**ड)** *नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यात नाही किंवा त्यावर स्वाक्षरी / अंगठ्याचा ठसा नाही.*

**इ)** *अनामत रक्कम दिली नाही किंवा पूर्ण दिली नाही किंवा विहित स्वरुपात दिली नाही किंवा मुदतीत दिली नाही याकरीता नामनिर्देशनपत्र नाकारता येईल.*

**फ)** *उमेदवार हा सदर ग्रामपंचायत क्षेत्रातील मतदार नाही व मतदार यादीत त्याचे नाव नाही.*

**ग)** *उमेदवाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी आहे.*

**च)** *नामनिर्देशनपत्र उमेदवार किंवा त्याचा लेखी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी या व्यतिरिक्त इतर व्यक्तीने सादर केले आहे किंवा उमेदवार व त्याचा लेखी प्राधिकृत केलेला प्रतिनिधी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचेव्यतिरिक्त इतर व्यक्तीकडे सादर केले आहे.*

**ह)** *उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सादर करावयाची शपथपत्रे / घोषणापत्रे हमीपत्र विहित मुदतीत सादर केलेली नाहीत*

***आय)*** *अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासप्रवर्ग या आरक्षित पदाच्या निवडणुकीकरीता उमेदवाराने नामनिर्देशनपत्र सादर केले असल्यास नामनिर्देशनपत्रासोबत तशा आरक्षित प्रवर्गात समावेश असल्याबाबतचा पुरावा म्हणून जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र (वैधता प्रमाणपत्र नसल्यास त्यासाठी अर्ज केल्याची पावती किंवा*

*पुरावा व हमीपत्र) सादर करणे आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र सादर केले नसल्यास नामनिर्देशनपत्र नाकारता येईल.*

***उमेदवाराने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्र दाखल केली असल्यास एक नामनिर्देशनपत्र वैध ठरले व इतर अवैध ठरली तरी उमेदवाराचे नामनिर्देशन / उमेदवारी वैध ठरेल.***

*अशाप्रकारे छाननी पूर्ण झाल्यानंतर त्वरीत निवडणूक निर्णय अधिका-याने स्वतः च्या दिनांकीत स्वाक्षरीने नामनिर्देशन पत्रावर नामनिर्देशनपत्र स्विकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत शेरा ठेवला पाहिजे व तसे उमेदवाराला कळविले पाहिजे.*

८) **छाननी पूर्ण करणे :-** नामनिर्देशनपत्राची छाननी ही सलग प्रक्रिया असून (continuous proccess) ती नेमून दिलेल्या दिवशी पूर्ण करावयाची आहे (नियम १२). निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्याच दिवशी प्रत्येक नामनिर्देशनपत्रावर ते स्विकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत शेरा लिहून स्वाक्षरी केली पाहिजे आणि नामनिर्देशनपत्र नाकारले असल्यास त्याची संक्षिप्त कारणे नमूद केली पाहिजे.

९) **वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी :-** सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी पूर्ण होताच आणि ती स्विकारल्याबाबत किंवा नाकारल्याबाबत निर्णय लिहून होताच निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने **सर्व वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी** (list of validly Nominated Candidates) तयार करुन ती रितसर नोटीसबोर्डावर तसेच ग्रामपंचायत कार्यालयावर व चावडीवर (चावडी नसल्यास मोक्याच्या सार्वजनिक ठिकाणी प्रसिध्द करावी) **(नियम १२).** अशी यादी **जोडपत्र-४** मध्ये विहित केलेल्या नमुन्यात असेल. यामध्ये एका उमेदवाराची एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे वैध (valid) ठरली असली तरी त्याचे नाव एकदाच येईल.

१०) **उमेदवारांच्या नावांत दुरुस्ती :-** वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये उमेदवाराचे नाव नामनिर्देशनपत्रात नमूद केल्याप्रमाणेच नोंदविण्यात यावे. अशी यादी प्रसिध्द करण्यात आल्यानंतर एखाद्या उमेदवाराने त्याचे नाव चुकीचे नमूद केले असल्याचे निदर्शनास आणून दिले तर त्याच्याकडून त्याचे म्हणणे लेखी स्वरुपात घेण्यात यावे आणि त्याच्या म्हणण्याची सत्यता पटल्यास त्याप्रमाणे आवश्यक ती दुरुस्ती यादीत करण्यात यावी.

***११) वैध अवैधतेच्या निर्णयाबाबत अपिल :-*** *स्विकारलेल्या किंवा नाकारलेल्या नामनिर्देशनपत्राविरुध्द निवडणूक निर्णय अधिकारी किंवा जिल्हाधिकारी, तहसिलदार इ. यांचेकडे अपील होत नाही. मात्र निवडणूकीच्या वैध /अवैधतेबाबत अधिनियमाच्या कलम १५ अन्वये निवडणूकीचा निकाल जाहीर झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसाच्या आत ज्या क्षेत्रात अशी निवडणूक झाली असेल किंवा झाली असती त्या क्षेत्रात सामान्यत: अधिकारीता असलेला दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांच्याकडे आणि जर दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नसेल तर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांच्याकडे अशा आक्षेपाचा निर्णय करण्यासाठी अर्ज करता येईल सदर निवडणूकीत मतदान करु शकेल असा मतदार किंवा उमेदवार किंवा जी व्यक्ती उमेदवार असु शकली असती अशी कोणतीही व्यक्ती सदर अपील / अर्ज करु शकेल.*

*तसेच अशा कोणत्याही निवडणुकीबाबत उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करता येईल.*

## अहवाल

छाननीअंती एखादया ग्रामपंचायतीच्या प्रभागात अथवा एखादया पदाकरिता प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशनपत्रे अवैध ठरल्यास/नाकारण्यात आल्यास व त्यामुळे सदर पद भरता येणे शक्य नाही अशी स्थिती निर्माण झाल्यास वस्तुस्थितीबाबतचा सविस्तर अहवाल त्वरीत राज्य निवडणूक आयोगाकडे फॅक्सवर/स्पिड पोष्टाने सादर करावा असा अहवाल कोणत्याही परिस्थितीत नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या अंतीम दिनांकाच्या दुस-या दिवसाच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत आयोगाच्या कार्यालयात प्राप्त होईल याची संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तसेच तहसिलदार यांनी दक्षता घ्यावी.

## प्रकरण ७
## उमेदवारी मागे घेणे

१) **उमेदवारी मागे घेण्याची नोटीस :-** याबाबतची कार्यपध्दती निवडणूक **नियम १३** च्या तरतुदीनुसार असेल. त्यानुसार कोणत्याही उमेदवारास **निवडणूक कार्यक्रमानुसार** उमेदवारी मागे घेण्यासाठी नेमलेल्या शेवटच्या दिवसाहून उशिराचा नसेल अशा दिवशी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेच्या दरम्यान त्याने सही केलेली अथवा अंगठ्याचा ठसा उमटवलेली लेखी नोटीस विहित नमुन्यात **जोडपत्र-५** निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्वाधीन करुन आपली उमेदवारी मागे घेता येईल. अशी नोटीस एकतर उमेदवारास स्वत: जातीने स्वाधीन करता येईल किंवा हया बाबतीत त्याने लेखी अधिकार दिलेल्या इसमाकडून स्वाधीन करता येईल आणि असा अधिकारी, त्या व्यक्तीची ओळख पटल्यानंतर, ती खूण किंवा अंगठयाचा ठसा हा त्याच व्यक्तीच्या अंगठयाचा ठसा किंवा खूण आहे असे साक्षांकीत करील **अशा निश्चित केलेल्या वेळेनंतर** उमेदवारी मागे घेण्यासंबंधी जी कोणतीही नोटीस दिली तर ती कोणत्याही प्रकारे परिणामक्षम असणार नाही. *त्याचप्रमाणे सार्वजनिक सुटीच्या दिवशी अशी उमेदवारी मागे घेण्याची नोटीस कोणासही देता येणार नाही व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास स्विकारता येणार नाही.*

नियम १३ च्या पोट-नियम (१) अन्वयेची उमेदवारी मागे घेण्यासंबंधी नोटीस मिळाल्यावर निवडणूक अधिकाऱ्याने त्यानंतर शक्य तितक्या लवकर, उमेदवारी मागे घेण्यासंबंधी नोटीस गावाच्या चावडीत आणि पंचायतीच्या कार्यालयात लावण्याची व्यवस्था केली पाहिजे. उमेदवाराने दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रापैकी एक नामनिर्देशनपत्र जरी मागे घेतले तरी त्याची उमेदवारी त्याने मागे घेतली असा अर्थ होईल.

*याबाबत असे निदर्शनास येते की, उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्राची छाननी पूर्ण झाल्यानंतरच उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देता येईल. अर्थातच नोटीस सर्व नामनिर्देशनपत्राची छाननी पूर्ण झाल्याच्या वेळेपासून उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी पूर्ण होईपर्यंत कोणताही उमेदवार आपली उमेदवारी मागे घेण्याची नोटीस देऊ शकतो. याबाबत आयोगाकडील निवडणूक कार्यक्रमात नमूद केलेला दिनांक व वेळ महत्वाची आहे. जर निवडणूक कार्यक्रम उमेदवारी मागे घेता येईल असे नमूद केले असेल तर त्या दिवशी त्याच कालावधीत (सकाळी ११ ते दुपारी ३) उमेदवारी*

*मागे घेता येईल. त्यापूर्वी किंवा नंतर नाही. अर्थातच नामनिर्देशनपत्रांच्या छाननीत नामनिर्देशन वैध ठरलेल्या उमेदवारासच नोटीस देता येईल.*

२) **नोटीसची पोचपावती :-** निवडणूक निर्णय अधिकारी अशी नोटीस मिळाल्यानंतर त्यावर त्वरीत नोटीस मिळाल्याची तारीख, वेळ व ठिकाण तसेच नोटीस स्वाधिन करणाऱ्या व्यक्तीचे नांव नमूद करील व आपली दिनांकित स्वाक्षरी करील. त्याचप्रमाणे उमेदवाराने अशी उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर उमेदवाराला त्याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून अशी नोटीस मिळाल्याची पोचपावती देण्यात येईल. या पोचपावतीवर नोटीस मिळाल्याचा दिनांक, वेळ व ठिकाण तसेच नोटीस स्वाधिन करणाऱ्या व्यक्तीचे नाव नमूद केलेली असेल.

३) **नोटीस रद्द करता येणार नाही :-** ज्या कोणत्याही व्यक्तीने आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधी नोटीस दिली असेल त्यास नोटीस रद्द करण्यास परवानगी देता कामा नये. अर्थात अशी नोटीस रद्द करता येत नाही.

४) **प्रसिध्दी :-** निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने अशी नोटीस प्राप्त होताच तिची प्रत त्वरीत त्याच्या कार्यालयीन नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करावी.

५) **निवडणूक चिन्हांचे वाटप :-** उमेदवारी मागे घेण्याचा कालावधी समाप्त होताच निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप केले जाईल. याबाबतची सविस्तर कार्यपध्दती यापुस्तिकेतील पुढील प्रकरणात दिली आहे.

६) **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी :-** उमेदवारी मागे घेण्यासाठी नियम १३ मध्ये तरतूद केलेली मुदत संपल्यावर निवडणूक अधिकाऱ्याने, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची म्हणजेच वैधरित्या नामनिर्देशीत केलेल्या उमेदवारांच्या यादीत ज्यांचा समावेश केलेला आहे असे उमेदवार आणि ज्यांनी उक्त मुदतीत आपली उमेदवारी मगे घेतलेली नाही असे उमेदवार यांची यादी तयार केली पाहिजे आणि ती, निवडणुकीसाठी नेमलेल्या तारखेपूर्वी किमान पाच दिवस आधी, ग्रामपंचायतीच्या कार्यालयात आणि गावाच्या चावडीत आणि गावात कोणतीही चावडी नसल्यास, गावातील कोणत्याही ठळक सार्वजनिक ठिकाणी लावली पाहिजे किंवा लावण्याची व्यवस्था केली पाहिजे. उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम दिनांकाच्या दिवशी दुपारी ३.०० नंतर ताबडतोब **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी (जोडपत्र-६ मध्ये)** विहित केलेल्या केलेल्या नमुन्यात तयार करण्यात यावी. ही यादी नामनिर्देशित उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे वैध (valid)

ठरविण्यात आली आहेत आणि ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही अशा उमेदवारांची **नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या नावांची मराठी वर्णानुक्रमानुसार आरक्षणनिहाय** केलेली यादी असेल. त्यामध्ये उमेदवाराचे नामनिर्देशनपत्रात नमूद केलेले नाव, पत्ता तसेच त्यात उमेदवाराला दिलेल्या निशाणीचे नाव नमूद केलेले असेल व त्या खाली निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची दिनांकासहीत स्वाक्षरी असेल अशी यादी ग्रामपंचायतीच्या कार्यालयात, गावाच्या चावडीवर किंवा चावडी नसल्यास कोणत्याही ठळक सार्वजनिक ठिकाणी लावली पाहिजे किंवा लावण्याची व्यवस्था केली पाहिजे. अशी प्रसिध्दी निवडणूक नियम १४ च्या तरतुदीनुसार मतदानाच्या दिवसापूर्वी किमान ५ दिवस अगोदर प्रसिध्द करण्यात आली पाहिजे. **अशी यादी तयार करतांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने विशेष काळजी घेणे आवश्यक आहे कारण या यादीच्या आधारे मतपत्रिकेची छपाई करावयाची असते. त्यामुळे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी ही अचूक असणे महत्वाचे आहे.**

**७) कागदपत्रांची सुरक्षितता :-** नामनिर्देशनपत्रे आणि त्यासंबंधी सर्व कागदपत्रे तसेच छाननी व उमेदवारी मागे घेण्याबाबतची सर्व कागदपत्रे ही एका लिफाफ्यात एकत्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या दिनांकीत सही व शिक्का / मोहर यांनी सीलबंद करुन ठेवली पाहिजेत.

***८) निवडणूक प्रतिनिधींची नेमणूक :-*** *निवडणूक प्रतिनिधी नेमणे हे उमेदवारावर बंधनकारक नाही. मात्र बऱ्याचवेळा उमेदवाराच्या निवडणूक प्रचारात व निवडणूकविषयक कामात त्यास मदत करण्याकरीता उमेदवाराकडून निवडणूक प्रतिनिधीची नेमणूक केली जाते अशावेळी असा निवडणूक प्रतिनिधी नेमल्याबाबत उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास रितसर व औपचारीकरित्या कळविणे आवश्यक आहे आणि त्यानंतर अशा निवडणूक प्रतिनिधीच्या नेमणुकीस निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मान्यता दिल्यास तसे उमेदवाराला कळविण्यात येऊन निवडणूक प्रतिनिधीला देखील निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने व शिक्क्यानिशी अशा प्रतिनिधीचा फोटो असलेले ओळखपत्र देण्यात यावे. अशी नेमणूक फक्त एकदा बदलता येऊ शकेल.*

*निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करतांना उमेदवाराने व अशा प्रतिनिधीच्या नेमणुकीस मान्यता देतांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने, शक्यतो गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या व्यक्तिची अशी निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमणूक करण्यात येणार नाही अशी दक्षता घ्यावी.*

९) **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना ओळखपत्रे देणे :-** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सही शिक्क्यानिशी छायाचित्रासहीत ओळखपत्रे देण्यात यावीत.

१०) ***भ्रष्ट आचरण व निवडणूक विषयक गुन्हे याबाबत उमेदवारांना अवगत करणे :-*** *निवडणूक आचारसंहिता ही प्रत्यक्षात निवडणूक कार्यक्रम राज्य निवडणूक आयोगाकडून जाहीर झाल्यापासून अंमलात येत असते मात्र निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची निश्चिती झाल्यानंतर आचारसंहिता भंग होण्याची शक्यता अधिक वाढते आणि त्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये याबाबत उमेदवारांनी दक्षता घ्यावी. याकरीता राज्य निवडणूक आयोगाच्या आचारसंहितेबाबतच्या सुचना तसेच भ्रष्ट आचरण आणि निवडणूक विषयक गुन्हे याबाबत भारतीय दंडसंहितेच्या अंतर्गत तरतुदी या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या निदर्शनास आणून द्याव्यात* ***(पहा आयोगाच्या आदर्श आचारसंहिता बाबतच्या सूचना दि. २९ मार्च, २००४ )***

११) ***उमेदवार व निवडणूक प्रतिनिधींच्या नमूना स्वाक्षऱ्या :-***

*उमेदवार किंवा त्याचा निवडणूक प्रतिनिधी यांच्या स्वाक्षरीने मतदान प्रतिनिधीच्या नेमणुकीबाबत पत्रव्यवहार करण्यात येत असल्याने उमेदवार व निवडणूक प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्यांचे नमुने रितसर घेण्यात येऊन निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सर्व मतदान केंद्राध्यक्षांना त्याची प्रत देण्याची व्यवस्था करावी, जेणेकरुन मतदान केंद्राध्यक्षाला उमेदवार व / किंवा त्याचा मतदान प्रतिनिधी याच्यावतीने सादर करण्यात येणाऱ्या अर्ज किंवा कागदपत्र यावरील स्वाक्षरी अशा नमुन्या स्वाक्षरीशी पडताळून घेणे शक्य होईल.*

मतनोंदणीसाठी नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या दिवशी निवडणूक अधिकाऱ्याने, ठरविलेल्या दिवशी ठरविलेल्या वेळेच्या दरम्यान आणि ठरविलेल्या मतदान केंद्रावर सर्व मतदारांनी हजर रहावे अशी गावात दवंडी पिटवून नोटीस देण्याची व्यवस्था केली पाहिजे.

### ***अहवाल***

***उमेदवारी मागे घेण्याच्या अंतीम दिनांकास एखादया ग्रामपंचायतीच्या एखाद्या प्रभागात अथवा एखादया पदाकरिता प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशनपत्रे मागे घेण्यात आल्यास अथवा एक उमेदवार सोडून उर्वरित सर्व उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्यास वस्तुस्थितीबाबतचा सविस्तर अहवाल त्वरीत राज्य निवडणूक आयोगाकडे फॅक्सवर/स्पिड पोष्टाने सादर करावा. अशा स्थितीत राज्य निवडणूक आयोगाचे परिपत्रक दिनांक २३/१२/२००४ मध्ये दिलेल्या सूचनांनुसार उर्वरित उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यापुर्वी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.***

### मतदानापूर्वी उमेदवाराचा मृत्यू

नियम १४-अ नुसार निवडणूक लढविणारा उमेदवार मरण पावले आणि त्याच्या मृत्यूचे प्रतिवृत्त निवडणूक अधिकाऱ्यास मतदान प्रारंभ होण्यापूर्वी मिळेल तर निवडणूक अधिकाऱ्याने, उमेदवाराच्या मृत्यूबाबत त्याची खात्री झाल्यानंतर, मतदानासंबंधी प्रत्यादेश दिला पाहिजे व ती गोष्ट राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास कळविली पाहिजे आणि त्या निवडणुकीसंबंधातील कामकाज सर्व बाबतीत नवीन निवडणूक असल्याप्रमाणे नव्याने सुरु करण्यात आले पाहिजे.

परंतु- मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्याच्या वेळी जो इसम निवडणूक लढविणारा उमेदवार होता अशा इसमाच्या बाबतीत आणखी नामनिर्देशनपत्राची आवश्यकता असणार नाही, आणि

मतदानासंबंधी प्रत्यादेश देण्यापूर्वी ज्याने नियम १३, पोट-नियम (१) अन्वये आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दलची नोटीस दिली असेल असा कोणताही इसम, मतदानासंबंधी असा प्रत्यादेश दिल्यानंतर, निवडणुकीकरीता उमेदवार म्हणून नामनिर्दिष्ट केला जाण्यास अपात्र असणार नाही.

***या तरतुदीनुसार प्रत्यादेश देण्याच्या वेळेपावेतो प्राप्त झालेली नामनिर्देशनपत्रे व प्रत्यादेश दिल्यानंतर आलेली इतर नामनिर्देशनपत्रे यांचा सर्वांचा विचार छाननीच्या वेळी करणे आवश्यक राहील याविषयी नोंद घ्यावी.***

<u>अहवाल</u>

१) मतदानापुर्वी उमेदवाराचा मृत्यु झाल्यास व मतदानाबाबत प्रत्यादेश दिल्यास, त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्यादेशाच्या प्रतीसह राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात दुस-या दिवशी दुपारी १२.०० वाजेपर्यंत मिळेल अशाप्रकारे फॅक्सद्वारे किंवा खास दुतामार्फत सादर करावा.

२) उमेदवारी मागे घेण्याच्या अंतीम दिनांकास एखादया ग्रामपंचायतीच्या एखाद्या प्रभागात अथवा एखादया पदाकरिता प्राप्त झालेली सर्व नामनिर्देशनपत्रे मागे घेण्यात आल्यास अथवा एक उमेदवार सोडून उर्वरित सर्व उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्यास वस्तुस्थितीबाबतचा सविस्तर अहवाल . आयोगाचे परिपत्रक दिनांक <u>२३/१२/२००४</u> मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, त्वरीत राज्य निवडणूक आयोगाकडे फॅक्सवर/स्पिड पोष्टाने सादर करावा उर्वरित उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यापुर्वी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

## प्रकरण ८
## निवडणूक चिन्हे वाटप.

**याबाबतची कार्यपध्दती निवडणूक नियम १६ च्या तरतुदीनुसार असेल व त्यानुसार लढवावयाच्या प्रत्येक निवडणुकीच्या बाबतीत राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या चिन्हांपैकी कोणतेही एक चिन्ह निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवारास नेमून देईल**

**परंतु, निवडणूक अधिका याच्या मते तसे करणे आवश्यक असेल तर, राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या चिन्हांच्या सूचीमध्ये भर टाकता येईल व तो तसे केल्याचे राज्य निवडणूक आयोगाला तात्काळ कळविल.**

*मात्र सदर चिन्हे ही राज्य निवडणूक आयोगाने मंजूर केलेल्या मुक्त चिन्हांच्या अद्ययावत सूचीमध्ये असलेली चिन्हे असतील.*

याबाबत विशेष नोंद घेण्याची बाब अशी की, ग्रामपंचायत निवडणुकीत एकाच उमेदवारास एकापेक्षा जास्त प्रभागातून निवडणूक लढविता येते. मात्र निवडणूक निर्णय अधिकारी एकाच प्रभागात एकापेक्षा जास्त उमेदवारास (वेगवेगळ्या वर्गवारीतून निवडणूक लढविणारे सर्व उमेदवार विचारात घेऊन) एकच चिन्ह देता येणार नाही. **(पहा आयोगाचे आदेश दि. २१/८/२००७) (परिशिष्ट II)** त्याचप्रमाणे उमेदवाराने चिन्हांचा प्राधान्यक्रम देण्याची अथवा विशिष्ट चिन्हाची मागणी करण्याची नियमात तरतूद नाही. ही बाब पुर्णतः निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या अधिकारात असेल त्यामुळे एक दोन किंवा तिन चिन्हांची अनेक उमेदवारांनी मागणी करण्याचा किंवा प्राथम्यक्रमानुसार चिन्हांचे वाटप करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तसेच ग्रामपंचायत या राजकिय पक्षनिहाय लढविल्या जात असल्याने अधिकृतपणे कोणत्याही राजकिय पक्षाला अशी निवडणूक लढविता येत नाही. त्यामुळे या निवडणूकांत राजकिय पक्ष, आघाडी, पॅनेल इत्यादींना स्थान नाही व त्यांना चिन्ह वाटपात कोणतेही विशेष प्राधान्य किंवा सवलती अथवा अधिकार नाहीत.

निवडणूक निर्णय अधिका-याने चिन्हे नेमुन देतांना केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर इतिवृत्त तयार करावे व त्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावी.

### मतदानापूर्वी घ्यावयाची दक्षता

**प्रचाराची मुदत -** ग्रामपंचायत निवडणुकांत प्रचाराची मुदत मतदानाचे दिनांकापूर्वी २४ तास अगोदर संपुष्टात येते अर्थात मध्यरात्री १२ नंतर दिनांक बदलत असल्याने एक दिवस अगोदर अर्थात

मतदानाच्या दिनांकापूर्वीच्या मध्यरात्रीपूर्वी २४ तास प्रचार समाप्त होईल. उदा. दि. ११ नोव्हेंबर ला मतदान असेल तर प्रचार ९ नोव्हेंबर च्या मध्यरात्री १२.०० वाजता समाप्त होईल. सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पिकर करणे इ. चा वापर रात्री १०.०० नंतर करण्यास बंदी असल्याने तसा वापर रात्री १०.०० नंतर करता येणार नाही. याबाबत सर्व उमेदवारांना अवगत करण्यात यावे.

२) विभेदक चिन्हे / पितळी सिले इ. चा आयोगाच्या सूचना दि. १५ मार्च, १९९६ नुसार विभेदक चिन्हे व पितळी सिले वापरण्यात यावीत. पितळी सिले विभागीय आयुक्त किंवा संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून पुरविण्यात येतील.

३) न पुसणारी शाई (Indelliable Ink) ही शाई आयोगाने प्राधिकृत केलेल्या Mysore Paints या कंपनीकडूनच विकत घेण्यात यावी.

**पत्ता** Mysore Paints & Varnish Ltd.
New Bannimantat Extension,
Mysore, Karnataka State 570 015
Ph.No 0821-2493831 / 2497469
Fax No. 0821- 2499466

याबाबत आयोगाचे क्र.रानिआ/मनपा २०१०/प्र.क्र.१०/का.५ दि. १९.११.२०११ चे सुधारीत आदेश पहावे

४) ग्रामपंचायत निवडणुकांत निवडणूक खर्चाची मर्यादा प्रती उमेदवार रु. ७,५००/- इतकी आहे. त्याचा हिशोब उमेदवाराने ठेवावयाचा असून निकाल जाहीर केल्यापासून ३० दिवसात तहसिलदारास सादर करावयाचा आहे. (पहा आयोगाच्या सूचना दि. ७/२/१९९५) - सुधारीत आदेश क्र. रानिआ/मनप/2006/प्र.क्र.१७/का.५ दि. 30/7/2011 अन्वये सदर खर्चाची मर्यादा रु.२५,०००/- करण्यात आली आहे. सर्व आदेश आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे.

# प्रकरण ९
## बिनविरोध निवडणूक

याबाबतची कार्यपध्दती निवडणूक नियम १५ च्या तरतुदीनुसार राहील व त्यानुसार ज्या मतदार संघात (अनु. जाती किंवा अनु. जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा स्त्रिया) यासाठी कोणतीही जागा राखून ठेवण्यात आली नसेल अशा कोणत्याही मतदार संघात-

**(एक)** वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची संख्या ही भरावयाच्या जागांच्या संख्येइतकी असेल तर, अशा रीतीने नामनिर्देशित केलेले उमेदवार मतदान न घेता निवडून आले आहेत असे निवडणूक अधिकाऱ्याने जाहीर केले पाहिजे;

**(दोन)** योग्यरित्या नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची संख्या ही, भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, अशारीतीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवार योंग्य रितीने निवडून आले आहेत असे निवडणूक अधिकाऱ्याने जाहीर केले पाहिजे आणि उरलेल्या जागांच्या संबंधात, किंवा कोणातही उमेदवार योग्य रितीने नामनिर्दिष्ट केलेला नसेल तर सर्व जागांच्या संबंधात, पद धारण करण्यास तयार असलेल्या उमेदवारांच्या आवश्यक संख्ये अभावी कलम १०, पोट-कलम (३) च्या अर्थाप्रमाणे निवडणूक घेण्यात आली नव्हती असे समण्यात आले पाहिजे;

**(तीन)** योग्य रितीने नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची संख्या ही, भरावयाच्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर, रिकाम्या जागा भरण्यासाठी हया नियमात तरतूद केलेल्या रितीने मते घेतली पाहिजेत.

**(२)** ज्या विभागात अनु. जाती किंवा अनु. जामती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा स्त्रिया यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या असतील अशा कोणत्याही विभागातील प्रत्येक राखीव जागा भरण्यासाठी पात्र असलेल्या उमेदवारांची संख्या निवडणूक अधिकाऱ्याने निश्चित केली पाहिजे आणि त्यांनतर त्याने पुढीलप्रमाणे कामास लागले पाहिजे:-

(एक) राखीव जागांपैकी कोणतीही राखीव जागा भरण्यासाठी निवडले जाण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या, अशा जागांच्या संख्येइतकी असेल तर, असे पात्र ठरलेले सर्व उमेदवार हे, अनुक्रमे राखीव जागा भरण्यासाठी निवडण्यात आले आहेत, असे निवडणूक अधिकाऱ्याने जाहीर केले पाहिजे;

(दोन) राखून ठेवलेल्या जागांपैकी कोणतीही जागा भरण्यासाठी निवडले जाण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या. अशा जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, असे सर्व उमेदवार हे, अनुक्रमे राखीव जागा भरण्यासाठी योग्य रीतीने निवडून आल्याचे ताबडतोब जाहीर केले पाहिजे; आणि उरलेल्या अशा राखीव जागांच्या संबंधात, पद धारण करण्यास तयार असलेल्या उमेदवारांच्या आवश्यक संख्येअभावी, कलम १० पोट-कलम (३) च्या अर्थाप्रमाणे निवडणूक घेण्यात आली नव्हती असे समजण्यात आले पाहिजे.

(३) पोट-नियम (२) यात उल्लेख केलेल्या अशा कोणत्याही विभागात-

**(एक)** त्या पोट-नियमान्वये व्यवस्था लावण्यात न आलेल्या सर्व उरलेल्या जागा राखून न ठेवलेल्या जागा असतील तर, त्या जागा पोट-नियम (१) मध्ये तरतूद केलेल्या रितीने भरण्यात आल्या पाहिजेत.

**(दोन)** त्या पोट-नियमान्वये आणि व्यवस्था लावण्यात न आलेल्या उरलेल्या जागांत कोणत्याही राखीव जागांचा समावेश असेल तर-

**(अ)** हया उरलेल्या जागांसाठीच्या उमेदवारांची जर एकूण संख्या ही अशा जागांच्या संख्येइतकी असेल आणि अशा उरलेल्या राखीव जागा भरण्यासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची त्यात समाविष्ट असलेली संख्या अशा जागांच्या संख्येपेक्षा जास्त असेल तर, अनुक्रमे पुन्हा भरावयाच्या जागांसाठी निवडून आल्याचे जाहीर करावयाचे उमेदवार हे, निवडणूक अधिकाऱ्याने, अनुक्रमे राखीव जागांसाठी निवडून येण्यास पात्र ठरलेल्या उमेदवारांमधून तो ठरविला अशारीतीने त्याने चिठ्ठया टाकून प्रथम निवडले पाहिजेत आणि त्यानंतर त्याने, अशारीतीने निवडून आलेले उमेदवार, भरावयाच्या राखीव जागांसाठी योग्यरीतीने निवडून आल्याचे जाहीर केले पाहिजे आणि त्यांनतर उरलेले उमेदवार हे, उरलेल्या जागा भरावयासाठी योग्यरीतीने निवडून आलेले उमेदवार असल्याचे जाहीर केले पाहिजे; किंवा

**(ब)** हया उरलेल्या जागांसाठीच्या उमेदवारांची जर एकूण संख्या ही आणि तीत समाविष्ट असलेली, राखीव जागा भरावयास पात्र ठरलेल्या उमेदवारांची संख्या ही, अनुक्रमे अशा उरलेल्या जागांची संख्या व तीत समाविष्ट असलेली राखीव जागांची संख्या यापेक्षा अधिक असेल तर, सर्व जागा भरण्यासाठी हया नियमात निर्दिष्ट केलेल्या रीतीने मतदान घेतले पाहिजे.

## प्रकरण १०
## मतदानाची तयारी

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये २००५ च्या सुधारणेद्वारे कलम ११ मध्ये सुधारणा करण्यात येऊन कलम ११ (३ क) सेक्शन ११(३A) समाविष्ठ करण्यात आले आहे. त्यानुसार निवडणुकीमध्ये मतदान मतपेटीद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे घेण्यात येईल अशी तरतूद केली आहे. अर्थात राज्य निवडणूक आयोग वेळोवेळी आदेश देईल त्यावेळी त्या जिल्ह्यात किंवा तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यात येईल. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान याबाबतच्या सूचना या हस्तपुस्तिकेच्या प्रकरण क्रमांक १४ पासून १९ पर्यंत पहाव्यात.**

### मतपत्रिकेद्वारे मतदान
### निवडणूक साहित्य व मतपेट्या

याबाबतची कार्यवाही नियम १९ च्या तरतुदीनुसार राहील. *याबाबत तहसिलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ग्रामपंचायत निवडणुकीसंबंधीत अधिकाऱ्याने लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी वापरण्यात येणाऱ्या मतपेट्या ग्रामपंचायत निवडणुकीकरिता वापरण्याविषयी मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य तथा प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या कार्यालयाकडून वेळीच परवानगी घेण्यात यावी.*

*तसेच महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाकडून सदर निवडणुकीकरिता आवश्यकतेनुसार अनुदानाची मागणी त्वरित करण्यात यावी. याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने ग्राम विकास विभागाशी वेळोवेळी संपर्क साधून आवश्यकतेनुसार अनुदान मंजूर होईल याची दक्षता घ्यावी.*

*मतदानाच्यावेळी वापरावयाची शाई (indelible ink) राज्य निवडणूक आयोगाकडून वेळोवेळी प्राधिकृत केलेल्या पुरवठादाराकडून आवश्यकतेनुसार व वेळीच मागविण्यात यावी व कोणत्याही परिस्थितीत वापरण्यायोग्य शाईच मतदान केंद्रावर वापरली जाईल याची दक्षता घ्यावी.*

*सदर साहित्य मतपेटी यासोबत मतदार यादी व मतपत्रिका निवडणुक निर्णय अधिका-याने मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात देतांना सदर मतपत्रिका व मतदार यादी संबंधित मतदान केंद्राशीच संबंधित असल्याची खात्री करुन घ्यावी व मतदान केंद्राध्यक्षाची देखील खात्री करुन दयावी तसेच मतदार यादी व मतपत्रिका यांची सुस्थितीत ताब्यात मिळाल्याबाबत पोच घ्यावी.*

**मतपत्रिकेचा नमुना :** नियम १७ मध्ये नमूद तरतुदीनुसार

((१) प्रत्येक मतपत्रिकेस स्थळप्रत जोडलेली असेल, आणि उक्त मतपत्रिका व स्थळप्रत ही, निवडणूक आयोग निदेश देईल अशा नमुन्यात असेल, आणि त्यातील तपशील आयोग निदेश देईल अशा नमुन्यात, आणि आयोग निदेश देईल अशा भाषेत किंवा भाषेमध्ये असेल.)

(२) उमेदवारांची नावे, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये ती ज्या क्रमाने दर्शविण्यात आली असतील त्याच क्रमाने मांडण्यात येतील व अशी नावे नियम १६ अन्वये प्रत्येक उमेदवारास नेमूद दिलेल्या ओळख चिन्हांसह नमूद केली पाहिजे.

(३) जर दोन किंवा त्याहून अधिक उमेदवार एकच नाव धारण करीत असतील तर, त्यांचा व्यवसाय किंवा निवासस्थान जादा दर्शवून किंवा अन्य कोणत्याही रीतीने त्यांच्यातील फरक दर्शविण्यात येईल.

**मतपत्रिकेचा सुधारीत नमुना**

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम १७ च्या सुधारीत तरतुदीनुसार ग्रामपंचायत निवडणुकीसाठी मतपत्रिका ही राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यात असेल. त्यानुसार दि. १८ फेब्रुवारी, २००६ च्या राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २० फेब्रुवारी, २००६ च्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या आदेशानुसार मतपत्रिकेचा नमुना निश्चित करण्यात आला आहे. (पहा परिशिष्ट VI) सदर आदेशाच्या आवश्यक तरतूदी पुढे नमूद केल्या आहेत :-**

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या नावानुसार, त्यांची नावे अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत तसेच मतपत्रिकेवर मराठी वर्णमालेच्या वर्णानुक्रमानुसार नमूद करावयाची आहेत. उमेदवारास मतपत्रिकेवर त्याचे नाव ज्या पध्दतीने, अर्थात उपनाव किंवा उपाधी इत्यादीसह मतपत्रिकेवर यावे असे वाटत असेल, तसे त्यांनी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी व वेळेपूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांना लेखी कळवावे. मात्र उमेदवारांनी दिलेली उपाधी, उपनाव इत्यादीचा नावांचा वर्णानुक्रम लावताना विचार करता येणार नाही. अर्थात उमेदवारांचे नामनिर्देशनपत्रावरील नावानुसार सर्व उमेदवारांचा वर्णानुक्रम लावल्यानंतर मतपत्रिकेवर नाव छापताना त्याची उपाधी आवश्यकतेनुसार लावण्यात येईल.

**मतपत्रिका:-** प्रत्येक प्रभागातील २ किंवा ३ जेवढया जागा निवडून द्यावयाच्या असतील, त्यानुसार त्या प्रभागात **आरक्षणाच्या वर्गवारीप्रमाणे वेगवेगळया रंगाची मतपत्रिका** छापण्यात येईल. {उदा. (१) जर एखादया प्रभागात तीन जागा भरावयाच्या असतील आणि त्यापैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी , एक जागा अनुसूचित जमातीसाठी व एक जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित असेल तर त्या प्रभागासाठी तीन वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका असणे आवश्यक आहे. उदा. (२) जर तीन जागांपैकी दोन जागा सर्वसाधारण (खुल्या) वर्गासाठी असतील व एक जागा अनुसूचित जमातीसाठी असेल तर दोन सर्वसाधारण जागांसाठी एक समाईक मतपत्रिका व अनुसूचित जमातीसाठी एक वेगळी मतपत्रिका अशा दोन निरनिराळया रंगाच्या मतपत्रिका असतील. उदा. (३) तीन जागांपैकी दोन जागा अनुसूचित जाती व एक जागा अनुसूचित जाती स्त्रिसाठी आरक्षित असेल तर अनुसूचित जातीच्या दोन जागांसाठी एका रंगाची समाईक मतपत्रिका व अनुसूचित जाती स्त्रीसाठी एक त्याच रंगाची वेगळी मतपत्रिका असेल.}

**मतपत्रिकांचे रंग:-** वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता प्रत्येक प्रभागातील आरक्षणानुसार वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका तयार करण्यात येतील. याकरीता प्रत्येक वर्गवारीनुसार मतपत्रिकांचा रंग खालील प्रमाणे राहिल.

**(अ) अनुसूचीत जातीच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका गुलाबी रंग**

**(ब) अनुसूचीत जमातीच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका हिरवा रंग**

**(क) नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका पिवळा रंग**

**(ड) सर्वसाधारण जागेसाठी मतपत्रिका - पांढरा रंग**

अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील **स्त्री राखीव** व नागरिकांचा मागास प्रवर्ग मधील **स्त्री राखीव** जागेकरीता तसेच सर्वसाधारण **स्त्री राखीव** जागेकरीता त्या त्या वर्गाकरीता निश्चित केलेल्या रंगाची मतपत्रिका राहिल.

मात्र अशावेळी **"स्त्री राखीव"** असे ठळक अक्षरात प्रतिपत्रावर आणि मतपत्रिकेवर निश्चित केलेल्या जागी छापलेले असेल.

मतपत्रिकांच्या वरील रंगाना पूर्व प्रसिध्दी देण्यात यावी, जेणेकरुन प्रत्येक वर्गवारीकरीता मतपत्रिकेचा रंग कोणता आहे त्याची माहिती उमेदवारांना, मतदारांना / जनतेला होईल.

मतपत्रिका व मतपेटीद्वारे मतदान करावयाच्यावेळी वापरावयाची मतपत्रिक वर नमूद केल्याप्रमाणे आरक्षणनिहाय वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका छापतांना त्यांचे आकारमान व त्यावरील तपशिल खालीलप्रमाणे असेल.

**स्थळप्रत/प्रतिपत्र/(counterfoil):-** मतपत्रिकेला संलग्न प्रतिपत्र/ स्थळप्रत

( counterfoil ) असेल. सदर प्रतिपत्र (counterfoil) मतपत्रिकेच्या वरच्या बाजूस असेल आणि तिची उंची ( length ) ५ से.मी. पेक्षा अधिक असणार नाही.

मतपत्रिकेची व काऊंटर फॉईलची रुंदी १० से.मी. पेक्षा अधिक असणार नाही. काऊंटर फॉईल वर खालील बाबी असतील.

अ) सर्वात वरच्या बाजूस मतपत्रिका सर्व एकत्रित ठेवण्यासाठी मध्यभागी स्टेपल करण्यासाठी / टाचण्यासाठी जागा असेल.

ब) काऊंटर फॉईलच्या सर्वात वर १ से.मी. जाडीची काळया रंगाची किनार राहिल.

क) काऊंटर फॉईल वर (ब) च्या लगतखालच्या बाजूला ग्रामपंचायतीचे नाव, प्रभाग क्रमांक, तालुका, जिल्हा व सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक हा तपशिल व वर्ष तसेच आरक्षणाची वर्गवारी असे नमूद केलेले असेल. स्त्री राखीव आरक्षणाचे बाबतीत "स्त्री राखीव" असे नमूद केलेले असेल.

ड) मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक डाव्या बाजूस तसेच मतदाराची सही / अंगठयाचा ठसा याकरीता उजव्या बाजूस पुरेशी जागा काऊंटर फॉईल वर असेल. मतपत्रिकेचा अनुक्रमांक काऊंटर फॉईल वर डाव्या बाजूस खालच्या कोपऱ्यात नमूद केला जाईल.

ई) मतपत्रिका काऊंटर फॉईल पासून वेगळी करण्याकरीता १ से.मी. रुंदीची तुटकतुटक रेषांची पट्टी/ब्लॉक, काऊंटर फॉईल च्या सर्वात तळाशी असेल, त्यामध्ये छिद्रांकीत पट्टी वेजक / परफोरेटेड रुल (perforated rule) समाविष्ट असेल.

**मतपत्रिकेचा आकारः-** अ) मतपत्रिकेच्या सर्वात वर १ से.मी. जाडीची काळया रंगाची ठळक पट्टी/किनार असेल.

ब) मतपत्रिकेवर पहिल्या छायायुक्त/रेषांकीत भागात ग्रामपंचायतीचे नाव, तालुका, जिल्हा व प्रभाग क्रमांक आणि सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक इत्यादी तपशिल वर्षासह नमूद केलेले असेल. तसेच आरक्षणाची वर्गवारी नमूद केलेली असेल. डाव्या बाजूस मतपत्रिकेचा अनुक्रमांक नमूद केलेला असेल. स्त्री राखीव आरक्षणाचे बाबतीत "स्त्री राखीव" असे नमूद केलेले असेल.

क) उमेदवारांची नावे मराठी वर्णमालिकेनुसार क्रमाने व नेमून दिलेले चिन्ह/ निशाणीसह छापली जातील. प्रत्येक उमेदवाराकरीता २.५ से.मी. इतक्या लांबीची जागा / चौकट प्रत्येक उमेदवाराच्या नावाकरीता व निशाणी करीता राहिल. त्यामध्ये डाव्या बाजूस उमेदवाराचे नाव व उजव्या बाजूस नेमून दिलेले चिन्ह / निशाणी दर्शविलेली असेल. दोन उमेदवारांच्या चौकटीमध्ये १ से.मी. जाडीची छायांकीत पट्टी /भाग असेल.

ड) **एका मतपत्रिकेत ९ पेक्षा अधिक उमेदवार दर्शविले जाणार नाहीत** व कोणत्याही परिस्थितीत ज्यावेळी एक रकानी (सिंगल कॉलम) मतपत्रिका असेल, त्यावेळी मतपत्रिकेची प्रती- पत्रासह लांबी ४५ से.मी. पेक्षा अधिक असणार नाही.

ई) मतपत्रिकेच्या शेवटी १ से.मी. जाडीची काळया रंगाची ठळक पट्टी /किनार असेल.

**९ पेक्षा अधिक उमेदवार असल्यास आवश्यक मतपत्रिका:-** ज्यावेळी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ९ पेक्षा अधिक असेल, त्यावेळी मतपत्रिका २ किंवा अधिक रकान्यात तयार केली जाईल. मात्र असे दोन रकाने (कॉलम) वेगवेगळे दर्शविण्याकरीता त्यामध्ये २.५ से.मी. रुंदीचें छायायुक्त क्षेत्र वर पासून खालपर्यन्त राहिल. तसेच अनुक्रमांक १० च्या उमेदवाराचे नांव दुसऱ्या रकान्यात पहिल्या स्थानावर असेल आणि यथावकाश त्यानुसार सर्व उमेदवारांची नांवे दर्शविली जातील. ज्यावेळी उमेदवारांची संख्या ९ च्या पटीत नसेल, त्यावेळी शेवटच्या रकान्यात मोकळी जागा राहिल्यास ती जागा संपूर्णपणे छायांकीत केली जाईल.

**मतदान केंद्रावरील व्यवस्था :**

(१) प्रत्येक मतदान केंद्राच्या बाहेर,- (अ) नियम १८ च्या तरतूदीनुसार नमुन्यादाखलच्या मतपत्रिका मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या मागदर्शनासाठी लावून ठेवल्या पाहीजेत. अर्थात वर्गवारीनुसार त्या मतदान केंद्रावर निवडणूक लढविणाऱ्या सर्व वर्गवारीच्या उमेदवारांची नावे नमूद केलेल्या त्या त्या रंगाच्या मतपत्रिका मतदारांच्या मार्गदर्शनासाठी लावून ठेवल्या पाहिजेत.

(ब) मतदान केंद्रामध्ये ज्या क्षेत्रातील मतदार, मतदान करण्यास हक्कदार आहेत ते मतदान क्षेत्र आणि जेव्हा मतदान क्षेत्रात एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे असतील तेव्हा मतदान करण्यास हक्कदार असलेल्या मतदारांचा तपशील दर्शविणारी नोटीस; आणि

(क) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या यादीची एक प्रत, ठळकपणे लावण्यात येईल.

(२) प्रत्येक मतदान केंद्रात, ज्यात मतदार आपली मते नोंदवू शकतील असे आडपडदा असलेले (एक किंवा एकापेक्षा अधिक मतदान कक्ष) उभारलेले असतील.

(३) नियम १९ च्या तरतूदीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रात, पुरेशा संख्येतील मतपेटया, **मतदार यादीची चिन्हांकित प्रत** (Marked Copy), अनुक्रमाने दिलेल्या पुरेशा मतपत्रिका, मोहरबंद करण्याची साधने (brass seal), मतपत्रिकेवर मत नोंदविण्यासाठी मतदारास आवश्यक असलेले बाणफुलीचे चिन्ह (Arrow Crossmark) व

मतपत्रिकेवर व स्थळ प्रतीवर उमटविण्याचे विभेदक चिन्हे (Distinguishing Mark), न पुसणारी शाई (Indelible Ink), स्टॅम्प पॅड, लिफाफे, कॅनव्हास कापड, कोरे कागद इ. चा पुरवठा करील.

**मतदार यादीची चिन्हांकित प्रत :**

*ग्रामपंचायत निवडणुकांकरीता मतदार यादी ठेवणे व तिची अभिरक्षा याबाबतची कार्यपध्दती निवडणुक नियम १९५९ च्या नियम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. अशी यादी अधिनियमाच्या कलम १२ पोटकलम २ अन्वये राज्य निवडणूक आयुक्ताने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेच्या संबंधित मतदार संघाच्या संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रातील मतदारांची यादी असेल. याकरीता राज्य निवडणूक आयोगाकडील निवडणूक कार्यक्रमात नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दतीचा अवलंब करुन तसेच निवडणूक नियम ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मतदारांची यादी तयार करण्यात यावी. याकरीता कलम १२ अंतर्गत अधिसूचित दिनांकास अस्तित्वात असलेली कच्ची किंवा प्रसिध्द करण्यात आलेली मतदारांची यादी ही ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय वेगवेगळी करुन निवडणूक कार्यक्रमात दिलेल्या दिनांकास प्रारुप स्वरुपात प्रसिध्द करण्यात यावी. या यादीमध्ये लेखनिकांच्या चुका झालेल्या असल्यास किंवा दुस-या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झाले असल्यास अथवा अधिसूचित केलेल्या तारखेस विधानसभा मतदार यादीत नावे असूनही त्यांची नांवे प्रभागनिहाय मतदार यादीत समाविष्ट करावयाची राहून गेली असल्यास, अथवा विधानसभा मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या मतदाराची नांवे या यादीमध्ये वगळलेली नसल्यास त्यांची नांवे पुरवणी यादी द्वारे समाविष्ट करावीत, अथवा वगळावीत. याबाबत जिल्हाधिकारी, जिल्हा मतदार नोंदणी अधिकारी किंवा त्यांनी या निवडणूकीसाठी अथवा मतदार यादी तयार करण्यासाठी आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या अधिका-यांनी सदर दुरुस्त्या अत्यंत काळजीपूर्वक कराव्यात. मतदारांच्या यादीत तहसिलदार अथवा निवडणूक नायब तहसिलदार यांने* **अशारितीने ठेवलेल्या मतदारांच्या प्रत्येक यादीवर तिच्या खरेपणाबद्दल सही केली पाहिजे आणि तिच्या प्रत्येक पानावर सही केली पाहिजे आणि ती यादी पंचायतीच्या सामाईक शिक्क्याने *आणि तहसिलदार कार्यालयाच्या* शिक्क्याने मोहोरबंद केली पाहिजे. *अशाप्रकारे तयार करण्यात आलेली यादी अंतिमरित्या निवडणूक कार्यक्रमात नमूद करण्यात आलेल्या दिनांकास प्रसिध्द करण्यात येईल व त्या ग्रामपंचायत निवडणूकीकरीता ती मतदारांची यादी असेल व त्यानंतर त्यात कोणताही बदल अथवा खाडाखोड करण्यात येणार नाही. त्यानंतर मात्र आयोगाचे आदेश***

*दि. १६/१/२००१ नुसार त्याची मतपत्रिका व निवडणूक कार्यप्रमाणपत्र देण्यात आलेल्या मतदारांच्या नावासमोर आवश्यकतेनुसार PB (*Postal Ballot / टपाली मतपत्रिका*) असे किंवा EDC (Election Duty Certificate / निवडणूक कार्य प्रमाणपत्र) असे नमूद करण्यात येईल ही कार्यवाही निवडणूक निर्णय अधिकारी करील. त्यानंतर या यादीच्या २ प्रती मतदान केंद्रनिहाय तयार करुन त्या तहसिलदाराच्या व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने व शिक्क्याने साक्षांकित करुन मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाधीन करण्यात येतील व त्यापैकी एक प्रत "चिन्हांकित प्रत" (Marked Copy) म्हणून वापरण्यात येईल.*

---

# प्रकरण ११

## मतदान

**मतदान केंद्रात प्रवेश देणे :**

याबाबत ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम २० च्या तरतुदीनुसार तसेच राज्य निवडणूक आयोगाकडील वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. नियम २० ची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

निवडणुकीच्या दिवशी प्रत्येक अध्यासी अधिका-याने, तो ज्या मतदान केंद्राचा अध्यासी अधिकारी असेल त्या मतदान केंद्राच्या पुढच्या खोलीत (ॲन्टी रुम) पुढील इसमांना प्रवेश दिला पाहिजे :-

(अ) उमेदवार व मतदारांची ओळख पटविण्यास मदत करण्यासाठी उमेदवार निवडतील असे अभिकर्ते; आणि (ब) मताधिकारी आणि कामावर असलेले इतर लोकसेवक :

परंतु, प्रत्येक मतदान केंद्रात, उमेदवारांखेरीज आणखी प्रत्येक उमेदवाराचा एक अभिकर्ता नेहमी हजर असला पाहिजे. (२) उमेदवार आणि त्यांचे अभिकर्ते यांच्याशिवाय, मतदार व अध्यासी अधिका-याने या बाबतीत दिलेल्या विशेष निदेशाद्वारे ज्यांना प्रवेश दिला जाईल असे इसम कोणतेही असल्यास यांनाच फक्त मतदान केंद्रात प्रवेश दिला पाहिजे.

*तसेच मतदान केंद्रावरील मतदारांच्या व इतर व्यक्तींच्या वर्तणुकीबाबत निवडणूक नियम २१ व २२ च्या तरतुदी लागू राहतील. मतदान केंद्रात १०० मीटर परिघात निवडणूक विषयक कायदे लागू असतात. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची प्रचार करणारी भित्तीपत्रके, छायाचित्रे अथवा बिल्ले लावण्यास परवानगी नाही. तसेच या १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात अनधिकृत व्यक्तीस प्रवेश नाही. मतदान केंद्राध्यक्षाच्या मतदान केंद्रावर मतदाराव्यतिरिक्त फक्त पुढील व्यक्तींना प्रवेश असेल.*

*अ) मतदान केंद्रावर नेमलेले शासकिय अधिकारी व कर्मचारी (मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, लिपिक, चतुर्थश्रेणी कर्मचारी इ. )*

*ब) ) राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेली व्यक्ती तसेच निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी,*

*क) राज्य निवडणूक आयोगाने नेमलेला निरिक्षक,*

ड) उमेदवार व उमेदवाराचा एक अधिकृत निवडणूक प्रतिनिधी,

ई) मतदान प्रतिनिधी / अभिकर्ता,

फ) मतदारासोबत येणारे बालक / मूल,

ग) मदतीवीना चालू न शकणा-या अंध किंवा अपंग मतदारासोबत येणारी व्यक्ती,

ह) मतदाराची ओळख पटविण्याकरीता किंवा केंद्राध्यक्षाच्या कामात मदत करण्याकरीता मतदान केंद्राध्यक्ष /अध्यासी अधिकारी याने परवानगी दिलेली व्यक्ती.

या सर्व व्यक्तींना मतदान केंद्राध्यक्षाने मागणी केल्यास आवश्यक ते ओळखपत्र उपलब्ध करुन दिल्यानंतर मतदान केंद्रात प्रवेश राहील. मतदाराला मतदान केंद्रावर प्रवेश देतांना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळख पत्र सादर करावे लागेल. ज्या मतदारांना ओळखपत्र प्राप्त झ ालेले नाही अथवा अन्य कारणामुळे ओळखपत्र दाखवू शकत नाही त्या मतदारांना राज्य निवडणूक आयोगाकडील दि. ४ एप्रिल, २००५ च्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या कागदपत्राच्या आधारे मतदान अधिकाऱ्यांना आपली ओळख पटवून द्यावी लागेल. त्यानंतरच मतदाराला मतदान केंद्रात प्रवेश दिला जाईल व मतदान करु दिले जाईल. (**पहा परिशिष्ट- VII**)

मतदान केंद्राध्यक्ष हा मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रीयेच्या संदर्भात सर्व अधिकार असलेला व सर्वाधिक जबाबदार अधिकारी आहे. निवडणूकी संदर्भात कामावरील सरकारी नोकर अथवा मतदान केंद्रावर नेमलेले शासकिय अधिकारी किंवा कर्मचारी ही संज्ञा पोलिस कर्मचारी किंवा अधिका-यास लागू होत नाही. त्यामुळे गणवेशातील किंवा साध्या वेषातील पोलिसांना मतदान केंद्राच्या आत येण्यास परवानगी देऊ नये. परंतु, कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने अथवा मतदान प्रक्रीया सुरळीत पार पाडण्याकरीता एखाद्या प्रसंगी मतदान केंद्राध्यक्ष पोलिस अधिका-याची मदत घेवू शकतो व आवश्यक तर मतदान केंद्रात प्रवेश देवू शकतो. मतदारासोबत किंवा उमेदवारा सोबतच्या सुरक्षा रक्षकांना मतदान केंद्रात प्रवेश नाही.

मतदान केंद्रापासून १०० मीटर परिघाच्या क्षेत्रात एखाद्या व्यक्तीकडून मतदान प्रक्रीयेत अडथळा होईल, असा ध्वनीक्षेपक (लाऊडस्पीकर) लावण्यात आला असेल तर, मतदान केंद्राध्यक्ष तो बंद करण्यास आदेश देवू शकतो.

निवडणूकी संदर्भात कामावरील लोकसेवक ही व्याख्या राज्य व केंद्र सरकारचे मंत्री, उपमंत्री आणि राज्यमंत्र्यांना लागू होत नाही आणि त्यासाठी आयोगाच्या सूचनेनुसार त्यांची निवडणूक

*प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येत नाही. खासदार, आमदार व अन्य लोकप्रतिनिधी यांना देखील मतदान केंद्रात ते संबंधित केंद्रावरील मतदार नसल्यास प्रवेश करता येणार नाही.*

***वृत्तपत्र प्रतिनिधी व छायाचित्रकारांना सुविधाः-***

*मतदान केंद्राबाहेर रांगेत उभ्या असलेल्या मतादारांची छायाचित्रे छायाचित्रकारांना घेता येतील. मात्र त्यांनी शांततापूर्ण व शिस्तबध्द मतदान व्यवस्थेत बाधा पोचवू नये.*

*मतदार नसलेल्या कुणाही व्यक्तिस मतदान केंद्रात प्रवेश देण्यात निवडणूक निर्णय अधिकारी परवानगी देऊ शकत नाही. आयोगाचे अधिकृत प्रवेशपत्र असल्याशिवाय कुणाही पत्रकार किंवा प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधीला किंवा छायाचित्रकाराला मतदान केंद्रात प्रवेश मिळणार नाही. तसेच कोणत्याही परिस्थितीत मतदार प्रत्यक्ष मतदान करताना छायाचित्र काढू देऊ नये.*

***आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांसाठी सुविधाः-***

*राज्य निवडणूक आयोग अलिकडे काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आपले निरीक्षक पाठवित आहे. त्यांची नियुक्ती ही वैध आहे.*

*जिल्हाधिकारी कार्यालयाने पुरविलेले ओळखपत्र व राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारपत्र / नियुक्तीपत्र सदर निवडणूक निरिक्षकाकडे असेल.*

मतदान केंद्राध्यक्ष, मतदान केंद्रात एकावेळी किती मतदारांना प्रवेश द्यायचा याचे नियमन करील

**मतदानासाठी मतपेट्या तयार करणे :**

(१) जेव्हा मतपेटी सुरक्षित ठेवण्यासाठी कागदाचे सील (मोहर) वापरण्यात येईल तेव्हा, मतदान केंद्राध्यक्ष, कागदाच्या सीलवर स्वतःची स्वाक्षरी करील आणि तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींची त्यावर स्वाक्षरी करण्याची इच्छा असल्यास त्यावर त्यांची स्वाक्षरी घेईल.

(२) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, अशा प्रकारे स्वाक्षरी केलेले कागदी सील, मतपेटीमध्ये त्यासाठी ठेवलेल्या जागेमध्ये लावील आणि त्यानंतर मतपेटी अशा रीतीने सुरक्षित व सीलबंद करील की जेणेकरुन मतपत्रिका आत टाकण्यासाठी असलेली फट नेहमी खुली राहील.

(३) मतपेटी सुरक्षित ठेवण्यासाठी वापरलेले सील (मोहर) अशा रीतीने लावील की, पेटी बंद करण्यात आल्यानंतर सील तोडल्याशिवाय मतपेटी उघडणे शक्य होणार नाही.

(४) जेव्हा मतपेट्या सुरक्षित ठेवण्यासाठी वापरलेले सील (मोहर) अशा रीतीने सुरक्षित व सीलबंद करील की जेणेकरुन मतपत्रिका आत टाकण्याची फट नेहमी खुली राहील आणि उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींची इच्छा असेल तर त्यांचे सील लावण्यास त्यांना मुभा देईल.

(५) एखाद्या मतदान केंद्रात वापरण्यात आलेल्या प्रत्येक मतपेटीच्या आतील व बाहेरील अशा दोन्ही बाजूला,-

(क) मतदारसंघाचा अनुक्रमांक, कोणताही असल्यास, आणि नाव;

(ख) मतदान केंद्राचा अनुक्रमांक आणि नाव;

(ग) मतपेटीचा अनुक्रमांक (केवळ मतपेटीच्या बाहेरील लेबलवर मतदान समाप्त झाल्यावर भरावयाचा आहे); आणि

(घ) मतदानाची तारीख,

लिहिलेले लेबल्स लावण्यात येतील.

(६) मतदान सुरु होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, मतपेटी खुली आहे व रिकामी आहे आणि तिला वर नमूद केलेले लेबल्स लावलेले आहेत याबाबत तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना व अन्य व्यक्तींना प्रात्यक्षिक करुन दाखवील.

(७) त्यानंतर मतपेटी बंद करण्यात येईल, ती सुरक्षित व सीलबंद करण्यात येईल. आणि ती मतदान केंद्राध्यक्ष व मतदान प्रतिनिधी याच्या संपूर्ण दृष्टीपथात ठेवील.

**मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी करावयाचे घोषणापत्र**

मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी (प्रतिरुप मतदान घेतल्याबाबत) तसेच चिन्हांकित मतदार यादी अथवा मतदार नोंदवही यावर EDC व PB व्यतिरिक्त कोणतीही खूण नसल्याबाबत; तसेच पेपरसीलवर संबंधितांची स्वाक्षरी घेतल्याबाबत **जोडपत्र-१२** मध्ये दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र वाचून दाखवून त्यावर उपस्थित मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

**मतदार यादीची चिन्हांकित प्रत :**

मतदान सुरु होण्याच्या लगतपूर्वी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदानासाठी वापरण्यात येणाऱ्या मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये,-

कोणत्याही चिन्हाचा अंतर्भाव नाही व ती योग्य त्या प्राधिकाऱ्याने (तहसिलदार किंवा जिल्हाधिकारी यांनी ) साक्षांकित केली आहे याबाबत तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना व अन्य व्यक्तींना खात्री करुन देईल.

**महिला मतदारांसाठी सुविधा :**

(१) जेव्हा एखादे मतदान केंद्र हे पुरुष व महिलांसाठी सामाईक असेल तेव्हा, मतदान केंद्राध्यक्ष, असा निदेश देईल की, ते मतदान केंद्रामध्ये वेगवेगळ्या गटाने एकानंतर एक या रीतीने प्रवेश करतील. (अर्थात, काही महिला मतदारांनंतर काही पुरुष मतदार नंतर पुन्हा काही महिला मतदार अशा क्रमाने )

(२) निवडणूक निर्णय अधिकारी किंवा मतदान केंद्राध्यक्ष, महिला मतदारांना सहकार्य करण्यासाठी आणि तसेच महिला मतदारांच्या संबंधातील मतदान घेण्यामध्ये सर्वसाधारणपणे मतदान केंद्राध्यक्षास मदत करण्यासाठी आणि विशेषत: आवश्यक असेल तेव्हा एखाद्या महिला मतदाराची झडती घेतांना किंवा ओळख पटविण्यासाठी मदत करण्यासाठी मतदान केंद्रातील एक परिचर म्हणून सेवा करण्यासाठी एखाद्या महिलेची नियुक्ती करु शकेल. परंतु अशी व्यक्ती कोणत्याही राजकिय पक्षाशी संबंधित नसेल व शक्यतो शासकिय कर्मचारी असेल असे पहावे.

**मतदारांची ओळख पटविणे :**

(१) मतदान केंद्राध्यक्ष मतदारांची ओळख पटविण्यामध्ये मदत करण्यासाठी किंवा मतदान घेण्यामध्ये अन्यप्रकारे त्याला मदत करण्यासाठी त्याला योग्य वाटेल अशा व्यक्तींची मतदान केंद्रात नियुक्ती करु शकेल.

(२) जेव्हा प्रत्येक मतदार मतदान केंद्रात प्रवेश करील तेव्हा, मतदान केंद्राध्यक्ष किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेला मतदान अधिकारी मतदार यादीतील संबंधित नोंदीबरोबर मतदाराचे नाव इतर तपशील ताडून पाहील आणि त्यानंतर, मतदाराचा अनुक्रमांक, नाव व इतर तपशील पुकारील.

(३) जेव्हा मतदार केंद्र अशा मतदारसंघात येत असेल की तेथील मतदारांचा मतदान नोंदणी नियम, १९६० च्या तरतुदींनुसार मतदार ओळखपत्रे देण्यात आली असतील त्याबाबतीत, असा मतदार, मतदान केंद्राध्यक्षास किंवा याबाबतीत त्याने प्राधिकृत केलेल्या मतदान अधिकाऱ्यास आपले ओळखपत्र दाखवील. त्याचप्रमाणे मतदाराची ओळख पटविण्याकरीता आयोगाच्या दि. ४/४/२००५ च्या परिपत्रकातील पुरावे ग्राह्य धरण्यात येतील. ते पुरावे खालीलप्रमाणे आहेत :-

१) पासपोर्ट,

२) वाहन चालविण्याचा परवाना,

३) आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र,

४) केंद्र शासन / राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी कंपन्या अथवा कारखाने यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना दिलेली ओळखपत्रे,

५) बँकेचे / किसान / पोस्टाचे पासबुक,

६) आयोगाने ज्या दिवशी निवडणुकीचा कार्यक्रम निर्गमित केला असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशीपर्यंत देण्यात आलेली शिधापत्रिका,

७) सक्षम प्राधिकाऱ्याने अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती / इतर मागासवर्ग / विमुक्त जाती / भटक्या जमाती / विशेष मागास प्रवर्ग इत्यादींना दिलेले जातीचे प्रमाणपत्र,

८) विद्यार्थ्यांचे ओळखपत्र,

९) मालमत्ता बाबतची कागदपत्रे तसेच नोंदणी खत इत्यादी,

१०) शस्त्रास्त्र परवाना,

११) परिवहन प्राधिकरणाने दिलेला वाहक परवाना ( Conductor Licences)

१२) निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन पासबुक / पेन्शन पेमेंट ऑर्डर,

१३) निवृत्त कर्मचाऱ्याच्या विधवा / अवलंबिता प्रमाणपत्र

१४) आयोगाने ज्या दिवशी निवडणुकीचा कार्यक्रम निर्गमित केला असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशीपर्यंत दिलेले रेल्वे पासचे ओळखपत्र

१५) अपंगत्वाचा दाखला,

१६) स्वातंत्र्यसैनिकाचे ओळखपत्र,

१७) मतदान केंद्राध्यक्षास मतदाराची ओळख समाधानकारकरित्या पटेल असे अन्य कोणतेही कागदपत्र.

(४) मतदानपत्रिका मिळण्याचा एखाद्या व्यक्तीचा अधिकार निर्धारित करतांना, मतदान केंद्राध्यक्ष किंवा यथास्थिती, मतदान अधिकारी, मतदार यादीत नोंदीमधील लेखनदोष किंवा मुद्रणदोष, जर त्यांची अशी नोंद ज्याच्याशी संबंधित आहे ती व्यक्ती तोच मतदार असल्याची खात्री पटल्यास, दुर्लक्षित करील.

## तोतयेगिरीविरुध्द संरक्षक उपाययोजना

**याबाबतची कार्यवाही नियम २३ अ च्या तरतुदीनुसार राहील. त्यानुसार**

मतदारांचा तोतयेगिरीला आळा घालण्याच्या दृष्टीने, ज्याच्या ओळखीबद्दल, यथास्थिती, मतदान केंद्राध्यक्षाची किंवा मतदान अधिका-याची खात्री पटली आहे असा प्रत्यक्ष प्रत्येक मतदार

केंद्राध्यक्षास किंवा मतदान अधिका-यास, त्याच्या डाव्या हाताची तर्जनी तपासू देईल आण तिच्यावर पक्क्या शाईची खूण करु देईल.

(२) कोणत्याही मतदाराने पोट-नियम (१) अन्वये त्याच्या डाव्या हाताची तर्जनी तपासू देण्यास किंवा तिच्यावर खूण करु देण्यास नकार दिल्यास किवा त्यांच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर अगोदरच अशी खूण केलेली असल्यास किंवा शाईची खूण नाहीशी करण्याच्या दृष्टीने त्याने कोणतीही कृती केल्यास त्याल मतपत्रिका पुरविली जाणार नाही किंवा मत देण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**स्पष्टीकरण-** या नियमातील, मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीच्या निर्देशाचा अर्थ त्या मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल त्याबाबतीत त्याच्या डाव्या हाताचे दुसरे कोणतेही बोट आणि डाव्या हाताचे एकही बोट नसेल त्याबाबतीत त्याच उजव्या हाताचे तर्जनी अथवा उजव्या हाताचे कोणतेही बोट असा आणि त्याच्या दोनही हातांचे एकही बोट नसेल त्याबाबतीत त्याला असणा-या डाव्या अथवा उजव्या हाताचे टोक असा लावण्यात येईल.

*मतदार म्हणून बतावणी करणे हा गुन्हा आहे. अशा व्यक्तीविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येऊन, भारत दंड संहिता, १८६०, कलम १७१ खाली सदर अपराधाला १ वर्षाची साधी अगर सक्त मजुरीची कैद किंवा दंड अगर दोन्हीही, अशा शिक्षा होऊ शकते.*

**बोटांना शाई लावणे**

प्रत्येक मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीस शाई लावावी. शाई लावण्याची कार्यवाही सदर मतदाराने पुन्हा दुस-या कोणाच्या नांवावर मतदान करु नये, यासाठी करण्यात येते. एखादा मतदार त्याच्या डाव्या हाताची तर्जनी त्यावर शाई लावली आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी तपासू देण्यास तयार नसल्यास त्यास मतदान करु देण्यात येणार नाही. एखादया मतदाराच्या डाव्या हातास तर्जनी नसल्यास डाव्या हाताच्या अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी. डाव्या हातास कोणतेही बोट नसल्यास उजव्या हाताच्या तर्जनीस व तर्जनी नसल्यास अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी. मतदारास दोन्ही हातास बोटे नसल्यास त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताच्या भागाच्या टोकास शाई लावण्यात यावी.

**हरकत घेण्यात आलेली मते: (Challanged Votes)**

***याबाबतची कार्यवाही निवडणूक नियम २१ च्या तरतुदीप्रमाणे राहिल. त्यानुसार*** मतदानपत्रिकेसाठी अर्ज करुन आपण अमुक मतदार आहे असे म्हणवून कोणत्याही इसमाने बतावणी केल्याचा अपराध केला आहे असे जर कोणताही उमेदवार, निवडणूक अभिकर्ता किंवा मतदान अभिकर्ता जाहीर करील व ते सिध्द करण्याचे काम हाती घेईल तर, केंद्राध्यक्षाने अशा इसमास, **(जोडपत्र-७)** नमुना ड मधील हरकत घेतलेल्या मतांच्या यादीत त्याचे नाव व पत्ता लिहिण्यास किंवा जर त्याला लिहिता येत नसेल तर त्यावर त्याच्या अंगठ्याचा ठसा देण्यास भाग पाडले पाहिजे. तसेच अशा इसमास तो तोच इसम आहे या विषयी पुरावा हजर करण्यासही भाग पाडले पाहिजे. परंतु, उमेदवाराने किंवा अशा अभिकर्त्याने ज्या ज्या वेळी तो हरकत घेईल त्या प्रत्येक वेळी (दोन रुपये इतकी ) रक्कम केंद्राध्यक्षाकडे अनामत ठेवल्यावाचून केंद्राध्यक्षाने ह्या पोट-नियमान्वये कोणतीही उपाययोजना करता कामा नये.

(२) ज्या विरुध्द अशा रीतीने हरकत घेण्यात आली असेल तो इसम अशी आवश्यक गोष्ट करण्याचे नाकारील तर, त्यास मत देण्याची परवानगी देता कामा नये. परंतु असा इसम जर अशा रीतीने ती गोष्ट करीत आणि त्यास प्रश्न विचारले असता, तो यादीत नाव असलेला इसम आहे किंवा नाही या प्रश्नास संपूर्ण होकारार्थ उत्तर देईल आणि त्याने मतदारसंघातील किंवा इतर कोणत्याही मतदार संघातील उक्त निवडणुकीत मत दिले आहे किंवा नाही या प्रश्नास नकारार्थ उत्तर देईल तर, बतावणीबद्दल शिक्षा होईल अशी ताकीद दिल्यानंतर त्यास मत देण्याची परवानगी देण्यात आली पाहिजे.

(३) केंद्राध्यक्षाने त्या ठिकाणी त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर जर असे मत होईल की, पोट-नियम (१) अन्वये उमेदवाराने किंवा त्याचा अभिकर्त्याने घेतलेली हरकत पोकळ आहे व ती शुध्दबुध्दीने घेतलेली नाही, तर त्याने पोट-नियम (१) अन्वये अनामत ठेवलेली रक्कम राज्य सरकारकडे जमा करण्यात यावी असे फर्माविले पाहिजे व त्याचा यासंबंधीचा आदेश अखेरचा असेल.

(४) पोट-नियम (१) अन्वये ठेवलेली अनामत रक्कम पोट-नियम (३) अन्वये जप्त करण्यात आली नाही तर, ती, ज्या दिवशी देण्यात आली असेल त्या दिवशी मतदानाची वेळ संपल्यावर, ज्या इसमाने ती दिली असेल त्या इसमास ती परत देण्यात आली पाहिजे.

(५) केंद्राध्यक्षाने प्रत्येक बाबतीत मग ज्या इसमाविरुध्द हरकत घेण्यात आली असेल त्या इसमास मत देण्याची परवानगी देण्यात आलेली असो किंवा नसो- त्या परिस्थितीची प्रश्नास्पद मतांची नोंद केली पाहिजे.

***स्पष्टीकरण :- एखाद्या मतदारास (१) मतदारांचे यादीत नाव असलेला तो इसम नाही, म्हणजे मतदार असल्याची तो बतावणी करीत आहे, किंवा (२) सदर मतदाराने त्या निवडणुकीत त्याच मतदारसंघात (वॉर्ड) दुसरे नावाने किंवा दुस-या मतदारसंघात स्वतःचे नावाने मत दिले अशी हरकत उमेदवार किंवा त्याचे अभिकर्त्याने घेतल्यावर, सदर मतदाराने ती गोष्ट नाकारल्यास, त्यास मत देण्याचा हक्क आहे, अशा वेळी सदर मतदाराचे नाव "हरकत घेण्यात आलेल्या मतदारांचे यादीत" (List ofChallanged Votes) (जोडपत्र-७) केंद्राध्यक्षाने नमूद केले पाहिजे.***

***मतदार म्हणून बतावणी करणे हा गुन्हा आहे. अशा व्यक्तीविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात येऊन, भारत दंड संहिता, १८६०, कलम १७१ खाली सदर अपराधाला १ वर्षाची साधी अगर सक्त मजुरीची कैद किंवा दंड अगर दोन्हीही, अशा शिक्षा होऊ शकते.***

(१) कोणताही मतदान प्रतिनिधी, विशिष्ट मतदार असल्याचा दावा करणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या ओळखीस जेव्हा आव्हान देईल. तेव्हा असे आव्हान देण्यापूर्वी अशा प्रत्येक आव्हानासाठी मतदान केंद्राध्यक्षाकडे दोन रुपये इतकी रक्कम प्रथम जमा करील.

(२) अशी रक्कम जमा केल्यावर, मतदान केंद्राध्यक्ष,-

(अ) आव्हान देण्यात आलेल्या अशा व्यक्तीस तोतयेगिरीकरिता शास्ती करण्याची ताकीद देईल;

(ब) मतदार यादीतील संबंधित नोंद पूर्णपणे वाचील आणि त्याला, तो त्या नोंदीमध्ये निर्दिष्ट केलेली व्यक्ती आहे किंवा कसे याबाबत त्याला विचारील;

(क) आव्हानीत मतांच्या यादीमध्ये (List of Challanged Votes) त्याचे नाव पत्ता नोंदवील; आणि

(ड) उक्त यादीमध्ये त्याची स्वाक्षरी करण्यास त्याला फर्मावील.

(३) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, त्या आव्हानाच्या संबंधात संक्षिप्त न्यायचौकशी (Summery Inquiry) करील आणि त्या प्रयोजनासाठी,-

(अ) आव्हान देणाऱ्यास, आव्हानाच्या पृष्ट्यर्थ पुरावा सादर करण्यास आणि आव्हान दिलेल्या व्यक्तीस, तिच्या ओळखी पृष्ट्यर्थ पुरावा सादर करण्यास फर्मावील;

(ब) आव्हान दिलेल्या व्यक्तीस, तिची ओळख सिध्द करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असलेले कोणतेही प्रश्न विचारील आणि शपथेवर त्याची उत्तरे देण्यास तिला फर्मावील; आणि

(क) आव्हान दिलेल्या व्यक्तीस आणि पुरावा देऊ करणाऱ्या अन्य कोणत्याही व्यक्तीस शपथ देईल.

(४) चौकशी केल्यानंतर आव्हान सिध्द होऊ शकले नाही असे मतदान केंद्राध्यक्षास वाटल्यास, तो आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदान करण्याची परवानगी देईल, आणि आव्हान सिध्द झाले आहे असे त्याला वाटल्यास, तो आव्हान दिलेल्या व्यक्तीस मतदान करण्यास मनाई करील.

(५) आव्हान क्षुल्लक आहे किंवा सद्‌भावनेने केलेले नाही असे मतदान केंद्राध्यक्षाचे मत झ ाल्यास तो, वरिल अनुक्रमांक (१) अन्वये जमा केलेली रक्कम शासनाकडे समपहृत करील आणि अन्य कोणत्याही बाबतीत, चौकशी समाप्त झाल्यावर ती आव्हानकर्त्यास परत करील.

**मतदारांना मतपत्रिका देणे आणि मतनोंदणी : (Issue of Ballot Paper & Voting)**

याबाबतची कार्यवाही निवडणूक नियम १९५९ च्या नियम २३ नुसार राहील.

मत नोंदणी पुढील उपबंधानुसार केली पाहिजे.

(१) प्रभागातील जेवढ्या जागा भरण्यासाठी मते घ्यावयाची असतील तेवढी मते देण्याचा त्या भागातील प्रत्येक मतदारास हक्क असेल, परंतु कोणत्याही मतदाराने, कोणत्याही एका उमेदवारास एकापेक्षा अधिक मते देता कामा नये;

(२) प्रतिनिधीद्वारे मत देता येणार नाही;

(३) प्रत्येक मतपत्रिका राज्य निवडणूक आयुक्त निदेश देईल अशा ओळख पटविणा-या खुणेने (विभेदक चिन्ह) मुद्रांकित करण्यात येईल आणि मत देण्याची इच्छा असलेल्या मतदारास उक्त मतपत्रिका देण्यापूर्वी , मतदारांच्या यादीतील त्याचे नाव व त्याचा क्रमांक, हजर असलेल्या सर्वांना ऐकू जाईल अशा रीतीने सांगण्यात येईल ;

(४) कोणतीही हरकत घेण्यात आली नसेल त्या बाबतीत, मतदान अधिका-याने मतदारांच्या यादीच्या प्रतीमध्ये, मतदारासंबंधीच्या नोंदीसमोर, मतपत्रिकेचा अनुक्रमांक नोंदविल्यानंतर मतपत्रिका मतदारास दिली पाहिजे व त्यास मतदानाच्या खोलीत प्रवेश दिला पाहिजे. परंतु मतदानाच्या खोलीत एका वेळी एकाहून अधिक मतदारास प्रवेश देता कामा नये.

उमेदवारांनी आणि त्यांच्या अभिकर्त्यांनी हरकती घेतल्या असतील तर, अध्यासी अधिका-याने अशा हरकतीची विल्हेवाट लावली पाहिजे आणि मत देण्याचा इरादा असलेल्या इसमास मत देण्याचा हक्क असून त्याने अद्यापी मत दिलेले नाही अशी जेव्हा त्याची खात्री होईल तेव्हा त्याने मतदाराची सही किंवा अंगठ्याची निशाणी घेउन आणि मतदारांच्या यादीतील त्याच्या नावासमोर मतपत्रिकेचा / मतपत्रिकांचे

अनुक्रमांक नमूद केल्यावर मतपत्रिका मतदारास देण्याचा निदेश दिला पाहिजे त्यानंतर मतदानाच्या खोलीत प्रवेश देण्यात येईल.

(५) मतदाराने, त्याचा ज्या उमेदवारास मत देण्याचा इरादा असेल त्या उमेदवाराच्या निशाणीवर किंवा निशाणीजवळ त्यास त्या कारणाकरिता देण्यात आलेल्या साधनाने (बाणफुली चिन्हाने) दुस-या उमेदवाराकरिता ठेवण्यात आलेल्या जागेवर खुणेचा कोणताही भाग येणार नाही (१९८९ (१) बॉम्बे सी. आर ५६९, ६७२ ) अशा प्रकारे मतपत्रिकेवर खूण केली पाहिजे. मतदाराने त्यानंतर आपले मत दिसणार नाही अशा रीतीने त्यास देण्यात आलेल्या सर्व मतपत्रिकांची घडी केली पाहिजे आणि घडी केलेल्या मतपत्रिका मतपेटीत टाकल्या पाहिजेत व अनावश्यक विलंब न लावता मतदानाच्या खोलीतून बाहेर गेले पाहिजे.

(६) जर, अंधत्वामुळे किंवा इतर शारीरिक अपंगत्वामुळे, एखादा मतदार मत पत्रिकेवरील निशाणी ओळखण्यास किंवा त्यावर खूण करण्यास, मदतीशिवाय असमर्थ आहे अशी मतदानकेंद्राध्यक्षाची खात्री झाल्यास, मतदानकेंद्राध्यक्ष एकवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेला सहचर अशा मतदारास मतदान खोलीत मतपत्रिकेवर त्याचे वतीने त्याचे इच्छेनुसार मत नोंदविण्यास, आणि जरुर तर मत गुप्त राहील अशा रीतीने मतपत्रिकेची घडी करुन ती मतपेटीत टाकण्यासाठी सोबत नेण्यास त्यास परवानगी देईल.)

मात्र कोणत्याही इसमास, एकापेक्षा जास्त मतदारांचा सहचर म्हणून काम करण्यास त्याच दिवशी कोणत्याही मतदानकेंद्रावर परवानगी देण्यात येणार नाही.

शिवाय असे की, या नियमाखाली कोणाही इसमास, कोणतेही दिवशी सहचर म्हणून काम करण्यास परवानगी देण्यापूर्वी, अशा इसमास मतदारातर्फे जे मत तो नोंदवील ते गुप्त ठेवील आणि त्याने त्या दिवशी त्यापूर्वी कोणत्याही मतदानकेंद्रावर दुस-या कोणत्याही मतदाराचा सहचर म्हणून काम केले नाही, असे प्रतिज्ञेवर सांगावे लागेल. (प्रतिज्ञा पत्राचा नमुना या पुस्तिकेसोबत **जोडपत्र-८अ** मध्ये दिला आहे.)

या नियमाखाली सर्व प्रकारणांची नोंद नमुना ब-१ **(जोडपत्र-८)** मध्ये मतदानकेंद्राध्यक्षाने ठेवली पाहिजे.

(६-अ) मतदानास प्रारंभ करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळापूर्वी कोणत्याही मतदाराला कोणतीही मतपत्रिका दिली जाणार नाही.)

(७) मतदान समाप्त करतेवेळी मतदानकेंद्रावर उपस्थित असतील अशा मतदारांखेरीज, कोणत्याही मतदारास मतदान समाप्त करण्यासाठी ठरविण्यात आलल्या वेळेनंतर कोणतीही मतपत्रिका देता कामा नये, (समाप्त करतेवेळी उपस्थित असतील) अशा मतदारांना मतदानाची वेळ संपल्यावरही मतदान करता येईल.

मतदान केंद्रावर एखादा मतदार अशा प्रकारे हजर होता किंवा कसे याबद्दल कोणताही प्रश्न उपस्थित झ ाल्यास, मतदानकेंद्राध्यक्ष त्याचा निर्णय लावील व त्याचा निर्णय अंतीम असेल.)

**स्पष्टीकरण-** *(मतदाराचे नाव वाचल्यानंर व मतपत्रिका त्यास देण्यापूर्वी, उमेदवार किंवा त्याचा अभिकर्ता (एजंट) यास मतनोंदणीस हरकत घेता येते. ती हरकत नियम २१ मध्ये दिलेल्या कोणत्याही कारणांसाठी घेता येते. अशा हरकतीचा निकाल अध्यासी अधिका-याने ताबडतोब केला पाहिजे, तशी नोंद त्या कारणासाठी त्याने ठेवलेल्या नोंदवहीत घेतली पाहिजे.*

**अहवाल**

**मतदान सुरु झाल्यापासून एक तासाच्या आत मतदान रितसर सुरु झाल्याबाबतचा तसेच मतदान पुर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदाराने दूरध्वनीवरुन राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात कळवावा. मतदानाच्या टक्केवारीबाबत दिवसातुन किमान तीन वेळा व मतदान पुर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर संपुर्ण टक्केवारीबाबतचा व कोणत्याही प्रकाराची अनियमितता न घडल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात फॅक्सद्वारे व दूरध्वनीवरुन संबंधित तहसिलदाराने व जिल्हाधिकारी कार्यालयाने सादर करावा. मतदानाच्यावेळी कोणत्याही प्रकारे अडथळा आल्यास अथवा अनुचित प्रकार घडल्यास त्वरीत राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाशी दूरध्वनीवरुन अथवा भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा तसेच त्वरीत फॅक्सद्वारे अहवाल सादर करावा.**

**याबाबतची संपुर्ण जबाबदारी संबंधित तहसिल कार्यालयाची राहील.**

**स्पष्टीकरण :-** ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये आरक्षणाच्या वर्गवारीनिहाय वेगवेगळ्या रंगाच्या पदांच्या संख्येनुसार २ किंवा ३ मतपत्रिका दिल्या जातील. याबाबत प्रकरण ९ मध्ये **मतपत्रिकेचा सुधारीत नमुना** या खालील सूचना पहाव्यात

(१) मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी अशा प्रत्येक मतपत्रिकेवर आणि तिला जोडलेल्या स्थळप्रतीवर, निवडणूक आयोग निदेश देईल असे विभेदक चिन्ह तिच्या मागील बाजूस मुद्रांकित करण्यात येईल, आणि ती देण्यापूर्वी अशा प्रत्येक मतपत्रिकेवर तिच्या मागील बाजुस मतदान केंद्राध्यक्ष स्वाक्षरी करील. याबाबत आयोगाच्या सूचना दिनांक ५ ऑगस्ट, ९७ व दि. २९ सप्टेंबर, १९९७ पहाव्यात.

(२) मतदारास मतपत्रिका देतेवेळी, मतदान अधिकारी,-

(अ) तिच्या स्थप्रतीवर, मतदार यादोच्या चिन्हांकित प्रतीमध्ये नोंदविल्याप्रमाणे मतदाराचा क्रमांक नोंदवील;

(ब) उक्त स्थळप्रतीवर त्या मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा घेईल; आणि

(क) त्या मतदाराला मतपत्रिका देण्यात आली आहे याचे निदर्शक म्हणून मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीमध्ये मतदाराचे नाव चिन्हांकित करील, आणि त्यासमोर मतपत्रिकेचा अनुक्रमांक नोंदविल.

परंतु, त्या मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर एखाद्या मतदाराने आपली स्वाक्षरी किंवा अंगठा केल्याशिवाय त्याला मतपत्रिका देण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिकाऱ्याने किंवा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याने स्थळप्रतीवरील मतदाराची स्वाक्षरी किंवा अंगठा साक्षांकित करण्याची आवश्यकता नाही.

(४) मतदान केंद्रामधील कोणतीही व्यक्ती, विशिष्ट मतदारांस दिलेल्या मतपत्रिकांचे अनुक्रमांक लिहून घेणार नाही.

**प्रदत्त मते : (Tender Votes)**

दुसरी एखादी व्यक्ती असा मतदार म्हणून अगोदरच मतदान करुन गेल्यानंतर जर एखाद्या व्यक्तीने आपण स्वतःच तो विशिष्ट मतदार असून आपल्याला मतपत्रिका देण्याची मागणी केली असेल तर, ती खरोखरच मतदार आहे काय याच्या ओळख करण्यासंबंधी तिने मतदान केंद्राध्यक्षाने विचारलेल्या प्रश्नांचे समाधानकारकपणे उत्तरे दिल्यावर, ती, या नियमाच्या पुढील तरतुदींना अधीन राहून, ज्या रीतीने अन्य कोणतेही मतदार मतदान करतात त्याच रीतीने मतपत्रिकेवर (जिला यात यापुढे "प्रदत्त मतपत्रिका" (Tender Ballot Paper) असे संबोधण्यात आले आहे.) मतदान करण्यास हक्कदार असेल.

(२) अशी प्रत्येक व्यक्ती, प्रदत्त मतपत्रिका देण्यापूर्वी, प्रदत्त मतपत्रिकेच्या यादीमध्ये नमुना क (पहा **जोडपत्र-९**) त्याच्या संबंधातील नोंदीसमोर त्याचे नाव व स्वाक्षरी करील.

(३) प्रदत्त मतपत्रिका ही मतदान केंद्रात वापरण्यात येणाऱ्या अन्य मतपत्रिकांसारखीच असेल परंतु-

(अ) अशी प्रदत्त मतपत्रिका ही, त्या मतदान केंद्रामध्ये वापरण्यासाठी दिलेल्या मतदानपत्रिकांच्या गठ्ठ्यातील शेवटचा अनुक्रमांकाची मतपत्रिका असेल; आणि

(ब) अशा प्रदत्त मतपत्रिकेवर व तिच्या स्थळप्रतीवर मागील बाजूस मतदान केंद्राध्यक्ष स्वतःच्या हस्ताक्षरात व सहीनिशी "प्रदत्त मतपत्रिका" (Tener Ballot Paper)असा मजकूर लिहील.]

(४) मतदार, मतदान कक्षात, प्रदत्त मतदानपत्रिकेवर ठसा मारल्यानंतर तिची घडी करील आणि ती मतपेटीत ( Ballot Box ) टाकण्याऐवजी मतदान केंद्राध्यक्षाकडे देईल, आणि मतदान केंद्राध्यक्ष, त्या प्रयोजनासाठी ठेवलेल्या स्वतंत्र कव्हरमध्ये ती ठेवील.

**टपाली मतपत्रिका आणि मतदान केंद्रावरील कर्मचाऱ्यांनी / अधिकाऱ्यांनी मतदान करणे**

ग्रामपंचायत निवडणूक नियम, २६ च्या तरतुदीनुसार अध्यासी अधिकारी किंवा मताधिकारी किंवा जो कोणताही इसम त्यास मत देण्याचा हक्क नसेल अशा मतदान केंद्रात कामावर असेल. तो इसम यास, जर अशा अधिका-यास किंवा इसमास ज्या निवडणुकीच्या संबंधात कामावर नेमण्यात आले असेल त्या निवडणुकीत मत देण्याचा हक्क असेल तर त्या मतदान केंद्रात मतनोंदणीचा अधिकार आहे. अशा इसमाच्या मतदानपत्रिका मोहोर केलेल्या लखोट्यात बंद केल्या पाहिजेत आणि त्या लखोट्यावर ज्या मतदानकेंद्रासंबंधी त्या असतील त्या मतदानकेंद्राची नावे लिहिली पाहिजेत. असे लखोटे, नियम ३० मध्ये नमूद केलेल्या इतर गोष्टींसह निवडणूक अधिका-याच्या स्वाधीन केले पाहिजेत. ***आयोगाच्या दि. १६/१/२००१ च्या टपाली मतपत्रिका आदेश २००१ मधील सूचनांनुसार अशा अधिकारी / कर्मचा-याला टपाली मतपत्रिका किंवा निवडणूक कार्य प्रमाणपत्र देण्याची तरतूद आहे. सदर आदेशाच्या सूचना व तरतुदी जशाच्या तश्या ग्रामपंचायत निवडणूकांच्याबाबतीत लागू राहतील. तसेच सदर आदेशाच्या सोबतची प्रपत्रे ग्रामपंचायत निवडणूकीस लागू राहतील.***

**मतदान केंद्राध्यक्षाने मतदानाच्या वेळी मतदान कक्षेत प्रवेश करणे :**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, तसे करणे आवश्यक असेल तर, तो त्याला जेव्हा जेव्हा वाटेल त्यावेळी, मतदानाच्या वेळी मतदान कक्षात प्रवेश करील, आणि मतदान कक्षातील मतदान पेट्यांमध्ये अनधिकृतपणे फेरुार किंवा कोणत्याही मार्गाने ढवळाढवळ केलेली नाही याची खात्री करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करील.

(२) जर मतदान केंद्राध्यक्ष, तसे करणे आवश्यक असेल तर, तो त्याला जेव्हा जेव्हा वाटेल त्यावेळी, मतदानाच्या वेळी मतदान कक्षात प्रवेश करील, आणि मतदान कक्षातील मतदान पेटयांमध्ये अनधिकृतपणे फेरुार किंवा कोणत्याही मार्गाने ढवळाढवळ केलेली नाही याची खात्री करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करील.

(३) या नियमान्वये जेव्हा जेव्हा मतदान केंद्राध्यक्ष मतदान कक्षात प्रवेश करील तेव्हा, त्याच्यासोबत मतदान प्रतिनिधीस उपस्थित राहण्याची परवानगी देईल.

**पूर्णतः किंवा अंशतः मतदान पेटीच्या बाहेर आढळून आलेल्या मतदानपत्रिकांची विल्हेवाट लावणे :**

(१) जर एखाद्या मतदारास दिलेली कोणतीही मतदानपत्रिका त्याने कोणत्याही मतदान पेटीत टाकलेली नसेल; परंतु ती मतदान केंद्रात कोणत्याही ठिकाणी किंवा मतदान केंद्राजवळ मग ती मतदान कक्षात किंवा मतदान कक्षाच्या बाहेर- आढळून आली असेल तर ती मतदान केंद्राध्यक्षास परत करण्यात आली असल्याचे आणि त्यानुसार कार्यवाही करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) एखादी मतदानपत्रिका, एखाद्या उमेदवाराच्या मतदान पेटीमध्ये अंशतः समाविष्ट करण्यात आली असल्याचे आढळून आल्यास, असे गृहीत धरण्यात येईल की, मतदाराचा त्या उमेदवारासाठी मतदान करण्याचा उद्देश होता आणि मतदान केंद्राध्यक्ष, त्यानुसार त्या मतदान पेटीमध्ये मतदानपत्रिका ढकलील.

**खराब झालेल्या मतपत्रिका**

याबाबत नियम २८ च्या तरतुदीनुसार जो मतदार अनवधानाने आपली मतदानपत्रिका अशारीतीने वापरील की, मतदानपत्रिका म्हणून तिचा सोयीस्कर रीतीने वापर करता येणे शक्य नसेल तर त्याने ती मतदानपत्रिका अध्यासी अधिका-याच्या स्वाधीन केल्यावर व त्याची आपल्या अनवधानाविषयी खात्री पटवून दिल्यावर त्याला खराब झालेल्या मतदानपत्रिकेऐवजी दुसरी मतदानपत्रिका घेता येईल, आणि खराब झालेल्या मतदानपत्रिकेवर "रद्द केली" असा शेरा लिहिला पाहिजे.

**निकडीच्या प्रसंगी मतदान तहकुब करणे व फेरमतदान**

याबाबतची कार्यवाही निवडणूक नियम, ३१ व ३१ अ मध्ये नमूद केली आहे. नियम ३१ अन्वये (१) जर कोणत्याही मतदानकेंद्रावरील कामकाजात कोणत्याही दंग्यामुळे किंवा उघड हिंसक कृत्यामुळे व्यत्यय किंवा अडथळा आला असेल किंवा कोणत्याही निवडणुकीत कोणतीही नैसर्गीक आपत्ती किंवा दुसरे कोणतेही पुरेसे कारण यामुळे, कोणत्याही मतदानकेंद्रात मतदान घेणे शक्य नसेल तर, अशा मतदानकेंद्राचा निवडणूक अधिकारी किंवा अध्यासी अधिकारी याने, नंतर नेमावयाच्या तारखेपर्यंत मतदान तहकूब केले आहे असे जाहीर केले पाहिजे आणि अध्यासी अधिका-याने अशा रीतीने मतदान तहकूब केले असेल तेव्हा, त्याने संबंधित निवडणूक अधिका-यास ताबडतोब कळविले पाहिजे.

(२) जेव्हा जेव्हा पोट-नियम (१) अन्वये मतदान तहकूब ठेवले तेव्हा तेव्हा, निवडणूक अधिका-याने ताबडतोब परिस्थितीचे प्रतिवृत्त राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-याकडे पाठविले पाहिजे राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने शक्य तितक्या लवकर मतदानास पुन्हा सुरुवात करण्यात येईल तो दिवस व ती वेळ नियम ७ अन्वये नेमली पाहिजे. निवडणूक अधिका-याने, असे तहकुबीमुळे होणारे मतदान पूर्ण होईपर्यंत अशा निवडणुकीतील मते मोजता कामा नये.

(३) मूळ मतदानास लागू असणारे ह्या नियमांचे उपबंध, योग्य त्या फेरफारांसह, या नियमान्वये घेतलेल्या तहकुबीच्या मतदानास लागू होतील.

***याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व तहसिलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचा संबंधित अधिकारी यांनी सविस्तर अहवाल त्याच दिवशी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात फॅक्सद्वारे पाठविला पाहिजे.***

**मतदान पेट्याचा नाश वगैरे झाल्याच्या बाबतीत नव्याने मतदान घेणे** -- याबाबतची कार्यवाही नियम ३१-अ नुसार खालीलप्रमाणे राहिल-- (१) कोणत्याही निवडणुकीत जर

(अ) एखाद्या मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कोणतीही मतदान पेटी मतदान केंद्राध्यक्षाच्या किंवा निवडणूक अधिका-याच्या ताब्यातून अवैधरित्या काढून घेण्यात आली, किंवा ती अपघाताने किंवा हेतूपूर्वक नष्ट करण्यात आली किंवा गहाळ झाली, किंवा मतदानकेंद्रावरील मतदानाचा निकाल निश्चित ठरविणे अशक्य होईल इतक्या प्रमाणात तिची नासधूस करण्यात आली किंवा तिच्यात घालमेल करण्यात आली; किंवा

(ब) मतदान केंद्रावरील कार्यपध्दतीत, जिच्यामुळे मतदान निष्फळ होण्याची शक्यता असेल अशी कोणतीही चूक किंवा नियमबाह्यता घडली असेल तर, निवडणूक अधिका-याने ती गोष्ट ताबडतोब राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-यास कळविली पाहिजे.

(२) त्यानंतर, राज्य निवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेला अधिकारी ज्याने सर्व महत्वाची परिस्थिती विचारात घेउन एकतर

(अ) त्या मतदान केंद्रावरील मतदान निरर्थक असल्याचे जाहीर केले पाहिजे, त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्यासाठी एखादा दिवस ठरविला पाहिजे व वेळ ठरविली पाहिजे आणि अशा रीतीने ठरविलेला दिवस व ठरविलेली वेळ त्यास योग्य वाटेल अशा रीतीने जाहीर केली पाहिजे, किंवा

(ब) त्या मतदानकेंद्रावरील नवीन मतदानाच्या निकालाचा निवडणुकीच्या निकालावर कोणत्याही प्रकारे अनिष्ट परिणाम होणार नाही किंवा कार्यपध्दतीतील चूक किंवा नियमबाह्यता महत्वाची नाही अशी

खात्री झाली तर, निवडणुकीच्या पुढील कामकाजाकरिता व निवडणूक पूर्ण करण्याकरिता त्यास योग्य वाटतील असे निदेश निवडणूक अधिका-यास दिले पाहिजेत.

(३) या अधिनियमाचे व त्या अन्वये केलेले कोणतेही नियम किंवा आदेश यांचे उपबंध ज्याप्रमाणे मूळ मतदानास लागू होतात त्याप्रमाणे ते अशा प्रत्येक नव्याने घेतलेल्या मतदानासही लागू होतील.

***याबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व तहसिलदार तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचा संबंधित अधिकारी यांनी सविस्तर अहवाल त्याच दिवशी राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात फॅक्सद्वारे पाठविला पाहिजे.***

**मतदान बंद करणे : (Close of Poll)**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, निवडणूक कार्यक्रमामध्ये मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी मतदान बंद करील आणि त्यानंतर कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही :

परंतु, मतदान बंद करण्यापूर्वी एखादा मतदार मतदान केंद्रात मतदान करण्यासाठी तेथे उपस्थित होता, याबाबत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्यावर मतदान केंद्राध्यक्ष निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

**मतदानानंतर मतपेट्या सीलबंद करणे :**

(१) मतदान बंद केल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, मतदान केंद्राध्यक्ष, मतपेटीची फट बंद करील आणि मतपेटीची फट बंद करण्यासाठी मतपेटीत कोणतेही यांत्रिक साधन समाविष्ट नसेल तेव्हा तो अशी फट सीलबंद करील आणि तसेच तेथे उपस्थित असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधीस त्यांचे सील लावण्यास परवानगी देईल.

(२) त्यानंतर मतपेटी सीलबंद व सुरक्षित करील.

(३) पहिली मतपेटी पूर्ण भरल्यामुळे जेव्हा दुसऱ्या मतपेटीचा वापर करणे आवश्यक असेल तेव्हा, दुसरी मतपेटी वापरण्यास घेण्यापूर्वी, तरतूद केल्याप्रमाणे पहिली मतपेटी बंद करण्यात येईल, सीलबंद व सुरक्षित करण्यात येईल.

(४) मतदान बंद केल्यानंतर, शक्य होईल तितक्या लवकर, अशा कोणत्याही मतदान केंद्रातील मतदान केंद्राध्यक्ष,

(अ) मतपेट्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, कापडी पिशवी किंवा कापडी अस्तराचे आवरण यात काहीही नाही याचे मतदान प्रतिनिधींना प्रात्यक्षिक दाखविल्यानंतर, मतदान पेटया कापडी पिशव्यांमध्ये किंवा कापडी अस्तराच्या कव्हरमध्ये ठेवील;

(ब) उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधीस, मतपेटी रिकामी आहे यासाठी प्रत्येक मतदान पेटीचे निरीक्षण करण्याची अनुमती देईल आणि त्यांना त्याचे प्रात्यक्षिक दाखवील;

(क) पिशवीवर किंवा कापडी अस्तराच्या कव्हरवर मतदारसंघाचे नाव, मतदान केंद्राचे नाव व मतदानाची तारीख नोंदवील; आणि

(ड) पिशवी किंवा कव्हर सीलबंद करील आणि तेथे उपस्थित असलेल्या कोणत्याही मतदान प्रतिनिधीस त्यावर त्याचे सील करण्याची अनुमती देईल.

**मतपत्रिकांचा हिशेब : (जोडपत्र-१०)**

(१) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान बंद केल्यानंतर, विहित नमुन्यात मतपत्रिकांचा हिशेब तयार करील आणि "मतपत्रिकांचा हिशेब" असा मजकूर लिहिलेल्या एका स्वतंत्र कव्हरमध्ये तो ठेवील. असा हिशेब तयार करतांना आरक्षणनिहाय मिळालेल्या मतपत्रिकांची आकडेवारी स्वतंत्र दाखविली जाईल. **(जोडपत्र १०)**

(२) मतदान केंद्राध्यक्ष, मतदान बंद करतेवेळी तेथे उपस्थित असलेल्या प्रत्येक मतदान प्रतिनिधीस, मतदानपत्रिकांच्या हिशेबची नोंद केलेली एक सत्य प्रत, त्यासाठी उक्त मतदान प्रतिनिधीकडून ती मिळाल्याची पावती घेतल्यानंतर प्रदान करील आणि त्यावर सत्य प्रत असे साक्षांकित करील.

**मतदान बंद करताना करावयाची घोषणा**

मतदान बंद करताना **जोडपत्र १३** मध्ये नमूद केल्याप्रमाणे मतदानाच्या शेवटी मतदान केंद्राध्यक्षाने सर्व मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रावर नोंदविलेल्या मतांच्या हिशोबाची प्रत दिल्यासंदर्भातील घोषणा करणे आवश्यक आहे.

**अन्य पाकिटात सीलबंद करणे :** निवडणूक नियम ३० च्या तरतूदीनुसार

(१) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष,

(अ) मतदान केंद्राध्यक्षाने स्वाक्षऱ्या केलेल्या परंतु न वापरलेल्या मतपत्रिका;

(ब) प्रदत्त मतपत्रिका

(क) मतदान कार्यपध्दतीचे उल्लंघन केल्याबाबत रद्द केलेल्या मतपत्रिका; तसेच अन्य कोणत्याही रद्द केलेल्या मतपत्रिका;

(ड) मतपत्रिकेची चिन्हांकित प्रत;

(ई) प्रदत्त मतांची यादी असलेले कव्हर;

(फ) आव्हान मतांची यादी; आणि

(ग) केंद्राध्यक्षांची दैनंदिनी व मतपत्रिकांचा हिशेब तसेच राज्य निवडणूक आयोगाकडून सीलबंद पाकिटामध्ये ठेवण्यास सांगण्यात येतील अशी अन्य कोणतीही कागदपत्रे, स्वतंत्र पाकिटामध्ये ठेवील.

(२) असे प्रत्येक पाकिट, मतदान केंद्राध्यक्षाच्या सीलने आणि जे मतदान केंद्रावर उपस्थित असतील व त्यावर आपले सील लावण्याची इच्छा व्यक्ती करतील अशा एकतर उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या किंवा त्याच्या मतदान प्रतिनिधीच्या सीलने सीलबंद करण्यात येईल.

मतदान केंद्राध्यक्ष मतदान केंद्रावरील कामकाज पूर्ण करण्यापूर्वी कागदपत्रे व मतपेटी सुरक्षितपणे सिल बंद केल्याची खात्री करील व तशी नोंद मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत घेईल **(जोडपत्र ११)**

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे मतपेट्या, इत्यादी हस्तांतरित करणे :

(१) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष, निवडणूक निर्णय अधिकारी निदेश देईल अशा ठिकाणी-

(क) मतपेट्या,

(ख) मतपत्रिकांचा हिशेब;

(ग) निर्दिष्ट केलेले सीलबंद पॉकेट; आणि

(घ) मतदान केंद्रात वापरलेली अन्य सर्व कागदपत्रे;

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे सुपूर्द करील किंवा ते सुपूर्द करण्याची व्यवस्था करील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी, सर्व मतपेट्यांची पाकिटांची व अन्य कागदपत्रांची सुरक्षित वाहतूक करण्यासाठी आणि मतमोजणी सुरु होईपर्यंत त्या सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यासाठी पुरेशी व्यवस्था करील.

## अहवाल

कोणत्याही प्रकाराची अनियमितता घडल्यास त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात फॅक्सद्वारे व दूरध्वनीवरुन संबंधित तहसिलदाराने व जिल्हाधिकारी कार्यालयाने सादर करावा. मतदानाच्यावेळी कोणत्याही प्रकारे अडथळा आल्यास अथवा अनुचित प्रकार घडल्यास त्वरीत राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाशी दूरध्वनीवरुन अथवा भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा तसेच त्वरीत फॅक्सद्वारे अहवाल सादर करावा.

याबाबतची संपुर्ण जबाबदारी संबंधित तहसिल कार्यालयाची राहील.

# प्रकरण १२

## मतमोजणी

**मतमोजणीची कार्यवाही नियम ३२ च्या तरतुदीप्रमाणे असेल. त्यानुसार (१) मतमोजणी निवडणूक अधिका-याने त्याच्या देखरेखीखाली व तो मतमोजणीसाठी मदत करण्याकरिता अशा इसमांच्या सहाय्याने केली पाहिजे.**

(२) मते मोजण्यासाठी नियम ७ अन्वये ठरविलेल्या दिवशी, वेळी व जागी, निवडणूक अधिका-याने मतदानासाठी वापरलेल्या मतपेट्यांच्या संबंधात पुढीलप्रमाणे काम चालविले पाहिजे--

मते मोजण्यासाठी ठेवलेल्या सर्व मतपेट्या पडताळून पाहिल्या पाहिजेत आणि अशा जागी मोजावयाच्या मतदानपत्रिका ज्यात आहेत अशा सर्व मतपेट्या मिळालेल्या आहेत आणि त्यांचा हिशेब देण्यात आलेला आहे, याविषयी निवडणूक अधिका-याने स्वतःची खात्री करुन घेतली पाहिजे;

(२) निवडणूक अधिका-याने त्यानंतर मोजणीच्या वेळी हजर असलेल्या उमेदवारास आणि त्याच्या निवडणूक अभिकर्त्यास व मोजणी अभिकर्त्यास मतपेट्या सुस्थितीत आहेत अशी त्यांची खात्री होण्यासाठी मतपेट्या व त्यांच्या मोहोरा तपासण्याची संधी दिली पाहिजे;

(३) तसेच निवडणूक अधिका-याने, वस्तूतः कोणत्याही मतपेट्यांचे बाबतीत ढवळाढवळ झालेली नाही अशी स्वतःचीही खात्री करुन घेतली पाहिजे ;

(४) जर अशा जागी मोजावयाच्या मतदानपत्रिका ज्यांत आहेत अशा सर्व मतपेट्या मिळाल्या आहेत आणि त्या सुंस्थितीत आहे अशी निवडणूक अधिका-याची खात्री होईल तर, त्याने मतपेट्या असलेल्या मतदानपत्रिकांची मोजणी सुरु केली पाहिजे.

(५) मतमोजणीसाठी प्रत्येक मतपेटी उघडण्यात येईल तेव्हा, स्पष्टपणे वैध असलेल्या मतदानपत्रिका अवैध व संशयास्पद मतदानपत्रिकांपासून वेगळ्या काढल्या पाहिजेत. अवैध व संशयास्पद मतपत्रिका, निर्णयासाठी निवडणूक अधिका-याकडे पाठविल्या पाहिजेत, वैध (मतदानपत्रिका) त्यानंतर मोजणीसाठी घेतल्या पाहिजेत आणि प्रत्येक उमेदवाराच्या नावे नोंदलेली मते, मतमोजणीसाठी मदत करण्याकरिता नेमलेल्या इसमांच्या मदतीने मोजली पाहिजेत;

(६) निवडणूक अधिका-याने, हजर असतील अशा उमेदवारास, आणि त्यांच्या निवडणूक व मोजणी अभिकर्त्यास निवडणूक अधिका-याच्या मते नामंजूर होण्यास पात्र असतील अशा सर्व मतदानपत्रिकांची तपासणी करण्याची वाजवी संधी दिली पाहिजे, परंतु त्यांना, त्या किंवा इतर

कोणत्याही मतदानपत्रिका हाताळू देता कामा नये. निवडणूक अधिका-याने, नामंजूर केलेल्या प्रत्येक मतदानपत्रिकेवर **नामंजूर केलेली** हे शब्द लिहिले पाहिजेत. जर कोणताही उमेदवार किंवा त्याचा निवडणूक किंवा मोजणी अभिकर्ता कोणतीही मतदानपत्रिका नामंजूर करण्याच्या बिनचूकपणाबद्दल हरकत घेईल तर निवडणूक अधिका-याने अशा मतदान पत्रिकेवर ती नामंजूर करण्यात आल्याबद्दलची कारणेसुध्दा थोडक्यात नमूद केली पाहिजेत;

(७) एखाद्या मतदान केंद्रात वापरण्यात आलेल्या सर्व मतपेट्यांमधील सर्व मतदानपत्रिकांची मोजणी झाल्यानंतर, सर्व वैध पत्रिकांचे पुडके करुन ते, नामंजूर केलेल्या मतपत्रिकांच्या वेगळ्या पुडक्यांसोबत ठेवले पाहिजे. ही पुडकी मोहोरबंद करुन त्यावर पुढील तपशील नोंदला जाण्याची व्यवस्था निवडणूक अधिका-याने केली पाहिजे-

(अ) ग्रामपंचायतीचे नाव,

(ब) प्रभागाचा (वॉर्डाचा) क्रमांक किंवा नाव,

(क) मतदानपत्रिकांचा वापर करण्यात आलेल्या मतदान केंद्राचा तपशील, आणि

(ड) मत मोजणीची तारीख.

(३) निवडणूक अधिका-याने मते मोजण्याचे काम शक्य असेल तेथवर सतत चालू ठेवले पाहिजे आणि मते मोजण्याचे काम तहकूब करावयाचे असेल अशा कोणत्याही दरम्यानच्या मुदतीत मतदानपत्रिका पुडकी व निवडणुकासंबंधीचे इतर दस्तऐवज यावर स्वतःची मोहोर करुन आणि ज्या उमेदवारांची किंवा निवडणूक किंवा मोजणी अभिकर्त्याची मोहोर करुन ती मोहोरबंद ठेवली पाहिजे आणि त्यांच्या सुरक्षित अभिरक्षेसंबंधी पुरेशी खबरदारी घेण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(४) सर्व मतदान केंद्रावर वापरलेल्या सर्व मतपेट्यांत असलेल्या मतदानपत्रिकांची मोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणूक अधिका-याने एक एकत्रित विवरणपत्रक तयार केले पाहिजे व त्यात, प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या मतांची एकूण संख्या नोंदली पाहिजे. **(जोडपत्र-१४)**

## अहवाल

**मतमोजणी सुरु झाल्यापासून एक तासाच्या आत मतमोजणी रितसर सुरु झ ाल्याबाबतचा तसेच मतमोजणी पुर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर त्याबाबतचा अहवाल संबंधित तहसिलदाराने दूरध्वनीवरुन राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयात कळवावा. कोणत्याही प्रकाराची अनियमितता न घडल्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगाच्या**

**कार्यालयात फॅक्सद्वारे व दूरध्वनीवरुन संबंधित तहसिलदाराने व जिल्हाधिकारी कार्यालयाने सादर करावा. मतमोजणीच्यावेळी कोणत्याही प्रकारे अडथळा आल्यास अथवा अनुचित प्रकार घडल्यास त्वरीत राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाशी दूरध्वनीवरुन अथवा भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा तसेच त्वरीत फॅक्सद्वारे अहवाल सादर करावा.**

**याबाबतची संपुर्ण जबाबदारी संबंधित तहसिल कार्यालयाची राहील.**

**वैध व अवैध मते**

मतमोजणीच्या वेळी मतपत्रिका नामंजूर करण्याची किंवा अवैध ठरविण्याची कारणे ही नियम ३३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील. ती खालीलप्रमाणे (१) मतपेटीत असलेल्या मतपत्रिका पुढील कारणांवरुन नाकारण्यात आल्या पाहिजेत:-

(अ) ज्यामुळे मतदार ओळखता येईल अशी कोणतीही खूण किंवा मजकूर मतपत्रिकेवर असेल

(ब) ज्या मतपेटीत ती आढळून आली असेल ती पेटी ज्या मतदान केंद्रात वापरली असेल त्या मतदान केंद्रात वापरण्यासाठी अधिकृत केलेल्या मतपत्रिकांवरील अनुक्रमांक आणि नावापूर्वीची उपाधी किंवा उत्तरगामी प्रत्यय किंवा खूणा याहून त्यावर निराळा अनुक्रमांक, नावापूर्वीची उपाधी किंवा उत्तरगामी प्रत्यय किंवा खूण असेल

(क) ती बनावट आहे किंवा ती खरीखुरी मतपत्रिका असल्याबद्दल निश्चितपणे सिध्द करता येणार नाही इतक्या प्रमाणात खराब किंवा फाटकी आहे अशी निवडणूक अधिकाऱ्याची खात्री झ ाली असेल

(ड) मतदाराने त्यास जितकी मते देण्याचा हक्क आहे त्यापेक्षा जास्त मते नोंदविली असतील किंवा त्याने कोणत्याही एका उमेदवाराकरीता एकापेक्षा अधिक मते नोंदविली असतील

परंतु

(एक) खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही दोष मतदान केंद्राध्यक्षाने किंवा मतदान अधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही चुकीमुळे किंवा कसुरीमुळे झाला आहे अशी निवडणूक अधिकाऱ्याची खात्री होईल याबाबतीत, केवळ असा दोष आहे या कारणावरुन ती मतदानपत्रिका नाकारण्यात येता कामा नये.

(दोन) ज्या प्रकारे मतदानपत्रिकेवर खूण करण्यात आली असेल त्यावरुन विशिष्ट उमेदवारास मत देण्याचा इरादा स्पष्टपणे दिसून येत असेल तर मत दर्शविणारी खूण अस्पष्ट आहे किंवा एकाहून अधिक वेळा खूण केली आहे, केवळ याच कारणावरुन, ती मतदानपत्रिका नाकारण्यात येता कामा नये.

(२) मतपेटीतील वैधतेसंबंधीचा निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा निर्णय अखेरचा असेल.

पोट-नियम (२) खाली निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा मतपत्रिकेच्या वैधतेसंबंधीचा निर्णय अंतिम असतो. परंतु त्यामुळे कलम १५ खाली न्यायाधिशाला अशा मतपत्रिकेबाबत निर्णय देण्यास हरकत नाही.

## प्रकरण १३

## निवडणुकीचा निकाल जाहीर करणे

याबाबतची तरतूद निवडणूक नियम ३४ मध्ये नमूद केली असून, त्यानुसार (१) नोदविलेल्या मतांची संख्या दर्शविणारे विवरणपत्रक पूर्ण झाल्यानंतर, निवडणूक अधिकाऱ्याने, जर कोणतीही राखीव जागा भरावयाची असल्यास, निवडून येण्यास पात्रताप्राप्त उमेदवारांमधून अशी राखीव जागा भरण्यासाठी ज्याला सर्वात अधिक मते मिळाली असतील असे उमेदवार, नियम ५ च्या उपबंधास अधीन राहून, जाहीर केले पाहिजेत

परंतु, जर त्याच विभागामध्ये अनु. जाती किंवा जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा स्त्रिया यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या असतील तर, अनु. जाती किंवा अनु. जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग किंवा स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागेचा किंवा जागांचा निकाल प्रथमतः जाहीर केला पाहिजे आणि त्यानंतर स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागेचा किंवा जागांचा निकाल जाहीर केला पाहिजे.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी त्यानंतर ज्या उमदेवारांनी बिनराखीव जागेमधून निवडणूक लढविलेली आहे आणि ज्यांनी बिनराखीव जागा किंवा (अनेक) जागा भरण्यासाठी निवडून येण्यासाठी सर्वात जास्त मते मिळविलेली आहेत अशा उमेदवारांमधून बिनराखीव जागेचे किंवा जागांचे निकाल जाहीर करील.

(३) राखीव जागांसाठी किंवा राखीव नसलेल्या जागांसाठी कोणत्याही उमेदवारांना समसमान मते पडली असल्याचे आढळून येईल आणि त्या उमेदवारांपैकी कोणताही उमेदवार हा, त्यास एक जादा मत मिळाल्यास निवडून आल्याचे जाहीर केले जाण्यास पात्र ठरत असेल तर, त्या बाबतीत असे जादा मत कोणत्याही इसमास किंवा इसमांस देण्यात आले पाहिजे ते, निवडणूक अधिकाऱ्याच्या समक्ष आणि ज्याची हजर राहण्याची इच्छा असेल अशा उमेदवारांच्या किंवा त्यांच्या अभिकर्त्यांच्या समक्ष आणि निवडणूक अधिकारी ठरवील अशा रीतीने चिठ्ठया टाकून ठरविण्यात आले पाहिजे.

**निवडणूकीचा निकाल जाहीर करणे (स्पष्टीकरण)**:- मतदार संघातील (वॉर्डमधील) मतमोजणी पूर्ण झाल्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने प्रथम अनु. जाती किंवा अनु. जमाती यांचेसाठी राखीव जागा असल्यास त्याचा निकाल प्रथम जाहीर केला पाहिजे. त्यानंतर स्त्रियांसाठी राखीव असलेल्या जागांचा निकाल जाहीर केला पाहिजे. शेवटी सर्वसाधारण किंवा बिनराखीव

जागांचा निकाल जाहीर केला पाहिजे. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक नियम ३४ (२) मधील २००२ च्या सुधारणेनुसार बिनराखीव जागेचा निकाल जाहिर करताना ज्या उमेदवारांनी बिनराखीव जागेची निवडणूक लढविली आहे व ज्यास बिनराखीव जागा किंवा अनेक जागा भरण्यासाठी निवडून येण्याकरीता सर्वात जास्त मते मिळाली आहेत, अशा उमेदवारांमधूनच बिनराखीव जागेचा निकाल जाहिर करील अर्थात अनु. जाती, जमाती व नागरिकांचा मागासप्रवर्ग व स्त्री राखीव जागेच्या उमेदवारांचा (निवडून आलेल्या किंवा न आलेल्या) या अराखीव/सर्वसाधारण जागेकरीता त्यास सर्वाधिक मते मिळाली असली तरीही विचार होणार नाही.

निकालपत्राचा नमूना व प्रगटन (Declaration) **जोडपत्र १५ व जोडपत्र १६** नुसार राहील.

## मतांची फेरतपासणी

नियम ३५ च्या तरतुदीनुसार (१) अशा रीतीने उमेदवार जाहीर करण्यात आल्यानंतर उमेदवारास किंवा त्याच्या गैरहजेरीत त्याच्या निवडणूक अभिकर्त्यास, पूर्वी मोजण्यात आलेल्या मतपत्रिकांपैकी सर्व किंवा कोणत्याही मतपत्रिकांच्या फेरमोजणीसाठी लेखी अर्ज करण्याचा अधिकार आहे, मात्र ज्या मुद्यावर त्याने अशी फेरमोजणीची मागणी केली असेल ते मुद्दे त्याने अशा अर्जात नमूद केले पाहिजे.

(२) असा अर्ज करण्यात आल्यानंतर, निवडणूक अधिकाऱ्याने, उक्त गोष्टींचा निकाल लावला पाहिजे आणि त्यास असा अर्ज संपूर्णतः किंवा अंशतः मंजूर करण्याचा किंवा उक्त अर्ज निष्कारण किंवा वाजवी कारण नसताना दिल्याचे त्यास दिसून येईल तर उक्त अर्ज संपूर्णपणे नामंजूर करण्याचा अधिकार आहे.

(३) निवडणूक अधिकाऱ्याचा पोट-नियम(२) अन्वयेचा प्रत्येक निकाल हा लेखी असला पाहिजे आणि त्यामध्ये त्याबद्दलची कारणे नमूद करण्यात आली पाहिजेत.

(४) जर निवडणूक अधिकारी पोट-नियम (२) अन्वये अर्ज संपूर्णपणे किंवा अंशतः मंजूर करण्याचे ठरवील तर त्याने,-

(अ) आपल्या निकालानुसार मतपत्रिकांची फेरमोजणी केली पाहिजे

(ब) नियम ३२, पोटनियम (४) मध्ये उल्लेखिलेल्या व नमूद केलेल्या मतांची संख्या दर्शविणाऱ्या विवरणपत्रकात, अशा फेरमोजणीनंतर आवश्यक असेल त्या मर्यादेपर्यन्त, सुधारणा केली पाहिजे आणि

(क) त्याने केलेल्या सुधारणा आणि निवडणुकीचा निकाल जाहिर केला पाहिजे.

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर उमेदवारास किंवा त्याचे गैरहजेरीत त्याचे अभिकर्त्यास निवडणूक अधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करुन मतांच्या फेरमोजणीची मागणी करता येते. मतांची बेरीज चुकली आहे किंवा एकूण मतपत्रिकांच्या संख्येइतकी मंजूर केलेल्या व नामंजूर केलेल्या मतांची बेरीज येत नाही, मतपत्रिका नामंजूर करण्यात चूक झालेली आहे अगर इतर जी कारणे फेरमतमोजणीसाठी योग्य असतील ती सदर अर्जात पुराव्यासह नमूद केली पाहिजेत.

**निवडणुकीचा निकाल प्रसिध्दी करणे:-**

नियम ३६ व ३७ च्या तरतुदीनुसार निवडणूक अधिका-याने निवडून आलेल्या उमेदवारांची नावे, गावाच्या चावडीत किंवा ग्रामपंचायतीच्या कार्यालयात किंवा त्याने त्या बाबतीत नियुक्त केले असेल अशा, जर कोणतेही असल्यास, सार्वजनिक ठिकाणी लावून प्रसिध्द केली पाहिजेत आणि अशी नावे राज्य निवडणूक आयुक्तांस ताबडतोब कळविण्यात आली पाहिजेत.

राज्य निवडणूक आयुक्ताने निवडून आलेल्या इसमांची नावे स्थायी समितीकडे पाठविली पाहिजेत आणि जर निवडून आलेल्या इसमांची संख्या ही पंचायतीच्या सदस्यांच्या एकूण संख्येहून कमी असेल तर राज्य निवडणूक आयुक्तास ठरलेल्या जागांसाठी कलम १०, पोटकलम (३) अन्वये नेमणूका करण्याविषयी स्थायी समितीस फर्माविण्याचा अधिकार असेल.

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्र.एसईसी १०९५/सीआर-२६/९५/पीआर, दि. २७/१/१९९५ व क्र. रानिआ १०९५/३२२६/९५/पंरा, १६/५/१९९५ च्या आदेशानुसार नियम ३७ चे अधिकार संबंधित जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत, त्यामुळे नियम ३७ च्या तरतुदीनुसार निवडून आलेल्या इसमांची नांवे स्थायी समितीकडे पाठविणे व तद्अनुषंगाने करावयाची सर्व कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे.

**निवडणूक कामकाजाचे कागदपत्र/दप्तर अभिरक्षीत ठेवणे**

याबाबतची कार्यवाही नियम ३८,३९ व ४० नुसार असेल. त्यानुसार

**कामकाजांची दप्तर :-** निवडणूक अधिकाऱ्याने प्रत्येक निवडणुकीच्या कामकाजांचे दप्तर ठेवले पाहिजे.

**निवडणुकीसंबंधीच्या कागदपत्रांची अभिरक्षा:-** निवडणुक अधिकाऱ्याने, नियम ३० व ३२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेली पुडकी आणि इतर दस्तऐवज व निवडणुकीसंबंधीची इतर सर्व कागदपत्रे अभिरक्षेत ठेवली पाहिजेत.

**निवडणूकविषयक कागदपत्रे सादर करणे व त्यांची तपासणी :-** (१) (अ) वापरण्यात न आलेल्या मतपत्रिकांची पुडकी

**(ब)** वापरण्यात आलेल्या मतपत्रिकांची पुडकी मग ती वैध असोत व प्रदत्त किंवा नाकारण्यात आलेली असोत

**(क)** मतदारांच्या यादीच्या चिन्हांकीत प्रतींची पुडकी निवडणूक अधिकाऱ्याच्या अभिरक्षेत असताना ती उघडता कामा नयेत आणि सक्षम न्यायालय किंवा प्राधिकारी यांच्या आदेशावाचून, कोणत्याही इसमाने किंवा प्राधिकाऱ्याने उक्त पाकिटातील मजकुरांची तपासणी करता कामा नये किंवा ती त्याच्यापुढे सादर करता कामा नये.

(२) निवडणुकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे लोकांच्या मागणीसाठी खुली असतील.

**मतदानपत्रिका व इतर सर्व कागदपत्रांची विल्हेवाट लावणे**

याबाबतची कार्यवाही नियम ४१ नुसार असेल त्यानुसार (१) निवडणुकीच्या निणर्य प्रसिध्द करण्यात आल्याच्या तारखेपासून दोन महिने पूर्ण झाल्या वर किंवा निवडणुकीच्या वैधतेविषयी शंका घेणारा अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत अशा अर्जावरील निर्णयाच्या तारखेपासून दोन महिने पूर्ण झाल्यांनंतर यांपैकी जी उशिराची असेल त्या तारखेस, निवडणूक अधिका-याने राज्य नि-नवडणूक आयुक्ताने प्राधिकृत केलेल्या अधिका-याची पूर्वमंजुरी घेउन , मतपत्रिका नष्ट केल्या पाहिजेत.

( २ ) निवडणूकीसंबंधातील इतर सर्व कागदपत्रे ही, ग्रामपंचायतीची पुढील निवडणूक संपेपर्यंत राखून ठेवण्यात आली पाहिजेत आणि त्यानंतर ती राज्य निवडणूक आयोगाने किंवा सक्षम - न्यायालयाने किंवा प्राधिंका-याने तव्दिरुध्द कोणताही निदेश दिला असल्यास त्यास अधीन राहून, नष्ट करण्यात आली पाहिजेत.

## बहुसदस्य निवडणूक व इतर तरतुदी

याबाबतची कार्यवाही नियम ४१-अ नुसार असेल. त्यानुसार एखादा इसम ग्रामपंचायतीतील एकाहून अधिक जागांसाठी निवडला गेल्यास, कलम १३-अ अनुसार त्याने एक खेरीज बाकी सर्व जागांचा राजीनामा ज्या मुदतीत दिला पाहिजे ती मुदत निवडणूक अधिका-याने नियम ३६ अ-वये निवडणूकीचा निकाल लावल्याच्या तारखेपासून सात दिवस इतकी असेल.

**मतदारांच्या याद्या आणि निवडणुकीच्या वेगवेगळया अवस्था इत्यादीबाबत प्रादेशिक भाषेत अधिसूचना काढणे** :- मतदारांच्या याद्या आणि नियम ३ अवये याद्यांची सार्वजाीक तपासणी करण्याबाबतची नोटीस आणि निवडणुकीच्या वेगवेगळया अवस्थांबाबतची अधिसूचना आणि नियम ७ अन्वये नियोजित निवडणुकीची नोटीस ही गावच्या प्रादेशिक भाषेत असली पाहिजे.

**आकस्मिक रीत्या रिकाम्या झालेल्या जागा** :- हया नियमांचे उपबंध, आवश्यक त्या फेरफारांसह, पोट-निवडणूकीस लागू होतील. परंतु-

१)नियम ३, पोट नियम (५)अवये सावर्जनिक निवडणुकीच्या बाबतीत तरतूद केल्याप्रमाणे मतदारांची यादी प्रसिध्द करणे हे पोट निवडणुकीच्या बाबतीत आवश्यक असणार नाही.

**या नियमांन्वये स्वतःचे अधिकार सोपविण्याचे राज्य निवडणूक आयुक्ताचे अधिकारः-** राज्य निवडणूक आयुक्त हया नियमावये त्याला वापरता येण्याजोगे अधिकार त्याने प्राधिकृत केलेल्या तहसीलदारापेक्षा कमी दजार्चे नसलेल्या अधिका-याकडे सोपवू शकेल.

### आदर्श आचारसंहिता

*राज्य निवडणूक आयोगाकडून ज्या दिनांकास निवडणूक कार्यक्रम जाहिर केला जाईल, त्या दिनांकापासून संबंधित ग्रामपंचायत क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू होईल. सदर आचारसंहिता निवडणूक प्रक्रीया पूर्ण होईपर्यन्त अर्थात निवडणूकीचा निकाल जाहिर करेपर्यन्त अंमलात राहिल. सदर आचारसंहितेची अंमलबजावणी राज्य निवडणूक आयोगाकडील एकत्रित आदेश दि. २९/३/२००४ मधील सूचनांनुसार करण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत सदर सूचनांचा भंग होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी. त्याचप्रमाणे संदिग्धता अथवा शंका असल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयाशी त्वरीत संपर्क साधावा व मार्गदर्शन घ्यावे.*

*आचारसंहितेबाबत राज्य निवडणूक आयोगाच्या निवडणूक कार्यक्रमात वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या सूचना जिल्हाधिकारी कार्यालयाने संबंधित तहसिलदार तसेच या निवडणूकांशी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या निर्देशनास आणुन दयाव्यात व त्यानुसार कार्यवाही केली जाईल याची दक्षता घ्यावी.*

## प्रकरण १४

## ग्रामपंचायत निवडणुकीकरिता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान - ओळख

### १. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबत निवडणूक कायदा व कार्यपध्दती

ग्रामपंचायत निवडणुकीशी संबंधित मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबत दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. तसेच त्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे निवडणूक नियम अद्याप तयार करण्यात आलेले नसल्याने राज्य निवडणूक आयोगाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १०अ अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायत निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश- २००७ दिनांक, २८/३/२००७ रोजी पारित केले असून, त्यांच्या प्रती सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्या आहेत. तसेच सदर आदेश या निदेश पुस्तिकेतही देण्यात आले आहेत. **( परिशिष्ट-VIII )**

**२. इलेक्ट्रॉनिक वोटींग मशीन (EVM):-** निवडणुकीसाठी मतपेटीच्याऐवजी वापरण्यात येणारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र. याचे २ मुख्य भाग असतात १) बॅलट युनिट (BU) व २) कंट्रोल युनिट (CU) या दोन्ही भागांचे मिळून एक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र होते.

### ३. मतदान यंत्राची थोडक्यात ओळख

(१) निवडणूक निर्णय अधिकारी यांना मतदान यंत्राची सखोल कार्यपध्दती माहिती असणे अनिवार्य आहे. मतदान यंत्राचे दोन भाग असून, एका भागास (कंट्रोल युनिट) तर दुस-या भागास (बॅलट युनिट) असे म्हटले जाते. सदरचे दोन भाग एका केबलद्वारे एकमेकांस जोडले जातात. या केबलचा एक भाग बॅलट युनिटला कायमचा जोडलेला असतो व दुस-या टोकाचा मोकळा भाग हा कंट्रोल युनिटला जोडावयाचा असतो.

(२) एक बॅलट युनिट जास्तीत जास्त १५ उमेदवारांसाठी उपयोगात आणता येते. बॅलट युनिटमध्ये "डिस्प्ले" हा एक भाग असून, त्यामध्ये मतपत्रिका ठेवण्याची तरतूद असून, मतपत्रिकेवर मतपत्रिकेचा अनुक्रमांक, निवडणुक कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्थेची व प्रभागाची आहे त्याविषयीची माहिती आणि निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नांवे, अनुक्रमांक व त्यांची चिन्हे दर्शविलेली असतात. प्रत्येक उमेदवाराच्या नांवासमोर एक बटन असून, ते बटन दाबून मतदार आपले मत संबंधित उमेदवारास

देऊ शकतो. सदर बटणाशेजारी एक लाल रंगाचा दिवा (बल्ब) असून, मत देण्यासाठी बटन दाबल्यानंतर सदर दिवा पेटतो. बॅलेट युनिटच्या शेवटी असलेले १६ वे बटन हे "END" अक्षरे लिहिलेले असून, त्याचा वापर केवळ राज्य निवडणूक आयोग निर्देश देईल त्याचवेळी करण्यात येईल. चार बॅलट युनिट एकमेकांशी जोडल्यानंतर ६० उमेदवार जरी निवडणूक रिंगणात असले तरी केवळ एका कंट्रोल युनिटच्या सहाय्याने मतदान प्रक्रिया पार पाडता येते.

(३) कंट्रोल युनिटच्या अगदी वरच्या भागात वेगवेगळी माहिती दर्शविणा-या तरतुदी आहेत. या माहितीमध्ये निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या, एकूण नोंदविण्यात आलेली मते, प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते इत्यादी माहिती दर्शविण्याची तरतूद असते. **या भागास कंट्रोल युनिटचे "डिस्प्ले सेक्शन" असे म्हटले जाते.** डिस्प्ले सेक्शनच्या खालच्या बाजूस एक बॅटरी ठेवण्यासाठी कप्पा असून, त्या बॅटरीवर मतदान यंत्र चालते. सदर कप्प्याच्या बाजूला एक दुसरा कप्पा असून, त्या ठिकाणी काढता येणारी मेमरी असून, त्याखाली "Cand. Set" नावाचे एक बटन आहे, त्याद्वारे कंट्रोल युनिटमध्ये कोणत्याही विशिष्ट निवडणुकीसाठी निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या निश्चित करता येते. या बटणास "कॅन्ड सेट बटन"असे म्हटले जाते. या बटणाच्या वर काढता येणारी मेमरी खोचून लावण्यात आलेली असते. मतमोजणीनंतर सदर मेमरी उपस्थित मतमोजणी प्रतिनिधींसमोर काढून सील करावयाची आहे. **या भागास कंट्रोल युनिटचा "कॅन्ड सेट सेक्शन" असे म्हटले जाते.** कॅन्ड सेट सेक्शनच्या खालच्या भागास कंट्रोल युनिटचा "रिझल्ट सेक्शन" असे म्हटले जाते. या भागात "Close" हे बटन असून, ते मतदान बंद करताना वापरले जाते. दुसरे "RESULT- I " हे बटन असून, ते मतमोजणीसाठी वापरले जाते "RESULT-II" हे बटन काढता येणा-या मेमरीतील निकाल पडताळणीसाठी असून त्याचा वापर सध्या होणार नाही.) तिसरे "Clear" हे बटन असून, त्याद्वारे मतदान यंत्रात नोंदविण्यात आलेली माहिती (डाटा) पुसण्यासाठी उपयोगात आणले जाते. कंट्रोल युनिटच्या सर्वात खालच्या बाजूस दोन बटन असून, एकावर "Ballot" असे बटन आहे, ते दाबल्यानंतर "बॅलट युनिट" मत नोंदविण्यासाठी तयार होते आणि दुसरे बटन "Total" हे बटन असून, ते दाबल्यानंतर त्या टप्प्यापर्यंत किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याची आकडेवारी मिळते. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, हे बटन दाबल्यानंतर मिळणारे आकडे हे बॅलट युनिटमध्ये नोंदविण्यात आलेली एकूण मते असून, ती उमेदवारनिहाय मते नसतील. **या भागास कंट्रोल युनिटचे "बॅलट सेक्शन" असे म्हटले जाते.**

(४) मतदान यंत्रामध्ये एक आधुनिक सूक्ष्म संगणक (मायक्रो-कॉम्प्युटर) असून, अन्य मोठया प्रमाणावरील इंटिग्रेशन चिप्स् असतात, ज्या बॅटरीवर चालतात आणि कोणत्याही ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत बॅटरीवर चालू शकतात. मतदान यंत्रात कोणत्याही प्रकारे घोटाळे अथवा चुका (टॅम्परिंग) करता येत नाही व ती वापरण्यासाठी सुलभ आहेत. मतदान यंत्रांचे दोन्ही भाग दोन वेगवेगळया बॅगांमधून कोठेही नेता येतात व एकदा नोंदविलेल्या मतांची माहिती बॅटरी काढल्यानंतरदेखील पुसली जात नाही.

(५) मतदान यंत्र विशेषतः बॅलट युनिट हे अशारितीने तयार करण्यात आले आहे की, सध्याच्या मतदान पध्दतीचे सर्व आवश्यक घटक त्यामध्ये जसेच्या तसे ठेवण्यात आले आहेत. केवळ बदल इतकाच आहे की, मतदारास मतपत्रिकेवर आपल्याला ज्या उमेदवारास मत दयावयाचे आहे त्या उमेदवाराच्या नांवासमोर शिक्का मारण्याऐवजी केवळ नांवासमोरील बटन दाबावयाचे आहे. मतदान प्रक्रियेची गुप्तता तसेच मतपेटया ताब्यात घेणे यासारख्या पारंपारिक पध्दतींमध्ये असलेली धोक्याचीदेखील जाणीव ठेवून त्याविषयी उपाययोजना करण्यात आली आहे. या पध्दतीद्वारे मतदान करणे अत्यंत सुलभ व गतीमान असून, लोकसभा/विधानसभा निवडणुकीमध्ये मतदान यंत्रे वापरल्यानंतर असा अनुभव आला आहे की, अशिक्षित मतदारसुध्दा कोणत्याही अडचणीविना मतदान यंत्राद्वारे मतदान करु शकतात. मतदान प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे अधिकारी/कर्मचारीसुध्दा मतदान यंत्र वापरणे व त्याची कार्यपध्दती सहजपणे समजावून घेऊ शकतात. मतदान यंत्राद्वारे केलेल्या मतदानाची गती जास्त असून, पारंपारिक पध्दतीने मतदान करताना लागणा-या वेळेपेक्षा कमी वेळेत मतदान प्रक्रिया पार पाडता येते. विशेषतः मतमोजणी व निकाल जाहीर करणे या बाबी अत्यंत सुलभ होत असून, प्रामुख्याने एखादी मतपत्रिका वैध की अवैध आहे या कारणास्तव जी शंका अथवा वादावादी होऊ शकते, ती पूर्णपणे मतदान यंत्रामध्ये टाळली जाते आणि केवळ कंट्रोल युनिटचे एक बटन दाबल्यानंतर मतदानाचा निकाल हाती येतो.

(६) राज्य निवडणूक आयोगाकडून वापरण्यात येणारी यंत्रे ही इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेली आहेत.

या यंत्रात दोन भाग आहेत.

१) कंट्रोल युनिट (नियंत्रण विभाग)

२) बॅलटींग युनिट (मतदान विभाग)

हे दोन्ही भाग केबलद्वारे जोडले जातात.

एका बॅलटींग युनिटद्वारे १५ उमेदवारांच्या निवडणुकीचे काम केले जाते. एका कंट्रोल युनिटला कमाल चार मतदान विभाग जोडले जाऊ शकतात. या यंत्राद्वारे कमाल ६० उमेदवारांच्या

निवडणुकीचे काम करता येते. मात्र एकाच बॅलेटिंग युनिटवर जेंव्हा एकापेक्षा जास्त मतपत्रिका लावावयाच्या असतात त्यावेळी मध्ये एक बटन बंद करुन त्यापुढे मतपत्रिकेचा तपशील येतो त्याप्रमाणात उमेदवारांची संख्या कमी होते.

दोन्ही युनिटे ठेवणेसाठी स्वतंत्र पेटया दिलेल्या आहेत. त्यांना कॅरींग केसेस म्हणतात. सदरच्या कॅरींग केसेसचे लॅच बटन (खटका) (दोन्ही बाजूने एकावेळी) दाब देऊन आपल्याकडे ओढून उघडता येतात.

कंट्रोल युनिटमध्ये विद्युत पुरवठयासाठी बॅटरीचा वापर करावा लागतो. कंट्रोल युनीट व बॅलटींग युनीट केबलने जोडली जातात. बॅटरी - सिल पॅक असते.

## १) बॅलटींग युनिट (Balloting Unit)

बॅलटींग युनिट ही एक आयताकृती पेटीच असते. याचा उपयोग मतदाराला आपले मत देण्याकरिता होतो.

**बॅलटींग युनिटमधील भाग (Parts of Balloting Unit)**

**१) कंट्रोल युनिटला जोडणारी केबल**

**२) मतदान यंत्र मतदानासाठी तयार असल्याचे दर्शविणारा दिवा (Ready Lamp)**

**३) स्लाईड स्वीच पॅनेल**

**४) मतपत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग**

**५) १५ उमेदवारांची बटने व त्यासमोर १५ लाल दिवे**

**६) १६ वे बटन "End" बटन असते.**

**१) कंट्रोल युनिटला जोडणारी केबल - (Inter Connecting Cable)** कंट्रोल युनिट व बॅलटींग युनिट यांना जोडणारी केबल बॅलटींग युनिटला कायमस्वरुपी जोडलेली असते. तिच्या एका टोकाला कनेक्टर असतो, ती कंट्रोल युनिटला जोडावयाची असते. सदरचा कनेक्टर पीनची संख्या व कनेक्टरचा आकार पाहून बसविणे आवश्यक आहे. बॅलट युनिटच्या कनेक्टरच्या एका बाजूला Top अशी अक्षरे लिहिलेली असतात. ही अक्षरे कंट्रोल युनिटच्या दिशेने करुन कंट्रोल युनिटवर ज्या ठिकाणी BU Connector अशी अक्षरे लिहिलेली असतात त्या ठिकाणी बॅलट युनिटचा कनेक्टर जोडावा.

**२) मतदान यंत्र तयार असल्याचे दर्शविणारा दिवा - (Ready Lamp)** प्रिसाईडींग ऑफिसर / मतदान अधिकारी यांनी कंट्रोल युनिटवरील बॅलट बटन दाबल्यावर बॅलटींग युनिटवरील रेडी लँप (हिरव्या रंगाने) पेटतो. सदरचा दिवा पेटतो त्यावेळी मतदाराने बॅलट युनिटवरील उमेदवाराचे बटन दाबून मतदान करावयाचे असते. मतदाराचे मतदान संपूर्ण झाल्यावर बीप आवाज येतो व रेडी लँप बंद होतो.

**३) स्लाईड स्वीच (Slide Switch)** बॅलटींग युनिटच्या आतील भागात उजव्या कोप-यात स्लाईड स्वीच पॅनेल बसविलेले असते. या पॅनेलवर एक ते चार क्रमांक असतात. सदरच्या भागात पॉईंटरने, किती बॅलटींग युनिटचा वापर केलेला आहे याची माहिती मिळते, पहिल्या बॅलट युनिटचा पॉईंटर एकावर निश्चित करावयाचा आहे. दुस-या युनिटचा पॉईंटर दोन नंबरवर, तिस-या युनिटचा पॉईंटर तीन नंबरवर व चौथ्या युनिटचा पॉईंटर चार नंबरवर निश्चित करावयाचा आहे.

**४) बॅलटींग युनिटवर मतपत्रिका ठेवण्यासाठी पारदर्शक पडद्याचा भाग -** सदर भागात मतपत्रिका सुरक्षित ठेवता येते. बॅलटींग युनिटवर मतपत्रिका ठेवण्याचा पारदर्शक भाग, आतील बाजूकडील दोन्ही टोकाकडील लॅचेस बटन खाली दाब देऊन ढकलल्यास उघडते. त्यानंतर मतपत्रिका उमेदवारांच्या बटनांना अनुसरुन पारदर्शक भागात ठेवावी. नंतर उमेदवारांच्या बटनांवरील मास्क (मुखवटे) बाजूला काढून सरकवावेत.

**५ व ६) उमेदवारांची बटने व लाल दिवा - (Candidates Buttons and lamps )** बॅलटींग युनिटवरील हिरवा दिवा लागल्यावर मतदार बॅलटींग युनिटवरील उमेदवारांच्या पसंतीनुसार बटन दाबून मतदान करु शकतो. उमेद्वाराचे बटन दाबल्यावर त्या बटनाच्या डाव्या बाजूचा बाणाच्या आकाराचा लाल दिवा लागतो. (तेव्हा मतदान झाले असे समजावे)

## २) कंट्रोल युनिट (Control Unit)

कंट्रोल युनिटद्वारे मतदानाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवले जाते. कंट्रोल युनिटमध्ये ४ भाग असतात.

१) दर्शक भाग (Display Section)

२) कॅन्डीडेट सेट सेक्शन (Candidate Set Section)

३) रिझल्ट सेक्शन (Result Section)

४) बॅलॅट सेक्शन (Ballot Section)

**१) डिस्प्ले सेक्शन - (Display Section)**

अ) दोन दिवे असतात त्यापैकी

**१) ऑन लॅंप - (on Lamp)** वरच्या बाजूस डाव्या बाजुला ऑन लॅंप असतो. यंत्र सुरु केल्यानंतर ऑन लॅंप हिरव्या रंगाने प्रकाशित होतो. कंट्रोल युनिट सुरु झ ााल्याचे दर्शवितो.

**२) बीझी लॅंप - (Busy Lamp)** डिस्प्ले सेक्शनवर उजव्या कोप-यात लाल दिवा असतो. त्याला बीझी लॅंप म्हणतात. बॅलट बटन दाबल्यावर हा दिवा प्रकाशित होतो. हा दिवा जोपर्यंत मतदार मतदानाची प्रक्रिया पूर्ण करत नाही तोपर्यंत सुरु असतो. मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तो बंद होतो.

**ब) दोन डिजीट डिस्प्ले पॅनेल - (Two Digit Display Panel)**

या पॅनलवर निरनिराळया प्रकारचे आकडेवारी किंवा अक्षरे दिसतात.

१) **LE- (LINK ERROR)** लिंक एरर दर्शवितो- केबल व्यवस्थित जोडलेली नसेल अथवा बॅलट युनिटवरील स्लाईड स्वीच वरील पॉईंट निश्चित केलेल्या ठिकाणी स्थिर केलेला नसेल, त्यावेळी असे चिन्ह दर्शविले जाते.

२) **PE - (PRESS ERROR)** प्रेस एरर- ज्यावेळी उमेदवाराचे एखादे बटन अथवा बटने दाबलेले अथवा जॅम झालेले असते, त्यावेळी सदरचे चिन्ह दर्शविले जाते.

३) **ER** (MEMORY ERROR) मेमरी एरर - कंट्रोल युनिट मतदानासाठी उपयोगी नाही असे दर्शविते.

**क) फोर डिजीट पॅनेल - (Four Digit Panel)** वेगवेगळे दर्शक दर्शविले जातात.

१) [ no ] कंट्रोल युनिटवरील बटन योग्य क्रमानुसार दाबलेले नाही असे दर्शक दर्शवितो.

२) [ End ] क्रमानुसार बटन अनुक्रमे Close, Result, Clear बटन दाबल्यावर दर्शक संपूर्ण माहिती दाखवून झाल्यावर शेवटी End हा शब्द दर्शवितो.

**ड) दोन्ही पॅनेलवरील दर्शक -** एकाचवेळी दोन्ही दर्शक पॅनेलवर वेगवेगळी दृश्य दर्शविली जातात.

१) **np-2** निवडणूक यंत्र दोन पदांच्या निवडणुकीसाठी तयार केलेले आहे असे दर्शक दर्शवितो.

२) **P1,07-2** सात उमेद्वार आहेत व त्यापैकी दोन उमेदवार निवडावयाचे आहेत, असे दर्शवितो.

३) **P2,05-1** पाच उमेद्वार आहेत व त्यापैकी एक उमेदवार निवडावयाचा आहे, असे दर्शवितो.

**to 1487** - एकूण झालेले मतदान दर्शवितो.

४) **02-235** दुस-या क्रमांकाच्या उमेदवारांस २३५ मते मिळाली आहेत असे दर्शविते.

**२) कॅन्डीडेटसेट सेक्शन - (Candidate Set Section)** - एका कव्हरने सदरचा भाग बंद केलेला असतो, सदरचे कव्हर डाव्या बाजूने उजव्या बाजूस उघडता येते. सदरचे कव्हर लॅच वर डाव्या बाजूस दाब देऊन उघडता येते. कव्हर उघडल्यानंतर दोन भाग दिसतात. डाव्या बाजूकडील भागात (कप्प्यात) पावर पॅक (बॅटरी) बसवावी. त्याला पॉवर पॅक सेक्शन म्हणतात. उजव्या बाजूकडील भाग कॅन्डीडेट सेट असून तो एका स्वतंत्र पट्टीने झाकलेला असतो. सदरची पट्टीसुध्दा डाव्या बाजूने उजव्या बाजूकडे उघडते. बंद करण्याचे केंद्र दो-याने सील केलेले असते. कॅन्डीडेट सेट सेक्शनमध्ये कॅन्डीडेट बटन असतो ते लाल रंगाचे असते. सदरचा भाग पट्टीने झाकला जातो व दो-याने सील करता येतो.

**३) रिझल्ट सेक्शन (Result Section)** - या सेक्शनवर एक पट्टीचे झाकण असते ते डाव्या बाजूने उजवीकडे उघडते. झाकणाच्या पट्टीवर एक Close नावांचे बटन असते. रिझल्ट सेक्शनमध्ये दोन कप्पे असतात. डावीकडील कप्प्यात Close बटन असते. उजवीकडील कप्पा स्वतंत्र पट्टीचे झाकणाने झाकलेला असतो. सदरच्या कप्प्यात दोन Result I व Result II असे बटन असतात. सदरचा कप्पा Result I व Result II या मधील भागात अंगठा व बोट एकाचवेळी आतील लॅच बटन दाबून उघडता येते. सदर प्रक्रिया हळूवार करावी कारण सदरचा भाग नाजूक असतो. झाकणाची पट्टी जोरात उघडते. झाकणाच्या पट्टीच्या आतील बाजूस गुलाबी पेपर सिल कागदी मोहरा बसविण्यासाठी दोन टोके

असतात. याच सेक्शनमध्ये उजव्या बाजूस शेवटी राखाडी रंगाचे बटन असते त्याला क्लिअर बटन म्हणतात.

**४) बॅलट सेक्शन - (Ballot Section)** या सेक्शनमध्ये दोन बटन असतात.

१) टोटल बटन - काळे असते.

२) बॅलट बटन - राखाडी रंगाचे मोठे बटन असते.

३) बझर - छिद्रे असलेला जाळीदार भाग त्यातून आवाज येतो.

**५) कंट्रोल युनिटचा मागचा भाग (Back side of control unit)** तळाचा मागचा भाग एका पट्टीच्या झाकणाने बंद असतो. सदरची पट्टी मधल्या भागातील लॅच बटन खाली दाबून उघडता येते. तेथे दो-याचे सिल करता येते. झाकण उघडल्यावर त्या ठिकाणी डाव्या बाजूला एक सॉकेट असते. त्या सॉकेटला बॅलट युनीटची केबल जोडावयाची असते. तेथेच पॉवर स्वीच असतो.

**६) बीप टोन - (शिटीचा आवाज) (Beep Tone)** कंट्रोल युनीट ज्यावेळी एखादी माहिती दर्शवितो त्यावेळी माहितीनुसार बीपचा (शिटीचा) आवाज होतो.

१) दोन सेकंदाचा बीप साऊंड, मतदाराने मतदान केल्यानंतर होतो.

२) दोन सेकंदाचा बीप साऊंड डिस्प्ले पॅनेलवरील माहिती बदलल्याबरोबर होतो.

३) बीप साऊंडचा तुटक तुटक आवाज, प्रक्रियेत चूक होते त्यावेळी होतो.

४) कंट्रोल युनीटवरील बटन क्रमानुसार दाबले नाही तर ४ सेकंदाचा बीप साऊंड होतो.

## बटनांचा उपयोग/कार्य (Functions of Buttons)

### बॅलट युनिट (Ballot Unit)

**१) कँडीडेटस् बटन (Candidates Buttons)**

उमेद्‌वाराचे बटन दाबले असता त्याच्या समोरील बाणाच्या आकाराचा दिवा लाल रंगाने प्रकाशमान होतो. तद्‌नंतर बीप साऊंड व रेडी लँप बंद होणे दोन्ही एकाचवेळी होतात. तद्‌नंतर कंट्रोल युनीटवरील रेड लँप (बीझी लँप) बंद होतो.

**२) स्लाईड स्वीच - (Slide Switch)**

१,२,३,४ अशा खुणा केलेल्या असतात. कंट्रोल युनिटला बॅलट युनिट जोडताना पहिल्या बॅलट युनिटच्यावेळी स्लाईड पॉईंटर एक या अंकावर स्थिर करावा. दुस-या युनीटच्या जोडणीच्यावेळी दोन या अंकावर स्थिर करावा. या अनुक्रमाने स्लाईड स्वीच, बॅलट युनिटवर स्थिर करावयाचा आहे.

**कंट्रोल युनिट (Control Unit)**

१) **पॉवर स्वीच -(Power Switch)** कंट्रोल युनिटच्या तळाचे (मागील) भागात पावर स्वीच असते. ते सुरु केले म्हणजे EVM सुरु होते.

२) **कँडीडेट सेट बटन - (Candidates Button)** निवडणुकीसाठी किती उमेद्‌वारांनी भाग घेतला आहे याची नोंद घेण्यासाठी बॅलट युनिटवरील एकुण उमेदवारांपैकी शेवटच्या उमेद्‌वाराचे बटन व कँडीडेट सेट दाबावे म्हणजेच कंट्रोल युनीटवरील डिस्प्ले सेक्शनवर np -- संख्या (पदांची) असे दृश्य दर्शविले जाते.

३) **क्लिअर बटन - (Clear Button)-** मतदान सुरु होण्यापूर्वी Clear Button दाबून, इलेक्ट्रॉनिक वोटींग यंत्रामध्ये कोणत्याही उमेद्‌वारांच्या संदर्भात मतदान नोंदलेले नाही. या संदर्भात पदांची संख्या तद्‌नंतर एकूण मतदान ० व उमेद्‌वारनिहाय मिळालेले मतदान ० व नंतर END दर्शविते. प्रत्येक कृतीमध्ये बीप साऊंड होतो.


४) **बॅलट बटन (Ballot Button) -** बॅलट बटन दाबल्यावर कंट्रोल युनिटवर बीझी लँप व बॅलट युनिटवर रेडी लँप प्रकाशित होतो. मतदाराने मतदान केल्यानंतर हे दोन्ही दिवे बंद होतात. त्याचवेळी बीप साऊंड होतो.

५) **टोटल बटन (Total Button)-** बीझी लँप बंद झाल्यावर म्हणजेच मतदाराचे मतदान झालेनंतरच टोटल बटन कार्यान्वित करावे. त्यानुसार एकूण मतदानाची आकडेवारी कळते.

६) **क्लोज बटन (Close Button)-** मतदान संपल्यानंतरच हे बटन दाबावे. सदरचे बटन दाबल्यानंतर निवडणुकीचा क्रमांक, एकुण उमेद्वार, एकूण मतदान नंतर End हा शब्द दर्शक पट्टीवर दिसेल.

७) **रिझल्ट बटन (Result Button)-** रिझल्ट I व रिझल्ट II असे पिवळया रंगाचे बटन असले तरीही निवडणूक निकाल पहाणेसाठी केवळ रिझल्ट I बटनाचाच उपयोग करावयाचा आहे व रिझल्ट II बटनाचा उपयोग केव्हाही करावयाचा नाही. रिझल्ट I बटन दाबल्याने एका निवडणुकीचे एकूण उमेदवार, एकूण मतदान, उमेदवारनिहाय मिळालेले मतदान, त्यानंतर End हा शब्द दर्शक पट्टीवर दिसेल. रिझल्ट-I बटन पुन्हा दाबून कितीही वेळा रिझल्ट पाहता येतो.

कंट्रोल युनिटवरील बटनांचा वापर खालील अनुक्रमानुसार करणे आवश्यक आहे.




### ३. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी पार पाडावयाच्या कामाची थोडक्यात माहिती

### निवडणूक निर्णय अधिकारी यांची भूमिका

(१) तुम्ही जर ज्या निवडणुकीमध्ये मतदान यंत्राद्वारे मतदान करावयाचे आहे त्या निवडणुकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी असाल तर तुम्ही निवडणूक कायदा, नियम तसेच त्यासंदर्भातील राज्य निवडणूक आयोगाचे आदेश यांची सविस्तर माहिती करुन घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय, मतदान यंत्रांची कार्यपध्दती बारकाईने समजून घेणे आवश्यक आहे.

(२) सदरची सूचना पुस्तिका तुम्हाला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याच्या दृष्टीने उपयोगी व्हावी यासाठी तयार करण्यात आली असून, ही पुस्तिका म्हणजे निवडणूक कायदयाविषयी

सर्वसमावेशक माहिती असलेली पुस्तिका नसून, याबरोबरच तुम्हाला वेळोवेळी भारतीय संविधानातील, संबंधित अधिनियमांतील, निवडणूक नियमातील तसेच आयोगाकडून वेळोवेळी काढण्यात आलेल्या आदेशातील तरतुदींची माहिती असणे आवश्यक आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी या नात्याने तुम्हाला खालील कामाची माहिती करुन घेणे आवश्यक आहे :-

(१) मतदानाच्या कार्यपध्दतीचा सविस्तर कार्यक्रम आखणे,

(२) निवडणुकीसाठी वापरण्यात येणारे साहित्य व मतदान यंत्रे पुरेशा संख्येने उपलब्ध आहेत किंवा कसे, हे पाहणे

(३) नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे, त्यांची छाननी, उमेदवारी मागे घेणे, निवडणूक चिन्हांचे वाटप व निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी जाहीर करणे इत्यादी कामे निवडणूक नियमानुसार पार पाडणे.

(४) (अ) बॅलट युनिटसाठी आवश्यक तितक्या मतपत्रिकांची छपाई करुन घेणे.

(ब) निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी टपाली मतपत्रिका छापून घेणे,

(क) प्रदत्त मतपत्रिका छापून घेणे.

(५) मतदान व मतमोजणी प्रक्रियेमध्ये नेमण्यात येणारे सर्व अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्रांच्या कार्यपध्दतीची नीट माहिती करुन देणे व त्यांना आत्मविश्वास जोपर्यंत येत नाही तोपर्यंत प्रशिक्षण देणे.

(६) मतदान यंत्रे मतदानाच्या तारखेच्या किमान एक आठवडा आधी तयार करुन ती कार्यरत होतील, असे पाहणे.

(७) मतदानाच्या आदल्या दिवशी मतदान अधिकारी/कर्मचारी मतदान यंत्रांसह प्रदत्त मतपत्रिका व अन्य साहित्यासह मतदान केंद्रावर पोहोचतील, असे पाहणे.

(८) मतदान प्रक्रियेचे प्रभावी पर्यवेक्षण करणे.

(९) मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर मतदान यंत्रांची वाहतूक व ती सुरक्षित ठेवणे.

(१०) मतमोजणीची तारीख, वेळ व जागा विचारात घेऊन मतमोजणी व निकाल जाहीर करणे.

(११) मतमोजणी पार पडल्यानंतर सर्व मतदान यंत्रे व निवडणुकीसंबंधीची सर्व कागदपत्रे निकाल जाहीर झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांच्या सूचनांनुसार सुरक्षित ठेवणे.

(१२) निवडणुकीच्या कामाचे संपूर्ण प्रभावी पर्यवेक्षण करणे.

## ४. मतदानाची रंगीत तालीम व मतदान अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्राचा वापर करण्याबाबतचे प्रशिक्षण देणे

(१) यापूर्वी आपण पारंपारिक पध्दतीने अनेकवेळा मतदान प्रक्रिया पार पाडली असेल. तरी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेणे ही तुलनेने नवी संकल्पना असून, त्यामध्ये अत्यावश्यक भाग म्हणजे निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेले अधिकारी/कर्मचारी यांना सखोल प्रशिक्षण देणे. मतदान यंत्राच्या वापराबाबतचे यश हे प्रामुख्याने मतदान अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेल्या प्रशिक्षणावर अवलंबून आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे. मतदान अधिकारी/कर्मचारी यांना मतदान यंत्रे वापरता येतील, याबाबत त्यांना आत्मविश्वास येईपर्यंत त्यांना मतदान यंत्रांची माहिती देणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदान केंद्राध्यक्ष व सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष यांनी किमान दोन ते तीन प्रशिक्षण कार्यक्रमास हजर राहिले पाहिजे.

(२) मतदान अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी प्रशिक्षणवर्ग घेण्याआधी निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वतः मतदान यंत्रांची माहिती पूर्णपणे करुन घेणे आवश्यक असून, त्यासाठी आपल्या सर्व शंकांचे निराकरण आवश्यक वाटल्यास राज्य निवडणूक आयोग किंवा इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीच्या अधिका-यांकडून करुन घेणे आवश्यक आहे.

(३) राज्य निवडणूक आयोगाने मतदार यंत्र हाताळण्याकरिता तयार केलेली पुस्तिका सर्व मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षांना प्रशिक्षणाच्यावेळी देण्यात येईल, हे पाहणे आवश्यक आहे. तसेच मतदान केंद्राध्यक्ष यांनी स्वतः यंत्रे हाताळून पाहणे आवश्यक आहे, जेणेकरुन त्या मतदान यंत्रांच्या सर्व कार्याची सविस्तर माहिती होईल.

(४) निवडणूक निर्णय अधिका-यांनी आपल्या कार्यालयाजवळ एका खोलीत एक मतदान यंत्र कायम ठेवावे, जेणेकरुन कोणताही मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी ज्याला अधिक प्रशिक्षणाची आवश्यकता आहे तो त्या ठिकाणी येऊन आपल्या कोणत्याही शंकेचे समाधान करुन घेऊ शकेल व त्यास यशस्वीरित्या मतदान यंत्र हाताळण्याबाबतचा आत्मविश्वास प्राप्त होईल.

**मतदान यंत्राच्या प्रशिक्षण वर्गाच्यावेळी खालील बाबी ठळकपणे संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.**

१) सर्व संबंधितांनी मतदान यंत्रे अत्यंत काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक आहे.

२) जेंव्हा मतदान यंत्र उपयोगात नसेल तेंव्हा कंट्रोल युनिट व बॅलट युनिट संबंधित बॅगमध्ये सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

३) कंट्रोल युनिटमध्ये असलेल्या बॅटरीचे बटन बंद करणे आवश्यक आहे, जेणेकरुन बॅटरी अनावश्यकरित्या सुरु राहून ती ऐनवेळी निकामी होणार नाही.

४) जेंव्हा यंत्र उपयोगात आणावयाचे असेल तेंव्हा कंट्रोल युनिट आणि बॅलट युनिट त्यासाठी असलेल्या केबलद्वारे जोडणे आवश्यक आहे. केबलचे एक टोक बॅलट युनिटला कायम जोडलेले असेल व कितीही प्रयत्न केला तरी ते बॅलट युनिट पासून वेगळे करता येणार नाही. तसेच केबलच्या दुस-या टोकाला कंट्रोल युनिटशी जोडण्यासाठी जो "कनेक्टर" ठेवण्यात आलेला आहे तो विशिष्ट पध्दतीने कंट्रोल युनिटशी जोडता येतो. तो कसा जोडावा याची माहिती करुन घेणे आवश्यक आहे. प्रत्येक मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना सदरचे "कनेक्टर" कंट्रोल युनिटमध्ये कसे जोडावे व कसे वेगळे करावे याची नीट माहिती देणे आवश्यक आहे, जेणेकरुन "कनेक्टर" जोडताना अथवा वेगळा करताना त्यास इजा होऊन तो निकामी होणार नाही.

५) कंट्रोल युनिट आणि बॅलट युनिट यावर देण्यात आलेली वेगवेगळी बटने दाबण्यासाठी जास्त ताकद लावण्याची आवश्यकता नाही. अनावश्यक ताकद वापरल्यास ती बटने निकामी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

६) कंट्रोल युनिटच्या "Result" आणि "Clear" ही बटणे समाविष्ट असणा-या कप्प्याच्या आतल्या झ ाकणास पेपर सील लावण्याची तरतूद आहे. इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेल्या यंत्रास एक पेपर सील लावण्याची तरतूद आहे. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना पेपर सील कसे लावावे, याची योग्य ती माहिती देणे आवश्यक आहे. हे पेपर सील अत्यंत महत्वाचे असून, ते जोपर्यंत सुरक्षित आहे तोपर्यंत कंट्रोल युनिटला कोणीही धक्का लावलेला नाही अथवा गैरप्रकार केलेला नाही, याची खात्री करुन घेता येईल. मतदान सुरु झाल्यापासून ते निकाल जाहीर होईपर्यंतच्या कालावधीत अशी खात्री कोणत्याही व्यक्तीस करुन घेण्याच्या दृष्टीने पेपर सील अत्यंत महत्वाचे आहे.

७) मतदान संपतेवेळी मतदान अधिका-यांनी आपल्या मतदान केंद्रावर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब नमुना-व्हीएम-३ या नमुन्यांत तयार करुन त्याची प्रत उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना देणे आवश्यक आहे. यासाठी मतदान केंद्राध्यक्षास नमुना-व्हीएम-३ मध्ये सदरचा हिशोब योग्यरित्या तयार करण्याची माहिती देण्यात यावी, जेणेकरुन त्याबाबत कोणतीही चूक त्यांच्याकडून होणार नाही व नमुना व्हीएम-३ योग्यरित्या भरला जाईल. त्यासाठी त्यांना व्हीएम-३ हा नमुना माहितीसाठी प्रशिक्षण वर्गात पुरवून तो योग्यरित्या भरता येतो किंवा कसे, याचे प्रात्यक्षिक करुन घ्यावे.

८) मतदान संपल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलट युनिट व कंट्रोल युनिट सीलबंद करणे आवश्यक आहे व त्यासाठी असलेल्या बॅगमध्ये ठेवणे आवश्यक आहे. मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदान प्रतिनिधींना देखील अशा सीलवर आपली स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्याची संधी दिली पाहिजे. त्याबाबतच्या कार्यपध्दतीची सविस्तर माहिती, प्रशिक्षणवर्गाच्या वेळी मतदान केंद्राध्यक्षांना देण्यात यावी व अशाप्रकारे हे सील यंत्राला तसेच त्यासाठी वापरावयाच्या बॅगला लावण्यात यावेत. *हे सील एकदा लावल्यानंतर त्याचा कोणत्याही प्रकारे थेट उष्णतेशी अथवा ज्वाळांशी संबंध येणार नाही, याची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.*

**मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे**

जेंव्हा मतदान यंत्रे वापरात नसतील तेंव्हा ती गोडाऊनमध्ये अथवा अन्य ठिकाणी सुरक्षित ठेवण्यात यावीत. तसेच मतदान व मतमोजणीची प्रक्रिया पार पडल्यानंतर ती जिल्हा कोषागारात अथवा राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा योग्य त्या ठिकाणी सुरक्षित ठेवणे आवश्यक आहे. निवडणुकीमध्ये होणा-या निवडणूक याचिका इत्यादीसाठी अथवा त्या ठिकाणी निवडणूक याचिका होणार नाही, त्या ठिकाणी राज्य निवडणूक आयोग ठरवील तितक्या कालावधीसाठी यंत्रे सुरक्षितपणे ठेवणे आवश्यक आहे. मतदान यंत्रे दुस-या कोणत्याही निवडणुकीमध्ये वापरण्यासाठी राज्य निवडणूक आयोग सूचना देईल तेंव्हा ती हलविण्यात यावीत. मतदान यंत्रे हलविताना ती सुरक्षितपणे हलविली जावीत व त्यांची वाहतूक योग्यरित्या व्हावी यासाठी इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने दिलेल्या सूचना राज्य निवडणूक आयोगाकडून कळविण्यात येतील, त्यानुसार त्याची वाहतूक करण्यात यावी.

---

टीप :

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावर "None of the Above" (NOTA) बटनाची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत आयोगाचे दि. १२/११/२०१३, दि. २६/११/१३ चे आदेश पहावेत.

२. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचा (सुधारणा) बाबत आयोगाचे क्र-रानिआ २०१३/प्र.क्र.०८/का-१२ दि. २८/१०/१३-चे आदेश.



* वेळोवेळी निर्गमित केलेले सर्व आदेश *आयोगाच्या www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

—* * *—

## प्रकरण १५

## मतपत्रिका आणि मतदान यंत्रे

उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आल्यानंतर मतपत्रिका छपाई हे अत्यंत महत्वाचे काम निवडणूक निर्णय अधिकारी यांना करावे लागते. उमेदवारांना चिन्ह वाटप करणे आणि मतदानाचा दिवस यामध्ये असलेला कालावधी विचारात घेऊन त्यासाठी किती वेळ उपलब्ध आहे याचा अंदाज निवडणूक निर्णय अधिकारी यांनी घेऊन त्यानुसार आपल्यास किती दिवस उपलब्ध आहेत, याचा आढावा घ्यावा व त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

१. **टपाली मतपत्रिकांची छपाई** :- उमेदवारांना चिन्ह वाटप केल्यानंतर व निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द केल्यानंतर टपाली मतपत्रिकांची छपाई हे अत्यंत महत्वाचे काम आहे. राज्य निवडणूक आयोगाकडील टपाली मतपत्रिका आदेश, दिनांक- १६ जानेवारी, २००१ मध्ये दिल्यानुसार टपाली मतपत्रिकांची छपाई करावयाची आहे. राज्य निवडणूक आयोगाने टपाली मतपत्रिका आदेश हे निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात येणा-या अधिकारी/कर्मचा-यांपुरतेच मर्यादित ठेवलेले असून, आवश्यक तितक्याच टपाली मतपत्रिका छापण्यात याव्यात. टपाली मतपत्रिकेच्या नमुन्याचा तपशील खाली नमूद केला आहे :-

(१) प्रत्येक टपाली मतपत्रिकेस स्थळप्रत (काऊन्टर फॉईल)जोडलेली असावी. ही स्थळप्रत मतपत्रिकेच्या अगदी वरच्या बाजूस असावी.

(२) स्थळप्रतीवर तसेच मतपत्रिकेच्या भागावर ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक /पोटनिवडणूक आहे तिचे (ग्रामपंचायतीचे) नांव, प्रभाग क्रमांक त्याबाबतचा तपशील छापण्यात यावा.

(३) टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे नाव नमूद करण्यात यावे. तथापि, टपाली मतपत्रिकेवर उमेदवाराचे चिन्ह छापण्यात येणार नाही.

(४) मतपत्रिकेच्या स्थळप्रतीवर प्रभाग क्रमांक तसेच संबंधित प्रभागाच्या मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक हा तपशील छापण्यात यावा. टपाली मतपत्रिकेचा नमुना **जोडपत्र १७** येथे दिला आहे.

२. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे व मतपत्रिका**- प्रकरण- १ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक मतदान यंत्रास एक कंट्रोल युनिट व बॅलट युनिट असे दोन भाग असतील व ही मतदान यंत्रे इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेली असतील. हे दोन भाग एकमेकांस जोडल्यानंतर सदर मतदान यंत्र

कार्यरत होऊ शकते. एका बॅलट युनिटवर १५ उमेदवारांसाठी मतदान करण्याची तरतूद आहे. एकास एक असे ४ बॅलट युनिट जोडून ६० उमेदवारांच्या निवडणुकीचे मतदान घेता येते.

**इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या बॅलट युनिटसाठी आवश्यक असणाऱ्या मतपत्रिका-**

(१) प्रत्येक बॅलट युनिटसाठी एक मतपत्रिका त्यासाठी राखून ठेवलेल्या जागेमध्ये घट्ट चिकटवली जाईल.

(२) सदर मतपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे असेल :-

**(अ)** मतपत्रिकेची एकूण लांबी जास्तीत जास्त ४६० मि.मी. तर रुंदी १४० मि.मी.इतकी राहील.

**(ब)** मतपत्रिकेच्या अगदी वरच्या बाजूस निवडणुकीचा तपशील लिहिण्यासाठी जागा ठरविण्यात येईल व या जागेची लांबी १२.७ मि.ती. व रुंदी १४० मि.मी. इतकी राहील.

**(क)** सदर ठरविलेल्या जागेत अगदी वरच्या बाजूस डाव्या कोपऱ्यात मतपत्रिकेचा अनुक्रमांक छापला जाईल. त्याखाली त्या मतपत्रिकेवर जितकी मते द्यावयाची असतील त्यानूसार **"एक मत द्यावे "/ "दोन मते द्यावीत "/ "तीन मते द्यावीत"** असे नमुद करावे.

**(ड)** सदर ठरविलेल्या जागेत अगदी वरच्या बाजूस उजव्या कोपऱ्यात ग्रामपंचायतीचे नाव, प्रभाग / जागा क्रमांक व सार्वत्रिक / पोट निवडणुकीचे वर्ष व आरक्षणाचा तपशील छापला जाईल.

**(इ)** सदर मजकूर छापल्यानंतर त्याच्या खाली २.१ मि.मी. जाडीची एक काळी रेषा आखण्यात येईल.

**(फ)** उपरोक्त नमूद रेषेखाली निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नाव आणि त्याला देण्यात आलेले चिन्ह चौकट छापण्यात येईल. प्रत्येक उमेदवारासाठी वेगळी चौकट / पट्टीका राहील.

**(ग)** प्रत्येक उमेदवारासाठी असलेला प्रत्येक उपरोक्त नमूद चौकट २५.४ मि.मी. लांबीची व १४० मि.मी. रुंदीची राहील. याप्रमाणे एका मतपत्रिकेवर जास्तीत जास्त १५ उमेदवार राहतील व शेवटच्या बटनासमोरील ("END"बटन) चौकटीमध्ये कोणत्याही उमेदवाराचे नाव येणार नाही. या चौकटीनंतर ५.२ मि.मी. जागा रिकामी राहील.

**(ह)** प्रत्येक उमेदवाराच्या तपशीलाचा चौकोन वेगळा करणारी जाड काळी रेषा २.१ मि.मी. इतक्या जाडीची राहील.

**(य)** निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नावे छापण्यात येतात त्याच क्रमाने मतपत्रिकेवर उमेदवाराची नावे छापण्यात येतील.

**(ज)** प्रत्येक उमेदवारासंबंधीच्या चौकटीत मतपत्रिकांवर उमेदवाराचा अनुक्रमांक व नाव डाव्या बाजूला तर त्याचे चिन्ह उजव्या बाजूला छापण्यात यावे.

(१) नमुना मतपत्रिका **जोडपत्र-१८** मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

(२) मतपत्रिका छापतांना घ्यावयाची दक्षता

मतपत्रिका छापतांना ती अशा रितीने छापणे आवश्यक आहे की जेणेकरुन मतपत्रिका बॅलटिंग युनिटमध्ये घट्ट चिकटविल्यानंतर उमेदवाराचे नांव नमूद केलेला चौकोन हा बॅलटिंग युनिटवरील रेषेशी बरोबर जुळला पाहिजे. त्यासाठी मतपत्रिका छापतांना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. मतपत्रिका योग्यरित्या छापल्या जातील यासाठी आवश्यक वाटल्यास मुद्रणालयाच्या तंत्रज्ञांना बॅलटिंग युनिट दाखविण्यात यावे व त्यांना त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेण्यास सांगावे जेणेकरुन निवडणुकीचा तपशील छापावयाची जागा व उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेले चौकोन यांच्या मधल्या रेषा व त्यांची जाडी याबाबत बॅलटिंग युनिटवर त्यासाठी ठेवलेल्या जागेशी बरोबर जुळतील. बॅलटिंग युनिटवर वापरण्यासाठी घ्यावयाच्या मतपत्रिकांना स्थळप्रतीची आवश्यकता नसून त्यांचे बंडल देखील शिवून घेण्याची आवश्यकता नाही. मतपत्रिका सुट्टयाच ठेवण्यात याव्यात.

**मतपत्रिका किती छापाव्यात याचा अंदाज घेणे :-**

मतपत्रिका किती छापाव्यात ही बाब किती मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत यावर तसेच किती मतदान यंत्रे वापरण्यात येणार आहेत (त्यामध्ये राखीव मतदान यंत्रांचा देखील समावेश असेल) यावर तसेच आरक्षणाच्या वर्गवारीवर अवलंबून राहील. तसेच प्रत्येक मतदान केंद्रावर किती प्रदत्त मतपत्रिका पुरवायच्या आहेत यावर देखील अवलंबून राहील. त्यासाठी खालील बाबी विचारात घेण्याची आवश्यकता आहे:-

(१) प्रत्येक बॅलटिंग युनिटवर ज्या वर्गवारीचे उमेदवार निवडणूक लढविणार आहेत त्या प्रत्येक वर्गवारीची मतपत्रिका आवश्यक राहील. यास्तव जितकी मतदान यंत्रे वापरावयाची आहेत व त्यावर (राखीव मतदान यंत्रासह) जितक्या वर्गवारीच्या मतपत्रिका आवश्यक आहेत तितक्या मतपत्रिका छापून घेणे आवश्यक आहे.

(२) प्रत्येक मतदान केंद्रावर प्रत्येक वर्गवारीच्या सुमारे २० प्रदत्त मतपत्रिका पुरविण्यात येतील अशारीतीने जितकी मतदान केंद्रे असतील त्यास गुणिले २० याप्रमाणे प्रदत्त मतपत्रिकांची संख्या काढण्यात यावी.

(३) वर नमूद केल्याप्रमाणे मतपत्रिकांची संख्या काढल्यानंतर मतदान यंत्रावर वापरावयाच्या मतपत्रिका अधिक प्रदत्त मतपत्रिका यांची संख्या काढल्यानंतर त्यामध्ये जितकी मतदान केंद्रे असतील त्यास गुणिले ५ अतिरिक्त मतपत्रिका प्रत्येक वर्गवारीच्या, ज्या आणिबाणीची वेळ पडल्यास वापरता येतील अथवा एखाद्या मतदान केंद्रावर अतिरिक्त प्रदत्त मतपत्रिका लागल्यास वापरता येतील अशारीतीने एकूण छापावयाच्या मतपत्रिकांची संख्या काढण्यात यावी.

**मतपत्रिका छापावयाची व्यवस्था**

(१) मतपत्रिकांची छपाई शक्यतोवर शासकीय मुद्रणालयात करण्यात यावी कारण लोकसभा / विधानसभा निवडणुकीसाठी मतदान यंत्रे वापरण्यात आली असल्यामुळे सदर मतदान यंत्रांसाठी आवश्यक असणारी मतपत्रिका छपाई करण्याचा त्यांना अनुभव आहे. शिवाय, छापाव्या लागणा-या मतपत्रिकांची संख्या अगदी कमी आहे. यास्तव, शक्यतोवर शासकीय मुद्रणालयात मतपत्रिका छापून घेण्याची व्यवस्था निवडणूक निर्णय अधिकारी यांनी करावयाची आहे. मतपत्रिका छापून घेतल्यानंतर त्या सुरक्षितपणे ठेवण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची आहे.

(२) मतपत्रिका छापून प्राप्त झाल्यानंतर त्यांची काळजीपूर्वक तपासणी करण्यात यावी जेणेकरुन कोणत्याही निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नाव व चिन्ह वगळले गेले नाही अथवा चुकीने छापले गेले नसल्यास ते लक्षात येईल.

(३) मतपत्रिका छापून मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्यानंतर जितक्या मतपत्रिका छापण्याचे आदेश मुद्रणालयास दिले आहेत तितक्या छापल्या आहेत किंवा कसे हे तपासणे आवश्यक आहे. तसेच काही मतपत्रिका खराब असल्याचे निदर्शनास आल्यास अथवा मतपत्रिकांच्या अनुक्रमांकाची द्विरुक्ती झाली असल्यास ते लक्षात येईल.

**न वापरलेल्या मतपत्रिकांची उपलब्धता**

मतदान यंत्रावर मतपत्रिका लावून झाल्यानंतर तसेच प्रदत्त मतपत्रिका संबंधित मतदान केंद्रावर पुरविण्यात आल्यानंतर काही मतपत्रिका निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे शिल्लक

राहण्याची शक्यता आहे. अशा मतपत्रिका एखाद्या मुख्य ठिकाणी मतदानाच्या दिवशी उपलब्ध होतील अशारीतीने ठेवण्यात याव्यात. जेणेकरुन एखाद्या मतदान केंद्रावर त्यांची आवश्यकता पडल्यास त्या तात्काळ उपलब्ध होतील. तथापि, अशा शिल्लक मतपत्रिकांचा ताबा निवडणूक निर्णय अधिकारी अथवा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडेच राहील याची दक्षता घेण्यात यावी व त्या अनधिकृत व्यक्तिच्या हातात पडणार नाहीत याची काळजी घेण्यात यावी. निवडणूक पूर्ण झाल्यानंतर अशा अतिरिक्त मतपत्रिका एखाद्या लोखंडी पेटीत ठेवून जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार कोषागारात अथवा अन्य ठिकाणी सुरक्षितरित्या ठेवण्यात याव्यात व नंतर आयोगाच्या आदेशानुसार त्या योग्य वेळी नष्ट करण्यात याव्यात.

## प्रकरण- १६
## मतदानाची तयारी

### १. मतदानाच्या तयारीबाबतची अंतिम कार्यवाही

(१) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदानाची अंतिम तयारी करण्याच्या दृष्टीने अन्य सर्व संबंधित बाबी तपासून पाहणे आवश्यक आहे.

(२) तुम्ही तुमच्या मतदार संघात आवश्यक असलेल्या मतदान यंत्रांची संख्या आतापर्यंत राखीव मतदान यंत्रांसह निश्चित केली असेल. सदर संख्या राज्य निवडणूक आयोगास तात्काळ कळवून आयोगाच्या आदेशानुसार ती जेथे ठेवलेली असतील त्या ठिकाणाहून घेऊन जाण्याची तयारी करण्यात यावी व आवश्यक तितकी मतदान यंत्रे आपल्या ताब्यात घ्यावीत. प्रत्येक मतदान यंत्र काळजीपूर्वक तपासून ते १०० टक्के कार्यक्षम असून, त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा दोष नाही, हे तपासून पाहणे आवश्यक आहे.

(३) निवडणूक नियमातील तरतुदीनुसार मतदानाचे अन्य साहित्य वैधानिक तसेच वैधानिक नसलेले नमुने व अन्य स्टेशनरी जी मतदानासाठी आवश्यक आहे ती तयार ठेवण्यात यावी.

(४) मतदानासाठी आवश्यक असलेल्या साहित्याची यादी तयार करावी व त्यामधील बाबी पूर्ण झाल्या किंवा कसे याचा सतत आढावा घ्यावा. सदर यादी खाली दिली आहे. ती उदाहरणार्थ असून, सर्वसमावेशक नाही हे कृपया ध्यानात घ्यावे.

(१) आवश्यक तितक्या मतदान यंत्रांची संख्या निश्चित करुन तितकी मतदान यंत्रे मिळविणे व ती तपासणे.

(२) टपाली मतपत्रिकांची तसेच बॅलट युनिटवर वापरावयाच्या आणि प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरावयाच्या मतपत्रिकांची छपाई करुन घेणे.

(३) मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी/कर्मचारी यांच्या नेमणुकीचे आदेश काढले आहेत किंवा कसे, हे पाहणे.

(४) निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना मागणी केल्यानंतर त्यांना टपाली मतपत्रिका देण्याबाबतचे योग्य ते नमुना - पीबी- २ अथवा पीबी- ३ देणे. यामध्ये बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिस कर्मचा-यांचाही समावेश असेल.

(५) मतदान प्रक्रियेसाठी आवश्यक तितकी वाहने अधिग्रहित करणे; जेणेकरुन मतदान अधिकारी/कर्मचारी व मतदान साहित्याची ने-आण करणे सुलभ होईल.

(६) मतदान कर्मचारी व मतदान साहित्य यांच्या वाहतुकीची व्यवस्था अंतिम करणे.

(७) पोलिस बंदोबस्त व त्यांच्या हालचाली यांची मतदान कर्मचा-यांच्या हालचालींशी सांगड घालणे.

(८) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांनी योग्य त्या नमुन्यांत अर्ज केल्यानंतर त्यांना टपाली मतपत्रिका देणे.

(९) मतदान साहित्य तसेच वैधानिक तसेच वैधानिक नसलेले नमुने यांची पुरेशी उपलब्धता आहे किंवा कसे, हे तपासणे. हे करताना प्रत्यक्ष निवडणूक लढविणारे उमेदवार व मतदान केंद्रांची संख्या विचारात घेऊन ही कार्यवाही करावी.

(१०) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या बैठका घेणे जेणेकरुन त्यांच्याकडून सहकार्य मिळेल व त्यांच्या मनातील भीती नाहीशी होईल. निवडणूक लढविणा-या उमेदवारांना (१) मतदान केंद्रांची यादी व त्यामध्ये समाविष्ट असलेला भाग तसेच (२) मतदान प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी नियुक्त करण्याबाबतच्या अर्जाचे नमुने देणे.

(११) चिन्हांकित मतदार यादयांच्या आवश्यक तितक्या प्रती मतदान केंद्रावर वापरण्यासाठी बनवून घेणे.

(१२) मतदान केंद्रावर वापरण्यासाठी मतदान कक्ष (व्होटिंग कम्पार्टमेंट) तयार करुन घेणे, जेथे मतदार पूर्ण गुप्ततेची खात्री बाळगून मतदान करु शकेल.

(१३) मतदान अधिकारी/कर्मचा-यांसाठी प्रशिक्षणवर्ग आयोजित करणे.

(१४) मतदान केंद्रांच्या स्थळांना प्रसिध्दी देणे.

(१५) मतदान कर्मचा-यांना मतदान साहित्याचे वाटप करणे.

(१६) मतदान यंत्राद्वारे मतदान कसे करावे, याबाबत मतदारांना सूचना देणारे पॅम्पलेट इत्यादींचे वाटप राजकीय पक्ष/उमेदवारांच्या सहाय्याने करणे.

(१७) मतदान पार पडल्यानंतर मतदान अधिकारी/कर्मचारी व मतदान साहित्य तसेच अन्य कागदपत्रे ताब्यात घेण्याची व्यवस्था करणे.

(१८) मतदान यंत्रे व अन्य निवडणूक कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था करणे.

(१९) निवडणूक लढविणारे उमेदवार जितक्या वेळा आपणास भेटतील त्या त्या वेळी मतदानाच्या पूर्वतयारीबाबत त्यांना माहिती देण्यात यावी. त्यांचे सहकार्य मिळाल्यास मतदानाच्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेची कार्यवाही करणे आपणास सुलभ जाईल.

(२०) आचारसंहितेचे सर्व संबंधितांकडून पालन केले जात आहे, याची दक्षता घेण्यात यावी. खाजगी व सरकारी मालमत्ता विद्रुपन न करण्याबाबतच्या कायदयाच्या तरतुदींचे योग्यरीतीने पालन होत आहे, याबाबत दक्षता घेण्यात यावी. आवश्यक तेथे भारतीय दंड संहितेच्या योग्य त्या कलमांखाली गुन्हे दाखल करणे.

## २. प्रशिक्षण वर्ग

यापूर्वी झालेल्या प्रशिक्षणवर्गाच्या वेळी सर्व कर्मचा-यांना योग्यरीतीने प्रशिक्षण मिळून त्यांना आत्मविश्वास आला असेल, तरीसुध्दा आवश्यक वाटल्यास आणखी काही प्रशिक्षण वर्ग (तालीम) आयोजित करण्यात यावेत.

## ३. नकली (डमी) मतपत्रिका

उमेदवारांनी नकली (डमी) मतपत्रिका आपल्या मतदारांना माहिती देण्यासाठी छापण्यास हरकत नाही. तथापि, सदर मतपत्रिकेवर त्यांनी स्वतःचे नांव, अनुक्रमांक आणि चिन्ह, इतकीच माहिती त्यावर छापावी. अन्य कोणत्याही उमेदवाराचे नांव, अनुक्रमांक आणि चिन्ह नकली मतपत्रिकेवर छापण्यात येऊ नये. अशी दुस-या उमेदवाराचे नांव छापलेली मतपत्रिका आढळून आल्यास त्या जप्त करुन संबंधितांविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी. तसेच सदर मतपत्रिका

मतदान केंद्रावर वापरण्यात येणा-या मतपत्रिकेपेक्षा वेगळ्या आकाराची असावी, जेणेकरुन त्यामधील फरक त्वरित लक्षात येईल.

**४. नकली (डमी) बॅलटिंग युनिट**

उमेदवार तसेच राजकीय पक्षांनी नकली (डमी) बॅलटिंग युनिट तयार करुन घेण्यास हरकत नाही. त्याद्वारे मतदारांना त्याची माहिती देणे सुलभ होईल. मात्र, अशी नकली बॅलटिंग युनिट लाकडी, प्लास्टिक अथवा प्लायवूडची असावीत व ती अधिकृत बॅलटिंग युनिटच्या अर्ध्या आकाराची असावीत व त्यास अधिकृत बॅलटिंग युनिटला असेलेला रंग वगळून अन्य रंगामध्ये ती तयार करण्याची अनुमती द्यावी.

**५. अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी**

राजकीय पक्ष तथा उमेदवारांनी मतदारांना मतदान केंद्र तसेच त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक सापडणे सुलभ व्हावे यासाठी अनधिकृत ओळखपत्र चिठ्ठी देण्यास हरकत नाही. त्यावर मतदाराचे नांव, प्रभाग क्रमांक, मतदान केंद्राचा क्रमांक, मतदाराचा अनुक्रमांक इत्यादी माहिती छापण्यास हरकत नाही. सदरची चिठ्ठी पांढ-या कागदावर असावी, मात्र त्यावर कोणत्याही राजकीय पक्ष, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक चिन्ह छापता कामा नये. तसेच त्यावर कोणतीही घोषणा अथवा कोणत्या उमेदवारास मत देण्याबाबतचे आवाहन छापता कामा नये. अशी उमेदवाराचे/पक्षाचे/निवडणूक चिन्ह यांची छपाई केलेली ओळखचिठ्ठी मतदान केंद्रापासन १०० मीटर अंतराच्या आत कोणतीही व्यक्ती वाटताना आढळून आल्यास सदर व्यक्तीवर योग्य ती कारवाई करण्यात यावी.

## प्रकरण-१७

### मतदान यंत्रे कार्यान्वित करणे
### अर्थात निवडणूक निर्णय अधिकारी यांची EVM संदर्भात कर्तव्ये

**१. प्राथमिक**

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तुम्हाला आवश्यक तितकी मतदान यंत्रे मिळाली असतील. ज्या ठिकाणी मतदान यंत्रे वापरावयाची आहेत, त्या मतदार संघात निवडणूक लढविणारे उमेदवार किती आहेत, १५ पेक्षा कमी आहेत की जास्त आहेत, याचा विचार करुन तुम्हाला मतदान यंत्रे कार्यान्वित करावी लागणार आहेत. यापूर्वीच्या प्रकरणात नमूद केल्यानुसार एका मतदान यंत्रावर १५ उमेदवारांसाठी मतदान घेता येते, हे आपण ध्यानी घेतले असेलच. **मात्र ग्रामपंचायत निवडणुकात २ किंवा ३ उमेदवार निवडणूक लढविणार असल्याने दोन मतपत्रिकांमध्ये १ चौकट रिकामी सोडावी लागेल. अर्थात ३ उमेदवार असल्यास पहिल्या व दुसऱ्या मतपत्रिकेच्यामध्ये १ आणि दुसऱ्या व तिसऱ्या मतपत्रिकेच्यामध्ये १ अशाप्रकारे २ चौकटी रिकाम्या सोडाव्या लागतील.** त्यानुसार १५ च्या पटीत जेवढे उमेदवार असतील तितकी म्हणजेच जास्तीत-जास्त ६० - ३ = ५७ उमेदवारांसाठी ४ बॅलटिंग युनिट अशाप्रकारे बॅलटिंग युनिटची संख्या निश्चित करावी लागेल. त्यापेक्षा जास्त उमेदवार रिंगणात असल्यास आयोगाकडून आवश्यक त्या सूचना प्राप्त झाल्यावर पारंपारीक पध्दतीने मतदान घ्यावे लागेल.

**२. अतिरिक्त मतदान यंत्रांची संख्या**

वरील परिच्छेदात नमूद केल्यानुसार बॅलटिंग युनिटची संख्या तसेच कंट्रोल युनिटची संख्या लक्षात घेऊन राखीव १० टक्के अधिक मतदान यंत्रे आवश्यक राहतील.

**३. मतदान यंत्राची सखोल तपासणी**

प्रत्येक मतदान यंत्र १०० टक्के निर्दोष आहे हे पहाण्यासाठी सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी कंपनीच्या प्रतिनिधींसमवेत आपण कार्यक्रम आखून सर्व यंत्रे सुस्थितीत व १०० टक्के निर्दोष आहेत, याची खातरजमा करुन घ्यावी.

**४. मतदान यंत्रे कार्यान्वित करणे**

लोकसभा व विधानसभा निवडणुकांकरिता निवडणूक निर्णय अधिका-याला त्याच्या अधिपत्याखालील सर्व मतदान यंत्रावर साधारणपणे ठराविक उमेदवारच सेट करावयाचे असतात. उदा.तेथील मतदार संघात आठ उमेदवार निवडणूक लढवित असतील तर सर्व मतदान यंत्रे आठ उमेदवारांकरिता सेट करावी लागतील. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांकरिता एका निवडणूक निर्णय अधिका-याच्या अधिपत्याखालील वेगवेगळे प्रभाग येत असल्यामुळे त्याला त्या-त्या प्रभागातील उमेदवारांच्या संख्येनुसार मतदान यंत्रे सेट करणे आवश्यक आहे. याकरिता मतदान यंत्रे सेट करताना अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे. **एकावेळी एका प्रभागात असलेल्या मतदान केंद्रांवर आवश्यक असलेली मतदान यंत्रे सेट करण्याकरिता घ्यावी व ती या प्रकरणात यापुढे दिलेल्या प्रक्रियेनुसार सेट व सील करण्यात यावीत. एका प्रभागात आवश्यक असलेली मतदान यंत्रे सेट/सील करुन झाल्यानंतर दुस-या प्रभागातील मतदान यंत्रे सेट करण्याकरिता घ्यावीत.** एकाच वेळी दोन प्रभागातील मतदान यंत्रे एकाच टेबलवर सेट/सील करण्याकरिता आल्यास त्यात गोंधळ होण्याची शक्यता आहे. तरी या सूचनेचे काटेकोटपणे पालन करावे.

मतदान केंद्राध्यक्षांना मतदान केंद्रावर वापरण्यासाठी कोणतेही मतदान यंत्र देण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर काही तयारी करणे आवश्यक असते. त्याचा सविस्तर तपशील खाली नमूद केलेल्या परिच्छेदात स्पष्ट केला आहे. ही तयारी उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करावयाची आहे. मतदान यंत्रे केंव्हा कार्यान्वित करावीत, ही बाब आपणाकडे मतपत्रिका केंव्हा छापून येतात यावर तसेच अन्य काही बाबींवर अवलंबून राहील व त्यानुसार आपण मतदान यंत्रे केव्हा तयार करावीत याचा कार्यक्रम आखावयाचा आहे.

**५. मतदान यंत्रे मतदानासाठी केंव्हा (तारीख व वेळ) तयार करण्यात येणार आहेत, याबाबत उमेदवारांना सूचना देणे**

(१) मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्या तारखेपूर्वी साधारणतः ३ ते ४ दिवसापूर्वी उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना मतदान यंत्रे मतदानासाठी किती तारखेस कोणत्या वेळी व कोणत्या ठिकाणी तयार करण्यात येणार आहेत, याबाबतची लेखी सूचना देणे आवश्यक आहे. उमेदवारांना अथवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींना याविषयी सूचना देताना प्रत्येक उमेदवारास किती प्रतिनिधी अनुज्ञेय राहतील, हे नमूद करणे आवश्यक आहे. प्रतिनिधींची संख्या किती त्यानुसार मतदान यंत्रे तयार करणे अवलंबून राहील. उदा. ५ टेबलावर एकाच प्रभागातील मतदान यंत्र सेट / सी करणार असल्यास त्यांना यानुसार ५ प्रतिनिधी नेमण्याची मुभा राहील.

(२) कोणत्याही कारणामुळे कोणताही उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याच्यावेळी अनुपस्थित राहिल्यास तुम्ही कोणत्याही परिस्थितीत मतदान यंत्रे मतदानासाठी तयार करण्याचे काम पुढे ढकलता कामा नये. उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर असल्यास अथवा कोणीही हजर नसल्यास तुमचे काम तुम्ही सुरु ठेवणे आवश्यक आहे.

(३) उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी उपस्थित राहिल्यास मतदान यंत्रे मतदानासाठी कशा प्रकारे तयार करण्यात येतात हे त्यांना समजावून सांगावे. तसेच त्यांना कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट तयार करतेवेळी त्याचे निरीक्षण करण्याची संधी दयावी.

**६. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र मतदानासाठी तयार करणे**

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर प्रत्येक बॅलटिंग युनिट खाली नमूद केल्यानुसार मतदानासाठी तयार करणे आवश्यक आहे.

**मतपत्रिका आणि निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान यंत्राची तयारी करणे :- (१)** इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रत्येक बॅलटिंग युनिटवर राज्य निवडणूक आयोग विहित करील तो तपशील राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या भाषेमध्ये अथवा भाषांमध्ये असेल.

**मतदान यंत्र सेट करतांना एका प्रभागाकरीता किमान एक मतदान यंत्र राहील. दोन प्रभागांची निवडणूक एका मतदान यंत्रावर घेता येणार नाही.**

**(२) ग्रामपंचायत निवडणुकांबाबत मतपत्रिका आयोगाचे आदेश दि. १८ फेब्रुवारी, २००६ नुसार निश्चित करण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत सदर मतपत्रिका**

**वापरतांना त्यात काही बदल आवश्यक आहेत. त्यानुसार सदर आदेशाच्या अनुक्रमांक ७, ८, व ९ मध्ये दिलेल्या सूचनांऐवजी पुढे नमूद केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.**

ग्रामपंचायत निवडणुकांकरीता आयोगाचे आदेश दिनांक १८ फेब्रुवारी, २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक प्रभागातील आरक्षणाच्या वेगवेगळ्या वर्गवारीनुसार त्या आदेशात नमूद केलेल्या रंगांच्या मतपत्रिका असतील. तसेच स्त्री राखीव उमेदवारांकरीता त्यांच्या आरक्षणाच्या वर्गवारीनुसार मतपत्रिका असेल. मात्र त्यावर **"स्त्री राखीव"** असे त्याकरीता निश्चित केलेल्या जागी छापलेले असेल. मतपत्रिका छापतांना ती अशा रितीने छापणे आवश्यक आहे की जेणेकरुन मतपत्रिका बॅलटिंग युनिटमध्ये घट्ट चिकटविल्यानंतर उमेदवाराचे नाव नमूद केलेली चौकट ही बॅलटिंग युनिटवरील रेषेशी बरोबर जुळली पाहिजे. त्यासाठी मतपत्रिका छापतांना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. मतपत्रिका योग्यरित्या छापल्या जातील यासाठी आवश्यक वाटल्यास मुद्रणालयाच्या तंत्रज्ञांना बॅलटिंग युनिट दाखविण्यात यावे व त्यांना त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेण्यास सांगावे जेणेकरुन निवडणुकीचा तपशील छापावयाची जागा व उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेली चौकट यांच्या मधल्या रेषा व त्यांची जाडी या बॅलटिंग युनिटवर त्यासाठी ठेवलेल्या जागेशी बरोबर जुळतील. बॅलटिंग युनिटवर वापरण्यासाठी घ्यावयाच्या मतपत्रिकांना स्थळप्रतीची आवश्यकता नसून त्यांचे बंडल देखील शिवून घेण्याची आवश्यकता नाही. मतपत्रिका सुट्टयाच ठेवण्यात याव्यात.

(३) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नावे नमूद करण्यात येतील त्याच क्रमाने सदर नावे बॅलटिंग युनिटवर लावावयाच्या मतपत्रिकेमध्ये नमूद करण्यात येतील.

(४) जेव्हा दोन किंवा अधिक उमेदवारांची नावे समान असतील तेव्हा त्यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी सदर उमेदवारांचा व्यवसाय अथवा पत्ता किंवा अन्य एखादी बाब त्यांच्या नावांसमोर नमूद केली जाईल.

(५) **सदर मतपत्रिका राज्य निवडणूक आयोग ठरवील अशा नमुन्यात असेल.**

(६) ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये आरक्षण वर्गवारीनुसार वेगवेगळया रंगांच्या मतपत्रिकांची तरतूद असल्याने बॅलटींग युनिटमध्ये मतपत्रिका विहित जागी घट्ट बसविताना त्याचा क्रम खालीलप्रमाणे असेल.

१. सर्वात वर **अनुसूचित जातीकरीता** विहित **फिक्या गुलाबी** रंगांची मतपत्रिका असेल

२. त्याखाली **अनुसूचित जमातीकरीता** विहित **फिक्या हिरव्या** रंगांची मतपत्रिका असेल

३. त्याखाली **नागरिकांच्या मागासप्रवर्गाकरीता** विहित **फिक्या पिवळया** रंगांची मतपत्रिका असेल

४. त्याखाली **सर्वसाधारण उमेदवारांकरीता** विहित **पांढऱ्या** रंगांची मतपत्रिका असेल

५. त्याखाली **अनुसूचित जाती स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी- **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या गुलाबी** रंगाची मतपत्रिका असेल

६. त्याखाली **अनुसूचित जमाती स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी- **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या हिरव्या** रंगाची मतपत्रिका असेल

७. त्याखाली **नागरिकांच्या मागासप्रवर्ग स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी - **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या पिवळया** रंगाची मतपत्रिका असेल

८. त्याखाली **सर्वसाधारण स्त्री** उमेदवारांकरीता विहित जागी - **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **पांढऱ्या** रंगांची मतपत्रिका असेल

**मात्र ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये एका प्रभागातून कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन उमेदवार निवडून दिले जातील, अशी तरतूद असल्याने वर नमूद केलेल्या आठ वर्गवारींपैकी निवडणूक लढविणाऱ्या दोन किंवा तीन वर्गवारीपैकी यथास्थिती दोन किंवा तीन वर्गवारीच्या विहित मतपत्रिका वापरल्या जातील व त्या व्यतिरिक्त इतर मतपत्रिका वापरल्या जाणार नाहीत.**

(७) एका प्रभागातून सर्व वर्गवारींच्या एकूण सर्व उमेदवारांची संख्या १५ (पंधरा) हून अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार दोन किंवा तीन किंवा चार बॅलटींग युनिट विहित पध्दतीने जुळणी करुन वापरली जातील.

**उमेदवारांच्या संख्येनुसार बॅलटयुनिटवरील बटने सेट करणे.**

**अ)** बॅलट युनिट कॅरींग बॉक्समधून काढल्यानंतर बॅलट युनिटचे लॅच बटन दाब देऊन युनिट उघडावे. नंतर बॅलट पेपर स्क्रिनवरील आतील बाजूकडील दोन्ही टोकाकडील लॅच बटन एकाचवेळी प्रथमतः हळूच आतील बाजूस ढकलून नंतर खाली दाबावीत म्हणजे बॅलट पेपर स्क्रिन उघडेल. बॅलट

पेपर स्क्रिनमध्ये मतपत्रिका, कँडीडेटच्या बटनांना जुळेल अशी ठेवावी. नंतर बॅलट पेपर स्क्रिन बंद करुन खालच्या भागास दो-याने हळुवारपणे सील करावे.

**ब)** दोन किंवा तीन वेगवेगळ्या वर्गवारीकरीता दोन पदांची निवडणूक असताना एक मतपत्रिका संपल्यानंतर एक बटन बंद (Masked) करुन त्या बंद बटनासमोर दुसऱ्या वर्गवारीच्या मतपत्रिकेचा तपशील येईल व त्यानंतर पुढील बटनावर उमेदवारांची नांवे येतील. याबाबत आयोगाच्या दि. २८ मार्च, २००७ च्या आदेशातील सूचनांनुसारच (पहा परिशिष्ट VIII) **वेगवेगळ्या वर्गवारीच्या** मतपत्रिकांचा क्रम असावा तो क्रम बदलण्यात येऊ नये.

**क)** बॅलेट युनिटवरील कॅंडीडेट बटने उमेदवारांच्या संख्येनुसार त्यावरील मास्क (पांढरे मुखवटे) बाजूला करुन त्याखालील करड्या रंगाची (Grey) बटने वरील छिद्रांतून स्पष्ट दिसतील अशारितीने ठेवावीत. बॅलट युनिटवरील शेवटचे १६ वे बटन हे END बटन असते ते पांढऱ्या पट्टीने न झाकता उघडे ठेवावे. जेणेकरुन त्याचा END असे नमूद केलेला लाल रंगाचा पृष्ठभाग वरील छिद्रांतून स्पष्ट दिसेल. त्यानंतर पारदर्शक स्क्रिनसह बॅलट पेपरचे झाकण बंद करील. व END बटनावर त्यासोबतची प्लॅस्टीकची काळी कॅप लावून END बटन झाकून ठेवील. त्यानंतर बॅलट युनिट निवडणूक निर्णय अधिकारी स्वतःची सही करुन सीलबंद करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करु इच्छितात त्यांच्या स्वाक्ष-या घेईल.

जेथे एकापेक्षा जास्त बॅलट युनिट वापरण्यात येतात तेव्हा फक्त शेवटच्या बॅलट युनिटवरील "END" बटन कार्यान्वित असेल बाकी बॅलट युनिटवरील "END" बटने पांढऱ्या पट्टीने झाकून (Masked) ठेवावित.

**स्लाईड स्वीच सेट करणे**

(१) बॅलटिंग युनिटच्या आतल्या बाजूस उजव्या कोप-यात वरील बाजूला एक स्लाईड स्वीच असून, तो चार जागी ठेवता येतो. उदा. १, २, ३, ४. ही कार्यवाही एखादया मतदान केंद्रावर किती बॅलटिंग युनिट वापरावयाची आहेत, यावर अवलंबून असून, नंतर ती एका कंट्रोल युनिटशी जोडावी लागतील. १५ पेक्षा जास्त उमेदवार असल्यास स्लाईड स्वीच योग्य त्या ठिकाणी म्हणजेच जितकी बॅलेटींग युनिट वापरावयाची आहेत त्यानुसार ठेवणे. उदा. ४ बॅलेटिंग युनिट जोडली

असल्यास कंट्रोल युनिटला पहिले जोडलेल्या बॅलेटिंग युनिटचा स्लाईड स्वीच १ वर राहील व त्यापुढे जोडलेल्या बॅलेटिंग युनिटचे स्लाईड स्वीच अनुक्रमे २, ३ व ४ वर राहतील.

(२) जेंव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ पर्यंत असेल तेंव्हा एकच बॅलटिंग युनिट वापरावे लागेल व त्यावेळी आतल्या बाजूचा स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल. जेंव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ आणि ३० यामध्ये असेल तेंव्हा २ बॅलटिंग युनिट वापरावे लागतील, तेंव्हा पहिल्या बॅलटिंग युनिटमध्ये १ ते १५ उमेदवार असल्यामुळे त्या युनिटमधील स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल. तर दुस-या बॅलटिंग युनिटमधील स्लाईड स्वीच उमेदवार १६ ते ३० पर्यंत असल्यामुळे २ वर ठेवावा लागेल. अशा त-हेने जर तीन बॅलटिंग युनिट वापरावयाची असतील व उमेदवारांची संख्या ३१ ते ४५ च्या मध्ये असेल तर पहिल्या बॅलटिंग युनिटमधील स्लाईड स्वीच १ वर ठेवावा लागेल, दुस-या बॅलटिंग युनिटमधील स्लाईड स्वीच २ वर ठेवावा लागेल तर तिस-या बॅलटिंग युनिटमधील स्लाईड स्वीच ३ वर ठेवावा लागेल. अशाच रितीने उमेदवारांची संख्या ४६ ते ५७ च्या दरम्यान असल्यास व ४ बॅलटिंग युनिट वापरावयाची असल्यास चौथ्या व शेवटच्या बॅलटिंग युनिटवरील स्लाईड स्वीच ४ वर ठेवावा लागेल.

**टीपः-** वरील परिच्छेदात नमूद केलेली स्लाईड स्वीच सेट करण्याची बाब योग्यरीतीने न केल्यास संपूर्ण मतदान यंत्र निरुपयोगी ठरेल. यास्तव बॅलटिंग युनिटमधील स्लाईड स्वीच सेट करणे ही बाब अत्यंत महत्वाची आहे, हे ध्यानी घ्यावे.

**बॅलटिंग युनिट सील करणे**

बॅलटिंग युनिटमध्ये बॅलट पेपर घट्ट चिकटविल्यानंतर आणि बॅलट पेपर स्क्रीन खाली ठेवून नंतर सील केल्यानंतर उमेदवारांची बटणे जी उपयोगात आणली जाणार नाहीत, ती झाकण्यात येतील आणि वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे स्लाईड स्वीच योग्य त्या जागी सेट करावे लागतील व त्यानंतर बॅलटिंग युनिट वरील बाजूचे झाकण त्याच्या मूळ जागी घट्ट बसवावे लागेल. त्यानंतर बॅलटिंग युनिट सील करावे लागेल. त्यासाठी वरील बाजूच्या तीन छिद्रांमधून एक दोरा ओवून आणि खालच्या बाजूच्या तीन छिद्रातून दुसरा दोरा ओवून त्याची घट्ट गाठ मारावी व त्या गाठीवर निवडणूक निर्णय अधिकारी यांचा सील उमटवावा, आणि सीलच्या दोन्ही टोकाला पत्त्याची खूणचिठ्ठी वर नमूद

केल्यानुसार अडकवावी. ही कार्यवाही करताना उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असल्यास त्यांनाही त्यावर आपली स्वाक्षरी करण्याची संधी दयावी.

अशारीतीने बॅलटिंग युनिट तयार करुन सील केल्यानंतर ते पुन्हा त्यासाठी पुरविण्यात आलेल्या बॅगमध्ये ठेवावे व बॅगच्या हॅण्डलला पत्त्याची खूणचिठ्ठी पुन्हा लावावी.

**७. बॅलटिंग युनिट आणि कंट्रोल युनिट एकमेकांस जोडणे**

(१) जेव्हा निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या १५ पेक्षा कमी असेल व एकच बॅलेटिंग युनिट उपयोगात आले असेल तेंव्हा बॅलटिंग युनिट हेच फक्त कंट्रोल युनिटशी जोडण्यात यावे.

(२) बॅलटिंग युनिट जेंव्हा एकापेक्षा जास्त असतील तेंव्हा ती एकमेकांस जोडताना अशी सर्व बॅलटिंग युनिट जी मतदान केंद्रावर वापरावयाची आहेत, त्यापैकी पहिल्या क्रमांकाचे बॅलटिंग युनिट हेच फक्त कंट्रोल युनिटशी जोडण्यात यावे व त्या बॅलटिंग युनिटचे स्लाईड स्वीच १ वर ठेवावे व त्याच्याशी स्लाईड स्वीच २ क्रमांकावर ठेवलेले बॅलटिंग युनिट जोडणे आवश्यक आहे. जेंव्हा ३ बॅलटिंग युनिट वापरावयाचे असतील तेंव्हा अनुक्रमे स्लाईड स्वीच ३ वर ठेवलेले बॅलटिंग युनिट हे स्लाईड स्वीच २ वर ठेवलेल्या बॅलटिंग युनिटशी जोडले पाहिजे व अशा रितीने ४ चे बॅलटिंग युनिट क्रमांक-३ च्या बॅलटिंग युनिटशी जोडले पाहिजे.

(३) एक बॅलटिंग युनिट दुस-या बॅलटिंग युनिटशी जोडताना बॅलटिंग युनिटच्या खालच्या बाजूस एक कप्पा असून, त्यामध्ये एक सॉकेटची तरतूद आहे. या सॉकेटला दुस-या युनिटमधून निघालेली केबल पहिल्या बॅलटिंग युनिटमधील सॉकेटशी जोडली पाहिजे. अशारीतीने तिस-या बॅलटिंग युनिटची केबल दुस-या युनिटच्या सॉकेटशी जोडली पाहिजे व चौथ्या युनिटची केबल तिस-या युनिटच्या सॉकेटशी जोडली पाहिजे.

(४) वर नमूद केल्यानुसार फक्त पहिले बॅलटिंग युनिट हेच कंट्रोल युनिटशी जोडले पाहिजे. बॅलटिंग युनिटमधून निघालेली केबल ही कंट्रोल युनिटच्या पाठीमागे असलेल्या कप्प्यातील सॉकेटशी जोडली पाहिजे.

(५) कंट्रोल युनिटच्या पाठीमागच्या कप्प्यामध्ये "Power" हे बटन पुरविलेले असते. ते बटन "On"या पोझिशनला ठेवल्यास मतदान यंत्राची बॅटरी कार्यान्वित होते व कंट्रोल युनिट तसेच सर्व बॅलटिंग युनिटला ती ऊर्जा पुरविते.

**टीपः-**

(१) एकापेक्षा जास्त बॅलटिंग युनिट वापरावयाचे असतील तेंव्हा ती एकमेकांशी त्याच्या अनुक्रमानुसार जोडली पाहिजेत. यामध्ये चूक झाल्यास मतदान यंत्र निरुपयोगी होईल आणि कंट्रोल युनिटवरील कोणतेही बटन दाबल्यास "LE" (लिंकिंग एरर) असे चिन्ह कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर दिसू लागेल. याचाच अर्थ बॅलटिंग युनिट एकमेकांशी अनुक्रमानुसार जोडण्यामध्ये काही तरी चूक झालेली आहे. ही चूक दुरुस्त केल्यानंतर "LE" हा मेसेज बंद होईल.

(२) बॅलटिंग युनिटच्या केबलच्या दुस-या टोकाच्या कनेक्टरमध्ये अनेक पिन असतात. हा कनेक्टर दुस-या बॅलटिंग युनिटच्या अथवा कंट्रोल युनिटच्या सॉकेटमध्ये योग्यरीतीने बसतो. हा कनेक्टर बसविताना योग्य पोझिशनमध्ये बसविणे आवश्यक आहे. ही पोझिशन ओळखणे फार सोपे असून, या करिता कनेक्टरमधील पिनची संख्या व कनेक्टरचा आकार पाहावा. या कनेक्टरच्या पिन अत्यंत नाजूक असून, या कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना जास्त ताकद वापरल्यास सदर पिनला इजा होऊ शकेल किंवा त्या वाकू शकतील. यास्तव कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना ते योग्यरीतीने बसविणे आवश्यक आहे. त्याची खालची व वरची बाजू (TOP) नीट पाहून TOP असे नमूद केलेली बाजू कंट्रोल युनीटकडे करुन (अर्थात कंट्रोल युनीटची डिस्प्ले आपल्या स्वतःकडे ठेवून) सदर कनेक्टर सॉकेटमध्ये बसविला पाहिजे. कनेक्टर योग्यरीतीने बसविल्यास मतदान यंत्र योग्यरीतीने काम करील हे ध्यानात घ्यावे.

(३) एका कंट्रोल युनिटशी अथवा बॅलटिंग युनिटशी जोडलेला कनेक्टर वेगळा करावयाचा असल्यास कनेक्टरच्या दोन्ही बाजूस असलेली क्लीप दाबून वर खेचून कनेक्टर वेगळा करावा.

(४) बॅलटिंग युनिट एकमेकांशी जोडणे अथवा ते कंट्रोल युनिटशी जोडणे अथवा वेगळे करणे यासाठी थोडा सराव करणे आवश्यक असून, तसे न केल्यास मतदान यंत्रास इजा होऊ शकते. ही बाब जे जे अधिकारी यंत्र हाताळतील अशा सर्व निवडणूक अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांच्या मनावर ठसविणे आवश्यक आहे.

## ८. कंट्रोल युनिट तयार करणे

(१) बॅलटिंग युनिट प्रमाणेच कंट्रोल युनिटच्या संदर्भातदेखील काही पूर्वतयारी निवडणूक निर्णय अधिका-यांच्या स्तरावर करणे आवश्यक आहे. त्याबाबतची कार्यवाही खाली नमूद केल्याप्रमाणे आहे :-

(अ) कंट्रोल युनिटमध्ये बॅटरी बसविणे.

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या सेट करणे.

(क) कंट्रोल युनिटमधील "Cand. Set" सेक्शन सील करणे.

**बॅटरी बसविणे -**

वर नमूद केल्यानुसार इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र हे कंपनीने तयार केलेल्या विशिष्ट प्रकारच्या बॅटरीवर चालते. प्रत्येक वेळी नवीन निवडणुकीसाठी मतदान यंत्र वापरताना नवीन बॅटरी बसविणे आवश्यक आहे. कंट्रोल युनिटच्या वरच्या बाजूस जे "कॅन्डिडेट सेट सेक्शनछआहे त्यामध्ये बॅटरी बसविण्यासाठी जागा आहे. "कॅन्डिडेट सेट सेक्शन" मध्ये बॅटरीसाठी पुरविलेल्या कप्प्याचे झाकण सुरुवातीस थोडेसे आत दाबून त्यासाठी डाव्या बाजूला पुरविलेल्या लॅचद्वारे उघडता येते. सदर बॅटरीसाठी एक सॉकेट असून, "कॅन्डिडेट सेट सेक्शन" मधील बॅटरीच्या कप्प्यास असलेल्या प्लगमध्ये ते बसते. बॅटरीचे सॉकेट एका चिकट पट्टीने चिकटविलेले असते. ही चिकटपट्टी काढून बॅटरी योग्य जागी असलेल्या प्लगमध्ये बॅटरीचे सॉकेट बसेल अशारीतीने घट्ट बसविण्यात यावी.

## ९. यंत्रामधील जुनी माहिती काढून टाकणे

कंट्रोल युनिटमध्ये वर नमूद केल्यानुसार निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नांवे सेट करण्याकरिता प्रथम मतदान यंत्रात पूर्वी रेकॉर्ड केलेली सर्व माहिती काढून टाकणे आवश्यक आहे.

यासाठी कंट्रोल युनिच्या रिझल्ट सेक्शनमधील "Clear" असे नांव दिलेले बटन दाबावे. हे बटन दाबताच मतदान यंत्रातील सर्व माहिती शून्यावर सेट होईल आणि कंट्रोल युनिटमधील डिस्प्ले पॅनेलवर प्रत्येक उमेदवारासमोर नोंदविण्यात आलेली मते शून्य इतकी दर्शविली जातील. जर क्लीयर बटन दाबल्यावर no हा मेसेज डिस्प्ले होत असेल तर, "Close" बटन दाबावे. त्यानंतर डिस्प्ले थांबल्यावर "Result-I" हे बटन दाबावे व तो डिस्प्ले थांबल्यावर "Clear" बटन दाबावे.

**१०. निवडणूक लढविणारे उमेदवार निश्चित करणे (Setting the number of Candidates)**

प्रथमतः बॅलट युनिट, कंट्रोल युनिटला केबलने जोडावे. नंतर ऑन बटन दाबून यंत्र चालू करावे. त्यावेळी बीप साऊंड होईल व दिवा प्रकाशित होईल. त्यानंतर कॅंडीडेट सेट बटन दाबावे. त्यानंतर दोन डिजीट पॅनेलवर np प्रकाशित होईल. नंतर चार डिजीट पॅनेलवर -- फ्लॅश प्रकाशित होईल. ज्यावेळी np -- दर्शक पट्टीवर प्रकाशित होईल याकरीता आपण असे उदाहरण घेऊ कि, एका प्रभागात अनुसूचित जातीच्या दोन पदांकरीता व सर्वसाधारण वर्गवारीतील एक पदाकरीता अशा २ प्रकारच्या पदांकरीता निवडणूक होणार आहे. त्यामुळे बॅलट युनिटवर सर्वात वर अनुसूचित जातीकरीता निश्चित केलेली गुलाबी रंगाची एक मतपत्रिका व त्यांनतर एक चौकट रिकामी सोडून सर्वसाधारण वर्गवारीकरीता निश्चित केलेली पांढऱ्या रंगाची एक मतपत्रिका लावली जाईल. (अधिक माहितीकरीता पहा आयोगाचे EVM बाबतचेआदेश दि. २८ मार्च, २००७) २ वेगवेगळ्या वर्गवारीकरीता निवडणूक होणार (२ वेगवेगळ्या मतपत्रिका) असल्याने np हे २ राहिल. या उदाहरणाचे Candidate Setting कसे करावे लागेल ते पाहू.

**टीप :- २ - ग्रामपंचायत निवडणुकीत एका प्रभागात किमान २ व जास्तीत जास्त ३ सदस्य निवडून द्यावयाचे असल्याने एकावेळी २ किंवा ३ पदांकरीता निवडणूक होते. मात्र या पदांच्या वर्गवारी वेगवेगळया असतील किंवा एकाच वर्गवारीतील २ पदे किंवा ३ पदे भरावयाची असतील. अर्थात, वर घेतलेल्या उदाहरणामध्ये अनुसूचित जातीचे २ सदस्य निवडून द्यावयाचे व १ सर्वसाधारण वर्गवारीचा सदस्य निवडून द्यावयाचे असे गृहीत धरले आहे. त्यात प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय, प्रत्येक प्रभागनिहाय फरक असेल व त्याप्रमाणे मतपत्रिकांची संख्या, रंग, कॅंडीडेट सेटींग व निकालाचा डिस्प्ले यामध्ये फरक राहील.**

**टप्पा क्र.१** मतदान यंत्रावर उमेदवार सेट करण्याकरिता सर्वप्रथम मतदान यंत्रावरील पूर्वीची सर्व मते क्लीअर करुन त्यानंतर Cand.Set हे बटन दाबण्यात यावे हे बटन दाबल्यानंतर खालील प्रमाणे डिस्प्ले दिसेल व त्यावर पुढे दर्शविल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

| टप्पा क्र. | डिस्प्ले | कोणते बटन दाबावे |
|---|---|---|
| २ | np - - | याचा अर्थ किती प्रकारच्या पदांकरिता (किती वर्गवारीकरीता) निवडणूक होणार आहे उदा. अनुसूचित जाती व सर्वसाधारण अशा **दोन प्रकारच्या पदांकरिता निवडणूक होणार असल्याने (२ वेगवेगळ्या मतपत्रिका असल्याने) पहिल्या बॅलट युनीटवरील सर्वात वरुन दुसरे बटन दाबावे** |
| ३ | F1 - - | याचा अर्थ पहिल्या पदाचा पहिला उमेदवार उदा. **पहिल्या (अनुसूचित जाती) पदाकरिता** सात उमेदवार उभे असल्याने, त्या ७ **उमेदवारांपैकी पहिला उमेदवार ज्या बटनासमोर येईल ते बटन दाबावे.** |
| ४ | L1 - - | याचा अर्थ पहिल्या पदाचा शेवटचा उमेदवार. उदा. **पहिल्या (अनुसूचित जाती) पदाकरिता उभ्या असलेल्या ७ उमेदवारांपैकी शेवटचा (सातवा) उमेदवार ज्या बटनासमोर येईल ते बटन दाबावे.** |
| ५ | P1 07 - - | याचा अर्थ पहिल्या वर्गवारीतून उभ्या असलेल्या सात उमेदवारांमधून किती उमेदवार निवडून दयायचे आहेत. **अनुसूचित जाती** करिता उभ्या असलेल्या ७ उमेदवारांमधून २ उमेदवार निवडायचे असल्याने त्या **७ उमेदवारांपैकी दुस-या उमेदवाराच्या नावासमोरील बटन दाबावे.** |
| ६ | F2 - - | याचा अर्थ दुस-या पदाचा (दुसऱ्या मतपत्रिकेवरील) पहिला उमेदवार. उदा. **दुस-या (सर्वसाधारण) या पदाकरिता ५ उमेदवार उभे असल्याने, त्या ५ उमेदवारांपैकी पहिला उमेदवार ज्या बटनासमोर येईल ते बटन दाबावे.** |
| ७ | L2 - - | याचा अर्थ दुस-या पदाचा शेवटचा उमेदवार. उदा. **दुस-या (सर्वसाधारण) या पदाकरिता उभ्या असलेल्या ५ उमेदवारांपैकी, शेवटचा (पाचवा) उमेदवार ज्या बटनासमोर येईल ते बटन दाबावे.** |
| ८ | P2 05 - - | याचा अर्थ दुस-या पदाकरिता (सर्वसाधारण वर्गवारीतून) उभ्या असलेल्या पाच उमेदवारांमधून किती उमेदवार निवडून दयायचे आहेत. **सर्वसाधारण** वर्गवारीच्या पदाकरिता उभ्या असलेल्या ५ उमेदवारांमधून १ उमेदवार निवडायचा असल्यामुळे त्या **५ उमेदवारांपैकी पहिल्या उमेदवाराच्या नावासमोरील बटन दाबावे.** |

| | | |
|---|---|---|
| ९ | np2<br>P1 07-02<br>P2 05-01 | बाजूला दर्शविल्यानुसार डिस्प्ले दाखवून झाल्यानंतर डिस्प्ले बंद होईल. |

**टिप :-**

१) जर **Cand Set** हे बटन दाबल्यानंतर **"no"** मेसेज दिसत असेल तर मतदान यंत्र पुढीलप्रमाणे क्लिअर करुन घ्यावे

२) **"Close"** बटन दाबावे.

३) "Close" बटन दाबल्यानंतर **End अक्षरे येईपर्यंत वाट पहावी.** End अक्षरे विझल्यावर बिप आवाज येईल

४) त्यानंतर **Result-I** हे बटन दाबावे

५) "Result-I" बटन दाबल्यानंतर **End अक्षरे येईपर्यंत वाट पहावी.** End अक्षरे विझल्यावर बिप आवाज येईल

६) त्यानंतर **Clear** हे बटन दाबावे.

७) "Clear" बटन दाबल्यानंतर **End अक्षरे येईपर्यंत वाट पहावी.** End अक्षरे विझल्यावर बिप आवाज येईल

**यानंतर Cand.Set हे बटन दाबावे व वरील चौकटीत दाखविलेल्या टप्प्यांनुसार कार्यवाही करावी.**

**(याव्यतिरिक्त मतदान केंद्राध्यक्षांसाठी निदेश पुस्तिकेचा मार्गदर्शनासाठी वापर करावा.)**

**कॅंडीडेट सेट झाल्यानंतर कंट्रोल युनिट यंत्रामधील चालू/बंद करावयाचे बटन बंद करावे. नंतर पुन्हा सुरु करावे. तद्नंतर दर्शक पट्टीवर उमेद्वारांची संख्या येईल. त्याबाबत खात्री करावी. खात्री पटल्यावर बटन बंद करुन बॅलट युनिटची केबल कंट्रोल युनिटपासून काढून घ्यावी व कंट्रोल युनिटचा तळाचा कप्पा बंद करावा.**

**त्यानंतर कॅंडीडेट सेट बटनाचा कप्पा काळजीपूर्वक सील करावा. त्यानंतर कॅंडीडेट कप्पा सीलड करावा. नंतर कंट्रोल युनिट व बॅलट युनिट पुन्हा त्यांचे कॅरींग बॉक्सेसमध्ये ठेवावेत. अशा रितीने मतदान यंत्र मतदानासाठी तयार करावेत.**

**११. "कॅन्डिडेट सेट सेक्शन" सील करणे**

(१) "कॅन्डिडेट सेट सेक्शन"मध्ये बॅटरी बसविल्यानंतर आणि कंट्रोल युनिटमध्ये निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या सेट केल्यानंतर कॅंड सेट सेक्शनमध्ये खोचून बसविण्यात आलेल्या **काढता येणा-या मेमरीचा अनुक्रमांक मतदार यंत्राच्या नोंदी घेण्याकरिता ठेवलेल्या मुख्य**

**नोंदवहीत (Master Register) मध्ये नोंदविण्यात यावा.** त्यानंतर "कॅन्डिडेट सेट सेक्शन" बंद करावा व तो सीलबंद करावा, जेणेकरुन "कॅन्डिडेट सेट सेक्शन" मधील बॅटरी आणि कॅन्ड सेट बटन या दोघांना कोणीही धक्का लावू शकणार नाही.

(२) "कॅन्डिडेट सेट सेक्शन" बंद करताना त्यावरील कव्हर घट्ट बसवून बंद करावा. नंतर तो सीलबंद करण्यासाठी डाव्या बाजूला पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा ओवून त्याची गाठ बांधावी व दो-याच्या दोन्ही टोकांना पत्त्याची खूणचिठ्ठी डकवावी. त्यामध्ये खालील तपशील ठेवावा.

| |
|---|
| ..................ग्रामपंचायत तालुका...........जि................ |
| सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ........... |
| प्रभाग क्रमांक- ....... |
| मतदान केंद्र क्रमांक-............ |
| कंट्रोल युनिट अनुक्रमांक- .............................. |
| मतदानाचा दिनांक -........................................ |

(३) उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित असल्यास व त्यांनी तशी इच्छा व्यक्त केल्यास त्यांना पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर आपली सही करण्याची अनुमती दयावी. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांनीही त्यावर सही करणे आवश्यक आहे. त्यानंतर कंट्रोल युनिट त्याच्या बॅगमध्ये ठेवावे, जेणेकरुन ते संबंधित मतदान केंद्राकडे रवाना करता येईल. कंट्रोल युनिटच्या हॅण्डलला देखील पत्त्याची खूणचिठ्ठी डकवावी जेणेकरुन ते कोठे वापरावयाचे आहे, हे त्वरित कळेल.

**१२. मतदानासाठी तयार करण्यात आलेली यंत्रे सुरक्षित ठेवणे**

(१) मतदानासाठी तयार करण्यात आलेली सर्व मतदान यंत्रे राखीव मतदान यंत्रांसह स्ट्रॉंग रुममध्ये सुरक्षित ठेवण्यात यावीत. स्ट्रॉंग रुमला जे कुलूप लावण्यात येईल त्यास सील लावून त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी करावी. उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांची इच्छा असल्यस त्यांनाही कुलूपाच्या सीलवर स्वाक्षरी करण्याची अनुमती दयावी.

(२) मतदान यंत्रे सुरक्षित ठेवलेली खोली (स्ट्रॉंग रुम) मतदान केंद्रावर यंत्रे देण्याच्या दिवशीच उघडण्यात यावी. ही खोली उघडण्याबाबतच्या लेखी सूचना, तारीख व वेळेसह निवडणूक

लढविणारे उमेदवार व त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना पाठविण्यात यावी.स्ट्राँग रुम उघडण्यासंबंधीच्या हालचालींची नोंदवही ठेवण्यात यावी व त्यामध्ये खोली केंव्हा उघडली व बंद केली याचा तपशील नोंदविण्यात यावा.

(३) काही आकस्मिक व न टाळता येणा-या कारणांमुळे स्ट्राँग रुम नियोजित वेळेच्या व तारखेच्या आधी उघडणे भाग पडल्यास तुम्ही, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांच्या उपस्थितीतच सदर खोली उघडावी व ती बंद करताना पुन्हा कुलूप बंद करुन कुलूपावर वर नमूद केल्यानुसार सील लावून निवडणूक निर्णय अधिकारी, उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी यांना सही करण्याची अनुमती दयावी व हालचाल नोंदवहीमध्ये खोली कोणत्या कारणामुळे उघडली व बंद केली त्याबाबतची तारीख, वेळ इत्यादी नमूद करण्यात यावी.

(४) मतदान यंत्रे ठेवलेली खोली वरिष्ठ पोलिस अधिका-यांच्या निरीक्षणाखाली सतत सुरक्षेत ठेवण्यात यावी. आवश्यक वाटल्यास केंद्रीय राखीव दल किंवा राज्य राखीव दलाचे जवान तैनात करण्यात यावेत.

**१३. मतदान यंत्राच्या नोंदी ठेवणे**

(१) निवडणुकीमध्ये आपण वापरणार असलेल्या कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिटच्या संपूर्ण नोंदी तुम्ही ठेवल्या पाहिजेत. सदर नोंदीनुसार कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिट प्रत्येक मतदान केंद्रावर वापरली जाणार आहेत. तसेच कोणत्या क्रमांकाच्या मतदान केंद्रावर कोणत्या क्रमांकाचे कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट वापरले जाणार आहे, याची नोंद राहील. तसेच या नोंदीमध्ये किती कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट त्यांच्या अनुक्रमांकासह राखीव म्हणून वापरण्यासाठी तयार केली आहेत, याचाही तपशील ठेवण्यात यावा.असे राखीव कंट्रोल युनिट अथवा बॅलटिंग युनिट वापरण्याची वेळ आल्यास कोणते युनिट, कोणत्या मतदान केंद्रावर, कोणत्या कारणामुळे वापरले गेले याचा तपशील ठेवणे शक्य होईल.

(२) वर नमूद केलेल्या मतदान यंत्राच्या संपूर्ण नोंदी ठेवण्याच्या दृष्टीने मुख्य नोंदवही (मास्टर रजिस्टर) ठेवण्यात यावी. त्यामध्ये खालील नोंदी राहतील.

१) निवडणूक निर्णय अधिका-यांच्या नियंत्रणामध्ये एकूण किती कंट्रोल युनिट देण्यात आली होती.

२) एकूण उपलब्ध करुन देण्यात आलेली बॅलटिंग युनिट

३) प्रभागातील एकूण मतदान केंद्रांची संख्या

४) मतदान केंद्रावर वापरावयाच्या एकूण कंट्रोल युनिटची संख्या (प्रत्येक मतदान केंद्रासाठी एक याप्रमाणे)

५) मतदान केंद्रावर वापरावयाच्या एकूण बॅलटिंग युनिटची संख्या (प्रत्येक मतदान केंद्रावर किती बॅलटिंग युनिट वापरावयाची आहेत त्यानुसार)

६) राखीव कंट्रोल युनिटची संख्या

७) राखीव बॅलटिंग युनिटची संख्या

८) प्रत्येक प्रभागातील मतदान केंद्राचे नांव व त्याचा क्रमांक

९) प्रत्येक मतदान केंद्राचे नांव व क्रमांकासमोर तेथे वापरावयाच्या कंट्रोल युनिटचा अनुक्रमांक

१०) कंट्रोल युनिटमध्ये खोचून बसविलेल्या काढता येणा-या मेमरीचा अनुक्रमांक

११) वरील नमूद मतदान केंद्रावर वापरावयाच्या बॅलटिंग युनिटचा अनुक्रमांक

१२) बॅलटिंग युनिटवर घट्ट चिकटविलेला मतपत्रिकेचा अनुक्रमांक

१३) राखीव ठेवलेल्या कंट्रोल युनिट, त्यामध्ये बसविण्यात आलेली काढता येणारी मेमरी व बॅलटिंग युनिटचे अनुक्रमांक

१४) वर नमूद केलेल्या मुख्य नोंदवहीत शेरा या रकान्यामध्ये एखादया मतदान केंद्रावर राखीव मतदान यंत्र वापरले असल्यास त्याचा क्रमांक व नांव लिहून त्यासमोर जर राखीव कंट्रोल युनिट अथवा बॅलटिंग युनिट वापरावे लागले तर ते नमूद करावे व त्यासाठीची कारणे नमूद करण्यात यावीत. (उदाहरणादाखल **जोडपत्र नऊ व दहा** येथे नोंदवहीचा नमुना दिला आहे.)

## १४. मतदान यंत्रे मतदान अधिकारी/कर्मचारी (पोलिंग पार्टी) यांना पुरविणे

(१) मतदान केंद्राध्यक्ष यांना मतदान यंत्रे पुरविताना त्याबाबतची योग्य ती पोच पावती घेण्यात यावी. त्यासाठी आपण एक वेगळी नोंदवही ठेवून मतदान केंद्राध्यक्षांचे नांव, मतदान केंद्राचा क्रमांक व त्याचे नांव व देण्यात आलेल्या कंट्रोल युनिटचा तसेच बॅलटिंग युनिटचा अनुक्रमांक व मतदान केंद्राध्यक्षांची सही त्या नोंदवहीत घेण्यात यावी.

(२) सदर नोंदवहीमध्ये मतदान केंद्राध्यक्षांकडून मतदान यंत्रे परत ताब्यात घेताना त्याबाबतच्या नोंदी ठेवण्याची तरतूददेखील करण्यात यावी. जो अधिकारी अशी मतदान यंत्रे मतदान

केंद्राध्यक्षांकडून ताब्यात घेईल, त्यांनी प्राप्त झालेल्या कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिटचा क्रमांक स्पष्टपणे नमूद करावा व त्यावर मतदान यंत्रे ताब्यात मिळाल्याबद्दल पूर्ण सही करावी.

(३) एखादे मतदान यंत्र ताब्यात घेताना ते मोडतोड झालेल्या अवस्थेत असेल तर त्याची संपूर्ण नोंद व मतदान यंत्राचा अनुक्रमांक इत्यादी ठेवण्यात यावा.

(४) मतदानाच्या दिवशी मुख्य ठिकाणी राखीव मतदान यंत्रे ठेवण्यात यावीत जेणेकरुन कमीत कमी कालावधीत ती संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यासाठी आणीबाणीच्या वेळी उपलब्ध राहतील. ही राखीव मतदान यंत्रे एखादया सहाय्यक निवडणूक निर्णय अधिका-याच्या ताब्यात अथवा अन्य वरिष्ठ अधिका-याच्या ताब्यात ठेवण्यात यावी.

**१५. मतदान यंत्रासाठी मतदान साहित्य पुरविणे**

(१) मतदान यंत्रासह अन्य कोणकोणते साहित्य मतदान केंद्रावर वापरण्यासाठी दयावे त्याची यादी सोबत दिली आहे. सदर यादीवरुन असे दिसून येईल की, त्यापैकी काही साहित्य पारंपारिक पध्दतीने मतदान घेताना आवश्यक नव्हते. मात्र, ते आता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान घेण्यासाठी आवश्यक असणार आहे. त्यामधील काही महत्वाच्या बाबी खाली नमूद केल्या आहेत.

**१६. मतदार नोंदवही**

(१) प्रत्येक मतदान केंद्रावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही ठेवावयाची आहे. (पहा दि.२८/३/२००७ च्या आदेशाचे परिच्छेद-१४,) मतदान केंद्राध्यक्षांनी या नोंदवहीमध्ये मतदारांचे मतदार यादीतील अनुक्रमांक (चिन्हांकित मतदार यादीत नमूद केल्यानुसार) लिहून घ्यावयाचे आहेत आणि संबंधित मतदारांची स्वाक्षरी अथवा त्यांच्या अंगठयाचा ठसा सदर नोंदवहीत घ्यावयाचा आहे. ही मतदार नोंदवही दुसरे काही नसून पारंपारिक पध्दतीमध्ये मतपत्रिकेस जी स्थळप्रत असते त्यासाठी पर्याय म्हणून वापरली जाणार आहे.

(२) मतदार नोंदवही एखादया पुस्तकाच्या स्वरुपात असेल व ती चांगल्या प्रकारच्या कागदावर छापलेली असेल. हा कागद ए-४ या साईझचा असावा. प्रत्येक नोंदवहीस एक वेगळे मुखपृष्ठ असावे व त्यामध्ये खालील तपशील छापण्यात यावा.

**नमुना-व्हीएम-१**
**मतदार नोंदवही**
**.............ग्रामपंचायत ता.............., जिल्हा-.................**
**निवडणूक/पोटनिवडणूक, २००७**
**प्रभाग क्रमांक ..............................**
**मतदान केंद्राचे नांव व क्रमांक ............................**
**मतदानाची तारीख ........................**

(३) सदर नोंदवहीच्या प्रत्येक पृष्ठावर मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक व त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी व अभिप्रायासाठी जागा असावी. एका पृष्ठावर साधारणपणे १० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्ष-या राहतील अशारीतीने नोंदवहीची रचना करावी. (म्हणजे एका पानावर पाठपोट २० मतदारांचे अनुक्रमांक राहतील.)

(४) नोंदवहीच्या प्रत्येक कागदाच्या दोन्ही बाजूला तपशील लिहिता येईल अशारीतीने छपाई करावी.

(५) सदर नोंदवही बांधणी (बाईंडिंग) केलेली असावी व सदर नोंदवहीत २५ पाने अथवा ५० पृष्ठे राहतील अशारीतीने नोंदवहीची बांधणी करण्यात यावी. २५ पाने असलेल्या नोंदवहीत सुमारे ५०० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्ष-या घेता येतील; तर ५० पाने असलेल्या नोंदवहीत सुमारे १००० मतदारांचे अनुक्रमांक व स्वाक्ष-या घेता येतील. नोंदवहीचा प्रत्येक पृष्ठक्रमांक छपाई यंत्राद्वारे छापलेला असेल. प्रत्येक मतदान यंत्रावर एक किंवा त्यापेक्षा जास्त नोंदवहया (मतदान केंद्रावरील मतदारांची संख्या विचारात घेऊन) पुरविण्यात याव्यात.

(१) आपण आवश्यक तितक्या संख्येने मतदार नोंदवहया वेळीच छपाई करुन घ्याव्यात.

**१७. मतदार चिठ्ठी (स्लीप)**

(१) मतदान केंद्रावर मत नोंदविण्यासाठी येणा-या प्रत्येक मतदाराची नोंद वर नमूद केल्यानुसार मतदार नोंदवहीत घेण्यात येईल. त्या मतदान केंद्रावर जसे मतदार येतील त्याप्रमाणे त्यांची ओळख पटल्यानंतर त्यांचा मतदार यादीतील अनुक्रमांक नमूद करुन त्यांची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा नोंदवहीत घेतल्यानंतर त्यांना मतदान करण्याची संधी दयावी. हे लक्षात घेणे

आवश्यक आहे की, मतदार नोंदवहीमध्ये ज्या क्रमाने मतदारांची नांवे व त्यांच्या स्वाक्ष-या अथवा अंगठयाचे ठसे घेतले असतील त्याच क्रमाने प्रत्येक मतदाराने मतदान करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक मतदारास त्याचा अनुक्रमांक मतदार नोंदवहीत लिहून घेतल्यानंतर व त्याची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर प्रत्येक मतदारास एक चिठ्ठी (स्लीप) संबंधित अधिका-याने ज्यांच्याकडे मतदार नोंदवहीमध्ये वरील तपशील लिहून घेण्याचे काम नेमून देण्यात आले आहे त्याने दयावी. सदर स्लीपमध्ये खालील तपशील राहील :-

१) मतदार नोंदवहीतील रकाना-१ मध्ये लिहिल्याप्रमाणे मतदाराचा अनुक्रमांक

२) मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक

३) मतदान अधिका-याची थोडक्यात सही

(२) वरीलप्रमाणे देण्यात आलेली मतदार चिठ्ठी घेऊन मतदार मतदान केंद्राध्यक्ष अथवा कंट्रोल युनिटचा ज्यांच्याकडे ताबा आहे त्या मतदान अधिका-याकडे जाईल व ती चिठ्ठी त्यास दाखवील. ती चिठ्ठी बघून मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी त्या क्रमाने (मतदार नोंदवहीत नमूद केलेल्या अनुक्रमांकानुसार) मतदान करण्याची अनुमती देईल.

(३) मतदार चिठ्ठया वेळीच आवश्यक तितक्या प्रमाणात छापून घेण्यात याव्यात. त्या साधारणपणे पोस्टकार्डच्या आकाराच्या असाव्यात. सदर चिठ्ठया ५० अथवा १०० च्या बंडलमध्ये शिवून घेतलेल्या असाव्यात जेणेकरुन त्या प्रत्येक मतदान केंद्रावरील प्रत्येक मतदार संख्येच्या प्रमाणात पुरविणे सोईचे होईल.

## १८. खूण चिठ्ठी (Address Tag)

(१) आपण हे लक्षात घेतले असेलच की, खूणचिठ्ठी दोन प्रकारची असून, त्यापैकी एक कंट्रोल युनिटसाठी वापरावयाची आहे तर दुसरी बॅलटिंग युनिटवर वापरावयाची आहे. सदरच्या खूणचिठ्ठीचा नमुना राज्य निवडणूक आयोगाने दिला असून त्यानुसार आपण आवश्यक तितक्या प्रमाणात वेळीच छापून घ्याव्यात व त्या मतदान यंत्रे तयार करताना अथवा मतदान केंद्रावर वापरण्यासाठी उपलब्ध करण्यात याव्यात. (पहा आयोगाचे पत्र दि. १४/८/२००७)

(२) खूणचिठ्ठीस डाव्या बाजूस एक छिद्र असावे. हे छिद्र एका धातूच्या कडीमध्ये ड ाकलेले असावे जेणेकरुन त्यामधील दोरा काढल्यानंतर खूणचिठ्ठी सहजासहजी फाटणार नाही.

| |
|---|
| ..................ग्रामपंचायत तालुका...........जि................ |
| सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ........... |
| प्रभाग क्रमांक- ....... |
| मतदान केंद्र क्रमांक-............ |
| कंट्रोल युनिट अनुक्रमांक- ................................ |
| मतदानाचा दिनांक -............................................ |

# प्रकरण- १८

## मतदान

**१. प्राथमिक**

मतदान केंद्रांची यादी वेळीच प्रसिध्द करुन त्यानुसार मतदानाची सर्व व्यवस्था योग्य वेळेपूर्वीच करणे आवश्यक आहे. मतदान केंद्रांची यादी आपण सर्व संबंधित उमेदवारांना वितरित करावी व त्यामध्ये आयत्यावेळी कोणताही बदल करण्यात येऊ नये.

**२. मतदान कर्मचारी (पोलिंग पार्टी)**

आपण घेणार आहोत ते मतदान इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या सहाय्याने घेणार असल्यामुळे ब-याचशा मतदान कर्मचा-यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्याचा अनुभव नसण्याची शक्यता आहे व त्यामुळे त्यांना सखोल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. विशेषत: मतदान केंद्राध्यक्ष आणि वरिष्ठ मतदान अधिकारी ज्याला सहाय्यक मतदान केंद्राध्यक्ष म्हणून नेमलेले असते त्या दोघांना सखोल प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

**३. मतदान साहित्य**

सर्व मतदान कर्मचा-यांना मतदान साहित्य इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासह वेळीच प्राप्त होईल याची दक्षता तुम्ही घेणे आवश्यक आहे. मतदान साहित्याची सर्वसाधारण यादी या पुस्तिकेत दिली आहे. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्राची सर्वतोपरी काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच त्यांच्या सुरक्षेची देखील योग्य ती व्यवस्था करणे आवश्यक आहे. मतदान यंत्रांना मतदान केंद्राध्यक्षांच्या निष्काळजीपणामुळे काही इजा पोहोचल्यास ते त्यास वैयक्तिक जबाबदार राहतील, याची त्यांना जाणीव करण्यात यावी.

**४. निवडणुका निर्भय व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्थेचे नियोजन**

आपण संबंधित पोलिस अधिका-याशी चर्चा करुन संवेदनशील तसेच अतिसंवेदनशील मतदान केंद्रांची यादी तयार करावी व त्याठिकाणी योग्य तो पोलिस बंदोबस्त अथवा राज्य राखीव पोलिस दल यांच्या अतिरिक्त तुकडया तैनात करण्यात याव्यात. विशेषत: मतदान साहित्य व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे यांच्या सुरक्षेची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच मतदान पार पडल्यानंतर मतदान कर्मचारी मतदान साहित्य व मतदान यंत्रे यासह मतमोजणीच्या ठिकाणी

पोहोचेपर्यंत त्यांना पोलिस सुरक्षा मिळेल याची काळजी घेण्यात यावी. मतदान केंद्राच्या आसपास कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, यादृष्टीने मतदानाच्या दिवशी वापरावयाची वाहने, दारुच्या विक्रीवर बंदी, परवानाधारक शस्त्रे बाळगणा-या व्यक्तींनी आपली शस्त्रे योग्य त्या पोलिस अधिका-यांकडे जमा करण्याबाबत आदेश काढणे, विना परवाना शस्त्रे कोणाकडे असल्यास त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची पोलिसांना सूचना देणे इत्यादी सर्व बाबींची दक्षता घेण्यात यावी.

**५. मतदान केंद्रावर मतदान कर्मचा-यांचे (पोलिंग पार्टी) आगमन**

(१) मतदानाच्या आदल्या दिवशी नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर मतदान कर्मचारी यांनी पोहोचणे आवश्यक आहे. तेथे पोहोचल्यानंतर मतदान कक्ष (व्होटिंग कम्पार्टमेंट) योग्य त्या रितीने एका कोप-यात उभे करावे, जेणेकरुन मतदार आपले मत नोंदविताना ते गोपनीय राहील.

(२) मतदान कक्षामध्ये ज्यामध्ये बॅलटिंग युनिट ठेवलेले असेल व जेथे कंट्रोल यूनिट ठेवलेले असेल त्यामधील अंतर ३ मीटरपेक्षा जास्त असता कामा नये. कारण कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट यांना जोडणारी केबल ही जास्तीत जास्त ५ मीटर इतकी लांब असते.

(३) मतदानाच्या दिवशी प्रत्येक मतदान कर्मचा-याने मतदान सुरु होण्यापूर्वी किमान एक तास आपल्या जागेवर उपस्थित असणे आवश्यक आहे.

(४) मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी मतदान यंत्र बरोबर मतदानास एक तास असताना तयार करण्यास घ्यावे. त्यावेळेपर्यन्त मतदान प्रतिनिधी उपिस्थत नसल्यास वाट पहात न रहाता मतदान यंत्र तयार करण्यास सुरुवात करावी.

**६. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान कर्मचारी यांची कर्तव्ये**

(१) सर्वसाधारणपणे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट हे मतदान केंद्राध्यक्षांकडे असणे योग्य ठरेल. तथापि, मतदान केंद्रामध्ये अन्य बाबींकडे उदा. आव्हानित मते, अंध व अपंग मतदारांना सहाय्य करण्याबाबतची कार्यपध्दती अवलंबिणे, प्रदत्त मतपत्रिका देणे यासारख्या बाबींकडे लक्ष देण्यास वेळ मिळावा यासाठी कंट्रोल युनिट एखादया मतदान अधिका-याकडे सोपवावे म्हणजेच

मतदान केंद्राध्यक्षांसह तीन मतदान अधिकारी मतदान केंद्रावर राहतील. तसेच एक कर्मचारी (शिपाई) उपलब्ध राहील.

(२) मतदान केंद्रावर पहिल्या मतदान अधिका-याने मतदाराची ओळख पटवावयाची आहे. तसेच त्याच्या ताब्यात चिन्हांकित मतदार यादी राहील. दुस-या मतदान अधिका-याने मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीस शाई लावावयाची आहे आणि नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक व त्याच्यासमोर मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा याची नोंद करावयाची आहे. तसेच तिस-या मतदान अधिका-याच्या ताब्यात कंट्रोल युनिट राहील.

**७. मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांची बैठक व्यवस्था**

मतदान केंद्रात मतदान केंद्राध्यक्षांनी अशा जागी बसावे जेथून तो मतदान केंद्रात चाललेल्या सर्व कार्यवाही पाहू शकेल. मतदान अधिकारी यांची जागा अशी असावी जेणेकरुन मतदान केंद्रात एखादया मतदाराने प्रवेश करताच तो सरळ पहिल्या मतदान अधिका-याकडे जाईल. त्याच्याकडे मतदाराची ओळख पटविणे हे काम व चिन्हांकित मतदार यादी असेल. त्यानंतर तो दुस-या मतदान अधिका-याकडे जाईल व नंतर तिस-या अशा क्रमाने बैठक व्यवस्था असावी.

**८. मतदान प्रतिनिधींचे आगमन**

प्रत्येक मतदान केंद्रात मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान एक तास आधी मतदान प्रतिनिधींनी उपस्थित असले पाहिजे. कारण या एक तासात मतदान केंद्राध्यक्षांस मतदान यंत्र तयार करणे तसेच प्रतिरुप मत (मॉक पोल) मतदान प्रतिनिधींच्या समाधानासाठी करावयाचे असते. तथापि, मतदान प्रतिनिधी वेळेवर मतदान केंद्रात न पोहोचल्यास कोणतीही कार्यवाही करण्यास थांबू नये व ती पूर्ण करण्यात यावी. तसेच एखादा मतदान प्रतिनिधी केवळ उशीरा आल्यास त्याच्यासाठी प्रतिरुप मतदान (मॉक पोल) पुन्हा करु नये.

**९. मतदान प्रतिनिधींची बैठक व्यवस्था**

मतदान प्रतिनिधींना बसण्यासाठी अशी जागा असावी जेथून त्यांना मतदार ओळखता येतील. तसेच मतदान केंद्राध्यक्ष व तिसरा मतदान अधिकारी यांच्या टेबलवरील कंट्रोल युनिट व त्याबाबतची सर्व कार्यवाही पाहता येईल.

**१०. मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्राची तयारी करणे**

निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर जी काही कार्यवाही व मतदान यंत्राची तयारी करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त आणखी काही तयारी मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षांनी करणे आवश्यक असते. ही कार्यवाही उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करावयाची असते.. ही कार्यवाही मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्याच्या वेळेपूर्वी सुमारे एक तास आधी सुरु करावी. वर नमूद केल्यानुसार एखादा अथवा कोणताही प्रतिनिधी वेळेवर उपस्थित राहिला नाही तरीदेखील ठरल्याप्रमाणे सर्व कार्यवाही मतदान केंद्राध्यक्षांनी वेळेवर सुरु करावयाची आहे.

**११. बॅलटिंग युनिट तयार करणे**

(१) निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर बॅलटिंग युनिट पूर्णपणे मतदानासाठी तयार केलेले असते व त्यामध्ये आणखी कोणतीही कार्यवाही मतदान केंद्रात करण्याची आवश्यकता नाही. फक्त बॅलटिंग युनिटला असलेली केबल कंट्रोल युनिटला जोडणे आवश्यक असते.

(२) तथापि, जेथे एकापेक्षा जास्त बॅलटिंग युनिट वापरावी लागणार असतील त्या ठिकाणी सर्व बॅलटिंग युनिट त्यांच्या अचूक क्रमाने एकमेकास जोडणे आवश्यक असते. अशा परिस्थितीत फक्त पहिले मतदान यंत्र कंट्रोल युनिटला जोडले जाईल व पुढील बॅलेट युनिट त्याच्या अलिकडे असलेल्या बॅलेट युनीटला जोडले जाईल.

(३) मतदान केंद्राध्यक्षांनी पुढील बाबी नीट पहाव्यात :-

(१) बॅलटिंग युनिटच्या बॅलटिंग पेपर स्क्रीनवर मतपत्रिका डिस्प्ले पॅनल खाली घट्ट बसविण्यात आलेल्या आहेत.

(२) बॅलटिंग युनिटच्या वरच्या व खालच्या भागास असलेले दोन सील सुस्थितीत आहेत, याची खात्री करावी.

**१२. कंट्रोल युनिट तयार करणे**

(१) मतदान केंद्राध्यक्षांनी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर "कॅन्डिडेट सेट सेक्शन" या भागास जे सील केलेले असते हे सुस्थितीत आहे याची खात्री करावी.

(२) मतदान केंद्राध्यक्षांनी कंट्रोल युनिटच्या बाबतीत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(१) ज्या ठिकाणी एकच बॅलटिंग युनिट वापरण्यात येणार आहे त्याची केबल कंट्रोल युनिटला जोडावी व त्या ठिकाणी एकापेक्षा जास्त बॅलटिंग युनिट जोडण्यात येणार आहेत ती एकमेकांशी स्लाईड स्वीचचा क्रमांक पाहून जोडावीत.

(२) कंट्रोल युनिटचे "पॉवर" हे बटन सुरु (ऑन) करावे.

(३) कंट्रोल युनिटच्या पाठिमागचा कप्पा वरील १ व २ येथे नमूद केलेली कार्यवाही केल्यानंतर बंद करावा.

(४) प्रतिरुप मतदान (मॉक पोल) पार पाडणे.

(५) कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शन" च्याआतल्या कप्प्यामध्ये आयोगाने विहित केलेले पेपर सील बसवावे व सीलबंद करावे.

(६) "रिझल्ट सेक्शन" चे वरील झाकण सीलबंद करावे.

(३) ज्या ठिकाणी एक बॅलटिंग युनिट वापरण्यात येणार आहे त्याची केबल कंट्रोल युनिटला त्यासाठी पुरविण्यात आलेल्या सॉकेटमध्ये बसवावी. तसेच कंट्रोल युनिटवरील "पॉवर" बटण सुरु करावे. सदर बटण सुरु करताच "बीप" असा आवाज होईल आणि कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले सेक्शनवरील हिरवा दिवा पेटेल. त्यानंतर कंट्रोल युनिटच्या मागील कप्पा बंद करावा. हा कप्पा घट्ट बंद करण्यासाठी त्यासाठी असलेल्या दोन छिद्रातून एक वायरचा तुकडा घालावा व त्याच्या दोन्ही टोकांना पीळ घालावा म्हणजे तो घट्ट बंद होईल. येथे हे लक्षात घेतले पाहिजे की, कंट्रोल युनिटच्या सदरचा मागील कप्पा सीलबंद करावयाचा नसून, मतदान बंद झाल्यानंतर पॉवर बटन बंद करण्यासाठी व बॅलटिंग युनिटची केबल वेगळी करण्यासाठी तो पुन्हा उघडावा लागणार आहे.

**१३. प्रतिरुप मतदान (मॉक पोल) पार पाडणे**

(१) मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्र सुस्थितीत आहे याबद्दल स्वतःची तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधींची खात्री पटावी यासाठी तसेच मतदान यंत्रात कोणतीही मते पूर्वीच नोंदविलेली नाहीत, याबद्दल मतदान प्रतिनिधींची खात्री पटावी यासाठी प्रतिरुप मतदान (मॉक पोल) करुन दाखविणे आवश्यक आहे. यासाठी मतदान केंद्राध्यक्ष सुरुवातीस कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शन" मधील "Clear" हे बटण दाबेल, ज्यायोगे सर्व उमेदवारांच्यासमोर "शून्य" मते डिस्प्ले पॅनेलवर दिसून येतील. जर NO असा मेसेज डिस्प्ले होत असेल तर "Close" बटन दाबावे व डिस्प्ले बंद झाल्यावर "Result-I" बटन दाबावे व तो डिस्प्ले बंद झाल्यावर "Clear" बटन दाबावे.

(२) त्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष प्रतिरुप मतदान पार पाडण्यासाठी काही उमेदवारांच्या बाबतीत अंदाजे काही मते नोंदवील. त्यासाठी मतदान प्रतिनिधींना कोणत्याही उमेदवाराच्या समोरील बटण दाबण्याची संधी दयावी. मात्र, कोणत्या उमेदवारास किती मते दिली गेली याची नोंद ठेवावी, जेणेकरुन प्रतिरुप मतदानाचा निकाल पाहताना तो दिलेल्या मतांशी जुळतो किंवा कसे हे त्यातून पाहणे शक्य होईल. प्रतिरुप मतदानाचा Mock Poll निकाल पाहण्यासाठी कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शन" वरील "Result-I" हे बटण दाबावे. सदर बटण दाबताच डिस्प्ले पॅनेलवर मध्ये दर्शविल्यानुसार प्रत्येक उमेदवाराच्यासमोर किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याचे आकडे क्रमाने पहिल्या उमेदवारापासून दिसण्यास सुरुवात होईल. प्रतिरुप मतदानाचा निकाल जुळतो आहे याची खात्री झाल्यानंतर मतदान यंत्रावर नोंदविलेली मते पुन्हा शून्यावर आणावीत व त्यासाठी "Clear" हे बटण दाबावे.

**१४. कंट्रोल युनिट पेपरसीलने सीलबंद करणे**

(१) **मतदान यंत्र सील करण्याकरिता सुरुवात करण्यापूर्वी ते मागून ऑफ (बंद) करणे अत्यावश्यक आहे.** मतदान यंत्र मागून बंद केल्यानंतर सीलींग करण्यास सुरुवात करावी व सील पूर्ण झाल्याशिवाय यंत्र सुरु करण्यात येवू नये. पारंपारिक मतदान पध्दतीमध्ये जेथे मतपत्रिका व मतपेटया वापरल्या जात होत्या तेंव्हा मतपेटया आयोगाने विहित केलेल्या पेपरसीलद्वारे सीलबंद करण्यात येत असत. अशाच प्रकारची कार्यपध्दती मतदान यंत्राबाबत देखील विहित करण्यात आली आहे. त्यासाठी कंट्रोल युनिटमध्ये खाली नमूद केल्यानुसार आयोगाने विहित केलेले पेपर सील वापरुन ते सीलबंद करावयाचे आहे.

(२) कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शन" च्या आतल्या कप्प्याच्या झाकणाच्या आतल्या बाजूस पेपरसील घालण्यासाठी एक चौकट ठेवण्यात आलेली आहे. इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने

तयार केलेल्या मतदान यंत्राच्या बाबतीत एक पेपर सील वापरण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर सील अशा प्रकारे घट्ट बसवावयाचे आहे, जेणेकरुन त्याचा वरील भाग दिसू शकेल. पेपरसीलचा वरचा भाग दुमडल्यानंतर त्यावरील अनुक्रमांक वरील बाजूस येईल.



*(रिझल्ट सेक्शनच्या आतील कप्प्यास असलेल्या खाचेमध्ये पेपरसील व आधारासाठी पुठ्ठा दिलेला असल्यास तो वर दर्शविल्याप्रमाणे घालावा जेणेकरुन रिझल्ट सेक्शनचे दोन्ही कप्पे बंद केल्यावर त्यामधून वरील बाजूने बाहेर येणारा पेपरसीलचा भाग पट्टीसीलच्या दिशेने दुमडल्यावर अनुक्रमांक वरच्या बाजूला दिसेल)*

(३) वर नमूद केल्याप्रमाणे पेपरसील आपल्या जागी घट्ट बसून राहावे व ते आपल्या जागेवरुन हलू नये यासाठी आवश्यक असल्यास एका पातळ पुठ्ठयाचा आधार पेपरसीलला देता येईल. पेपर सील आपल्या जागेवरुन हलणार नाही, याची खात्री करण्यासाठी ते एका बाजूने हळूच ओढून ते घट्ट बसल्याची खात्री करावी. तथापि, ते सील खराब होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी व ते खराब झाल्यास त्वरित दुसरे पेपर सील वापरण्यात यावे.

(४) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर कंट्रोल युनिटच्या आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद करावे. सदर झाकण अशारीतीने बंद करावे की पेपर सीलच्या दोन्ही बाजूची टोके आतल्या कप्प्याच्या बाहेर राहतील. खालील परिच्छेद १७ मध्ये दर्शविल्यानुसार A B C D अक्षरे असलेले पट्टी सील वापरुन मतदान यंत्र सील केल्यानंतर पेपर सीलच्या पांढ-या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांनी पेपरसीलच्या अनुक्रमांकाखाली आपली पूर्ण स्वाक्षरी करावी व विभेदक चिन्ह उमटवावे. मतदान केंद्रात उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जर पेपरसीलवर स्वाक्षरी करु इच्छित असतील तर त्यांनाही तशी अनुमती दयावी. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान प्रतिनिधींच्या सहया त्यांच्या नेमणूक पत्रावरील सहीशी जुळतात किंवा कसे, याची खात्री करावी.

(५) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर व आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी आतल्या झाकणाच्या डाव्या बाजूस ठेवण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून एक दोरा ओवून तो स्पेशल टॅग वापरुन सीलबंद करावा. स्पेशल टॅग लावताना त्याचा धक्का "Close" बटनाला लागणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी.


**१५. पेपरसीलचा हिशोब ठेवणे**

(१) मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेल्या पेपरसीलचा हिशोब ठेवणे त्याने आवश्यक आहे. सदर हिशोब नमुना व्हीएम-३ मध्ये ठेवणे आवश्यक आहे.

(२) मतदान केंद्राध्यक्ष उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांना पेपरसीलवरील अनुक्रमांक लिहून घेण्याची अनुमती देईल.

**१६. कंट्रोल युनिटचे "रिझल्ट सेक्शन" बंद करुन सीलबंद करणे**

(१) कंट्रोल युनिटच्या "रिझल्ट सेक्शन" च्या आतला कप्पा बंद करुन तो सीलबंद केल्यानंतर "रिझल्ट सेक्शन" च्या वरील झाकण बंद करावे.



(२) वरील झाकण बंद केल्यानंतर "रिझल्ट सेक्शन" पुढीलप्रमाणे सीलबंद करावे.


(१) वरील झाकणाच्या डाव्या बाजूस पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा ओवावा.

(२) दो-याची गाठ मारुन त्यास मतदान केंद्राध्यक्षाचे सील लावावे. आणि,

(३) पत्त्याची खूणचिठ्ठी दो-याच्या टोकास बांधावी. ज्याप्रमाणे "कॅन्डिडेट सेट सेक्शन" मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्तरावर पत्त्याची खूणचिठ्ठी वर बांधलेली असेल त्याच धर्तीवर ही खूणचिठ्ठी असेल. या पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास स्वाक्षरी करण्याची संधी दयावी.


**१७. A B C D पट्टीसील वापरुन मतदान यंत्र सीलबंद करणे :-**

**टप्पा क्र. १:-** रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, तो खालीलप्रमाणे दुमडावा.




*(प्रथम गुलाबी कागदी मोहोरेचा गुलाबी भाग बाहेरच्या बाजूला राहील याची खात्री करुन तिचे आतील टोक मध्यभागी दुहेरी दुमडा)*

**टप्पा क्र. २:-** त्यानंतर ABCD अक्षरे असलेली पट्टी सील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे, असे करताना 'A'भाग रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, तेथे खालीलप्रमाणे ठेवावा.





*(निकाल विभागाच्या बाहय दरवाजाच्या आतील बाजूने बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेच्या आतील घडीच्या तळाजवळ पूर्वीच डिंक लावलेला 'ए' भाग येईल, अशाप्रकारे पट्टी मोहोर (सील) ठेवा. 'ए' वरील मेणकागद काढा)*

**टप्पा क्र. ३:-** त्यावर पेपरसीलचा खालील भाग खालील दर्शविल्याप्रमाणे दुमडून चिटकवावा.





*(या डिंक लावलेल्या भागावर गुलाबी कागदी मोहोरेची आतील घडी दाबा आणि चिटकवा)*


**टप्पा क्र. ४:-** त्यानंतर 'B' भाग उलट दुमडून पेपरसील वर चिटकवावा.



*(पूर्वीच डिंक लावलेल्या 'बी' भागावरील मेणाचा कागद काढा आणि हा डिंक लावलेला भाग गुलाबी कागदी मोहोरेच्या बाहेरील घडीवर दाबा)*


**टप्पा क्र. ५:-** त्यानंतर 'C' भागावर पेपरसीलची वरील पट्टी चिटकवावी.








*(हरव्या कागदी मोहोरेवर " बी" भाग चिटकवल्यावर "सी" हा भाग सर्वात वर येईल. "सी" भागावरील मेणकागद काढा. बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागापासून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेला दाबा. जेणेकरुन हिरवी कागदी मोहोर "सी" भागावर घट्टपणे चिटकवली जाईल)*

**टप्पा क्र. ६:-** त्यानंतर पट्टी सील मतदान यंत्राभोवती गोल फिरवून 'D'भाग जेथे 'A' 'B' 'C' चिटकविलेले आहेत, त्याठिकाणी आणून चिटकवावा.






*(पट्टी मोहोर (सील) क्लोज (बंद) बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन पट्टी सीलचा उर्वरित भाग डावीकडून नियंत्रण युनिटच्या भोवताली गुंडाळा, पट्टी सीलचे दुसरे टोक, नियंत्रण युनिटच्या उजव्या बाजून बाहय दरवाजाच्या सर्वात वरच्या भागात जेथे पूर्वीच डिंक लावलेले "डी" "बी" "सी" भाग चिटकवलेले आहेत, तेथे आणा. पूर्वीच डिंक लावलेल्या "डी" भागावरील आवरण असलेला मेणकागद काढा आणि दरवाजाच्या सर्वात वरच्या भागातून बाहेर आलेल्या हिरव्या कागदी मोहोरेवर तो भाग घट्टपणे दाबा. पूर्वीच डिंक लावलेला "डी" भाग "क्लोज" बंद बटनाच्या खाली पट्टी सीलवर चिकटतो. हा चिकटणार "डी" चा भाग पट्टी सीलवर घट्टपणे दाबा)*

**१८. प्रत्यक्ष मतदानासाठी मतदान यंत्र तयार असणे.**

(१) आता मतदान यंत्र सर्व प्रकारे प्रत्यक्ष मतदानासाठी तयार झाले आहे.

(२) प्रत्यक्ष मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष बॅलटिंग युनिट मतदान कक्षात (व्होटिंग कम्पार्टमेंट) नेऊन ठेवील. यापूर्वी नमूद केल्यानुसार बॅलटिंग युनिट व कंट्रोल युनिट यामधील केबलची लांबी अंदाजे ५ मीटर इतकी असल्यामुळे ज्या मतदान अधिका-यांच्या ताब्यात कंट्रोल युनिट आहे त्यांचे टेबल व मतदान कक्ष यामधील अंतर ३ मीटरपेक्षा जास्त नसावे. तसेच कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट यांना जोडणारी केबल यामुळे मतदाराच्या हालचालीस बाधा येऊ नये अथवा मतदार या केबलला अडखळणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**१९. चिन्हांकित मतदार यादी व व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही सर्वांना दाखविणे**

मतदानास सुरुवात होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष चिन्हांकित मतदार यादी; जी मतदान केंद्रावर वापरण्यात येणार आहे त्यामध्ये तसेच व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही, यामध्ये कोणत्याही खुणा नाहीत हे उपस्थित उमेदवार अथवा निवडणूक प्रतिनिधी यांना दाखवील.

**२०. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी करावयाचे घोषणापत्र**

मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान सुरु होण्यापूर्वी (प्रतिरुप मतदान घेतल्याबाबत) तसेच चिन्हांकित मतदार यादी अथवा मतदार नोंदवही यावर EDC व PB व्यतिरिक्त कोणतीही खूण नसल्याबाबत; तसेच पेपरसीलवर संबंधितांची स्वाक्षरी घेतल्याबाबत **जोडपत्र-१२अ** मध्ये दिलेल्या नमुन्यातील घोषणापत्र वाचून दाखवून त्यावर उपस्थित मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या घ्याव्यात.

**२१. मतदान गुप्त ठेवण्याबाबत ताकीद**

मतदान केंद्राध्यक्षांनी सर्व उपस्थितांना मतदानाबाबतची गोपनीयता पाळण्याबाबत ताकीद दयावी व गोपनीयतेचा भंग झाल्यास संबंधितांवर कारवाई होईल, याची जाणीव करुन दयावी.

**२२. मतदानास सुरुवात करणे**

मतदान केंद्राध्यक्षांनी मतदानासाठी ठरवून दिलेल्या वेळेवर अचूक मतदान सुरु करावे. त्यापूर्वी ज्या काही बाबी पार पाडणे आवश्यक आहे त्या वेळीच पार पाडाव्यात. काही न टाळता येणा-या कारणांमुळे मतदान सुरु होण्यास विलंब झाल्यास मतदानाची वेळ वाढवून देण्याचे त्यांना

अधिकार नाहीत व मतदान ठरल्यावेळीच बंद झाले पाहिजे. तथापि, मतदान बंद होण्याच्यावेळी जितके मतदार मतदान केंद्रावर उपस्थित असतील त्या सर्वांना मतदान करु दयावे.

## २३. आव्हानित मते (Challenged Votes) (प्रकरण ११ व जोडपत्र-७)

(१) एखादया मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास संबंधित प्रतिनिधीकडून रोख रु.२ इतकी अनामत रक्कम ठेवून घ्यावी. मतदाराची चौकशी केल्यानंतर सदर मतदार खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मतदारास मतदान करु दयावे. तथापि, मतदार खरा नसल्याचे निष्पन्न झाल्यास व तो बोगस असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास पोलिसांच्या स्वाधीन करावे आणि त्याबाबतची लेखी तक्रार पोलिसात दयावी. सदर तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन गुन्हेगाराविरुध्द गुन्हा शाबित होईल, यादृष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी. (पहा या पुस्तिकेचे प्रकरण ११ तसेच जोडपत्र -७)

## २४. बोटांना शाई लावणे

प्रत्येक मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीस शाई लावावी. शाई लावण्याची कार्यवाही सदर मतदाराने पुन्हा दुस-या कोणाच्या नांवावर मतदान करु नये, यासाठी करण्यात येते. एखादा मतदार त्याच्या डाव्या हाताची तर्जनी त्यावर शाई लावली आहे किंवा कसे, हे तपासण्यासाठी तपासू देण्यास तयार नसल्यास त्यास मतदान करु देण्यात येणार नाही. एखादया मतदाराच्या डाव्या हातास तर्जनी नसल्यास डाव्या हाताच्या अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी. डाव्या हातास कोणतेही बोट नसल्यास उजव्या हाताच्या तर्जनीस व तर्जनी नसल्यास अन्य कोणत्याही बोटास शाई लावावी. मतदारास दोन्ही हातास बोटे नसल्यास त्याच्या डाव्या किंवा उजव्या हाताच्या भागाच्या टोकास शाई लावण्यात यावी.

## २५. मतदार नोंदवहीत मतदाराचा अनुक्रमांक लिहिणे

कोणत्याही मतदारास मतदान करु देण्यापूर्वी मतदार नोंदवहीत त्याचा चिन्हांकित मतदार यादीतील अनुक्रमांक लिहावा व त्यासमोर त्याची स्वाक्षरी घ्यावी अथवा अंगठयाचा ठसा उमटवावा. कोणताही मतदार आपली स्वाक्षरी करण्यास अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्यास नकार देत असल्यास त्यास मतदान करु देऊ नये व तसा शेरा मतदार नोंदवहीत लिहिण्यात यावा.

**२६. मतदार चिठ्ठी देणे**

(१) मतदार नोंदवहीत मतदाराचा अनुक्रमांक लिहून त्याची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा घेतल्यानंतर मतदारास प्रकरण-चार मध्ये नमूद केल्यानुसार मतदार चिठ्ठी देण्यात यावी.

(२) त्यानंतर मतदार कंट्रोल युनिट ज्या मतदान अधिका-याकडे आहे त्यांच्याकडे अथवा मतदान केंद्राध्यक्षांच्या ताब्यात असल्यास त्यांच्याकडे जाईल व त्यास मतदार चिठ्ठी दाखवील. मतदार चिठ्ठी पाहिल्यानंतरच संबंधित अधिकारी त्यास मतदान करण्याची अनुमती देईल.

(३) हे अत्यंत महत्वाचे आहे की, त्यांना ज्या क्रमाने मतदार चिठ्ठया देण्यात येतील व त्यांची नांवे ज्या क्रमाने मतदार नोंदवहीत नोंदविण्यात येतील त्याच क्रमाने मतदारांनी आपली मते नोंदविणे आवश्यक आहे. यासाठी मतदान केंद्राध्यक्ष अथवा कंट्रोल युनिट ज्यांच्या ताब्यात आहे असा मतदान अधिकारी मतदारास मतदान कक्षाकडे जाण्याची त्याच क्रमाने परवानगी देईल. (जो क्रमांक मतदार चिठ्ठीवर लिहिलेला आहे.)

(४) काही कारणांमुळे ज्या क्रमाने मतदार नोंदवहीत नांवे नोंदविण्यात आलेली आहेत त्या क्रमाने एखादया मतदाराने आपले मत न नोंदविता वेगळया क्रमांकावर मत नोंदविल्यास सदर मतदाराने कोणत्या क्रमांकावर मतदान केले तो अनुक्रमांक मतदार नोंदवहीत सदर मतदाराच्या स्वाक्षरीसमोरील शेरा (रिमार्क) या रकान्यात लिहिण्यात यावा.

**२७. मतदाराने मत नोंदविणे**

(१) वर नमूद केल्यानुसार सर्व कार्यवाही पार पडल्यानंतर कंट्रोल युनिट ज्या अधिका-याच्या ताब्यात आहे; तो अधिकारी संबंधित मतदारास मतदान कक्षाकडे जाण्याची अनुमती देईल. त्यापूर्वी कंट्रोल युनिटमधील बॅलट हे बटन दाबल्यानंतर बॅलटिंग युनिट मत नोंदविण्यासाठी तयार होईल व कंट्रोल युनिटवरील "बिझी" असे लिहिलेला लाल दिवा पेटेल व बॅलटिंग युनिटवरील "रेडी" असे लिहिलेला हिरवा दिवा पेटेल. मतदार आपले मत आपली इच्छा असलेल्या उमेदवाराच्या समोरील बटन दाबून नोंदविल. त्याने बटन दाबताच बटणाशेजारील लाल दिवा पेटेल व बॅलटिंग

युनिटवरील हिरवा दिवा बंद होईल व त्याचवेळी च्बीपछ असा आवाज कंट्रोल युनिटमधून निघेल. काही सेकंदानंतर बीप आवाज बंद होईल व बॅलटिंग युनिट वरील उमेदवारासमोरील लाल दिवा तसेच कंट्रोल युनिटवरील बिझी असे लिहिलेला लाल दिवा हे बंद होतील. सदरचे डोळयांना दिसणारी व कानांनी ऐकू येणारी ही चिन्हे मत नोंदल्याचे निदर्शक आहेत. मतदाराने आपले मत नोंदविताच मतदान कक्षाच्या बाहेर यावे.

(२) अशारीतीने प्रत्येक वेळी नवीन मतदार आल्यानंतर हीच कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी. मतदान कक्षात एकावेळी एकच मतदार जाईल, याची दक्षता घ्यावी. तसेच कंट्रोल युनिटवरील बॅलट बटण दाबण्यापूर्वी मतदान कक्षात आधी गेलेला मतदार बाहेर आला असेल याचीही दक्षता घ्यावी.

**२८. नोंदविण्यात आलेल्या मतांचा वरचेवर ताळमेळ घालणे**

कोणत्याहीवेळी मतदान यंत्रात एकूण किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, हे पाहण्यासाठी कंट्रोल युनिटवरील टोटल हे बटण दाबावे. हे बटण दाबल्यानंतर कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनेलवर त्या क्षणापर्यंत किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, याची संख्या दिसू लागेल. मतदार नोंदवहीत नोंदविण्यात आलेली मतांची संख्या व मतदान यंत्रात नोंदविल्या गेलेल्या मतांची संख्या यांचा मेळ बसतो आहे किंवा कसे, हे पाहण्यासाठी ही प्रक्रिया वरचेवर करावी. मतदान केंद्राध्यक्षांनी साधारणपणे दर दोन तासांनी हा ताळमेळ बसतो आहे हे पहावे व त्याची नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये योग्य त्या रकान्यामध्ये घ्यावी.

**२९. मतदानाबाबत गुप्तता बाळगणे**

मतदान केंद्रातील प्रत्येक मतदार आपल्या मतदानाबाबत पूर्णपणे गुप्तता पाळील. तसेच मतदान पध्दती जशी विहित करण्यात आली आहे तिचे पालन करील. अशा कार्यपध्दतीचे पालन करण्यास कोणत्याही मतदाराने नकार दिल्यास मतदान केंद्राध्यक्षाने त्यास ताकीद दयावी व तरीही तो मतदान कार्यपध्दतीचे पालन करीत नसल्यास त्यास मतदान करु देऊ नये. अशा मतदारास मतदार

चिठ्ठी देण्यात आली असेल तर ती त्याच्याकडून परत घेऊन रद्द करण्यात यावी. जेव्हा मतदान पध्दतीचे पालन न केल्याबद्दल एखादया मतदारास मतदान करु देण्यास नकार देण्यात आला असेल त्यावेळी व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत चअभिप्रायछ या रकान्यात सबंधित मतदारासमोर तशी नोंद घेण्यात यावी व मतदान केंद्राध्यक्षांनी आपली पूर्ण सही त्या नोंदीखाली करावी. अशा परिस्थितीत अनुक्रमांकामध्ये मात्र कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

### ३०. अंध व अपंग मतदारांनी मतदान करणे

यासंदर्भात मतदान केंद्राध्यक्षांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद-१७ तसेच निवडणूक नियमामधील तरतुदींचे पालन करावे. (पहा आयोगाचे आदेश दि. २८/३/२००७ परिशिष्ट-IX आणि या पुस्तिकेतील प्रकरण ११ तसेच **जोडपत्र ६ व ८)**

### ३१. मतदाराने मतदान करण्याचे नाकारणे

एखादया मतदाराने मतदार नोंदवहीत त्याचे नांव नोंदविल्यानंतर व त्यापुढे त्याने आपली स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा उमटविल्यानंतर मतदान करावयाचे नाही, असे ठरविल्यास त्यास मतदान करण्याबाबत जबरदस्ती करण्यात येऊ नये. त्याने मतदान करावयाचे नाही, असे ठरविल्यासंदर्भात मतदार नोंदवहीतील "अभिप्राय" या रकान्यात तशी नोंद करण्यात यावी व मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा शे-यापुढे घ्यावा. तसेच यासंदर्भात मतदार नोंदवहीतील अनुक्रमांकामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही.

अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखाद्या मतदाराने ज्यासाठी निवडणूक लढविली जात आहे, त्या सर्व पदांपैकी एका पदाकरिता किंवा कोणत्याही पदासाठी मतदान केले नाही व मतदान मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर केंद्राध्यक्षांना ही गोष्ट त्यांच्याकडे असलेल्या "Control Unit" वर लाल दिवा न विझल्यामुळे लक्षात येईल व अशावेळी मतदाराने द्यावयाच्या मतापेक्षा कमी मते नोंदविली तर मतदान यंत्र पुढील मतदारासाठी तयार (Ready) होणार नाही. अशा परिस्थितीत केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देणे आवश्यक राहील व मतदारास मतदान पूर्ण करण्याबाबत, विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन उर्वरित पदांकरीता मत नोंदविले तर या बटनाचा वापर करण्याची आवश्यकता भासणार नाही. पण जर मतदारास उर्वरित

पदांपैकी एका पदासाठी किंवा दोन्ही पदांकरीता कोणालाही मतदान करावयाचे नसेल तेव्हा त्या मतदारास त्याने "END" बटन दाबण्याबाबत विनंती करण्यात यावी. जेणेकरुन त्याची मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल व केंद्राध्यक्षांकडे असलेल्या नियंत्रण युनिटवरील ("Control Unit") लाल दिवा विझून जाईल व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुढील मतदानासाठी तयार होईल. अपवादात्मक प्रकरणापैकी कधी एखादा मतदार "END" बटन दाबण्यासाठी नकार देईल तेव्हा मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्रावरील मतपत्रिकेसह सर्व भाग ("END" बटनाव्यतिरिक्त) अपारदर्शक पुठ्ठ्याने झाकावा व त्यानंतर केंद्राध्यक्षांनी केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने "END" बटन दाबावे व याबाबतची योग्य ती नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये घ्यावी.

**३२. प्रदत्त मते**

(१) जेव्हा एखादा मतदार मतदान केंद्रात आल्यानंतर त्याला असे आढळून आले की, त्याच्या नांवावर अन्य एखादया व्यक्तीने त्याच्या आधीच मतदान केले आहे, अशा वेळी मतदान केंद्राध्यक्षांनी त्याची पूर्णपणे ओळख पटविल्यानंतर त्यास प्रदत्त मतपत्रिकेद्वारे मतदान करण्याची अनुमती दयावी. मात्र, मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची अनुमती देऊ नये.

(२) प्रदत्त मतपत्रिका कशी असावी, हे यापूर्वीच नमूद करण्यात आले आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील तरतुदीनुसार अशा मतदारास प्रदत्त मतपत्रिका देण्यात यावी. प्रदत्त मतपत्रिका दिल्यानंतर मतदार मतदान कक्षात सदर मतपत्रिका घेऊन जाईल व त्यावर आपल्या इच्छेनुसार संबंधित उमेदवाराच्या चिन्हावर "X" अशी खूण संबंधित रबरी शिक्क्याचा उपयोग करुन करील.

(३) मतदान केंद्राध्यक्ष प्रदत्त मतपत्रिकेचा (१) मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या मतपत्रिका, (२) मतदारांना देण्यात आलेल्या मतपत्रिका, (३) न वापरलेल्या मतपत्रिका यांचा हिशोब नमुना व्हीएम-३ मधील अनुक्रमांक- ७, ८ नुसार ठेवील.

**३३. मतदान सुरु असताना मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्षांचा प्रवेश**

एखादे वेळी मतदान केंद्राध्यक्षास असा संशय आला की, मतदान कक्षात ठेवलेले बॅलटिंग युनिट नीट काम करीत नाही अथवा एखादा मतदार, मतदान कक्षात मतदानासाठी प्रवेश केल्यानंतर बॅलटिंग युनिटला इजा करण्याचा प्रयत्न करीत आहे अथवा आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ मतदान कक्षात थांबला आहे, अशा वेळी मतदान केंद्राध्यक्ष, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याच्या आदेशामधील तरतुदीनुसार मतदान कक्षात प्रवेश करील व आवश्यक ती पावले उचलील, जेणेकरुन बॅलटिंग युनिटला कोणताही धक्का पोहोचणार नाही व मतदान सुरळीतपणे चालू राहील. मात्र, मतदान केंद्राध्यक्ष जेंव्हा मतदान कक्षात प्रवेश करील अशा वेळी त्यांनी मतदान प्रतिनिधींना त्यांनी तशी इच्छा दर्शविल्यास आपल्या सोबत येण्याची अनुमती दयावी.

**३४. मतदान बंद करणे**

(१) मतदान बंद करण्याच्या विहित केलेल्या वेळी ते बंद करणे आवश्यक आहे. मतदान बंद करण्यासाठी नेमून दिलेल्या वेळी जितके मतदार मतदान केंद्रावर उपस्थित असतील त्या सर्वांना मतदान करण्याची संधी दयावी व त्यासाठी मतदान बंद करण्याची वेळ थोडी लांबली तरी हरकत नाही.

(२) जेव्हा मतदान केंद्रावरील शेवटच्या मतदाराने मतदान केले असेल तेंव्हा मतदान यंत्र बंद करणे आवश्यक असून, त्यामध्ये कोणतेही मत त्यापुढे नोंदविले जाणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलटिंग युनिट कंट्रोल युनिटपासून वेगळे करावे व कंट्रोल युनिटवरील "Close" हे बटण दाबावे. जेंव्हा हे "Close" बटण दाबले जाईल तेंव्हा कंट्रोल युनिट त्यामध्ये एकूण नोंदविलेल्या मतांची संख्या दर्शविल. ती संख्या नमुना व्हीएम-३ (भाग-१) मधील अनुक्रमांक-५ मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. एकदा "Close" हे बटण दाबल्यानंतर मतदान यंत्र त्यानंतर कोणतीही मते स्वीकारणार नाही, याची नोंद घ्यावी. यास्तव क्लोज हे बटण दाबताना मतदान केंद्राध्यक्ष मतदान संपण्याच्यावेळी काळजीपूर्वक पाहूनच क्लोज हे बटण दाबील.

**३५. नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशोब**

मतदान बंद झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील तरतुदीनुसार नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ मध्ये नोंदविल्या गेलेल्या

मतांचा हिशोब तयार करील व ते एका वेगळया नमुन्यात ठेवण्यात येईल. त्यावर "नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशोब" असे लिहिलेले असेल.

**३६. मतदान प्रतिनिधींना मतांच्या हिशोबाची प्रत पुरविणे**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २२ मध्ये नमूद केल्यानुसार प्रत्येक मतदान केंद्राध्यक्षांने मतदान केंद्रावर नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशोब जो व्हीएम-३ (भाग-१) या नमुन्यांत तयार केलेला असेल त्याची प्रत मतदान प्रतिनिधींना देणे आवश्यक आहे व हिशोबाची प्रत मिळाल्याची पोहोच त्यांच्याकडून घेणे आवश्यक आहे. मतदान प्रतिनिधींनी अशा हिशोबाच्या प्रतीची मागणी जरी केली नाही; तरी प्रत्येक मतदान प्रतिनिधींना त्याची प्रत देण्यात यावी.

**३७. मतदान बंद करताना करावयाची घोषणा**

मतदान बंद करताना **जोडपत्र-१३अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे मतदानाच्या शेवटी मतदान केंद्राध्यक्षाने सर्व मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रावर नोंदविलेल्या मतांच्या हिशोबाची प्रत दिल्यासंदर्भातील घोषणा करणे आवश्यक आहे.

**३८. मतदान संपल्यानंतर मतदान यंत्र सीलबंद करणे**

(१) मतदान बंद झाल्यानंतर व नोंदविलेल्या मतांचा हिशोब व्हीएम-३ भाग-१ या नमुन्यांत तयार केल्यानंतर व त्याची प्रत मतदान प्रतिनिधींना दिल्यानंतर मतदान यंत्रे मतमोजणीच्या ठिकाणी नेण्यासाठी सीलबंद करणे आवश्यक आहे.

(२) मतदान यंत्र बंद करण्यासाठी कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिट एकमेकांपासून वेगळे करावे आणि कंट्रोल युनिटमधील पॉवर हे बटण बंद करावे. बॅलटिंग युनिट आणि कंट्रोल युनिट त्यांच्या संबंधित बॅगांमध्ये ठेवण्यात यावीत व त्यानंतर सदर दोन्ही बॅगच्या हॅण्डलमधून दोरा ओवण्यासाठी ठेवलेल्या छिद्रामधून दोरा ओवून त्याची गाठ मारुन त्यावर मतदान केंद्राध्यक्षांचे सील व पत्त्याची खूणचिठ्ठी लावावी. पत्त्याच्या खूणचिठ्ठीवर मतदान केंद्राचे नांव व त्याचा क्रमांक राहील.

उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी तशी इच्छा दर्शविल्यास त्यांनाही त्यावर स्वाक्षरी करण्याची अनुमती दयावी.

(३) बॅलटिंग युनिट अथवा कंट्रोल युनिटच्या बॅगवर वरीलप्रमाणे जे सील व खूणचिठ्ठी लावली असेल व त्यावर जे उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्ष-या केल्या असतील त्यांची नांवे मतदान केंद्राध्यक्षांनी **जोडपत्र-१९** मध्ये नमूद करावीत.

## ३९. निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २४ मध्ये नमूद केल्यानुसार निवडणुकीसंदर्भातील सर्व कागदपत्रे मतदान केंद्राध्यक्षांनी सीलबंद करावीत.

## ४०. मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या ताब्यात देणे

(१) मतदान यंत्रे व सर्व निवडणूक कागदपत्रे सील बंद केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी त्यांना दिलेल्या आदेशानुसार ती पोहोचविण्याची व्यवस्था त्यासाठी नियुक्त केलेल्या अधिका-यांमार्फत करण्यात यावी.

(२) मतदान यंत्रे व अन्य निवडणूक कागदपत्रे मतमोजणीच्या ठिकाणापर्यंत अथवा ती ज्या ठिकाणी मतमोजणी पूर्ण होईपर्यंत सुरक्षितपणे ठेवली जाणार आहेत, त्या ठिकाणापर्यंत त्याची सुरक्षित वाहतूक होण्याच्या दृष्टीने खालील सूचनांचे पालन करावे.

(अ) सीलबंद केलेली मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे तसेच अन्य साहित्य थेट मतमोजणीच्या ठिकाणी नेण्यात यावीत जेणेकरुन मतदान यंत्रे फक्त एकदाच हाताळली जातील व त्यांच्या सुरक्षित वाहतुकीची दक्षता घेणे शक्य होईल.

(ब) मतदान यंत्रांची वाहतूक करताना मतदान यंत्रे हलविण्याच्यावेळी व ज्या रस्त्याने त्यांची वाहतूक करण्यात येणार आहे त्याची सूचना उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांना दयावी, जेणेकरुन मतदान यंत्रांसोबत त्यांची इच्छा असल्यास येणे शक्य होईल. तथापि, मतदान प्रतिनिधींनी आपली वाहतुकीची व्यवस्था स्वतःच करावयाची असून, कोणत्याही परिस्थितीत ज्या वाहनात मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे ठेवली असतील त्या वाहनात प्रवास करण्याची अनुमती मतदान प्रतिनिधींना अथवा उमेदवारांना देण्यात येऊ नये.

## ४१. मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे

(१) सर्व मतदान केंद्राध्यक्षांनी त्यांची मतदान केंद्रावरील मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे तसेच अन्य साहित्य वेळेवर जमा करणे आवश्यक असून, त्यासंदर्भात विलंब केल्यास त्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई त्यांच्यावर होऊ शकते.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ज्या ठिकाणी मतदान यंत्रे सुरक्षित ठेवावयाची आहेत ती जागा आधीच निश्चित केलेली असली पाहिजे व मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे ठेवताना ती शक्यतो मतदान केंद्राच्या अनुक्रमांकानुसार ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

(३) एका मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स एका ठिकाणी एकाच चौकोनात ठेवण्यात यावीत. बॅलटिंग युनिटवर कंट्रोल युनिट ठेवण्यात यावे व नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशोब आणि पेपरसीलचा हिशोब ही कागदपत्रे कंट्रोल युनिटवर ठेवण्यात यावीत.

(४) मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणी दोन रांगांमध्ये पुरेशी जागा ठेवलेली असावी, जेणेकरुन एखादे मतदान यंत्र ठेवल्यानंतर ते हलविण्याची पाळी येऊ नये.

(५) मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणाची पाहणी करण्याची निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अथवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींची इच्छा असल्यास त्यांना तशी पाहणी करु दयावी व मतदान यंत्रे ठेवलेल्या खोलीचे दरवाजे बंद केल्यानंतर त्याच्या कुलूपावर सील लावून त्यावर स्वाक्षरी करण्याची त्यांना अनुमती देण्यात यावी. या सीलवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मतदान यंत्रे ठेवली गेल्यानंतर ती खोली तात्काळ बंद करणे आवश्यक आहे व त्यानंतर मतमोजणीच्या वेळेपूर्वी कोणत्याही व्यक्तीस सदर खोलीत जाण्याची अनुमती देण्यात येऊ नये. काही अनपेक्षित न टाळता येण्याजोग्या कारणांमुळे मतदान यंत्रे ठेवलेली खोली उघडावी लागल्यास त्याची सूचना उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधींना देण्यात यावी व त्यांच्या उपस्थितीतच खोली उघडावी व खोली बंद करताना पुन्हा सीलबंद करुन त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी तसेच उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या स्वाक्ष-या कराव्यात.

(६) यापूर्वीच्या प्रकरणात नमूद केल्यानुसार मतदान यंत्रे ठेवलेली खोली किती वेळा उघडण्यात आली याची हालचाल नोंदवही ठेवण्यात यावी व खोली किती वेळा उघडण्यात आली,

## ४१. मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे

(१) सर्व मतदान केंद्राध्यक्षांनी त्यांची मतदान केंद्रावरील मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे तसेच अन्य साहित्य वेळेवर जमा करणे आवश्यक असून, त्यासंदर्भात विलंब केल्यास त्याबद्दल शिस्तभंगाची कारवाई त्यांच्यावर होऊ शकते.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी ज्या ठिकाणी मतदान यंत्रे सुरक्षित ठेवावयाची आहेत ती जागा आधीच निश्चित केलेली असली पाहिजे व मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे ठेवताना ती शक्यतो मतदान केंद्राच्या अनुक्रमांकानुसार ठेवण्याची व्यवस्था करण्यात यावी.

(३) एका मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स एका ठिकाणी एकाच चौकोनात ठेवण्यात यावीत. बॅलटिंग युनिटवर कंट्रोल युनिट ठेवण्यात यावे व नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशोब आणि पेपरसीलचा हिशोब ही कागदपत्रे कंट्रोल युनिटवर ठेवण्यात यावीत.

(४) मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणी दोन रांगांमध्ये पुरेशी जागा ठेवलेली असावी, जेणेकरुन एखादे मतदान यंत्र ठेवल्यानंतर ते हलविण्याची पाळी येऊ नये.

(५) मतदान यंत्रे ठेवलेल्या ठिकाणाची पाहणी करण्याची निवडणूक लढविणा-या उमेदवारांची अथवा त्यांच्या मतदान प्रतिनिधींची इच्छा असल्यास त्यांना तशी पाहणी करु दयावी व मतदान यंत्रे ठेवलेल्या खोलीचे दरवाजे बंद केल्यानंतर त्याच्या कुलूपावर सील लावून त्यावर स्वाक्षरी करण्याची त्यांना अनुमती देण्यात यावी. या सीलवर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. मतदान यंत्रे ठेवली गेल्यानंतर ती खोली तात्काळ बंद करणे आवश्यक आहे व त्यानंतर मतमोजणीच्या वेळेपूर्वी कोणत्याही व्यक्तीस सदर खोलीत जाण्याची अनुमती देण्यात येऊ नये. काही अनपेक्षित न टाळता येण्याजोग्या कारणांमुळे मतदान यंत्रे ठेवलेली खोली उघडावी लागल्यास त्याची सूचना उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधींना देण्यात यावी व त्यांच्या उपस्थितीतच खोली उघडावी व खोली बंद करताना पुन्हा सीलबंद करुन त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी तसेच उमेदवार अथवा त्यांच्या प्रतिनिधींनी आपल्या स्वाक्ष-या कराव्यात.

(६) यापूर्वीच्या प्रकरणात नमूद केल्यानुसार मतदान यंत्रे ठेवलेली खोली किती वेळा उघडण्यात आली याची हालचाल नोंदवही ठेवण्यात यावी व खोली किती वेळा उघडण्यात आली,

कोणत्या व्यक्तीद्वारे उघडण्यात आली, खोली उघडण्यामागची कारणे, खोली उघडण्याच्या वेळी /बंद करण्याच्यावेळी सुरक्षा रक्षकाची स्वाक्षरी इत्यादी सर्व बाबी सदर हालचाल नोंदवहीत नमूद करण्यात याव्यात.

## ४२. पितळी सील व रबरी शिक्के इत्यादी सुरक्षित ठेवणे

मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेले पितळी सील तसेच रबरी शिक्के ज्याद्वारे प्रदत्त मतपत्रिकांवर शिक्के मारता येतील इत्यादी साहित्य मतदान केंद्राध्यक्षांनी एका मोठया लिफाफ्यात ठेवावेत व त्यावर "वैधानिक नसलेले पाकिट" असे नमूद करण्यात यावे. सदर साहित्य निवडणूक निर्णय अधिका-यांनी योग्य वेळी संबंधितांच्या स्वाधीन करावे.

## ४३. मतदान स्थगित करणे

(१) एखादया मतदान केंद्रावर दंगलसदृश्य परिस्थिती अथवा उघड-उघड हिंसाचार अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा ज्या ठिकाणी मतदान शांततेत पार पाडणे शक्य नाही, अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष संबंधित मतदान केंद्रावरील मतदान स्थगित करतील व त्याची तारीख नंतर ठरविण्यात येईल. जेंव्हा असे मतदान मतदान केंद्राध्यक्षांकडून स्थगित करण्यात येईल तेव्हा त्याबाबतचा अहवाल तात्काळ निवडणूक निर्णय अधिका-यास कळविण्यात येईल.

(२) जेव्हा निवडणूक निर्णय अधिकारी स्वत: अथवा मतदान केंद्राध्यक्षांकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या आधारे असे मतदान स्थगित करतील त्यावेळी राज्य निवडणूक आयोगास त्यासंदर्भातील अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा व राज्य निवडणूक आयोग पुढील मतदानाची तारीख व वेळ निश्चित करील. निवडणूक निर्णय अधिकारी तोपर्यंत झालेल्या मतदानाची मतमोजणी करणार नाही जोपर्यंत स्थगित केलेले मतदान पार पडणार नाही.

## ४४. मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील २६ मध्ये मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. यासंदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(१) राज्य निवडणूक आयोगाकडून मतदान स्थगित करण्याबाबत राज्य निवडणूक आयोगास पाठविलेल्या अहवालानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून मतदानाची नवीन तारीख प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतच्या सूचना निवडणूक लढविणा-या उमेदवारांना अथवा त्यांच्या प्रतिनिधींना देण्यात येतील व त्यामध्ये मतदान केंद्राचे स्थळ, मतदानाची तारीख तसेच वेळ हे नमूद करण्यात येईल.

(२) स्थगित केलेल्या मतदानाच्या नवीन तारखेबाबत संबंधित क्षेत्रातील नागरिकांच्या माहितीसाठी तशी पुरेशी प्रसिध्दी वर्तमानपत्रे अथवा इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्यामार्फत देण्यात येईल.

(३) जेव्हा मतदान केंद्रावरील मतदान वर नमूद केल्यानुसार स्थगित करण्यात आलेले असेल अशावेळी स्थगित केलेले मतदान ज्या टप्प्यावर थांबविले होते त्या टप्याच्या पुढे सुरु करण्यात येईल. उदा. ज्या मतदारांनी मतदान स्थगित होईपर्यंत मतदान केलेले नव्हते त्यांनाच फक्त मतदान करण्याची अनुमती देण्यात येईल. मतदान केंद्राध्यक्षास सील केलेली पाकिटे ज्यामध्ये चिन्हांकित मतदार यादी असेल, तसेच नमुना-व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही आणि एक नवीन मतदान यंत्र पुरविण्यात येईल. मतदान सुरु करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष सील केलेली पाकिटे त्यामध्ये चिन्हांकित मतदार यादी व मतदार नोंदवही ठेवलेली आहे ती उघडील. ती पाकिटे उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांच्यासमोर उघडण्यात येतील.

(४) स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरु केल्यानंतर त्यासंदर्भात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याच्या आदेशामधील तरतुदी शक्य असेल तोवर लागू होतील.

**४५. नव्याने पुनर्मतदान घेणे**

(१) एखादया मतदान केंद्रावरील मतदान यंत्र बेकायदेशीररित्या मतदान केंद्राध्यक्ष अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या ताब्यातून पळविण्यात आले असेल अथवा ते अपघाताने नष्ट झाले अथवा हरवले; अथवा त्यास फार मोठया प्रमाणावर इजा पोहोचली की ज्यामुळे त्या मतदान

केंद्रावरील मतमोजणी शक्य होणार नाही, अशा परिस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी त्यासंदर्भातील अहवाल तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठवील.

(२) राज्य निवडणूक आयोगाकडे असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सर्व संबंधित बाबी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाकडून संबंधित केंद्रावर झालेले मतदान रद्द करण्यात येईल व नवीन पुनर्मतदानासाठी तारीख व वेळ इत्यादी निश्चित करण्यात येईल आणि त्यासंबंधी जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येईल. संबंधित जिल्हाधिकारी त्याबाबतच्या सूचना राजपत्रात प्रसिध्द करतील आणि त्याबाबतची पुरेशी प्रसिध्दी संबधित क्षेत्रातील मतदारांना देतील.

(३) राज्य निवडणूक आयोगाची अशी खात्री झाली की, एखाद्या मतदान केंद्रावर पुनर्मतदान घेतल्यामुळे निवडणूक निकालावर काही परिणाम होणार नाही; अथवा झालेली अनियमितता ही फार महत्वाची नसून त्यामुळे निकालावर काही परिणाम होणार नाही, अशा वेळी राज्य निवडणूक आयोगाकडून जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांना योग्य त्या सूचना देण्यात येतील. त्यानुसार पुनर्मतदानाची पुढील कार्यवाही पार पाडण्यात येईल.

(४) पुनर्मतदान जाहीर केल्यानंतर संबंधित मतदान केंद्रावरील सर्व मतदारांना नव्याने मतदान करण्याची अनुमती देण्यात येईल. अशा वेळी आधीच्या मतदानाच्यावेळी मतदारांच्या बोटाला लावलेली शाई दुर्लक्षित करण्यात येईल व मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीऐवजी मधल्या बोटाला शाई लावण्यात येईल.

(५) पुनर्मतदानाच्यावेळी कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिटस् नवीन वापरण्यात येतील. तसेच चिन्हांकित मतदार यादी तसेच मतदार नोंदवही इत्यादी नवीन वापरण्यात येतील.

(६) नवीन मतदान घेताना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशा मधील सर्व तरतुदी जोपर्यंत लागू करणे शक्य आहे तोवर लागू होतील.

## ४६. मतदानाबाबतचे वेळोवेळी अहवाल राज्य निवडणूक आयोगास पाठविणे

राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात दर दोन तासांची मतदानाची आकडेवारी स्त्री/पुरुष मतदारांसह राज्य निवडणूक आयोगास दूरध्वनीद्वारे तसेच फॅक्सद्वारे पाठविणे आवश्यक आहे. यासाठी आकडेवारी गोळा करण्यासंदर्भात संबंधित क्षेत्र अधिकारी (झोनल ऑफिसर) यांच्यावर

जबाबदारी सोपविण्यात यावी. त्यांनी आकडेवारी गोळा करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना पुरवावयाची आहे व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी संबंधित आकडेवारी जिल्हाधिकारी तसेच राज्य निवडणूक आयोगास कळवावयाची आहे.

ब-याच वेळा असे आढळून आले आहे की, काही निवडणूक निर्णय अधिकारी जिल्हाधिकारी यांच्याकडे आकडेवारी पाठवितात व राज्य निवडणूक आयोगाशी कोणताही संपर्क ठेवत नाहीत. यास्तव यासंदर्भात हे ध्यानात घेणे आवश्यक आहे की, जिल्हाधिकारी यांच्याकडे आकडेवारी पाठविताना ती राज्य निवडणूक आयोगासदेखील न चुकता पाठविण्याची जबाबदारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावर आहे.

# प्रकरण १९
## मतमोजणी

**१) सर्वसाधारण सूचना -**

पारंपारिक पध्दतीने मतपत्रिकेद्वारे मतदान घेतल्यानंतर त्याची मतमोजणी हा अत्यंत महत्वाचा परंतु वेळखाऊ व किचकट टप्पा आहे. प्रत्येक मतपत्रिकेची वैधता तपासून पाहण्यासाठी त्याची तपासणी बारकाईने करावी लागते. ब-याच वेळा मतपत्रिका वैध आहे की अवैध यावरील निर्णय निवडणूक निर्णय अधिकारी यांना घ्यावा लागतो व त्या संदर्भात वाद निर्माण होतात. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रामध्ये हे सर्व प्रकार नाहीसे झाले आहेत. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र प्रत्येक मतदाराने नोंदविलेल्या मतांची उमेद्वारनिहाय अद्ययावत आकडेवारी देऊ शकते. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रात नोंदविण्यात आलेली मते ही सर्व वैध मते असून, त्यामध्ये अवैध मतांची संख्या शून्य आहे. त्यामुळे मतमोजणी ही अत्यंत सोपी, सुलभ व वेगवान होण्यास मदत होते. तथापि, खाली नमूद केलेल्या परिच्छेदामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे ज्या ठिकाणी मतदान झाले आहे त्या ठिकाणी मतमोजणी करण्यासंदर्भातील प्रत्येक सूचना बारकाईने वाचून मतमोजणी संदर्भात कोणत्याही उमेद्वार अथवा त्याच्या प्रतिनिधीच्या मनात निवडणुकीच्या निकालाबाबत शंका उरणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे. या संदर्भात मतमोजणी पर्यवेक्षक व मतमोजणी सहाय्यक यांना सखोल प्रशिक्षण देवून सदर अधिकारी आपली कर्तव्ये नीट पार पाडतील याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

**१) कायदेशीर तरतुदी-**

इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशामध्ये मतमोजणी संदर्भातील तरतूद करण्यात आलेली आहे. ग्रामपंचायत निवडणुकी संदर्भात राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले टपाली मतपत्रिका आदेश २००१ अन्वये निवडणूक कर्तव्यार्थ नेमण्यात आलेले अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी टपालाने मत नोंदविण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**२) मतमोजणीची तारीख, ठिकाण व वेळ-**

(१) राज्य निवडणूक आयोगाने मतमोजणीसाठी तारीख व वार निश्चित करण्यात येतो. तथापि, मतमोजणीचे ठिकाण जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेनुसार निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निश्चित केलेले असेल. मतमोजणीची तारीख, ठिकाण व वेळ कळविणा-या सूचना सर्व संबंधितांना, निवडणूक लढविणा-या उमेद्वारांना अथवा त्यांच्या प्रतिनिधींना लेखी कळविणे आवश्यक आहे.

(२) काही न टाळता येण्याजोग्या कारणांमुळे निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणी वेळेवर सुरु करु शकले नाहीत अशा वेळी त्याबाबतचा अहवाल राज्य निवडणूक आयोगास तात्काळ पाठविणे आवश्यक आहे. तसेच मतमोजणीच्या ठिकाणात काही कारणामुळे बदल करावा लागल्यास त्याची अनुमती जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडून मिळविणे आवश्यक आहे.

(३) मतमोजणी ज्या ठिकाणी करावयाची आहे तो हॉल, निवडणूक निर्णय अधिकारी, मतमोजणीसाठी आवश्यक ते कर्मचारी व अधिकारी, उमेद्‌वार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी इ. सर्व व्यक्ति हजर राहणार असल्यामुळे गर्दी होणार नाही अशारीतीने मोठा असलेला निवडण्यात यावा.

(४) मतमोजणीच्या हॉलमध्ये उजेडाची योग्य ती व्यवस्था असावी. लाईट गेल्यास जनरेटर अथवा गॅसबत्ती यांची व्यवस्था असावी. मतमोजणीसाठी मंडप उभारण्याचे शक्यतो टाळावे. जेणेकरुन धूळ अथवा पाऊस यामुळे मतमोजणीच्या कामात अडथळा येणार नाही. मंडप उभारण्याची आत्त्यंतिक गरज भासल्यास त्याबाबतची अनुमती जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगाकडून घेण्यात यावी.

**३) मतमोजणीसाठी टेबल लावणे-**

(१) मतमोजणीसाठी लावण्यात येणारी टेबले ही रांगेत लावलेली असावीत. तसेच किती टेबले लावावयाची आहेत याबाबतचा निर्णय पुरेसा अगोदर घेण्यात यावा. कारण त्यावर किती मतमोजणी पर्यवेक्षक तसेच सहाय्यक नेमावे लागतील; त्याशिवाय किती मतमोजणी पर्यवेक्षकांना प्रवेश दयावा हेदेखील अवलंबून राहील. मतमोजणीसाठी किती टेबले लावावीत याबाबतचा निर्णय मतमोजणीचा हॉल किती मोठा आहे यावर अवलंबून राहील.

**४) मतमोजणीसाठी आवश्यक असणारे साहित्य-**

मतमोजणीसाठी खालील साहित्याची आवश्यकता राहील

(१) निळया शाईचे बॉलपेन

(२) सील तोडण्याची सुरी

(३) नमुना व्हीएम-३ मधील भाग १ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब (नमुना व्हीएम-४ मधील भाग २ या नमुन्यात मतमोजणी करुन मतमोजणी पर्यवेक्षकाने मतमोजणीचा निकाल नमूद करावयाचा आहे)

(४) किमान दोन कोरे कागद

(५) मतमोजणीनंतर काढता येणारी मेमरी ठेवण्याकरिता आवश्यक असलेला खोका व पाकीट

**५) मतमोजणी प्रतिनिधींची संख्या-**

मतमोजणीसाठी जितकी टेबले लावण्यात येणार आहेत. तितके प्रत्येक टेबलासाठी १ याप्रमाणे प्रत्येक उमेद्वारांचे प्रतिनिधी नेमता येतील. तसेच निवडणूक निर्णय अधिका-यांच्या टेबलासाठी १ प्रतिनिधी नेमता येईल.

**६) मतमोजणी प्रतिनिधींच्या नेमणुकीची पत्रे देणे-**

(१) उमेद्वारांना त्यांना मतमोजणीसाठी किती प्रतिनिधी नेमता येतील याची संख्या कळवावी. उमेद्वार आपल्या सर्व प्रतिनिधींची नेमणूक एकाच पत्राद्वारे करु शकेल.मात्र त्या सर्व मतमोजणी प्रतिनिधींनी सदर पत्रावर सहया केलेल्या असणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांनी मतमोजणी प्रतिनिधी म्हणून आपली नेमणूक स्वीकारली असल्याचे सिध्द होईल.

(२) कोणत्याही परिस्थितीत मतमोजणीच्या तारखेपूर्वी किमान ३ दिवस अगोदर मतमोजणी प्रतिनिधींची नांवे उमेद्वारांनी कळविणे आवश्यक आहे. अशा नेमणुकीसोबत उमेद्वारांनी मतमोजणी प्रतिनिधींची छायाचित्रे देखील पुरविणे आवश्यक आहे. जेणेकरुन मतमोजणी प्रतिनिधींना निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या स्वाक्षरीने ओळखपत्र किंवा प्रवेश पत्र देणे शक्य होईल.

(३) प्रत्येक मतमोजणी प्रतिनिधीस १ बॅंच देण्यात यावा. त्यावर तो कोणत्या टेबलाचा मतमोजणी प्रतिनिधी आहे, त्या टेबलाचा अनुक्रमांक लिहिलेला असावा. सदर बॅंचवर मतमोजणी प्रतिनिधीची पूर्ण सही असावी व सदर प्रतिनिधी हा ज्या टेबलासाठी नियुक्त करण्यात आलेला आहे त्या टेबलजवळ बसेल. मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये त्याला इतरत्र फिरता येणार नाही.

(४)उमेद्वार आणि त्याचा निवडणूक प्रतिनिधी मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये फिरुन मतमोजणी प्रक्रियेची पाहणी करु शकेल.

**७) मतमोजणीच्या हॉलमध्ये खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात यावा :-**

१) मतमोजणी पर्यवेक्षक आणि मतमोजणी सहाय्यक

२) राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती

३) निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त करण्यात आलेले लोकसेवक

४) उमेदवार, त्यांचे निवडणूक प्रतिनिधी आणि मतमोजणी प्रतिनिधी

निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेले लोकसेवक यामध्ये सर्वसाधारणपणे पोलिस अधिका-यांचा समावेश होत नाही. पोलिस अधिकारी गणवेषात अथवा साध्या वेषात देखील मतमोजणी हॉलमध्ये प्रवेश करणार नाहीत. तथापि, निवडणूक निर्णय अधिकारी तशीच वेळ आल्यास कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून पोलिस अधिका-यांना मतमोजणीच्या हॉलमध्ये प्रवेश देवू शकेल. मतमोजणीच्या हॉलमध्ये पोलिस अधिका-यांचा विनाकारण प्रवेश उमेद्वारांना तक्रार करण्यास वाव देवू शकतो. तसेच मतमोजणी प्रतिनिधी त्यांच्यावर दबाव आल्याची तक्रार करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**८) निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेले लोकसेवक-**

यामध्ये केंद्र व राज्य शासनाचे मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री यांचाही समावेश होत नाही. तसेच त्यांना सुरक्षा पुरवावी लागत असल्यामुळे त्यांना मतमोजणी प्रतिनिधी अथवा निवडणूक प्रतिनिधी म्हणून नेमण्यात येऊ नये.

**९) मतमोजणीच्या ठिकाणी शिस्त व सुव्यवस्था ठेवणे-**

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम करताना मतमोजणीच्या ठिकाणी सर्व कामे शिस्तबध्दरीतीने व सुव्यवस्थितपणे होतील याची दक्षता घेण्यात यावी. मतमोजणीच्या ठिकाणी धूम्रपानास अनुमती देण्यात येवू नये. तसेच मतमोजणीच्या ठिकाणी मोबाईल दूरध्वनी नेण्याची

अनुमती देण्यात येवू नये. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास मोबाईल दूरध्वनी जप्त करण्याचा अधिकारी निवडणूक निर्णय अधिका-यांना राहील.

**१०)मतमोजणीच्या ठिकाणी पत्रकार व इलेक्ट्रॉनिक मिडिया यांना प्रवेश-**

मतमोजणीच्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेल्या यादीप्रमाणे अधिस्वीकृती धारक वर्तमानपत्रांचे प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया यांच्या प्रतिनिधींना प्रवेश दयावा. त्यासाठी त्यांना ओळखपत्रे देण्यात यावीत. मात्र मतमोजणीच्या हॉलमध्ये त्यांना कुठेही फिरण्याची अनुमती देण्यात येवू नये. पत्रकार कक्षाची ज्या ठिकाणी व्यवस्था केली असेल त्या ठिकाणी त्यांना माहिती पुरविण्याची व्यवस्था करावी. अधिस्वीकृतीधारक वर्तमानपत्राचे प्रतिनिधी तसेच इलेक्ट्रॉनिक मिडिया या व्यतिरिक्त अन्य स्थानिक वर्तमानपत्राच्या प्रतिनिधींना प्रवेश देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील. मात्र मतमोजणीच्या ठिकाणी सुव्यवस्था राहावी व गोंधळ होवू नये या दृष्टीने दक्षता घेण्यात यावी.

**११) मतमोजणीची माहिती गुप्त ठेवण्याबाबतची ताकीद-**

मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी सुरु असताना मतदानाबाबतची माहिती गोपनीय ठेवणे आवश्यक असून, त्याची गोपनीयता भंग केल्यास संबंधितांवर कारवाई होऊ शकेल याची जाणीव उपस्थितांना करुन दयावी.

**१२) टपाली मतपत्रिकांची मतमोजणी-**

टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील मुद्दा क्र. १० मधील तरतुदीनुसार निवडणूक निर्णय अधिकारी प्रथमतः टपाली मतपत्रिकांची मतमोजणी करेल व त्यासाठी खाली नमूद केलेली पध्दती अनुसरेल.

(१) मतमोजणी सुरु करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेनंतर प्राप्त झालेला प्रपत्र पीबी ६ मधील कोणताही लखोटा उघडण्यात येणार नाही व त्यामध्ये असलेल्या मतपत्रिकेची मोजणी करण्यात येणार नाही.

(२) विहित कालावधीत प्राप्त झालेले टपाली मतपत्रिका असलेले लखोटे एका

पाठोपाठ एक उघडण्यात येतील व प्रत्येक लखोटा उघडल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी प्रथमतः प्रपत्र पीबी-४ मधील घोषणापत्राची तपासणी करील.

(३) वरील नमूद लखोटा उघडल्यानंतर त्यामध्ये विहित घोषणापत्र न आढळून आल्यास, अथवा त्यावर सही तसेच साक्षांकन नसल्यास, अथवा ते मोठया प्रमाणावर सदोष असल्यास, अथवा घोषणापत्रात नमूद केलेला टपाली मतपत्रिकेचा अनुक्रमांक व नमुना पीबी-५ मधील लखोटयावर नमूद केलेल्या टपाली मतपत्रिकेच्या अनुक्रमांक यामध्ये फरक असल्यास सदर लखोटा उघडण्यात येणार नाही, आणि त्यावर योग्य तो शेरा लिहून निवडणूक निर्णय अधिकारी त्यामधील मतपत्रिका रद्द करील.

(४) वरीलप्रमाणे शेरा लिहिलेले लखोटे आणि त्यासोबत प्राप्त झालेली घोषणापत्रे प्रपत्र पीबी-६ मधील लखोटयात परत ठेवण्यात येतील व प्रपत्र पीबी-६ मधील अशा त-हेचे सर्व लखोटे एका वेगळया पाकिटात मोहोरबंद करुन ठेवण्यात येतील. सदर लखोटयावर मतदार संघाचे नांव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे, त्याचा थोडक्यात तपशील लिहिण्यात येईल.

(५) प्रपत्र पीबी-५ मधील कोणताही लखोटा, उघडण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांचे मते योग्य असलेली प्रपत्र पीबी-४ मधील सर्व घोषणापत्रे एका वेगळया पाकिटात ठेवण्यात येतील व सदर पाकीट मोहोरबंद करण्यात येईल. तसेच त्यावर मतदार संघाचे नांव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व लखोटयामध्ये काय ठेवले आहे, त्याचा थोडक्यात तपशील लिहिण्यात येईल.

(६) नमूद केल्यानुसार आतापर्यंत न उघडण्यात आलेले प्रपत्र पीबी-५ मधील लखोटे एका पाठोपाठ एक उघडण्यात येतील आणि निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक टपाली मतपत्रिकेची तपासणी करील व त्यावर नोंदविलेल्या मताची वैधता ठरवील.

(७) टपाली मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल, जर -

(ए) टपाली मतपत्रिकेवर एखादी अशी खूण करण्यात आली असेल (मत नोंदविण्याच्या खुणेव्यतिरिक्त) ज्यावरुन मतदाराची ओळख पटू शकेल, अथवा

(बी) टपाली मतपत्रिकेवर मत नोंदविण्यात आले नसेल, अथवा

(सी) एकापेक्षा जास्त उमेद्‌वारांसमोर मत नोंदविण्यात आले असेल, अथवा

(डी) टपाली मतपत्रिका नकली/बनावट असेल तर, अथवा

(ई) टपाली मतपत्रिकेस इतक्या मोठया प्रमाणावर हानी पोहोचली असेल अथवा ती छिन्न-विछिन्न झाली असेल की, ज्यायोगे मतपत्रिका खरी आहे किंवा कसे, हे ओळखता येणार नाही, अथवा

(एफ) निवडणूक निर्णय अधिकारी यांनी टपाली मतपत्रिकेसोबत जो लखोटा पाठविला असेल, त्या लखोटयात ती परत करण्यात आली नसेल.

(८) टपाली मतपत्रिकेवर अशारितीने मत नोंदविले असेल की ज्यायोगे ते कोणत्या उमेद्वारास दिले आहे हे ओळखता येत नसेल तर अशी मतपत्रिका रद्द ठरविण्यात येईल.

(९) टपाली मतपत्रिकेवर नोंदविलेले मत अस्पष्ट असेल अथवा मत नोंदविण्याची खूण एकापेक्षा जास्त वेळा केली असेल व जर त्यावरुन मतदाराची कोणत्या उमेद्वारास मत देण्याची इच्छा आहे हे पुरेसे स्पष्ट होत असल्यास केवळ त्या कारणासाठी मतपत्रिका रद्द करण्यात येणार नाही.

(१०) निवडणूक निर्णय अधिकारी सर्व वैध टपाली मतपत्रिकांवरील मते कोणत्या उमेद्वारांना देण्यात आली आहेत त्याची मोजणी करील व त्यांची बेरीज संबंधित निवडणुकीसाठी विहित करण्यात आलेल्या प्रपत्रात नोंदवील व ती जाहीर करील.

(११) तद्नंतर, सर्व वैध टपाली मतपत्रिका आणि अवैध ठरलेल्या टपाली मतपत्रिकांचे वेगवेगळे गठ्ठे बांधून एका पाकिटात ठेवण्यात यावेत व ते पाकीट निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मोहरेने मोहोरबंद करण्यात यावे. उमेदवार अथवा त्यांच्या मतमोजणी प्रतिनिधींची इच्छा असेल त्यांना सहया करण्याची अनुमती देऊन सदर पाकिटावर मतदार संघाचे नांव, निवडणुकीचा तपशील, मतमोजणीची तारीख व पाकिटात काय आहे, त्याचे थोडक्यात विवरण लिहिण्यात येईल.

**१३) मतदान यंत्राद्वारे नोंदविलेल्या मतांची मतमोजणी-**

१) टपाली मतपत्रिकाची मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर तुम्ही मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट मतमोजणीसाठी लावलेल्या टेबलवर वितरित करणे आवश्यक आहे. कंट्रोल युनिट चे वाटप मतमोजणीसाठी लावलेल्या टेबलांवर करताना ते मतदान केंद्राच्या अनुक्रमांकानुसार करण्यात

यावे. म्हणजेच पहिल्या राऊंडसाठी जी कंट्रोल युनिटस घेण्यात येतील ती संबंधित प्रभागाच्या क्रमांक एकच्या मतदान केंद्रावर वापरण्यात आलेल्या कंट्रोल युनिटनुसार करण्यात यावीत. वितरित केलेल्या कंट्रोल युनिटची नोंद तुमच्या माहितीसाठी ठेवण्यात यावी.

२) मतमोजणीच्या वेळी मतदान यंत्रातील फक्त कंट्रोल युनिटचीच आवश्यकता असते, मात्र बॅलटिंग युनिटची आवश्यकता नसते. तरीसुध्दा मतदान केंद्रावर वापरण्यात आलेले बॅलटिंग युनिट देखील मतमोजणी केंद्रावर नेण्यात यावे. मात्र मतमोजणीच्या टेबलवर फक्त कंट्रोल युनिटच वितरित करण्यात यावे. बॅलटिग युनिट मतमोजणीच्या हॉलमध्ये नेणे यासाठी आवश्यक आहे की, जर एखाद्या उमेद्वार अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधींना त्याचे निरीक्षण करावयाचे असल्यास ती उपलब्ध होतील.

३) मतमोजणीच्या टेबलवर कंट्रोल युनिट सोबत संबंधित मतदान केंद्रावरील व्हीम-३ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब, हे प्रपत्र पुरविणे आवश्यक आहे.

## १४) कंट्रोल युनिटचे सील सुरक्षित आहे किंवा कसे हे पाहणे-

मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये किती मते नोंदविण्यात आली याची मोजणी सुरु करण्यापूर्वी उमेद्वार अथवा त्याचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी यांना कंट्रोल युनिट ठेवलेल्या बॅगचे सील तसेच बॅग उघडल्यानंतर व कंट्रोल युनिट बाहेर काढल्यानंतर त्यामध्ये अत्यावश्यक असलेली कागदी मोहोर इ. सुरक्षित आहेत किंवा कसे याची पाहणी व निरीक्षण करु दयावे. प्रत्येक मतदान यंत्राच्या सीलला कोणतीही इजा झालेली नाही याची तपासणी करण्यात यावी. एखादया मतदान यंत्राचे सील सुरक्षित नसून त्या यंत्रास कोणी इजा पोचविलेली आहे असे तुमच्या लक्षात आल्यास मागील प्रकरण ५ मध्ये नमूद केल्यानुसार सर्व संबंधित बाबी विचारात घेवून संबंधित मतदान केंद्रावर पुनर्मतदान घेण्याच्या दृष्टीने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आपला अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगास सादर करावा व आयोगाकडून पुढील आदेश मिळवून पुनर्मतदान घेण्याच्या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी.

## १५) कंट्रोल युनिट ठेवलेल्या बॅगेचे सील उघडणे-

(१) मतदान केंद्रावर वापरलेले कंट्रोल युनीट संबंधित बॅगमध्ये सुरक्षित ठेवलेले

असते व त्या बॅगलादेखील मोहोर लावलेली असते. मतमोजणीच्या टेबलवर सदर बॅग ठेवल्यानंतर बॅगची मोहोर सुरक्षित आहे किंवा कसे हे पहावे. काहीवेळा बॅगची मोहोर प्रवासामध्ये तुटली असल्यास बॅग उघडून कंट्रोल युनिटमधील मोहोर इ. सुरक्षित आहेत किंवा कसे पहावे.

(२) कंट्रोल युनिट बॅगमधून बाहेर काढल्यानंतर ते मतमोजणी टेबलवर निरीक्षणासाठी ठेवावे. जेणेकरुन उमेद्वार अथवा त्याचे मतमोजणी प्रतिनिधी सीलचे निरीक्षण करु शकतील.

(३) प्रत्येक कंट्रोल युनिट बॅगमधून बाहेर काढल्यानंतर त्याचा अनुक्रमांक तपासून पहावा. जेणेकरुन संबंधित मतदान केंद्रावर वापरण्यात आलेले कंट्रोल युनिट तेच आहे किंवा कसे याबद्दल तुमची खात्री होईल. त्यानंतर कंट्रोल युनिटच्या "कॅंडिडेट सेट सेक्शनचे" सील सुरक्षित आहेत का हे तपासण्यात यावे. तसेच कंट्रोल युनिटवरील रिझल्ट सेक्शनचे सील देखील सुरक्षित आहे किंवा कसे ते पहावे. जर या दोन्ही सीलला इजा झाली असेल तरी रिझल्ट सेक्शनच्या आतल्या झाकणाची कागदी मोहोर (सील) सुरक्षित असल्यास कंट्रोल युनीट सुरक्षित आहे असे समजावे व त्यास कोणतीही इजा पोचविलेली नाही असे समजावे.

**१६) कागदी मोहरेचा अनुक्रमांक तपासून पाहणे-**

(१) मतदान यंत्राला एक कागदी मोहोर लावण्यात येते. या कागदी मोहोरेवर एका बाजूला अनुक्रमांक छापलेले असतील. सदर कागदी मोहोरेचा अनुक्रमांक तुम्हाला देण्यात आलेल्या व्हीएम-३ या नमुन्यातील भाग-१ -नोंदविलेल्या मतांचा हिशेब या प्रपत्रात ज्या कागदी मोहोरांचे (पेपरसील) क्रमांक नोंदविलेले आहेत त्याच्याशी कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या झाकणाच्या कागदी मोहोरेवरील अनुक्रमांक जुळतात किंवा कसे ते पहावे. हे क्रमांक जुळतात याबद्दल उमेद्वार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जे मतमोजणी टेबलावर उपस्थित असतील त्यांची खात्री करुन देण्यात यावी.

(२) वर नमूद केल्यानुसार व्हीएम-३ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांचा हिशेब यामध्ये नमूद केलेल्या वापरलेल्या कागदी मोहोरांचा अनुक्रमांक जर कंट्रोल युनिट रिझल्ट सेक्शनला वापरलेल्या झाकणाच्या कागदी मोहोरेवरील अनुक्रमांक जुळत नसल्यास एक तर मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित प्रपत्रात कागदी मोहोरेचा अनुक्रमांक लिहिण्यात चूक केली असावी असे

सकृतदर्शनी संशय घेण्यास वाव आहे. अशा प्रकरणी संबंधित मतदान केंद्राध्यक्षांनी न वापरलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक संबंधित प्रपत्रात दिलेले असतील त्याच्याशी कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या झाकणाच्या कागदी मोहोरेवरील अनुक्रमांक जुळतात किंवा कसे ते पहावे व या संदर्भात योग्य तो निर्णय घ्यावा. या लिहिण्यामध्ये लेखनिक चूक आहे असे आढळून आल्यास ते दुर्लक्षित करावे. तसेच या संदर्भात उमेद्वार अथवा त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी यांनी काही तक्रार केल्यास त्या अनुषंगाने या संदर्भात निर्णय घ्यावा.

(३) कंट्रोल युनीटच्या "रिझल्ट सेक्शनच्या" बाहेरच्या झाकणाचे मोहर (सील) तोडून झाकण उघडावे. रिझल्ट सेक्शनच्या बाहेरचे झाकण उघडल्यानंतर तुम्हाला आतील झाकणास मतदान केंद्राध्यक्षांनी लावलेल्या मोहरेचा गुलाबी भाग दिसून येईल. ही मोहर सुरक्षित आहे का ते तपासून पहावे.

**१७) कंट्रोल युनिटला इजा पोचविलेली आढळल्यास ते बाजूला ठेवणे-**

मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटला खरोखरच कोणीतरी इजा पोचविली असावी अशी आपली खात्री झाल्यास अथवा मतदान केंद्रावर जे कंट्रोल युनीट वापरण्यात आले ते कंट्रोल युनीट मतमोजणी टेबलवर नाही याबद्दल आपली खात्री झाल्यास असे कंट्रोल युनिट बाजूला ठेवावे व त्यामध्ये नोंदविलेल्या मतांची नोंदणी करण्यात येवू नये. या संदर्भातील अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्य निवडणूक आयोगास पाठविण्यात यावा. तथापि, एखादे मतदान यंत्र अशाप्रकारे बाजूला ठेवावे लागल्यामुळे संपूर्ण मतमोजणी थांबविण्याची आवश्यकता नाही. ते यंत्र बाजूला ठेवून ऊर्वरित मतमोजणी सुरु ठेवावी.

**१८) मतदान यंत्रातील मतमोजणी-**

सर्व कागदी मोहोरा सुरक्षित असल्याची खात्री पटल्यानंतर संबंधित केंद्रावर वापरण्यात आलेले कंट्रोल युनिट तेच असून त्यास कोणतीही इजा पोहोचविण्यात आलेली नाही अशी खात्री झाल्यानंतर त्यामधील मतमोजणी सुरु करावी. त्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

(१) कंट्रोल युनीटच्या पाठीमागच्या कप्प्याचे झाकण उघडून त्यामधील पॉवर हे बटन सुरु (on) करावे. तसे केल्यानंतर कंट्रोल युनीटच्या डिस्प्ले सेक्शनवरील ऑन असे लिहिलेला हिरवा दिवा पेटेल.

(२) रिझल्ट सेक्शनच्या आतल्या झाकणाच्या रिझल्ट-I या बटनावरील कागदी मोहोर काढण्यात यावी.

(३) रिझल्ट-I हे बटन दाबावे.

(४) ग्रामपंचायत निवडणुकीत अनुसूचित जातीच्या २ जागांकरीता व सर्वसाधारण वर्गवारीच्या एका जागेकरीता निवडणूक होत असल्याचे आपण जे उदाहरण घेतले आहे त्या उदाहरणाच्या अनुषंगाने मतमोजणी कशी होईल ते आपण पाहू. यावेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावरील Result-I हे बटन दाबून निकाल पुढीलप्रमाणे दिसेल. प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते यांचा निकाल डिस्प्ले पॅनलवर खाली दर्शविल्याप्रमाणे दिसू लागेलः-

१) अनुसूचित जाती सदस्य पदाची निवडणूक लढविणारे उमेदवार - ७

२) सर्वसाधारण सदस्य पदाची निवडणूक लढविणारे उमेदवार - ५

३) मतदान केंद्रावर प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या - ६५०

| डिस्प्ले १ | डिस्प्ले २ | अर्थ |
|---|---|---|
| np | 2 | एकूण आरक्षणाच्या वर्गवारी-२ (अनुसूचित जाती व सर्वसाधारण) |
| t0 | 650 | मतदान केंद्रावर एकूण ६५० मतदारांनी मतदान केले. |
| P1 | 07-2 | अनुसूचित जाती करीता ७ उमेदवार उभे आहेत त्यातून २ उमेदवार निवडून द्यावयाचे आहे. |
| t1 | 650 | अनुसूचित जाती राखीव पदाकरीता एकूण ६५० मतदारांनी मतदान केले. |
| 01 | 100 | अनुसूचित जातीच्या पहिल्या उमेदवाराला १०० मते मिळाली |
| 02 | 225 | अनुसूचित जातीच्या दुसऱ्या उमेदवाराला २२५ मते मिळाली |
| 03 | 150 | अनुसूचित जातीच्या तिसऱ्या उमेदवाराला १५० मते मिळाली |
| 04 | 50 | अनुसूचित जातीच्या चौथ्या उमेदवाराला ५० मते मिळाली |
| 05 | 60 | अनुसूचित जातीच्या पाचव्या उमेदवाराला ६० मते मिळाली |
| 06 | 40 | अनुसूचित जातीच्या सहाव्या उमेदवाराला ४० मते मिळाली |
| 07 | 25 | अनुसूचित जातीच्या सातव्या उमेदवाराला २५ मते मिळाली |
| P2 | 05-1 | सर्वसाधारण पदाकरीता ५ उमेदवार उभे आहेत त्यातून १ उमेदवार निवडून द्यावयाचा आहे. |
| t2 | 625 | सर्वसाधारण पदाकरीता एकूण ६२५ मतदारांनी मतदान केले. |
| 01 | 250 | सर्वसाधारण पदाच्या पहिल्या उमेदवाराला २५० मते मिळाली |
| 02 | 200 | सर्वसाधारण पदाच्या दुसऱ्या उमेदवाराला २०० मते मिळाली |
| 03 | 110 | सर्वसाधारण पदाच्या तिसऱ्या उमेदवाराला ११० मते मिळाली |
| 04 | 40 | सर्वसाधारण पदाच्या चौथ्या उमेदवाराला ४० मते मिळाली |
| 05 | 25 | सर्वसाधारण पदाच्या पाचव्या उमेदवाराला २५ मते मिळाली |
| | END | |

**टीप :- १ - कंट्रोल युनिटवरील "Result-II" हे बटन सध्या वापरण्याची आवश्यकता नाही. कारण जर काढता येणा-या मेमरीवरील निकाल पहाण्याकरिता "Result-II" हे बटन वापरण्याची आवश्यकता असते. त्यामुळे दुस-या बटनाचा वापर करण्यात येवू नये.)**

**टीप :- २ - ग्रामपंचायत निवडणुकीत एका प्रभागात किमान २ व जास्तीत जास्त ३ सदस्य निवडून द्यावयाचे असल्याने एकावेळी २ किंवा ३ पदांकरीता निवडणूक होते. मात्र या पदांच्या वर्गवारी वेगवेगळ्या असतील किंवा एकाच वर्गवारीतील २ पदे किंवा ३ पदे भरावयाची असतील. अर्थात, वर घेतलेल्या उदाहरणामध्ये अनुसूचित जातीचे २ सदस्य निवडून द्यावयाचे व १ सर्वसाधारण वर्गवारीचा सदस्य निवडून द्यावयाचे असे गृहीत धरले आहे. त्यात प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय, प्रत्येक प्रभागनिहाय फरक असेल व त्याप्रमाणे मतपत्रिकांची संख्या, रंग, कँडीडेट सेटींग व निकालाचा डिस्प्ले यामध्ये फरक राहील.**

(५) नमुना व्हीएम-४, भाग-२ या नमुन्यात प्रत्येक उमेद्‌वाराचा कंट्रोल युनिटवर दिसत असलेला निकाल उमेद्‌वारनिहाय लिहून घेण्यात यावा. आवश्यकता वाटल्यास उमेद्‌वार अथवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी याची खात्री होण्यासाठी **"Result-I"** हे बटन पुन्हा एकदा दाबून लिहून घेतलेली आकडेवारी बरोबर आहे किंवा कसे याची खात्री करण्यात यावी.

(६) वरील प्रकारे निकाल लिहून घेतल्यानंतर रिझल्ट सेक्शनचे झाकण बंद करावे व कंट्रोल युनिटच्या पाठीमागील पॉवर हे बटन बंद (off) करावे.

**१९) मतमोजणीचा निकाल नमुना व्हीएम ४ मध्ये लिहीणे**

(१) कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले पॅनलवर प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते दिसतील. ती मतमोजणी पर्यवेक्षकाने नमुना व्हीएम-४, भाग-२ मध्ये लिहून घ्यावी. सदर नमुन्यात संबंधित मतदान केंद्रावर नोंदविण्यात आलेली मते व नमुना व्हीएम-३ मधील अ.क्र. ५ मध्ये नमूद केलेली मतदान यंत्रामध्ये नोंदविली गेलेल्या एकूण मतांची संख्या जुळते किंवा कसे हे पहावे व त्यात काही फरक येतो किंवा कसे हे देखील पहावे. **(राज्य निवडणूक आयोगाने EVM बाबत दिलेल्या आदेशाच्या परिच्छेद १५ मधील सूचनांनुसार बॅलट युनिटवरील "End" बटन सुरु असेल, तेथे ग्रामपंचायत सदस्य पदाच्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची संख्या अनुक्रमे t1, t2 व t3 यांच्याशी जुळेल. पहा आयोगाचे आदेश दि. १/८/२००७)** नमुना व्हीएम-४, भाग-२ मध्ये संपूर्ण माहिती भरुन झाल्यानंतर त्यावर मतमोजणी पर्यवेक्षकाने स्वाक्षऱ्या कराव्यात. तसेच त्यावर उपस्थित उमेदवार अथवा संबंधित मतमोजणी टेबल वर उपस्थित असलेल्या मतमोजणी प्रतिनिधी यांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

(२) वरीलप्रमाणे नमुना व्हीएम-४, भाग-२ भरुन झाल्यानंतर तो निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे नेवून द्यावा. निवडणूक निर्णय अधिकारी त्यावर स्वाक्षरी करुन तो साक्षांकित करतील, तसेच त्यामधील सर्व माहिती योग्यरित्या भरली आहे, याची खात्री करुन घेतील. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी साक्षांकित केलेला **नमुना व्हीएम-४, भाग-२** अंतिम मतमोजणीचा निकाल तयार करणाऱ्या अधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अंतिम मतमोजणीची स्थिती दर्शविणारे प्रपत्र सोबतच्या **जोडपत्र-२०** मध्ये दिल्यानुसार तयार करावयाचे आहे.

**२०) पुनर्मतमोजणी**

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे झालेल्या मतदानाची मतमोजणी करतांना पुनर्मतमोजणीचा प्रश्न सर्वसाधारणपणे उपस्थित होणार नाही. कारण मतदान यंत्रात मतदाराने दिलेले प्रत्येक मत नोंदविण्यात येते व ते वैध नसण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे वादाचा मुद्दा उपस्थित होत नाही. जास्तीत जास्त, एखादा उमेदवार अथवा त्याचा मतमोजणी प्रतिनिधी याने मतमोजणी सुरु असतांना एखाद्या मतदान केंद्रावरील मते जेव्हा कंट्रोल युनिट मध्ये दर्शविण्यात येतात तेव्हा ती लिहून घेतली नसल्यामुळे पुनर्मतमोजणीची मागणी होउ शकते. अशावेळी रिझल्ट बटन दाबून एखाद्या मतमोजणी केंद्रावरुन मतांची संख्या डिस्प्ले पॅनलवर पुन्हा दिसू शकेल व संबंधित व्यक्ती ते लिहून घेवू शकेल.

२) वरीलप्रमाणे वस्तुस्थिती असली तरी अंतिम निकाल संबंधित नमुन्यात भरुन तयार केल्यानंतर त्यावर स्वाक्षरी करण्यापूर्वी त्याची घोषणा करावी व १/२ मिनिटे थांबावे. त्यावेळेत उमेदवार अथवा त्याच्या अनुपस्थितीत त्याचा निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीसाठी मागणी करीत असल्यास त्याला असा लेखी अर्ज करण्यासाठी किती वेळ लागेल याची विचारणा करावी व त्याने मागीतलेला वेळ योग्य असेल तर तेवढा वेळ द्यावा व तसा अर्ज किती वाजून किती मिनिटांपर्यंत स्वीकारण्यात येईल यावर निर्णय द्यावा. पुनर्मतमोजणीच्या संदर्भात कोणताही अर्ज येणार नाही याची खात्री असेल तरच अंतिम निकाल पत्रावर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वाक्षरी करावी.

३) पुनर्मतमोजणीसाठी अर्ज प्राप्त झाल्यास पुनर्मतमोजणी घेण्यासाठी जी कारणे देण्यात आली आहेत ती विचारात घ्यावी. अशाप्रकरणी आपण संपूर्ण अर्ज नाकारु शकता किंवा

पुनर्मतमोजणीची मागणी अंशतः मान्य करु शकता. असे तुम्हाला वाटल्यास पुनर्मतमोजणीची मागणी विनाकारण करण्यात आली आहे व ती रास्त नाही तर पुनर्मतमोजणीचा अर्ज नाकारता येईल. यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी यांचा निर्णय अंतिम असेल. मात्र कोणताही निर्णय घेतला तरी त्यासंदर्भातील थोडक्यात कारणे नोंदवून तुमचा निर्णय लिहून त्याखाली स्वाक्षरी करावी.

४) काहीही असले तरी तुम्ही पुनर्मतमोजणीच्या अर्जावर ती अंशतः किंवा पूर्णपणे घेण्याच्या दृष्टीने निर्णय दिल्यास सर्व मतदान यंत्रावरील मतमोजणी विहित पध्दतीनुसार पुन्हा करण्यात यावी. टपाली मतपत्रिका देखील तुम्ही तसे ठरविल्यास पुन्हा मोजण्यात याव्यात. पुनर्मतमोजणी पूर्ण झ ाल्यानंतर **जोडपत्र-२०** मधील मतमोजणीची अंतिम स्थिती दर्शविणारे प्रपत्र तयार करण्यात यावे. मूळ निकालपत्र व पुनर्मतमोजणीनंतरचे निकालपत्र यामधे काही फरक असल्यास ते घोषित करावे व त्यानंतर अंतिम निकाल पत्रावर स्वाक्षरी करावी.

५) निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून तुमचे हे कर्तव्य आहे की, मतमोजणी अचूक करण्यात यावी. गरज भासल्यास तुमच्या पर्यवेक्षणाखालील अधिकारी / कर्मचारी यांना पुनर्मतमोजणीचे आदेश देण्याचे तुम्हाला अधिकार आहेत. मात्र उमेदवारांनी केवळ पुनर्मतमोजणीची मागणी केली म्हणजे त्यांना पुनर्मतमोजणी दिली पाहिजे असे नाही. पुनर्मतमोजणीची मागणी करण्यामागे सकृत दर्शनी काही कारण असणे आवश्यक आहे. उदा. मतमोजणी अचूक झाली नाही व न्यायाच्या दृष्टीने पुनर्मतमोजणी आवश्यक आहे अशी तुमची खात्री पटली पाहिजे.

६) एकदा पुनर्मतमोजणी झाल्यानंतर आणखी पुन्हा पुनर्मतमोजणीची मागणी कोणत्याही परिस्थितीत मान्य करता येणार नाही. तसेच अंतिम निकाल पत्र स्वाक्षरी करुन त्याबाबतची घोषणा केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुनर्मतमोजणीची मागणी मान्य करण्यात येवू नये.

**२१) मतमोजणी स्थगित करणे :-**

एकदा मतमोजणीस सुरुवात केल्यानंतर ती पूर्ण होईपर्यंत सातत्याने सुरु राहणे आवश्यक आहे. तथापि, काही अनपेक्षित कारणांमुळे तुम्हाला मतमोजणी स्थगित करावी लागली तर सर्व मतदान यंत्रे व त्यासोबतची निवडणूक कागदपत्रे सीलबंद करण्यात यावीत व उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी तशी इच्छा दर्शविल्यास सीलवर अथवा निवडणूक कागदपत्र ठेवलेल्या पाकिटावर स्वाक्षरी करण्याची अनुमती देण्यात यावी. त्यानंतर सर्व मतदान यंत्रे व

निवडणूक कागदपत्रे असलेली पाकिटे एका वेगळया खोलीत ठेवून त्या खोलीस लावलेले कुलुप सील करण्यात यावे. त्यावर निवडणूक निर्णय अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी स्वाक्षरी करावी.

**२२) मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी केंद्र ताब्यात घेण्याची घटना :-**

एखाद्या ठिकाणी मतमोजणी केंद्र ताब्यात घेण्यासारखा प्रकार घडल्यास व परिणामी त्या मतमोजणी केंद्रावरील निवडणूक निकाल जाहीर करणे अशक्य होणार असल्यास निवडणूक निर्णय अधिकारी त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी यांच्यामार्फत तात्काळ राज्य निवडणूक आयोगास पाठवतील. असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून, संबंधित परिस्थिती व जिल्हाधिकारी यांचे मत याचा विचार करुन संबंधित मतदान केंद्रावर पुन्हा निवडणूक करण्याबाबत योग्य ते आदेश पारीत करण्यात येतील.

**२३. मतमोजणीनंतर काढता येणारी मेमरी सीलबंद करणे -**

(१) यापूर्वी नमूद केल्यानुसार कंट्रोल युनिट मध्ये नोंदविलेल्या उमेदवारनिहाय मतांची आकडेवारी **व्हीएम-४, भाग-२** या नमुन्यात लिहून **जोडपत्र-२०** मधील मतमोजणीची अंतिम स्थिती दर्शविणारे प्रपत्र तसेच अंतिम निकाल **जोडपत्र-२१** मध्ये दिल्यानुसार तयार करुन निकाल घोषित केल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांनी काढता येणारी मेमरी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २९ नुसार खालीलप्रमाणे सीलबंद करावी व सीलवर स्वत: स्वाक्षरी करुन उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या अथवा त्यांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या त्यांची इच्छा असल्यास करण्याची अनुमती दयावी.

(अ) मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेली उमेदवार निहाय मते किती आहेत, याची खात्री करुन ती व्हीएम-४ या विहित नमुन्यांत नमूद करण्यात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी (Detachable Memory) सीलबंद करील व त्यावर स्वाक्षरी करुन स्वत:चा शिक्का उमटवील. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यावर सही करावयाची इच्छा असेल अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्याची इच्छा असेल त्यांना तशी परवानगी देईल. परंतु, काढता येणा-या मेमरीमधील मते पुसली जाणार नाहीत, याची दक्षता घेईल.

(आ) निवडणूक निर्णय अधिकारी वरीलप्रमाणे सीलबंद केलेल्या काढता येणाऱ्या मेमरीला त्यासाठी विशेषतः तयार केलेल्या खोक्यामध्ये ठेवील. तसेच खोक्यावर खालील तपशील नमूद करण्यात येईल:-

(क) ग्रामपंचायत व प्रभाग क्र. यांचे नाव व क्रमांक

(ख) मतदान केंद्र क्रमांक अथवा नाव जेथे ती काढता येणारी मेमरी उपयोगात आणली गेली आहे;

(ग) काढता येणाऱ्या मेमरीचा अनुक्रमांक;

(घ) मतदानाची तारीख; आणि

(ङ) मतमोजणीची तारीख.

(२) त्यानंतर कंट्रोल युनिट बंद करताना ते खाली नमूद केलेल्या पध्दतीनुसार करावीत :-

अ) कंट्रोल युनिटच्या कँडीडेट सेट सेक्शनचे सील उघडून त्यामधील बॅटरी काढून घ्यावी. बॅटरी काढल्यानंतर कँडीडेट सेट सेक्शन पुन्हा बंद करावा. बॅटरी काढणे अत्यावश्यक आहे; कारण काही कालावधी गेल्यानंतर बॅटरी खराब होउ शकते. येथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, बॅटरी जरी कंट्रोल युनिटमधून बाजूला काढली तरी कंट्रोल युनिटमध्ये नोंदविण्यात आलेली मते त्याच्या मेमरीमध्ये कायम राहतील.

ब) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनचे वरचे झाकण बंद करा.

क) बंद केलेले कंट्रोल युनिट त्याच्या बॅगमध्ये ठेवा.

ड) कंट्रोल युनिट ठेवलेली बॅग बंद करा

**२४. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीशी संबंधित कागदपत्रे यांचा ताबा:-**

(१) निवडणुकीमध्ये वापरण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी संबंधित जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहील.

(२) जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे त्यांच्या ताब्यात खालील बाबी सुरक्षितपणे ठेवतील:-

(अ) चिन्हांकित मतदार यादी असलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ मध्ये ठेवलेली मतदार नोंदवही असलेल पाकीट

(क) नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक मतदारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब ठेवलेले पाकीट

(ड) निवडणूक संदर्भातील अन्य कागदपत्र

**२५. इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे सादर करणे अथवा त्यांचे निरीक्षण:-**

(१) जिल्हाधिकारी / राज्य निवडणूक आयोग अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या ताब्यात असलेल्या खालील बाबी:-

(अ) चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यात ठेवलेल्या मतदार नोंदवही असलेले पाकीट

या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाहीत अथवा त्यांचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

(२) उपरोक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशामधील परिच्छेद २९ मधील तरतुदीनुसार सीलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्राच्या काढता येणा-या मेमरी जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याच्या ताब्यात राहतील व त्या शासकीय कोषागार किंवा उपकोषागारामध्ये ठेवण्यात येतील व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाहीत, त्याचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

(३) राज्य निवडणूक आयोग आदेश देईपर्यन्त जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या ताब्यात असलेली इलेक्ट्रॉनिक मतदार यंत्राची काढता येणारी मेमरी जशीच्या तशी ठेवली व ती अन्य कोणत्याही निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या अनुमतीशिवाय वापरता येणार नाही. जरी सील केलेली मेमरी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागामध्ये कोणतीही निवडणूक याचिका दाखल न झाल्यास ही मेमरी तीन महिन्यांच्या अवधीनंतर राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा ठिकाणी परत केल्यानंतर या मेमरीमधील माहिती नष्ट करण्यात येईल.

(४) ज्या ग्रामपंचायतीच्याबाबतीत कोणतीही निवडणूक याचिका अथवा अन्य कोणत्याही न्यायालयात रिट याचिका प्रलंबित नसल्यास अन्य निवडणूक कागदपत्रे ठेवलेली पाकिटे संबंधित नियमांतील तरतुदीनुसार नष्ट करता येतील.

**२६. मतदान यंत्रे सुरक्षित ठेवणे :-**

मतदान यंत्रे आयुक्त/ जिल्हाधिकारी /राज्य निवडणूक आयोगाने निर्देशित केलेला अधिकारी यांच्या ताब्यात राहतील व राज्य निवडणूक आयोग आदेश देईल अशा कालावधीपर्यंत सदर मतदान यंत्रे पुढील कोणत्याही निवडणुकीसाठी वापरण्यात येणार नाहीत.

२) वरील नमूद कागदपत्रे एखाद्या लोखंडी पेटीत ठेवून त्यास कुलुप लावावे व त्या कुलुपास सील लावावे. सीलवर स्वाक्षरी करावी.

**२७. कार्यवृत्त तयार करणे :-** १) काढता येणारी मेमरी सीलबंद केल्यानंतर तसेच निवडणुकीसंदर्भातील कागदपत्रे मतमोजणीच्या ठिकाणी मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर सीलबंद करुन त्यासंदर्भातील कार्यवृत्त तयार करावे. सदर कार्यवृत्तामध्ये खालील बाबींचा समावेश असावा:-

अ) निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच मतमोजणीच्या ठिकाणी उपस्थित असलेले त्यांचे प्रतिनिधी यांची यादी.

ब) निवडणुक निर्णय अधिका-यांनी वरील व्यक्तींना काढता येणारी मेमरी तसेच निवडणुकीसंबंधी कागदपत्रे ठेवलेली पाकिटे सीलबंद करतांना सीलवर स्वाक्षरी करण्याची संधी दिली होती याबाबतची नोंद

क) वरीलप्रमाणे ज्या व्यक्तींनी काढता येणा-या मेमरीच्या सीलवर तसेच निवडणूक कागदपत्रे ठेवलेल्या पाकिटांवर स्वाक्ष-या केल्या त्यांची यादी, तसेच ज्या व्यक्तींनी स्वाक्ष-या करण्यास नकार दिला त्यांचीही यादी २) वरीलप्रमाणे कार्यवृत्त तयार केल्यानंतर त्यावर निवडणूक निर्णय अधिका-याने स्वाक्षरी करावी. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी जे स्वाक्ष-या करण्यास इच्छुक असतील त्यांच्याही स्वाक्ष-या घ्याव्यात. सदर कार्यवृत्त एका पाकिटात घालून ते सीलबंद करावे व अन्य निवडणूक कागदपत्रांच्या सोबत ठेवावे.

**२८. मतदान यंत्रे व निवडणूक कागदपत्रे आयुक्त/ जिल्हाधिकारी /राज्य निवडणूक आयोग यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या सुपूर्द करणे :-**

निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर शक्यतोवर त्याच दिवशी अथवा उशिरात उशिरा दुस-या दिवशी दुपारपर्यंत मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे ठेवलेल्या लोखंडी पेट्या आयुक्त / जिल्हाधिकारी अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करणे आवश्यक असून त्यांनी सदर पेट्या जिल्हा कोषागार अथवा उप कोषागारात अथवा राज्य निवडणूक आयोग निदेश देईल त्यानुसार ठेवण्याची व्यवस्था करावी.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यासाठी सूचना पुस्तिका

**भाग-२ (परिशिष्ट व जोडपत्र)**

## ऑगस्ट, २००७

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२

**ग्रामपंचायत निवडणुकांकरिता**

# परिशिष्ट

# परिशिष्ट (Annexture)



| विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|
| १) नामनिर्देशनपत्राचा सुधारीत नमुना आदेश दि. १३/६/२००७ | १ ते ५ |
| २) आयोगाचे चिन्ह वाटपाबाबतचे आदेश (दि. २१/८/२००७) | ६ ते ७ |
| ३) गुन्हेगारी पार्श्वभुमी नसल्याचे घोषणापत्र तसेच मालमत्ता व दायित्व यांचे विवरणपत्र व घोषणापत्र (दि. १५/३/२००४ ची अधिसूचना) | ८ ते १५ |
| ४) अपत्यांच्या संख्येबाबतचे घोषणापत्र (दि. १२/७/२००१ चे परिपत्रक) | १६ ते २० |
| ५) खर्चाची नोंदवही ठेवण्याचा नमुना (आयोगाचे आदेश दि. ७/२/१९९५) | २१ ते २७ |
| ६) मतपत्रिकेचा सुधारीत नमुना. (आयोगाचे आदेश दि. १८/२/२००६) | २८ ते ३४ |
| ७) मतदाराची ओळख पटविण्याकरीता पुरेशी कागदपत्रे (आयोगाचे परिपत्रक दि.४/४/२००५) | ३५ ते ३६ |
| ८) मतदान यंत्र वापराबाबतचे आदेश दि. २८/३/२००७ | ३७ ते ५६ |

# परिशिष्ट-I

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२
दिनांक- १३ जून, २००७

**आदेश**

क्रमांक- रानिआ/ग्रापनि २००७/ प्र.क्र. १० /का.८ - ज्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के मधील तरतुदीनुसार राज्यातील पंचायतींच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे, आणि

ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये कलम १०-१अ हे नवे कलम दाखल झाले आहे व त्या कलमातील तरतुदीनुसार राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवाराने नामनिर्देशनपत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद केली आहे. आणि ज्याअर्थी, ज्या उमेदवारांकडे जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जात पडताळणी समितीकडे, जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी दिल्याची पावती / पुरावा सोबत जोडण्याबाबत व जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून ४ महिन्यांच्या कालावधीत सादर करण्याबाबत हमीपत्र देण्याची तरतुद केली आहे आणि

ज्याअर्थी, उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने नामनिर्देशनपत्राचा नमुना विहित करणे आवश्यक झाले आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम १० अ (४) अन्वये यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात यापूर्वी काढलेल्या आदेशांचे अंशतः अधिक्रमण करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र, ग्रामपंचायत निवडणुकांकरीता नामनिर्देशनपत्राचा नमुना परिशिष्ट-१ मध्ये व उमेदवाराने निवडून आल्याच्या दिनांकापासून ४ महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्याच्या हमीबाबतच्या, हमीपत्राचा नमुना परिशिष्ट-२ मध्ये विहित केल्यानुसार राहील असे आदेश देत आहे.

स्वाक्षरीत /-

नन्द लाल
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

परिशिष्ट-१

# नमुना "अ"

(नियम ८ पहा)

## नामनिर्देशन पत्र

**ग्रामपंचायतीचे नांवः------------------तालुकाः-----------------जिल्हाः-----------**

सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन--------

उमेदवारास ज्या प्रभागासाठी नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या प्रभागाचे नांव ----------------

आरक्षणाची वर्गवारी ----------------------------------------------------------------

उमेदवाराचे संपूर्ण नांव----------------------------------------------------------------

स्त्री किंवा पुरुष----------------------------------------------------------------

वय----------------------------------------------------------------

पत्ता----------------------------------------------------------------

निवडणूक लढवित असलेले आरक्षणाची वर्गवारी ----------------------------------

योग्य त्या रकान्यात (✓) अशी खूण करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | अनुसूचित जाती स्त्री | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमात |
| नागरीकांचा मागास प्रवर्ग | नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री | सर्वसाधारण | सर्वसाधारण स्त्री |

उमेदवार ज्या अनुसूचित जातीचा / अनुसूचित जमातीचा / नागरीकांच्या मागासप्रवर्गाचा

त्या अनुसूचित जातीचे / अनुसूचित जमातीचे / नागरीकांच्या मागासप्रवर्गाचे नाव ------------------

ज्या प्रभागाच्या मतदार यादीत उमेदवाराचे नाव आहे व उमेदवारास ज्या प्रभागात म करण्याचा हक्क आहे त्या प्रभागाचे नाव------------ मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक ---------

मी याव्दारे असे घोषित करतो की, निवडून आल्यास सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार

दिनांकः

-----------------------------

(उमेदवाराची सही किंवा अंगठ्याच

## भाग - २

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र क्रमांक एक

ग्रामपंचायतीचे नाव -----------प्रभाग क्र. ---------------------- निवडणूक ------------------

मी, श्री / श्रीमती -------------------------------------- याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, -

(अ) माझ्या वयाची ---------------वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मी अपात्र नाही.

(क) मी या ग्रामपंचायतीचा ठेकेदार नाही.

(ड) मी ग्रामपंचायतीच्या नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

--------------------------

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र क्रमांक दोन

(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागासप्रवर्गातील उमेदवाराने स्वत: करावयाचे प्रतिज्ञापत्र)

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात ---------------------

या *अनुसूचित जाती / अुनसूचित जमाती / नागरिकांचा मागासप्रवर्गामधील व्यक्ती आहे.

--------------------------

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

(*लागू नसेल ते खोडावे.)

टिपा:- (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरीकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन), अधिनियम २००० च्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत जोडावी. तसेच

(२) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

(३) राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या ज्या उमेदवारांजवळ जात पडताळणी समितीने दिलेले प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा व जातप्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून ४ महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

## भाग - ३

**सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन--------**

**ग्रामपंचायतीचे नांवः------------------------प्रभाग क्रमांक -------- तालुकाः----------जिल्हाः----------**
सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------------------- आरक्षणाची वर्गवारी ------------------------
उमेदवाराचे नाव --------------------------------------------------------------------------------
नामनिर्देशनपत्र अनुक्रमांक ------------------------------

हे नामनिर्देशनपत्र, *उमेदवाराने / उमेदवाराच्या लेखी प्राधिकृत प्रतिनिधी श्री / श्रीमती ----------
----------------------------------यांनी आज दिनांक-------------------रोजी ------------वाजता

माझ्याकडे माझ्या कार्यालयात समक्ष सुपूर्द केले.

दिनांक वेळ ठिकाण निवडणूक निर्णय अधिका-याची सही व शिक्का

## भाग - ४

***नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने दिलेला निर्णय***

मी, श्री. / श्रीमती ------------------------- मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम ११ व १२ नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :-
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------------

(निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही)

दिनांक :

X

## भाग - ५

(नामनिर्देशनपत्र मिळाल्याची पावती व छाननीची नोटीस)
(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)

**सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन---------**

**ग्रामपंचायतीचे नावः------------------प्रभाग क्रमांक ------- तालुकाः-----------जिल्हाः----------**
सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------------ आरक्षणाची वर्गवारी ---------------------
उमेदवाराचे नाव ------------------------------------------------------------------------
नामनिर्देशनपत्र अनुक्रमांक ------------------------------

हे नामनिर्देशनपत्र उमेदवाराने / उमेदवाराच्या लेखी प्राधिकृत प्रतिनिधी श्री. / श्रीमती ------------------
------------------------ यांनी आज दिनांक -------------------रोजी ------------वाजता माझ्याकडे माझ्या कार्यालयात समक्ष सुपूर्द केले.

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी ---------------(दिनांक) रोजी ------------(वेळ) वाजता-------------------
----------(ठिकाण) येथे करण्यात येईल.

----------------------
(निवडणूक निर्णय अधिका-यांची सही)

दिनांक :

परिशिष्ट-२

# हमीपत्र

मी, श्री./श्रीमती ---------------------------------------------------- (स्वतःचे नाव) श्री.-------------------------------------------वडीलांचे / पतीचे नाव यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय--------वर्षे, राहणार ---------------------------(पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो / करते की,

१. मी,---------------------------------------------ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग क्र.---------मधून ---------------- या राखीव जागेकरीता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२. माझ्याजवळ जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे मी जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत/पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत जोडला असून जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

३. निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल, आणि मी ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह/अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

माझेसमक्ष

निवडणूक निर्णय अधिकारी /सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

## परिशिष्ट-II

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ / ग्रापनि / २००७ / प्र.क्र. २० /का.८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२
दिनांक २१/८/२००७

***आदेश***

ज्याअर्थी; मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व त्या अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या तरतुदीनुसार ग्रामपंचायतीच्या प्रत्येक प्रभागातून कमीत कमी २ व जास्तीत जास्त ३ सदस्य निवडून दिले जातील अशी तरतूद आहे. तसेच मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम ८ च्या पोटनियम ३ च्या तरतुदीनुसार ज्यावेळी २ किंवा अधिक प्रभागात एकाचवेळी निवडणूक घेण्यात येईल तेव्हा एखाद्या व्यक्तिस अशा सर्व प्रभागातील किंवा अशा प्रभागांपैकी कोणत्याही प्रभागातील निवडणुकीसाठी उभे राहण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे.. तसेच निवडणूक नियम १६ च्या तरतुदीनुसार लढवावयाच्या प्रत्येक निवडणुकीच्याबाबतीत राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या चिन्हांपैकी कोणतेही एक चिन्ह निवडणूक अधिकारी प्रत्येक उमेदवारास नेमून देईल अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी ; ग्रामपंचायत अधिनियम तसेच निवडणूक नियम यामध्ये एकच व्यक्ती एकाच प्रभागातून आरक्षणाच्या वेगवेगळया वर्गवारीतून निवडणूक लढवू शकेल किंवा नाही याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. त्याचप्रमाणे एकाच प्रभागात एकच निवडणूक चिन्ह एकापेक्षा अधिक उमेदवारांना वाटप करण्याबाबत किंवा न करण्याबाबत कोणतीही तरतूद नाही.

आणि ज्याअर्थी ; भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के च्या व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०अ अन्वये पंचायतींच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण हे राज्य निवडणूक आयोगाकडे सोपविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०अ पोटकलम ४ अन्वये अधिनियम व नियम यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी आयोगाला न्याय्य व मुक्त निवडणूक होण्याच्यादृष्टीने या अधिनियमाच्या तरतूदीशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश काढता येतील अशी तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये एकाच व्यक्तीस एकाच प्रभागातून एकापेक्षा अधिक वर्गवारीतून निवडणूक लढविणे शक्य झाल्यास मतदारांना अशा निवडणुकीत मतदान करतांना संभ्रम निर्माण होऊ शकतो अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे. त्याचप्रमाणे एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकच निवडणूक चिन्ह वाटप केल्यास मतदारांना निवडणुकीत मतदान करतांना संभ्रम निर्माण होऊ शकतो अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे. आणि ग्रामपंचायत निवडणुका स्वच्छ, निर्भय, निपक्षपाती व मुक्त वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयोगास संविधानिक व अधिनियमाच्या तरतूदीनुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन एकाच व्यक्तीस एकाच प्रभागातून एकापेक्षा अधिक वर्गवारीतून निवडणूक लढविता येणार नाही तसेच एका प्रभागात एकापेक्षा अधिक उमेदवारांना एकच निवडणूक चिन्ह वाटप करण्यात येणार नाही असे आदेश देणे आवश्यक आहे अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी; मी राज्य निवडणूक आयुक्त, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १०अ च्या तरतुदीनुसार पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) "ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये गावातील २ किंवा अधिक प्रभागांसाठी एकाचवेळी निवडणूक घेण्यात येईल तेव्हा कोणत्याही व्यक्तीस एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वर्गवारीतून (Category) तसेच एकापेक्षा अधिक पदांकरीता निवडणूक लढविता येणार नाही."

२) "कोणत्याही प्रभागात कोणतेही एक निवडणूक चिन्ह एकापेक्षा अधिक उमेदवारांना वाटप करण्यात येणार नाही."

स्वाक्षरीत /-
( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

---

# परिशिष्ट-III

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक १५ मार्च, २००४

**आदेश**

क्रमांक-इसईसी/जीईएन/२००२/प्र.क्र.८५/कार्या-०५ .- ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के प २४३-झेडए अन्वये राज्यातील पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक एसईसी/जीईएन/२००२/सीआर-३९/डी-१०, दिनांक ३ जुलै, २००२ अन्वये प्रतिज्ञापत्र (महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समिती निवडणुकांकरिता) आणि घोषणापत्र (ग्रामपंचायती निवडणुकांकरिता) विहित करण्यात आले आहे.

३. आणि ज्याअर्थी, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसंदर्भात दाखल करावयाच्या प्रतिज्ञापत्रासंदर्भात काही सूचना व निरीक्षण विचार प्रकट केले आहेत, त्या दृष्टीकोनातून यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३ जुलै, २००२ रोजी दिलेले आदेश सुधारीत करणे आवश्यक आहे.

४. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४ (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व व-हाड २) च्या कलम ९-बी (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा.५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयागाने यासंदर्भात यापूर्वी दिलेल्या आदेशांचे अधिक्रमण करुन खालीप्रमाणे सुधारीत आदेश देत आहे :-

(१) प्रत्येक उमेदवार जिल्हा परिषदा किंवा पंचायत समित्या किंवा महानगरपालिका किंवा नगरपरिषदा किंवा नगरपंचायती यांच्या सार्वत्रिक अथवा पोट-निवडणुकीकरिता नामनिर्देशनपत्र दाखल करताना शपथपत्रात विर्निदिष्ट केलेली संपूर्ण माहिती सादर करेल; या आदेशासोबतच्या जोडपत्र-एक मध्ये विहित नमुन्यातील शपथपत्राचें प्रपत्र जोडले आहे. परंतु, ग्रामिण भागात शपथपत्र दाखल करण्याकरिता येणाऱ्या अडचणी विचारात घेता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ नुसार ग्रामपंचायत निवडणुकांकरिता निवडणूक लढविणारा उमेदवार शपथपत्राऐवजी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यासमोर घोषणापत्र दाखल करेल. या आदेशासोबत जोडपत्र-दोन मध्ये विहित नमुन्यातील प्रपत्र जोडले आहे.

(२) प्रत्येक उमेदवाराने उपरोक्त शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, लेख प्रमाणक (नोटरी पब्लिक), उच्च न्यायालयाने नेमलेले ओथ कमिशनर अथवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेला अधिकारी (यामध्ये जिल्हा दंडाधिकारी / उपविभागीय दंडाधिकारी/ तालुका दंडाधिकारी यांचा समावेश होतो) यांच्यासमोर करण्यात यावे.

(३) उमेदवाराने शपथपत्र अथवा घोषणापत्र सादर न करणे हे या आदेशाचे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल आणि निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननीच्यावेळी शपथपत्र/घोषणपत्र सादर न केल्यामुळे नाकारू शकेल.

(४) अशाप्रकारे उमेदवाराने सादर केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्रातील माहितीचा संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राची प्रत त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर चिटकवून त्याचा प्रसार करेल आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने निश्चित केल्यानुसार प्रति काढण्याकरिता येणारे शुल्क आकारून त्याच्या प्रती प्रचाराचा कालावधी संपेपर्यंत पुढे नमूद केलेल्यांना उपलब्ध करुन देण्यात येतील:-

(एक) संबंधित निवडणूक लढविणारा कोणताही उमेदवार;
(दोन) कोणताही मुद्रण/इलेक्ट्रानिक प्रसार माध्यमाचा प्रतिनिधी;
(तीन) कोणताही लोक प्रतिनिधी.

(५) कोणत्याही प्रतिस्पर्धी उमेदवाराने स्वतः केलेल्या शपथपत्राद्वारे किंवा घोषणापत्राद्वारे परस्पर विरोधी माहिती सादर केली असली तरी; ती माहिती संबंधित उमेदवाराच्या शपथपत्र किंवा घोषणात्रासोबत वर नमूद केल्यानुसारच प्रसारीत करण्यात येईल.

(६) निवडणूक निर्णय अधिकारी शपथपत्रात/घोषणापत्रात दिलेल्या माहितीची सारांशाने छाननी करून अथवा अन्य प्रकारे त्याची सत्यता पडताळून पाहणार नाही आणि त्याच्या/तिच्या मते माहिती चुकीची आढळली याच्याआधारे नामनिर्देशनपत्र नाकारणार नाही.

५. नामनिर्देशनपत्रासोबत सर्व उमेदवारांना आयोगाने याद्वारे विहित केलेल्या यथास्थिती शपथपत्र अथवा घोषणापत्राच्या प्रती देण्यात येतील याची सर्व निवडणूक निर्णय अधिकारी खात्री करतील.

६. हे आदेश दिनांक १ एप्रिल, २००४ पासून अंमलात येतील आणि राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निदेशानुसार घेण्यात येणाऱ्या निवडणूकांना लागू रहातील.

**य.ल.राजवाडे**
राज्य निवडणूक आयुक्त
महाराष्ट्र

परिशिष्ट एक

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपुढे नामनिर्देशनपत्रांसोबत उमेदवाराने द्यावयाचे शपथपत्र**

..............................महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत / जिल्हा परिषद /पंचायत समिती निवडणूक / पोट-निवडणूक, जिल्हा...............प्रभाग क्रमांक व जागा क्रमांक/मतदार गट क्रमांक /मतदार गण क्रमांक..............................नाव असल्यास.............................

मी, श्री./श्रीमती.......................................श्री..........................................यांचा मुलगा/यांची मुलगी/पत्नी, वय-वर्षे.............. राहणार.................................वरील निवडणुकीचा/निवडणुकीची उमेदवार, खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते (लागू नसलेले खोडावे.) :-

१. (अ) मला, दोषसिध्दीनंतर दोन किंवा दोन वर्षांपेक्षा जास्त कालावधीकरिता कैद झालेल्या खालील अपराधांप्रकरणी दोषी ठरविलेले असून, याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(एक) दोषी ठरविण्यात आलेल्या अपराधाच्या कायद्याचे कलम अणि गुन्ह्यांचा तपशील :

(दोन) ज्या न्यायालयाने दोषी ठरविले आहे, त्या न्यायालयाचे नाव :

(तीन) दावा क्रमांक

(चार) दोषसिध्दीचा दिनांक

(ब) मी एक किंवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता कैद झालेल्या खालील अपराधांबाबत (ज्याच्या दोषसिध्दी आणि शिक्षेमुळे मला निवडणूक लढविण्याकरिता अपात्र ठरविता येईल ते सोडून इतर अपराध) दोषी असून, याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(एक) कायद्याचे कलम अणि आरोप ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपशीलः

(दोन) ज्या न्यायालयाने दोषी ठरविले आहे, त्या न्यायालयाचे नावः

(तीन) दावा क्रमांक

(चार) दोषसिध्दीचा दिनांक

(पाच) वरील दोषसिध्दीच्या विरोधात केलेल्या अपील (ले)/ पुनरिक्षण (णे) इत्यादीबाबतचा तपशील.-

२. यासोबत मी माझी पत्नी/माझे पती व अवलंबित* यांच्या मालमत्तेचा (स्थावर, जंगम, बँकेतील जमा रक्कम इत्यादी) तपशील खाली देत आहे :-

**(अ) जंगम मालमत्तेचा तपशील**

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

| **अनुक्रमांक मालमत्तेचा तपशील** | **स्वतः नाव** | **पती/पत्नीचे नाव** | **अवलंबित-१ चे नाव** | **अवलंबित-२ चे नाव** | **अवलंबित-३ चे नाव** |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

(एक) रक्कम

(दोन) बँक वित्तीय संस्था व बँकेव्यतिरिक्त वित्तीय कंपन्यांमधील ठेवी

(तीन) कंपन्यांमधील बंधपत्रे, कर्जरोखे व भाग

(चार) इतर वित्तीय दस्तऐवज, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे, पोस्टाच्या बचती, एलआयसी पॉलिसी इत्यादी

(पाच) मोटार वाहने (बनावटीचा तपशील इत्यादी)

(सहा) जडवाहीर (वजन व मूल्य यांचा तपशील द्यावा.)

(सात) दाव्यांचे/व्याजांचे मूल्य यासारखी इतर मालमत्ता

टिप.-बंधपत्रे/कर्जरोखे/भाग यांचे मूल्य सूचीतील कंपन्यांच्या बाबतीत शेअर बाजारामधील सध्याच्या बाजारभाव मूल्यानुसार व सूचीबाह्य कंपन्यांच्या बाबतीत पुस्तकी मूल्यानुसार देण्यात यावे.

* अवलंबित म्हणजे उमेदवाराच्या मिळकतीवर सारतः अवलंबून असलेली व्यक्ती.

**(ब) स्थावर मालमत्तेचा तपशील**

(टिप.- संयुक्त मालकीच्या संपत्तीमध्ये संयुक्त मालकीचे प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. (१) | तपशील (२) | स्वत: (३) | पती/पत्नीचे नाव (वे) (४) | अंवलंबित-१चे नाव (५) | अंवलंबित-२चे नाव (६) | अंवलंबित-३चे नाव (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| (एक) | कृषि जमीन<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (दोन) | अकृषिक जमीन<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (तीन) | इमारती (व्यापारी आणि निवासी)<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (चार) | घरे/सदनिका इ.<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (पाच) | इतर (संपत्तीमधील हक्क यासारखे) | | | | | |

३. मी देय असलेल्या सार्व जनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय/निमशासकीय संस्थाकडील दायित्वे /थकीत रकमा यांचा तपशील देत आहे :-

(टिप.- प्रत्येक बाबीचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.)

| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | बँक/वित्तीय संस्था/ शासकीय/निमशासकीय संस्था इत्यादी यांचे नाव व पत्ते (३) | दिनांक ............ रोजी देय असलेली रक्कम (४) |
|---|---|---|---|
| (अ) (एक) | बँकाकडून कर्जे | | |
| (दोन) | वित्तीय संस्थांकडून कर्जे | | |
| (तीन) | शासकीय/निमशासकीय देणी (आयकर व संपत्तीकर याव्यतिरिक्त) (सार्वजनिक संस्थेत एखादे पद धारण करत असल्यास अथवा केले असल्यास त्यांच्याकडील रकमांच्या प्रकरणी ना देय प्रमाणपत्र सादर करावे) | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (ब) (एक) | अधिभारासह आयकर (जेव्हापासून आयकर रिटर्न अर्ज भरला तेव्हापासूनचे निर्धारण वर्ष नमूद करावे. तसेच पॅन क्रमांक द्यावा.) | | |
| (दोन) | संपत्तीकर (जेव्हापासून संपत्तीकर रिटर्न अर्ज भरता तेव्हापासूनचे निर्धारण वर्ष नमूद करावे.) | | |
| (तीन) | विक्रीकर (फक्त संपत्ती व्यवसायाच्या प्रकरणी) | | |
| (चार) | मालमत्ता कर | | |

४. माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:-
(शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षणाचा तपशील द्यावा.)
(शाळा / विद्यापीठांचे नाव व पाठयक्रम पूर्ण केलेले वर्षही नमूद करावे.)

## पडताळणी

मी वर नमूद केलेला अभिसाक्षी, तपासणी करुन घोषित करतो की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातला कोणताही भाग खोटा नसून, त्यापासून कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

.......................................येथे दिनांक........................माहे...................२०० रोजी तपासले.

**स्थळ:**
दिनांक :

**अभिसाक्षी**
माझ्यापुढे तपासले.
(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम शिक्का )

परिशिष्ट दोन

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांपुढे नामनिर्देशन पत्रांसोबत उमेदवाराने द्यावयाचे घोषणापत्र
## (केवळ ग्रामपंचायत निवडणुकांबाबत)

..............................ग्रामपंचायत निवडणूक / पोट-निवडणूक, तालुका..............................जिल्हा................प्रभाग क्रमांक ......................नाव असल्यास..............................

मी, श्री./श्रीमती........................................श्री..........................................यांचा मुलगा/यांची मुलगी/पत्नी, वय-वर्षे.............. राहणार..................................वरील निवडणुकीचा/निवडणुकीची उमेदवार, खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते (लागू नसलेले खोडावे.) :-

१. (अ) मला, दोषसिध्दीनंतर दोन किंवा दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता कैद झालेल्या खालील अपराधांप्रकरणी दोषी ठरविलेले असून, याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(एक) दोषी ठरविण्यात आलेल्या अपराधाच्या कायद्याचे कलम अणि गुन्ह्यांचा तपशील :

(दोन) ज्या न्यायालयाने दोषी ठरविले आहे, त्या न्यायालयाचे नाव :

(तीन) दावा क्रमांक

(चार) दोषसिध्दीचा दिनांक

(ब) मी एक किंवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता कैद झालेल्या खालील अपराधांबाबत (ज्याच्या दोषसिध्दी आणि शिक्षेमुळे मला निवडणूक लढविण्याकरिता अपात्र ठरविता येईल ते सोडून इतर अपराध) दोषी असून, याचा तपशील खालीलप्रमाणे :-

(एक) कायद्याचे कलम अणि आरोप ठेवण्यात आलेल्या गुन्ह्याचा तपशील:

(दोन) ज्या न्यायालयाने दोषी ठरविले आहे, त्या न्यायालयाचे नाव:

(तीन) दावा क्रमांक

(चार) दोषसिध्दीचा दिनांक

(पाच) वरील दोषसिध्दीच्या विरोधात केलेल्या अपील (ले)/पुनरिक्षण (णे) इत्यादीबाबतचा तपशील.-

२. यासोबत मी माझी पत्नी/माझे पती व अवलंबित* यांच्या मालमत्तेचा (स्थावर, जंगम, बँकेतील जमा रक्कम इत्यादी) तपशील खाली देत आहे :-

**(अ) जंगम मालमत्तेचा तपशील**

(संयुक्त नावावर असलेल्या मालमत्तेत संयुक्त मालकीचे प्रमाण नमूद करणे आवश्यक आहे.)

| अनुक्रमांक | वर्णन | स्वतः | पती/पत्नीचे नाव | अवलंबित-१ चे नाव | अवलंबित-२ चे नाव | अवलंबित-३इ. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| (एक) | रक्कम | | | | | |
| (दोन) | बँक वित्तीय संस्था व बँकेव्यतिरिक्त वित्तीय कंपन्यांमधील ठेवी | | | | | |
| (तीन) | कंपन्यांमधील बंधपत्रे, कर्जरोखे व भाग | | | | | |
| (चार) | इतर वित्तीय दस्तऐवज, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे. पोस्टाच्या बचती, एलआयसी पॉलिसी इत्यादी | | | | | |
| (पाच) | मोटार वाहने (बनावटीचा तपशील इत्यादी) | | | | | |
| (सहा) | जडवाहीर (वजन व मूल्य यांचा तपशील द्यावा.) | | | | | |

(सात) दाव्यांचे/व्याजांचे मूल्य यासारखी इतर मालमत्ता

टिप.-बंधपत्रे/कर्जरोखे/भाग यांचे मूल्य सूचीतील कंपन्यांच्या बाबतीत शेअर बाजारामधील सध्याच्या बाजारभाव मूल्यानुसार व सूचीबाह्य कंपन्यांच्या बाबतीत पुस्तकी मूल्यानुसार देण्यात यावे.

* अवलंबित म्हणजे उमेदवाराच्या मिळकतीवर सारत: अवलंबून असलेली व्यक्ती.

**(ब) स्थावर मालमत्तेचा तपशील**

(टिप.- संयुक्त मालकीच्या संपत्तीमध्ये संयुक्त मालकीचे प्रमाणपत्र नमूद करणे आवश्यक आहे.)

| अ.क्र. (१) | तपशील (२) | स्वत: (३) | पती/पत्नीचे नाव (वे) (४) | अंवलंबित-१चे नाव (५) | अंवलंबित-२चे नाव (६) | अंवलंबित-३ इत्यादीचे नाव (७) |
|---|---|---|---|---|---|---|
| (एक) | कृषि जमीन<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (दोन) | अकृषिक जमीन<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (तीन) | इमारती (व्यापारी आणि निवासी)<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (चार) | घरे/सदनिका इ.<br>-स्थान (ने)<br>-सर्वे/क्रमांक<br>-क्षेत्र (एकूण मोजमाप)<br>-सध्याचे बाजारभावानुसार मूल्य | | | | | |
| (पाच) | इतर (संपत्तीमधील हक्क यासारखे) | | | | | |

३. मी देय असलेल्या सार्वजनिक वित्तीय संस्था यांच्याकडील व शासकीय/निमशासकीय संस्थाकडील दायित्वे /थकीत रकमा यांचा तपशील देत आहे :-

(टिप.- प्रत्येक बाबीचा तपशील स्वतंत्रपणे द्यावा.)

| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | बँक/वित्तीय संस्था/ शासकीय/निमशासकीय संस्था इत्यादी यांचे नाव व पत्ते (३) | दिनांक ............ रोजी देय असलेली रक्कम (४) |
|---|---|---|---|
| (अ) (एक) | बँकाकडून कर्जे | | |
| (दोन) | वित्तीय संस्थांकडून कर्जे | | |

| | | | |
|---|---|---|---|
| (तीन) | शासकीय/निमशासकीय देणी (आयकर व संपत्तीकर याव्यतिरिक्त) (सार्वजनिक संस्थेत एखादे पद धारण करत असल्यास अथवा केले असल्यास त्यांच्याकडील रकमांच्या प्रकरणी ना देय प्रमाणपत्र सादर करावे) | | |
| (ब) (एक) | अधिभारासह आयकर (जेव्हापासून आयकर रिटर्न अर्ज भरला तेव्हापासूनचे निर्धारण वर्ष नमूद करावे. तसेच पॅन क्रमांक द्यावा.) | | |
| (दोन) | संपत्तीकर (जेव्हापासून संपत्तीकर रिटर्न अर्ज भरता तेव्हापासूनचे निर्धारण वर्ष नमूद करावे.) | | |
| (तीन) | विक्रीकर (फक्त संपत्ती व्यवसायाच्या प्रकरणी) | | |
| (चार) | संपत्ती कर | | |

४. माझी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे:-
(शालेय व विश्वविद्यालयीन शिक्षणाचा तपशील द्यावा.)
(शाळा / विद्यापीठांचे नाव व पाठ्यक्रम पूर्ण केलेले वर्षही नमूद करावे.)

अभिसाक्षी

## पडताळणी

मी वर नमूद केलेला अभिसाक्षी, तपासणी करुन घोषित करतो की, या शपथपत्रातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे सत्य व अचूक आहे. यातला कोणताही भाग खोटा नसून, त्यापासून कोणतीही महत्वाची वस्तुस्थिती लपविण्यात आलेली नाही.

........................................येथे दिनांक........................माहे...................२०० रोजी तपासले.

स्थळ:
दिनांक :

अभिसाक्षी
माझ्यापुढे तपासले.
(तपासणी प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी व पदनाम शिक्का )

# परिशिष्ट-IV

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तातडीचे

क्रमांक-एसईसी/जीईएन/२००१/प्र.क्र.२९/का-१०,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबईः- ४०० ०३२.
दिनांक- १२ जुलै, २००१.

प्रति,
आयुक्त,
महानगरपालिका (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

विषयः- स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढविण्यासाठी दोनपेक्षा अधिक अपत्ये असलेल्या व्यक्तींना अनर्ह ठरविण्याबाबत

महोदय,

महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायती यांच्या निवडणुका लढविण्यासाठी आवश्यक असलेल्या पात्रतेसंदर्भात शासनाने महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ तसेच मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (सुधारणा) अधिनियम, १९९५ पारित केले असून, या दोन्ही अधिनियमांना मा. राज्यपालांची संमती प्राप्त झालेली आहे. सदर दोन्ही अधिनियमांद्वारे (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८, (२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, (३) नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, (४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, (५) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८, (६) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यामधील अनर्हतेशी संबंधित कलमांमध्ये सुधारणा केल्या आहेत.

२. उपरोक्त नमूद सुधारणेद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक लढविण्यासाठी ज्या अपात्रता संबंधित अधिनियमाद्वारे यापूर्वी विहित करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये आणखी एक अपात्रता समाविष्ट करण्यात आली असून, दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या व्यक्ती यापुढे उपरोक्त नमूद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी अपात्र ठरविण्यात येणार आहेत. यासंदर्भात आणखी खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे :-

(१) अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक-१३ सप्टेंबर, २००२ रोजी हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असली तरीदेखील अशा व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरणार नाहीत. तथापि, सदर तारखेनंतर

मुलांच्या संख्येत भर पडून एकुण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अशा व्यक्ती निवडणूक लढविण्यासाठी अपात्र ठरतील. परंतु-

अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाया कालावधीत म्हणजेच दिनांक-१३ सप्टेंबर, २००० ते दिनांक- १२ सप्टेंबर, २००१ या एक वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक अपत्य किंवा एकापेक्षा अधिक अपत्ये या अधिनियमानुसार अपात्रतेच्या प्रयोजनासाठी विचारात घेतली जाणार नाहीत.

(२) दिनांक- १२ सप्टेंबर, २००१ नंतर झालेल्या मुलामुळे एकूण हयात अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास अथवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत दिनांक- १२/९/२००१ नंतर भर पडल्यास अशा व्यक्ती वरील नमूद स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यास अपात्र ठरतील.

(३) ज्यावेळी एखादया जोडप्याला अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक- १३ सप्टेंबर, २००० रोजी किंवा त्या दिनांकानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसुतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तर ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल.

(४) "मूल" यामध्ये दत्तक असलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.

३. प्रस्तुत सुधारणेमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लढविण्यासाठी एखादी व्यक्ती अपात्र ठरते किंवा कसे, याविषयी निवडणूक निर्णय अधिकारी यांना निर्णय घेणे सुलभ व्हावे, या हेतुने राज्य निवडणूक आयोगाने एक शपथपत्र विहित केले असून,त्याचा नमुना साबत जोडला आहे. कोणत्याही व्यक्तीस महानगरपालिका/नगर परिषद/ नगर पंचायत/जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती यापैकी कोणतीही निवडणूक लढवावयाची असेल त्यावेळी सादर करावयाच्या नामनिर्देशनपत्रासोबत सोबत जोडलेले शपथपत्र (Duly sworn in)

रुपये २०/- च्या स्टॅम्प पेपरवर सादर करणे बंधनकारक राहील. असे शपथपत्र प्रथमवर्ग दंडाधिकारी, ओथ कमिशनर, नोटरी पब्लिक किंवा शपथपत्र देण्यासाठी सक्षम असलेले प्राधिकारी अथवा शासकीय अधिकारी (यामध्ये उपविभागीय अधिकारी, वर्ग-१ तसेच तहसिलदार, वर्ग-१ यांचा समावेश होतो.) यांच्यापुढे करावे लागेल. ग्रामपंचायतीची निवडणूक लढविण्यासाठी मात्र शपथपत्र करण्याची आवश्यकता नसून सोबत जोडलेल्या नमुन्यातील घोषणापत्र भरुन घेणे बंधनकारक राहील.

४. राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वी राजकारणाचे गुन्हेगारीकरणाच्या संदर्भात विहित केलेले शपथपत्र व त्यासोबतचे प्रपत्र याव्यतिरिक्त वरील नमूद शपथपत्र/घोषणापत्र वेगळयाने सादर करावयाचे आहे, याची कृपया नोंद घ्यावी व

त्यानुसार निवडणुकीच्यावेळी संबंधित उमेदवारांवा याची कल्पना देण्यात यावी. निवडणुकीच्यावेळी उमेदवारांना दयावयाच्या माहिती पत्रामध्ये विषयाधीन अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या तरतुदींचीदेखील माहिती समाविष्ट करण्यात यावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

सही/-

( बी. जी. वीर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग

## शपथपत्र

मी, श्री/श्रीमती .................................................. (स्वतःचे नांव)
श्री.......................................... (वडीलांचे/पतीचे नांव) यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय .......वर्षे, राहणार- .............................. (पत्ता) खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर सांगतो/सांगते आणि घोषित करतो/करते की,

१. मी .................................... *महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती च्या निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरीत आहे.

२. माझ्या आज रोजी हयात असलेल्या अपत्यांची संख्या ........... इतकी आहे. त्यापैकी दिनांक-१३ सप्टेंबर, २००० नंतर जन्मलेल्या माझ्या अपत्यांची संख्या ...... इतकी आहे. (असल्यास, त्यांच्या जन्मतारखा नमूद कराव्यात.)

३. दिनांक- १२ सप्टेंबर, २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

अभिसाक्षी

स्थळ :

दिनांक :

माझ्यापुढे तपासले,
(तपासणी प्राधिका-याची स्वाक्षरी व शिक्का)

*लागू नसेल ते खोडावे.

# घोषणापत्र

मी, श्री/श्रीमती ........................................... (स्वतःचे नांव)

श्री................................ * (वडीलांचे/पतीचे नांव) यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय- ...... वर्षे, राहणार- ........................... (पत्ता) खालीलप्रमाणे प्रतिज्ञेवर

सांगतो/सांगते आणि घोषित करतो/करते की,

१. मी ............................................ ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी

नामनिर्देशनपत्र भरीत आहे.

२. माझ्या आज रोजी हयात असलेल्या अपत्यांची संख्या ......... इतकी आहे.

त्यापैकी दिनांक- १३ सप्टेंबर, २००० नंतर जन्मलेल्या माझ्या अपत्यांची संख्या .....

इतकी आहे. (असल्यास, त्यांच्या जन्मतारखा नमूद कराव्यात.)

३. दिनांक-१२ सप्टेंबर, २००१ नंतर माझ्या एकूण हयात मुलांच्या संख्येत भर पडून ती दोनपेक्षा जास्त झाल्यास मी उपरोक्त स्थानिक स्वराज्य संस्थेचा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

अभिसाक्षी

स्थळ :

दिनांक :

माझ्यापुढे तपासले,
(तपासणी प्राधिका-याची स्वाक्षरी व शिक्का)

*लागू नसेल ते खोडावे.

# परिशिष्ट-V(AnnexureV)

## STATE ELECTION COMMISSION

**New Administrative Building, Opp.Mantralaya, Madam Cama Road, Mumbai-400 032.**

**Dated 7th February,1995**

**CONSTITUTION OF INDIA.**

**No.SEC.१०९५/१०१/Desk.३.** -- Whereas the Superintendence, direction and control of all elections to the Panchayats and the Municipalities in the State are vested in the State Election Commission, Maharashtra in accordance with the provisions of Articles २४३-K and २४३-ZA of the Constitution of India;

And whereas as envisaged in the provisions made by the Constitution (Seventy-third) Amendment Act,१९९२ and the Constitution (Seventy-fourth) Amendment Act,१९९२ it is intended *inter alia* to ensure regular, timely and also free, fair and in efficient manner, all elections to the Panchayats and the Municipalities under the superintendence, direction and control of the State Election Commission;

And whereas the increasing role of money power in elections has a pernicious influence on society, resulting into malady which tends to reduce the process of election into a mere farce thereby placing some privileged candidates with financial resources in a distinctly advantageous position over the other candidates with meagre resoucces;

And whereas the provisions with regard to the elections to the Panchayats and the Municipalities made in the relevant State Acts under which the Panchayats and the Municipalities are constituted do not provide for any limit of expenditure to be incurred by a candidate at an election to a Panchayat or a Municipality;

And whereas it is necessary and expedient in the interest of purity of elections to a Panchayat or a Municipality and in the interest of conduct of such election in a free, fare and efficient manner, to provide for limit of expenditure to be incurred by a candidate at an election and for incidental provisions with regard to rendering of accounts of such expenditure at elections;

Now therefore, in exercise of the powers conferred by Articles २४३-K and २४३-ZA of the Constitution of India, read with sub-section (४) of section १८A of the Bombay Municipal Corporation Act (Bom.III of १८८८), sub-section (४) of section ९B of the City of Nagpur Corporation Act, १९४८ (C.P.and Berar II of १९५०), sub-section (४) of section १४ of the Bombay Provincial Municipal Corporations Act, १९४९ (Bom.LIX of १९४९), sub-section (४) of section १०A of the Maharashtra Municipal Councils, Nagar Panchayats and Industrial Townships Act,१९६५, sub-section (४) of section १०A of the Bombay Village Panchayats Act, १९५८ (Bom.III of १९५९), the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, १९६१ (Mah.v of १९६२) and of all other powers enabling me in this behalf, and in relation to holding of elections under these provisions by the State Election Commission, I, D.N.Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra, hereby direct as follows :-

१. The limit of expenditure that may be incurred by a contesting candidate (either by himself or by his authorised election agent or any particular Party/Aghadi/Front or any other association, body or individual) in connection with the election to any of the Panchayats or the Municipalities shall --

(a) in the case of an election as a Councillor to a Municipal Corporation, be Rs.४०,०००;

(b) in the case of an election as a Councillor to a Municipal Council, be Rs.३०,०००
(c) in the case of an election as a Councillor to a Zilla Parishad, be Rs.३०,०००
(d) in the case of election as a member of a Panchayat Samiti, be Rs.२०,०००; and
(e) in the case of election as a member of a Village Panchayat, be Rs.५,०००

२. The contesting candidate shall maintain accounts of expenditure and submit the details of expenditure which may generally be on the items of expenditure specified in the proforma in Annexure I, and the account of such expenditure shall be submitted in detail in that Annexure as directed in paragraph ७ herein.

३. The contesting candidate for an election as a Councillor to a Municipal Corporation, Municipal Council, or Zilla Parishad or a member to a Panchayat Samiti shall maintain day-to-day account of expenditure in the proforma in Annexure II and submit the same to the Returning Officer concerned on the following day by २.०० p.m.

४. The contesting candidate shall, either by himself or by his authorised election agent, keep separate and correct accounts of all expenditure in connection with the election between the date he has been nominated and the date of declaration of results, both dates inclusive. The total of such expenditure shall not exceed the limit laid down hereinabove.

५. No particular Party/Aghadi/Front or any other association, body or individual shall put up any cut-outs, hoardings, wall paintings or any other paintings on any property, buntings, arches, gates, banners, flags, advertisement in newspapers, etc. without the general or special authority in writing of the candidate whose election is sought to be promoted or procured by such legitimate expenditure incurred by the contesting candidate. No contesting candidate or any individual on his behalf shall put up any cutout, hoardings, paintings etc. on any property whatsoever without prior permission of the owner or the government or the local body concerned, as the case may be.

६. The failure to submit day-to-day account, as required under paragraph ३ above, by the candidate shall be viewed seriously and treated as a major default on the part of such candidate. Further as a consequence of that default, the result of election of such candidates shall not be declared till such time as details of day-to-day expenditure upto the date of poll is submitted to the returning officer concerned and the expenditure is found to be within the limit of expenditure permissible in the case of such a candidate at such election.

७. The statement of accounts maintained in Annexure-I by the contesting candidate shall be submitted by him within thirty days of the declaration of the result, in the case of a contesting candidate as councillor or Municipal Corporation, to the Municipal Commissioner concerned and the Municipal Commissioner or an officer not below the rank of Deputy Municipal Commissioner authorised by the Municipal Commissioner in this behalf, shall give an acknowledgement for receipt of the statement. In any other case, such statement of accounts shall be submitted by the contesting candidate, within the period aforesaid, to the Collector of a District concerned and the Collector or an officer not below the

rank of Deputy Collector authorised by the Collector in this behalf shall give acknowledgement for receipt of the statement.

८. The contesting candidate shall, while submitting the accounts, furnish together with the account, the following details of expenditure, if any incurred in respect thereof --

(a) size of the advertisement released in the Newspaper and the amount paid for each such advertisement and the name and date of such newspaper.

(b) Details of hoardings put up by them and of the writing on the walls, etc. and expenditure incurred on such items.

(c) Number of vehicles used by them and details of such vehicles and the expenditure incurred in respect thereof including expenditure incurred on petrol, etc.

९. A voucher shall be obtained for every item of expenditure, unless from the nature of the case, such as postage, travel by rail and the like, it is not practicable to obtain a voucher.

१०. The statement of account of expenditure in Annexure I, submitted by the contesting candidate shall be accompanied by an affidavit on oath sworn in by him in the format in Annexure-III. The affidavit shall *inter-alia* recite specifically that the expenditure against each item has been completely and unexceptionally included in the statement of accounts in Annexure-I and that no expenditure whatsoever has remained to be disclosed.

११. Any violation by the contesting candidate or his authorised agent or particular Party/Aghadi/Front or any association, body or individual to incur expenditure in excess of the limit mentioned above or failure to submit the accounts as indicated herein-above will be viewed seriously by the State Election Commission and stringent action as may be available under the relevant law including action to institute criminal prosecution shall be taken against the defaulter.

१२. On receipt of the Statement of accounts in Annexure I, the Municipal Commissioner/the Collector shall satisfy that the statement reflects the correct account of all expenses and before recording that the statement of accounts is in accordance with the directions herein above he may, if found expedient, conduct such enquiry as he deem necessary. On being so satisfied, the Municipal Commissioner/the Collector shall certify to the Commission that the statement of account submitted by the contesting candidate is accepted as correct and complete in all respects.

१३. The contesting candidate shall, on demand by the Municipal Commissioner or the Collector or an Officer authorised by them under paragraph ७, make available for inspection the accounts and vouchers etc. so maintained by him.

## भाग एक

## निवडणूकविषयक खर्चाचे संक्षिप्त विवरण

| अ. क्र. | खर्चाची बाब | परिणाम / संख्या | खर्च करणाऱ्या किंवा त्याला अधिकृत मंजुरी देणाऱ्या व्यक्तीचे / राजकीय पक्षाचे / संस्थेचे / संघाचे नाव | खर्चाची रक्कम | प्रदानाचा / प्रदानांचे दिनांक | प्रदानांची पध्दती | लेख्या सोबत जोडलेला प्रदानांचा पुरावा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १) | नामनिर्देशन पत्रावरील खर्च | | | | | | | |
| २) | प्रतिभूती ठेवीवरील खर्च | | | | | | | |
| ३) | मतदार याद्यांच्या प्रती खरेदी करण्यावरील खर्च | | | | | | | |
| ४) | प्रचार मोहिमांसाठी कार्यालये भाड्याने घेण्यावरील खर्च | | | | | | | |
| ५) | जाहीरनाम्यांच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ६) | व्यक्तिगत माहिती पत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ७) | भित्तीपत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ८) | हस्तपत्रकाच्या मुद्रणावरील खर्च | | | | | | | |
| ९) | भित्तीपत्रके चिकटवण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १०) | हस्तपत्रकांचे वितरण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| ११) | जाहीराती प्रसिध्द करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १२) | सार्वजनिक सभांचा प्रचार करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १३) | भिंतींवर लिखाण करण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १४) | सार्वजनिक सभांसाठी मंडप वगैरे गोष्टी भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५) | सार्वजनिक सभांसाठी जागा भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १६) | सार्वजनिक सभांसाठी ध्वनिक्षेपक भाड्याने घेण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १७) | सार्वजनिक सभांमध्ये छायाचित्र काढण्यासाठी बोलाविलेल्या छायाचित्रकारांचा भाडे खर्च | | | | | | | |
| १८) | व्हिडिओ कॅसेट काढण्यासाठी व दाखविण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| १९) | ध्वनिमुद्रित कॅसेट काढण्यासाठी व ऐकण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| २०) | विशेष मान्यवर व्यक्तींच्या भेटी | | | | | | | |
| २१) | दारे व कमानी उभारण्यासाठी झालेला खर्च | | | | | | | |
| २२) | उमेदवाराने वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २३) | निवडणूक प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २४) | मतदान प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २५) | मतमोजणी प्रतिनिधींनी वापरलेल्या वाहनांचा भाडे खर्च आणि पेट्रोल व वंगण यावर झालेला खर्च | | | | | | | |
| २६) | निवडणूक प्रतिनिधींना दिलेले परिश्रमिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २७) | मतदान प्रतिनिधींना दिलेले परिश्रमिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८) | मतमोजणी प्रतिनिधींना दिलेले परिश्रमिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| २९) | घरोघरी जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलेला परिश्रमिक / दिलेल्या अल्पोपहारावरील खर्च | | | | | | | |
| ३०) | पक्षाच्या मुख्यालयामध्ये जाण्यासाठी केलेल्या प्रवासावरील खर्च | | | | | | | |
| ३१) | संकीर्ण खर्च (वर यादीमध्ये नमूद केलेल्या बाबींच्या व्यतिरिक्त) | | | | | | | |

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची स्वाक्षरी

टीप - १) वर उल्लेखिलेल्या बाबी सर्व समाविष्ट नाहीत, त्यामुळे क्र. १ ते ३० बाबींव्यतिरिक्त करण्यात आलेला खर्च बाब क्र. ३१ या सर्वसाधारण खर्चाचे अंतर्गत तपशीलवार देण्यात यावा.

२) या प्रपत्रासोबत विहित नमुन्यातील शपथपत्र जोडणे आवश्यक आहे. शपथपत्राशिवाय असलेले खर्चाचे विवरणपत्र, पूर्ण विवरणपत्र म्हणून स्वीकारण्यात येणार नाही.

३) हिशेब निवडणूक प्रतिनिधीने दाखल केला असेल तर, त्यावर उमेदवाराने प्रतिस्वाक्षरी करावी व निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या हिशेबाची सत्यप्रत आहे असे प्रमाणित करावे.

४) टपालखर्च, रेल्वे प्रवास अशा प्रकारची प्रमाणके सादर करणे व्यवहार्य नाही. अशी प्रमाणके वगळता इतर सर्व खर्चाच्या बाबींची प्रमाणके सादर करणे आवश्यक आहे.

## परिशिष्ट-VI

ग्रामपंचायत निवडणूकांसंबंधी
मतपत्रिकाबाबत आदेश

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
क्रमांक -रानिआ/ग्रापनि २००५/प्र.क्र.२६/का.८
दिनांक - १८/२/२००६

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के अन्वये राज्यातील ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि त्याअंतर्गत मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या तरतुदीनुसार प्रत्येक ग्रामपंचायत ही प्रभागात विभागण्यात येईल आणि प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाची सदस्य संख्या ही राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे असेल, अशी तरतुद आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत (सदस्य संख्या, प्रभागात विभाजन आणि जागांचे आरक्षण) नियम, १९६६ च्या नियम ३ च्या तरतुदीनुसार प्रत्येक प्रभागातून निवडून द्यावयाची सदस्य संख्या ३ पेक्षा जास्त व २ पेक्षा कमी असणार नाही, अशी तरतूद आहे.

आणि, ज्याअर्थी मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या नियम १७ मधील मुंबई ग्रामपंचायत निवडणूक (सुधारणा) नियम २००६ अन्वये करण्यात आलेल्या सुधारणांअन्वये **मतपत्रिका राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या नमुन्यात छापलेली असली पाहिजे,** अशी तरतुद झालेली आहे.

आणि, त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम १०-अ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या नियम १७ अन्वये राज्य निवडणूक आयोगाला असलेल्या अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायतीच्या निवडणूका स्वच्छ व नि:पक्षपातीपणे पार पाडण्याकरीता राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**१)** हे आदेश मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ अंतर्गत स्थापन झालेल्या व अस्तित्वात असलेल्या सर्व ग्रामपंचायत निवडणूकांच्या संदर्भात लागू असतील.

**२)** मतपत्रिकांचा नमुना या आदेशाच्या अनुसूची-१ मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे राहिल.

# निवडणूक खर्च सादर करण्यासंबंधीचा नमुना

उमेदवाराचे नाव ---------------------------------

ज्याच्यातर्फे उमेदवार निवडणूक लढवित असेल त्या राजकीय पक्ष / आघाडी

फ्रंट यांचे नाव------------

निवडणूक लढवित असलेला प्रभाग --------------------

निवडणूक जाहीर झाल्याचा दिनांक--------------

## दैनंदिन खर्च

| खर्चाचा दिनांक | खर्चाचे स्वरुप | खर्चाची रक्कम | | प्रदानाची तारीख | आदात्याचे नाव व पत्ता | दिलेल्या रकमेच्या बाबतीत प्रमाणकाचा अनुक्रमांक | अदत्त रकमेच्या बाबतीत देयकाचा अनुक्रमांक | अदत्त रक्कम ज्या व्यक्तीस देय आहे त्या व्यक्तीचे नाव व पत्ता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दिलेली | अदत्त | | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| | | | | | | | | | |

प्रमाणित करण्यात येत आहे की, मी / माझ्या निवडणूक प्रतिनिधीने ठेवलेल्या लेख्याची ही सत्यप्रत आहे.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराची स्वाक्षरी

**३) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी :-** मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ नुसार निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द झाल्यानंतर व नामनिर्देशनपत्रे प्राप्त होवून छाननी, नामनिर्देशनपत्रे मागे घेणे व चिन्ह वाटप इत्यादी कार्यवाही झाल्यानंतर अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची प्रभागनिहाय व आरक्षणनिहाय यादी प्रसिध्द करण्यात येईल. सदर यादी **उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रांत नमूद केलेल्या त्यांच्या नावांची मराठी वर्णमालिकेतील वर्णानुक्रमे केलेली यादी** असेल व त्याच क्रमाने उमेदवारांची नांवे मतपत्रिके वर छापण्यात येतील.

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रात नमूद केलेल्या नावानुसार त्यांची नांवे अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीत तसेच मतपत्रिकेवर मराठी वर्णमालेच्या वर्णानुक्रमानुसार नमूद करावयाची आहेत. उमेदवारास मतपत्रिकेवर त्याचे नाव ज्या पध्दतीने, अर्थात उपनाव किंवा उपाधी इत्यादीसह मतपत्रिकेवर यावे असे वाटत असेल, तसे त्यांनी नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी व वेळेपूर्वी निवडणूक निर्णय अधिकारी यांना लेखी कळवावे. मात्र उमेदवारांनी दिलेली उपाधी, उपनाव इत्यादीचा नावांचा वर्णानुक्रम लावताना विचार करता येणार नाही. अर्थात उमेदवारांचे नामनिर्देशनपत्रावरील नावानुसार सर्व उमेदवारांचा वर्णानुक्रम लावल्यानंतर मतपत्रिकेवर नाव छापताना त्याची उपाधी आवश्यकतेनुसार लावण्यात येईल.

**४) मतपत्रिकाः-** प्रत्येक प्रभागातील २ किंवा ३ जेवढया जागा निवडून द्यावयाच्या असतील, त्यानुसार त्या प्रभागात आरक्षणाच्या वर्गवारीप्रमाणे वेगवेगळया रंगाची मतपत्रिका छापण्यात येईल. {उदा. (१) जर एखादया प्रभागात तीन जागा भरावयाच्या असतील आणि त्यापैकी एक जागा अनुसूचित जातीसाठी , एक जागा अनुसूचित जमातीसाठी व एक जागा नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी आरक्षित असेल तर त्या प्रभागासाठी तीन वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका असणे आवश्यक आहे. उदा. (२) जर तीन जागांपैकी दोन जागा सर्वसाधारण ( खुल्या ) वर्गासाठी असतील व एक जागा अनुसूचित जमातीसाठी असेल तर दोन सर्वसाधारण जागांसाठी एक समाईक मतपत्रिका व अनुसूचित जमातीसाठी एक वेगळी मतपत्रिका अशा दोन निरनिराळया रंगाच्या मतपत्रिका असतील. उदा. (३) तीन जागांपैकी दोन जागा अनुसूचित जाती व एक जागा अनुसूचित जाती स्त्रिसाठी आरक्षित असेल तर अनुसूचित जातीच्या दोन जागांसाठी एका रंगाची समाईक मतपत्रिका व अनुसूचित जाती स्त्रीसाठी एक त्याच रंगाची वेगळी मतपत्रिका असेल.}

**५) मतपत्रिकांचे रंगः-** वरीलप्रमाणे कार्यवाही करण्याकरीता प्रत्येक प्रभागातील आरक्षणानुसार वेगवेगळया रंगाच्या मतपत्रिका तयार करण्यात येतील. याकरीता प्रत्येक वर्गवारीनुसार मतपत्रिकांचा रंग खालील प्रमाणे राहिल.

**(अ) अनुसूचीत जातीच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका गुलाबी रंग**

**(ब) अनुसूचीत जमातीच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका हिरवा रंग**

**(क) नागरिकांच्या मागास प्रवर्गाच्या जागेसाठी मतपत्रिका - फिका पिवळा रंग**

**(ड) सर्वसाधारण जागेसाठी मतपत्रिका - पांढरा रंग**

अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती मधील **स्त्री राखीव** व नागरिकांचा मागास प्रवर्ग मधील **स्त्री राखीव** जागेकरीता तसेच सर्वसाधारण **स्त्री राखीव** जागेकरीता त्या त्या वर्गाकरीता निश्चित केलेल्या रंगाची मतपत्रिका राहिल.

मात्र अशावेळी **"स्त्री राखीव"** असे ठळक अक्षरात प्रतिपत्रावर आणि मतपत्रिकेवर निश्चित केलेल्या जागी छापलेले असेल.

६ ) मतपत्रिकांच्या वरील रंगाना पूर्व प्रसिध्दी देण्यात यावी, जेणेकरुन प्रत्येक वर्गवारीकरीता मतपत्रिकेचा रंग कोणता आहे त्याची माहिती उमेदवारांना, मतदारांना / जनतेला होईल.

७) **स्थळप्रत/प्रतिपत्र/(counterfoil):-** मतपत्रिकेला संलग्न प्रतिपत्र/ स्थळप्रत ( counterfoil ) असेल. सदर प्रतिपत्र (counterfoil) मतपत्रिकेच्या वरच्या बाजूस असेल आणि तिची उंची ( length ) ५ से.मी. पेक्षा अधिक असणार नाही.

मतपत्रिकेची व काऊंटर फॉईलची रुंदी १० से.मी. पेक्षा अधिक असणार नाही. काऊंटर फॉईल वर खालील बाबी असतील.

अ) सर्वात वरच्या बाजूस मतपत्रिका सर्व एकत्रित ठेवण्यासाठी मध्यभागी स्टेपल करण्यासाठी / टाचण्यासाठी जागा असेल.

ब) काऊंटर फॉईलच्या सर्वात वर १ से.मी. जाडीची काळया रंगाची किनार राहिल.

क) काऊंटर फॉईल वर (ब) च्या लगतखालच्या बाजूला ग्रामपंचायतीचे नाव, प्रभाग क्रमांक, तालुका, जिल्हा व सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक हा तपशिल व वर्ष तसेच आरक्षणाची वर्गवारी असे नमूद केलेले असेल. स्त्री राखीव आरक्षणाचे बाबतीत "स्त्री राखीव" असे नमूद केलेले असेल.

ड) मतदारांच्या यादीतील मतदाराचा अनुक्रमांक डाव्या बाजूस तसेच मतदाराची सही / अंगठयाचा ठसा याकरीता उजव्या बाजूस पुरेशी जागा काऊंटर फॉईल वर असेल. मतपत्रिकेचा अनुक्रमांक काऊंटर फॉईल वर डाव्या बाजूस खालच्या कोपऱ्यात नमूद केला जाईल.

ई) मतपत्रिका काऊंटर फॉईल पासून वेगळी करण्याकरीता १ से.मी. रुंदीची तुटकतुटक रेषांची पट्टी/ब्लॉक, काऊंटर फॉईल च्या सर्वात तळाशी असेल, त्यामध्ये छिद्रांकीत पट्टी वेजक / परफोरेटेड रुल (perforated rule) समाविष्ट असेल.

८) **मतपत्रिकेचा आकार:-** अ) मतपत्रिकेच्या सर्वात वर १ से.मी. जाडीची काळया रंगाची ठळक पट्टी/किनार असेल.

ब) मतपत्रिकेवर पहिल्या छायायुक्त/रेषांकीत भागात ग्रामपंचायतीचे नाव, तालुका, जिल्हा व प्रभाग क्रमांक आणि सार्वत्रिक किंवा पोट निवडणूक इत्यादी तपशिल वर्षासह नमूद केलेले असेल. तसेच आरक्षणाची वर्गवारी नमूद केलेली असेल. डाव्या बाजूस मतपत्रिकेचा अनुक्रमांक नमूद केलेला असेल. स्त्री राखीव आरक्षणाचे बाबतीत "स्त्री राखीव" असे नमूद केलेले असेल.

क) उमेदवारांची नावे मराठी वर्णमालिकेनुसार क्रमाने व नेमून दिलेले चिन्ह/ निशाणीसह छापली जातील. प्रत्येक उमेदवाराकरीता २.५ से.मी. इतक्या लांबीची जागा / चौकट प्रत्येक उमेदवाराच्या नावाकरीता व निशाणी करीता राहिल. त्यामध्ये डाव्या बाजूस उमेदवाराचे नाव व उजव्या बाजूस नेमून दिलेले चिन्ह / निशाणी दर्शविलेली असेल. दोन उमेदवारांच्या चौकटीमध्ये १ से.मी. जाडीची छायांकीत पट्टी /भाग असेल.

ड) **एका मतपत्रिकेत ९ पेक्षा अधिक उमेदवार दर्शविले जाणार नाहीत** व कोणत्याही परिस्थितीत ज्यावेळी एक रकानी (सिंगल कॉलम) मतपत्रिका असेल, त्यावेळी मतपत्रिकेची प्रती- पत्रासह लांबी ४५ से.मी. पेक्षा अधिक असणार नाही.

ई) मतपत्रिकेच्या शेवटी १ से.मी. जाडीची काळया रंगाची ठळक पट्टी /किनार असेल.

**९) ९ पेक्षा अधिक उमेदवार असल्यास आवश्यक मतपत्रिका:-** ज्यावेळी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या ९ पेक्षा अधिक असेल, त्यावेळी मतपत्रिका २ किंवा अधिक रकान्यात तयार केली जाईल. मात्र असे दोन रकाने (कॉलम) वेगवेगळे दर्शविण्याकरीता त्यामध्ये २.५ से.मी. रुंदीचें छायायुक्त क्षेत्र वर पासून खालपर्यन्त राहिल. तसेच अनुक्रमांक १० च्या उमेदवाराचे नांव दुसऱ्या रकान्यात पहिल्या स्थानावर असेल आणि यथावकाश त्यानुसार सर्व उमेदवारांची नांवे दर्शविली जातील. ज्यावेळी उमेदवारांची संख्या ९ च्या पटीत नसेल, त्यावेळी शेवटच्या रकान्यात मोकळी जागा राहिल्यास ती जागा संपूर्णपणे छायांकीत केली जाईल.

**१०) मतपत्रिका वाटपाबाबत:-** मतपत्रिकेच्या मागील बाजूस व प्रतिपत्राच्या मागच्या बाजूस "विभेदक चिन्ह" (Distinguishing Mark), ज्यामध्ये प्रभाग क्रमांक व मतदान केंद्र क्रमांक दर्शविलेला असेल, ते रबरस्टँपने उमटविले जाईल. तसेच मतपत्रिका मतदारास देण्यापूर्वी केंद्राध्यक्ष मतपत्रिकेच्या मागील बाजूस व प्रतिपत्राच्या मागील बाजूस विभेदक चिन्हाजवळ पूर्ण स्वाक्षरी करील. मतदारास मतपत्रिका देण्यापूर्वी मतदान अधिकारी प्रतिपत्रावर (counterfoil) मतदाराची स्वाक्षरी/अंगठयाचा ठसा घेईल. प्रत्येक प्रभागातून जितके वेगवेगळे वर्गवारीचे सदस्य निवडून द्यावयाचे आहेत, तितक्या मतपत्रिका मतदान अधिकाऱ्याकडून प्रत्येक मतदारास देण्यात येतील. याकरीता नेमून दिलेला मतदान अधिकारी

मतदाराला अशा मतपत्रिका स्वतंत्रपणे अर्थात एका मतपत्रिकेनंतर दुसरी व त्यानंतर तिसरी अशाप्रकारे देईल व सर्व मतपत्रिका मतदाराने मत नोंदविल्यानंतर मतपेटीत टाकल्याची खात्री करेल.

ज्या प्रभागात एकाच वर्गवारीचे दोन किंवा तीन सदस्य निवडून द्यावयाचे असतील, त्यावेळी अशा सर्व उमेदवारांची नांवे एकाच मतपत्रिकेवर छापली असल्याने, अशा वेळी एकच मतपत्रिका देण्यात येईल. उदा. अनुसूचित जातीचा एक व सर्वसाधारण प्रवर्गातील दोन सदस्य ज्यावेळी एका प्रभागातून निवडून द्यावयाचे असतील, त्यावेळी अनुसूचित जातीच्या उमेदवारांची नांवे असलेली एक मतपत्रिका व सर्वसाधारण वर्गवारीतील दोन जागांकरीता सर्वसाधारण वर्गवारीतील सर्व उमेदवारांची नांवे असलेली एक मतपत्रिका मतदारास देण्यात येईल. मतदारांना अनुसूचित जातीच्या मतपत्रिकेवर एका उमेदवारास एक मत व सर्वसाधारण वर्गवारीच्या मतपत्रिकेवर कोणत्याही दोन उमेदवारांस प्रत्येकी एक याप्रमाणे दोन मते द्यावयाची आहेत.

मतदार मत नोंदविण्याकरीता मतदान केंद्रावर पुरविलेल्या बाणफुली शिक्क्याचाच (Arrow cross mark) वापर करील.

**११) मतमोजणीबाबत:-** ज्यावेळी एका मतपत्रिकेवर एकच मत द्यावयाचे असेल, त्यावेळी एकाहून अधिक मते दिली असल्यास, ती मतपत्रिका अवैध/बाद ठरेल. मात्र ज्यावेळी एका मतपत्रिकेवर एकाहून अधिक उमेदवारांना निवडून देण्याकरीता एकाहून अधिक अर्थात २ किंवा ३ मते द्यावयाची असतील अशा वेळी यथास्थिती २ किंवा ३ मते दिलेली मतपत्रिका देखील वैध ठरेल. मात्र, त्याहून अधिक मते दिलेली मतपत्रिका अवैध ठरेल. अशा मतपत्रिकांची मतमोजणी करताना, अशा सर्व उमेदवारांना प्रत्येकी मिळालेल्या मतांचा तक्ता तयार करण्यात येवून, दोन उमेदवारांना निवडून द्यावयाचे असल्यास सर्वाधिक मते मिळालेले उमेदवार व त्या खालोखाल मत मिळालेले उमेदवार असे दोन उमेदवार निवडण्यात येतील.

या आदेशामध्ये विशिष्ट तरतुद करण्यात आलेली नसल्यास त्या विषयाबाबत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम, १९५९ च्या तरतुदी लागू राहतील. हे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकानंतर मतदान होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणूकीपासून लागू राहतील.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र

# परिशिष्ट-VI

## नमुना मतपत्रिका

अनुसूची - २ (भाग २)

मतपत्रिकेचा नमुना

अ ब क — चिन्ह

क ख ग — चिन्ह

च छ ज — चिन्ह

अनुसूची - १ (भाग २)

स्त्री राखीव मतपत्रिकेचा नमुना

ग्रामपंचायत -------------- तालुका -------------- जिल्हा ----------

प्रभाग क्र. -----------  आरक्षणाची कोणती --------------------

सार्वत्रिक/पोट-निवडणूक २००-

मतदाराचा अनुक्रमांक ---------- स्त्री राखीव

क्रमांक ००००१ मतदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा

अ ब क चिन्ह

प्रमाणक ००००१ ग्रा.प. ---- ता. ---- जिल्हा ---- प्रभाग ---- आरक्षणाची कोणती ---- स्त्री राखीव

क ख ग चिन्ह

च छ ज चिन्ह

(नन्द लाल)
आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,
महाराष्ट्र.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

## परिशिष्ट-VII

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान
करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार
ओळखपत्र अथवा अन्य पुरावा सादर करण्याबाबत...

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा/२००५/प्र.क्र. १२/का-५,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- ४ एप्रिल, २००५.

**प रि प त्र क**

राज्य निवडणूक आयोगाकडील आदेश क्रमांक-एसईसी/एमसी/२००१/प्र.क्र.३८/का-१०, दिनांक ०८/१०/२००१ अन्वये संदर्भाधीन आदेशाद्वारे राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायती यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र (Electoral Identity Card)सादर करणे सक्तीचे केले आहे. त्यानुसार या सर्व निवडणुकांमध्ये मतदारांना मतदान करताना भारत निवडणूक आयोगाकडील ओळखपत्र सादर करणे आवश्यक आहे. ज्या मतदारांना असे ओळखपत्र प्राप्त झालेले नाही अथवा अन्य कारणांमुळे ओळखपत्र दाखवू शकत नाही त्यांनी आपली ओळख पटविण्यासाठी खालीलपैकी कोणतेही कागदपत्र मतदान केंद्र अधिकारी अथवा ओळख पटविण्यासाठी नियुक्त केलेल्या मतदान अधिका-यांना दाखवून आपली ओळख पटविल्यास त्यांना मतदान करु दयावे.

१) पासपोर्ट,
२) वाहन चालविण्याचा परवाना,
३) आयकर विभागाकडील पॅन ओळखपत्र,
४) केंद्र शासन /राज्य शासन / सार्वजनिक उपक्रम / स्थानिक स्वराज्य संस्था / खाजगी कंपन्या अथवा कारखाने यांनी आपल्या कर्मचा-यांना दिलेली ओळखपत्रे,
५) बँकेचे/किसान/पोस्टाचे पासबुक,
६) आयोगाने ज्या दिवशी निवडणुकीचा कार्यक्रम निर्गमित केला असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशीपर्यंत देण्यात आलेली शिधापत्रिका,
७) सक्षम प्राधिका-याने अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागासवर्ग/विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग इत्यादींना दिलेले जातीचे प्रमाणपत्र,
८) विद्यार्थ्यांचे ओळखपत्र,
९) मालमत्ता बाबतची कागदपत्रे तसेच नोंदणी खत इत्यादी,

१०) शस्त्रास्त्र परवाना,

११) परिवहन प्राधिकरणाने दिलेला वाहक परवाना (Conductor Licences)

१२) निवृत्त कर्मचा-यांचे पेन्शन पासबुक/पेन्शन पेमेंट ऑर्डर,

१३) निवृत्त कर्मचा-यांच्या विधवा/अवलंबिता प्रमाणपत्र

१४) आयोगाने ज्या दिवशी निवडणुकीचा कार्यक्रम निर्गमित केला असेल त्या दिवसाच्या आदल्या दिवशीपर्यंत दिलेले रेल्वे पासचे ओळखपत्र,

१५) अपंगत्वाचा दाखला,

१६) स्वातंत्र्यसैनिकाचे ओळखपत्र,

१७) मतदान केंद्राध्यक्षास मतदाराची ओळख समाधानकारकरित्या पटेल असे अन्य कोणतेही कागदपत्र

२. भारत निवडणूक आयोगाकडील मतदार ओळखपत्र किंवा वरील नमूद ओळखपत्रांपैकी कोणतेही एक कागदपत्र पाहून ओळख पटल्याशिवाय मतदारास मतदान करु देऊ नये.

३. त्याबाबत मतदानाचे दिवसापूर्वी प्रसिध्दी दयावी.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

स्वाक्षरीत/-

**(महेन्द्र ब.वारभुवन)**

**सहायक आयुक्त,**

**राज्य निवडणूक आयोग**

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त

सर्व महानगरपालिका आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

## परिशिष्ट-VIII

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक - २८ मार्च, २००७.**

**ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे आदेश- २००७**
**ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे आदेश**

**भारताचे संविधान**

क्रमांक -रानिआ-२००७/प्र.क्र.३/का-८, - ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के मधील तरतुदीनुसार पंचायतीच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम **३ (कक-१) (i.e.Sec.3(aa-1)) व ११(३ ) (i.e.Sec.11 (3a))** याद्वारे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची तरतूद मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाद्वारे करण्यात आलेली आहे, तथापि, त्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबत नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत आणि अशी सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणे अत्यावश्यक झाले आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १०अ(४) अन्वये यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ -** (१) या आदेशास **"ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करुन मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देण्याबाबतचे आदेश"** असे नाव राहील.

(२) या आदेशाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील आणि सदर आदेश राज्यातील सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी लागू राहतील.

(३) सदर आदेश **शासकीय राजपत्रात** छापल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या आणि अर्थाविष्कार :-** या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर.-

(१) "इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र" म्हणजे ग्रामपंचायतीच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी मतपेटी व मतपत्रिका याऐवजी मत नोंदविण्यासाठी वापरले जाईल असे कोणतेही मशिन किंवा यंत्र जे इलेक्ट्रॉनिक अथवा अन्य पध्दतीने चालविले जाईल.

(२) "मतदार संघ" म्हणजे ग्रामपंचायत प्रभागनिहाय मतदार संघ

(३) "निवडणूक" म्हणजे हे आदेश लागू होणारी ग्रामपंचायत निवडणूक होय. यामध्ये पोटनिवडणूकीचा समावेश होतो.

(४) "टपाली मतपत्रिका आदेश-२००१" म्हणजे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दिनांक- १६ जानेवारी, २००१ चे आदेश.

३. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची रचना** :- प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास (यापुढे मतदान यंत्र असा उल्लेख केलेले) एक कंट्रोल युनिट आणि एक किंवा अनेक बॅलटिंग युनिट असतील ज्याची रचना राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.

४. **मतपत्रिका आणि निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान यंत्राची तयारी करणे** :- (१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रत्येक बॅलटिंग युनिटवर राज्य निवडणूक आयोग विहित करील तो तपशील राज्य निवडणूक आयोगाने ठरविलेल्या भाषेमध्ये अथवा भाषांमध्ये असेल.

**ग्रामपंचायत निवडणुकांबाबत मतपत्रिका आयोगाचे आदेश दि. १८ फेब्रुवारी, २००६ नुसार निश्चित करण्यात आली आहे. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासोबत सदर मतपत्रिका वापरतांना त्यात काही बदल आवश्यक आहेत. त्यानुसार सदर आदेशाच्या अनुक्रमांक ७, ८, व ९ मध्ये दिलेल्या सूचनांऐवजी पुढे नमूद केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करावी.**

(२) ग्रामपंचायत निवडणुकांकरीता आयोगाचे आदेश दिनांक १८ फेब्रुवारी, २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रत्येक प्रभागातील आरक्षणाच्या वेगवेगळ्या वर्गवारीनुसार त्या आदेशात नमूद केलेल्या रंगांच्या मतपत्रिका असतील. तसेच स्त्री राखीव उमेदवारांकरीता त्यांच्या आरक्षणाच्या वर्गवारीनुसार मतपत्रिका असेल. मात्र त्यावर **"स्त्री राखीव"** असे त्याकरीता निश्चित केलेल्या जागी छापलेले असेल. मतपत्रिका छापतांना ती अशा रितीने छापणे आवश्यक आहे की जेणेकरुन मतपत्रिका बॅलटिंग युनिटमध्ये घट्ट चिकटविल्यानंतर उमेदवाराचे नाव नमूद केलेली चौकट ही बॅलटिंग युनिटवरील रेषेशी बरोबर जुळली पाहिजे. त्यासाठी मतपत्रिका छापतांना अत्यंत काळजी घेणे आवश्यक आहे. मतपत्रिका योग्यरित्या छापल्या जातील यासाठी आवश्यक वाटल्यास मुद्रणालयाच्या तंत्रज्ञांना बॅलटिंग युनिट दाखविण्यात यावे व त्यांना त्यानुसार आवश्यक ती मोजमापे घेण्यास सांगावे जेणेकरुन निवडणुकीचा तपशील छापावयाची जागा व उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेली चौकट यांच्या मधल्या रेषा व त्यांची जाडी या बॅलटिंग युनिटवर त्यासाठी ठेवलेल्या जागेशी बरोबर जुळतील. बॅलटिंग युनिटवर वापरण्यासाठी घ्यावयाच्या मतपत्रिकांना स्थळप्रतीची आवश्यकता नसून त्यांचे बंडल देखील शिवून घेण्याची आवश्यकता नाही. मतपत्रिका सुट्याच ठेवण्यात याव्यात.

(३) निवडणूक लढविणा-या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नावे नमूद करण्यात येतील त्याच क्रमाने सदर नावे बॅलटिंग युनिटवर लावावयाच्या मतपत्रिकेमध्ये नमूद करण्यात येतील.

(४) जेव्हा दोन किंवा अधिक उमेदवारांची नावे समान असतील तेव्हा त्यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी सदर उमेदवारांचा व्यवसाय अथवा पत्ता किंवा अन्य एखादी बाब त्यांच्या नावांसमोर नमूद केली जाईल.

(५) **सदर मतपत्रिका राज्य निवडणूक आयोग ठरवील अशा नमुन्यात असेल.**

(६) ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये आरक्षण वर्गवारीनुसार वेगवेगळया रंगांच्या मतपत्रिकांची तरतूद असल्याने बॅलटींग युनिटमध्ये मतपत्रिका विहित जागी घट्ट बसवितांना त्याचा क्रम खालीलप्रमाणे असेल.

१. सर्वात वर **अनुसूचित जातीकरीता** विहित **फिक्या गुलाबी** रंगांची मतपत्रिका असेल

२. त्याखाली **अनुसूचित जमातीकरीता** विहित **फिक्या हिरव्या** रंगांची मतपत्रिका असेल

३. त्याखाली **नागरिकांच्या मागासप्रवर्गाकरीता** विहित **फिक्या पिवळया** रंगांची मतपत्रिका असेल

४. त्याखाली **सर्वसाधारण उमेदवारांकरीता** विहित **पांढऱ्या** रंगांची मतपत्रिका असेल

५. त्याखाली **अनुसूचित जाती स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी- **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या गुलाबी** रंगाची मतपत्रिका असेल

६. त्याखाली **अनुसूचित जमाती स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी- **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या हिरव्या** रंगाची मतपत्रिका असेल

७. त्याखाली **नागरिकांच्या मागासप्रवर्ग स्त्री राखीव** उमेदवाराकरीता विहित जागी - **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **फिक्या पिवळया** रंगाची मतपत्रिका असेल

८. त्याखाली **सर्वसाधारण स्त्री** उमेदवारांकरीता विहित जागी - **"स्त्री राखीव"** असे नमूद केलेली **पांढऱ्या** रंगांची मतपत्रिका असेल

**मात्र ग्रामपंचायत निवडणूकांमध्ये एका प्रभागातून कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन उमेदवार निवडून दिले जातील, अशी तरतूद असल्याने वर नमूद केलेल्या आठ वर्गवारींपैकी निवडणूक लढविणाऱ्या दोन किंवा तीन वर्गवारींपैकी यथास्थिती दोन किंवा तीन वर्गवारीच्या विहित मतपत्रिका वापरल्या जातील व त्या व्यतिरिक्त इतर मतपत्रिका वापरल्या जाणार नाहीत.**

(७) एका प्रभागातून सर्व वर्गवारींच्या एकूण सर्व उमेदवारांची संख्या १५ (पंधरा) हून अधिक झाल्यास आवश्यकतेनुसार दोन किंवा तीन किंवा चार बॅलटींग युनिट विहित पध्दतीने जुळणी करुन वापरली जातील.

(८) खालील तरतुदींच्या अधीन राहून निवडणूक निर्णय अधिकारी,-

(अ) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची नावे व चिन्हे नमूद केलेली (मतपत्रिका) बॅलटिंग युनिटमध्ये योग्य जागी घट्ट बसवील आणि स्वतःची सही करुन सीलबंद करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करु इच्छितात त्यांच्या स्वाक्ष-या घेईल.

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची संख्या कंट्रोल युनिटमध्ये सेट करील आणि अशी संख्या निश्चित करावयाचा मशिनचा विभाग बंद करुन तो सीलबंद करील व त्यावर स्वतःची स्वाक्षरी करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करु इच्छितात त्यांच्या स्वाक्ष-या घेईल.

५. **मतदान केंद्रातील व्यवस्था :-** (१) प्रत्येक मतदान केंद्राबाहेर खालील गोष्टी ठळकपणे दिसतील अशा रितीने लावण्यात येतील-

(अ) संबंधित मतदान केंद्रांवर त्या मतदान केंद्राच्या अंतर्गत येणारे असे क्षेत्र ज्या विशिष्ट क्षेत्रातील मतदार मतदान करण्यास पात्र आहेत तसेच संबंधित क्षेत्रामध्ये एकापेक्षा जास्त मतदान केंद्रे असतील तर त्या मतदान केंद्रांवर ज्या विशिष्ट क्षेत्रातील मतदार मतदान करण्यास पात्र आहेत त्या क्षेत्राचा तपशील दर्शविणारी सूचना.

(ब) निवडणूक लढविणा-या उमेदवारांची यादी.

(क) वर्गवारीनुसार उमेदवारांच्या मतपत्रिकेचा रंग नमूद करणारी सूचना

(२) प्रत्येक मतदान केंद्रात एक किंवा अधिक मतदान कक्ष ठेवण्यात येतील जेणेकरुन, मतदार त्याचे मत कोणीही अन्य व्यक्ती पाहणार नाही, अशा रितीने नोंदवू शकतील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान यंत्र आणि मतदार यादीच्या संबंधित भागाची प्रत आणि मतदानासाठी आवश्यक ते अन्य निवडणूक साहित्य पुरवील.

६. **मतदान केंद्रात प्रवेश** :- मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील तरतुदीनुसार मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी मतदान केंद्रात एकावेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांची संख्या विनियमित करील. तसेच सदर नियमात नमूद केलेल्या अधिकृत व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणालाही मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.

७. **मतदानासाठी मतदान यंत्र तयार करणे :-** (१) मतदान केंद्रात वापरण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिट्सवर खालील तपशील नमूद केलेली खूणचिठ्ठी लावलेली असेल -

(अ) मतदार संघाचा अनुक्रमांक आणि मतदार संघाचे नाव, असल्यास;

(ब) मतदान केंद्राचा अनुक्रमांक आणि मतदान केंद्राचे अथवा केंद्रांची नावे;

(क) मतदान यंत्राचा अनुक्रमांक; आणि

(ड) मतदानाची तारीख.

(२) मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान प्रतिनिधी आणि इतर उपस्थित अधिकृत व्यक्ती यांना मतदान यंत्रामध्ये कोणत्याही मतदाराने आपले मत नोंदविलेले नाही व उपरोक्त परिच्छेद ७ (१) मध्ये नमूद केलेली खूणचिठ्ठी मतदान यंत्रावर लावलेली आहे हे दाखवील.

(३) मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोर (पेपर सील) वापरली जाईल, आणि त्यावर मतदान केंद्राध्यक्ष आपली स्वतःची सही करील. तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधी जे कागदी मोहरेवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांच्याही सहया घेईल.

(४) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये विहित केलेल्या जागी वरीलप्रमाणे सहया केलेले कागदी मोहोर घट्ट चिकटवील आणि ती सुरक्षित व मोहोरबंद करील.

(५) कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात येणारे कागदी मोहोर अशारितीने घट्ट चिकटविण्यात येईल, जेणेकरुन कागदी मोहोर तोडल्याशिवाय "रिझल्ट" बटन दाबता येणार नाही.

(६) वरीलप्रमाणे बंद केलेले आणि सुरक्षित केलेले कंट्रोल युनिट मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान प्रतिनिधी या सर्वांना दिसेल अशारितीने ठेवण्यात येईल आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स मतदान कक्षात ठेवण्यात येतील.

८. **चिन्हांकित मतदार यादी** :- मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष सर्व मतदान प्रतिनिधी व इतर उपस्थितांना चिन्हांकित मतदार यादीमध्ये पुढील बाबींव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खुणा केल्या नसल्याचे दाखवून देईल -

(अ) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील परिच्छेद ३ उप परिच्छेद २ मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही ; आणि

(ब) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील परिच्छेद ५(२) मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही.

९. **महिला मतदारांसाठी सुविधा** :- (१) जेव्हा एखादया मतदान केंद्रात महिला व पुरुष असे दोन्ही मतदार असतील तेव्हा आवश्यकता असल्यास मतदान केंद्राध्यक्ष पुरुष व महिला यांच्या वेगवेगळया रांगा करुन काही पुरुष व त्यानंतर काही महिला अशाप्रकारे मतदानासाठी पाठवील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष एखादया मतदान केंद्रावर महिला मतदारांना सहाय्य करण्यासाठी आवश्यकतेनुसार एखादी महिला सहाय्यक नियुक्त करील. जेणेकरुन, ती मतदान केंद्राध्यक्षास सर्वसाधारणपणे मतदान प्रक्रियेमध्ये अनुज्ञेय मदत करु शकेल. विशेषतः आवश्यकता भासल्यास एखादया महिला मतदाराची ओळख पटविणे अथवा तिची झडती घेणे इत्यादी यामध्ये मदत करु शकेल.

१०. **मतदारांची ओळख पटविणे** :- मुंबई ग्रामपंचायत (निवडणूक) नियम, १९५९ मधील तरतुदीनुसार विहित केलेली पध्दती यासंदर्भात अवलंबिली जाईल.

११. **मतदान कर्तव्यार्थ नेमलेल्या लोकसेवकांना दयावयाची सुविधा** :- (१) टपालाने मतदान करु इच्छिणाऱ्या निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेल्या मतदाराने टपाली मतपत्रिका आदेश, २००१ अन्वये विहित केलेल्या पीबी-१ या प्रपत्रात निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे मतदानाच्या तारखेपूर्वी कमीत कमी ७ दिवस अगोदर अथवा निवडणूक निर्णय अधिकारी कमी करतील अशा मुदतीपूर्वी पोहोचेल अशा बेताने अर्ज करावा आणि निवडणूक निर्णय अधिकारी यांची अर्जदार हा निवडणूक कर्तव्यार्थ नियुक्त केलेला मतदार आहे, अशी खात्री झाल्यास अशा अर्जदारास टपाली मतपत्रिका देण्यात येईल.

(२) ज्या ठिकाणी मतदाराची नेमणूक त्याच्याच मतदार संघात मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी किंवा मतदान कर्मचारी म्हणून वा अन्य निवडणूक कामासाठी करण्यात आली असेल तर असा मतदार टपालाद्वारे मतदान करण्याऐवजी ज्या केंद्रावर त्याला नेमणूक देण्यात आली आहे, त्याच मतदान केंद्रावर मतदान करु शकतो. परंतु, यासाठी त्याने विहित नमुन्यातील निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात निवडणूक कार्य प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर, -

(क) मतदान केंद्राध्यक्ष त्यावर सदर प्रमाणपत्र सादर करणा-या संबंधित व्यक्तीची स्वाक्षरी घेईल.

(ख) मतदान केंद्राध्यक्ष निवडणूक कार्य प्रमाणपत्रात नमूद केल्यानुसार संबंधित व्यक्तीचे नाव व त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक चिन्हांकित मतदार यादीच्या शेवटी नमूद करील; आणि

(ग) संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्यास पात्र असलेल्या अन्य कोणत्याही मतदाराने ज्याप्रमाणे मतदान केले असते त्याप्रमाणे त्यास मतदान करु देईल.

१२. **मतदाराच्या ओळखीस आव्हान :-** यासंदर्भात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील विहित केलेल्या तरतुदी यासंदर्भात लागू राहतील.

१३. **तोतयेगिरीस प्रतिबंध करणे** :- यासंदर्भात मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ अंतर्गत विहित केलेले नियम व राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले आदेश यासंदर्भात लागू राहतील.

१४. **मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची कार्यपध्दती** :- (१) एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष -

(अ) चिन्हांकित मतदार यादीमध्ये नमूद केलेला मतदाराचा अनुक्रमांक व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत नमूद करील.

(ब) मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा अंगठयाचा ठसा उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत उमटवील ; आणि

(क) चिन्हांकित मतदार यादीमध्ये संबंधित मतदारांच्या नावांसमोर खूण करील, जेणेकरुन त्यास मतदान करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे.

परंतु, कोणत्याही मतदारास त्याने व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत स्वाक्षरी केल्याशिवाय अथवा अंगठयाचा ठसा उमटविल्याशिवाय त्यास मतदान करण्याची अनुमती देणार नाही.

(२) एखादया व्यक्तीने उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत अंगठयाचा ठसा उमटविल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी यांनी अंगठयाचा ठसा साक्षांकित करणे आवश्यक राहील.

१५. बॅलेटिंग युनिटवरील "End" बटनाचा वापर :- **(१) जेथे एकाहून अधिक वर्गवारीतील पदांकरीता मतदान होते तेथे "End" बटन उघडून (Unmask) ठेवण्यात यावे. साधारणपणे मतदाराकडून सर्व वर्गवारीतील पदांसाठी मतदान केल्यावर "End" बटनाचा वापर करण्याची आवश्यकता नाही. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र दोन किंवा आवश्यक तेथे तीन मतांसाठी सेट केले असेल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये जर एखादया मतदाराने ज्यासाठी निवडणूक लढविली जात आहे, त्या सर्व पदांपैकी एका पदाकरिता किंवा कोणत्याही पदासाठी मतदान केले नाही व मतदार मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर केंद्राध्यक्षांना ही गोष्ट त्यांच्याकडे असलेल्या "Control Unit" वर लाल दिवा न विझल्यामुळे लक्षात येईल व अशावेळी मतदाराने द्यावयाच्या मतापेक्षा कमी मते नोंदविली तर मतदान यंत्र पुढील मतदारासाठी तयार (Ready) होणार नाही. अशा परिस्थितीत केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देणे आवश्यक राहील व मतदारास मतदान पूर्ण करण्याबाबत, विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन उर्वरित पदांकरिता मत नोंदविले तर या बटनाचा वापर करण्याची आवश्यकता भासणार नाही. पण जर मतदारास उर्वरित पदांपैकी एका पदासाठी किंवा दोन्ही पदांकरिता कोणालाही मतदान करावयाचे नसेल तेव्हा त्या मतदारास त्याने "End" बटन दाबण्याबाबत विनंती करण्यात यावी.**

**जेणेकरुन त्याची मतदानाची प्रक्रिया पूर्ण होईल व केंद्राध्यक्षांकडे असलेल्या नियंत्रण युनीटवरील "Control Unit" लाल दिवा विझून जाईल व इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुढील मतदानासाठी तयार होईल. अपवादात्मक प्रकरणापैकी कधी एखादा मतदार "End" बटन दाबण्यासाठी नकार देईल तेव्हा मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान यंत्रावरील मतपत्रिकेसह सर्व भाग ("End" बटना व्यतिरिक्त) अपारदर्शक पुठ्ठयाने झाकावा व त्यानंतर केंद्राध्यक्षांनी केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने "End" बटन दाबावे व याबाबतची योग्य ती नोंद मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये घ्यावी.**

**(२) जेथे एकापेक्षा जास्त बॅलट युनिट वापरण्यात येते तेव्हा फक्त शेवटच्या बॅलट युनिटवरील "End" बटन कार्यान्वीत असेल. बाकी बॅलट युनिटवरील "End" बटने पांढऱ्या पट्टीने झाकून** (Masked) **ठेवावे.**

**(३) पोटनिवडणुकांच्यावेळी जर एकच मत दयावयाचे असेल तर "End" बटनाला पांढऱ्या पट्टीने झाकून (Masked) ठेवावे.**

**१६. मतदारांनी मतदान केंद्रात मतदानाबाबत तसेच मतदान पध्दतीबाबत गुप्तता बाळगणे :-** (१) प्रत्येक मतदाराने त्यास उपरोक्त परिच्छेद १४ मध्ये विहित केल्याप्रमाणे मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदानाबाबत मतदान केंद्रात गुप्तता बाळगणे आवश्यक असून, आणि त्यादृष्टीने मतदान करताना खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यपध्दती अनुसरणे आवश्यक आहे.

(२) मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदार तात्काळ ज्याच्या अखत्यारित कंट्रोल युनिट आहे अशा मतदान अधिका-याकडे अथवा मतदान केंद्राध्यक्षाकडे जाईल व संबंधित मतदान अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिटचे योग्य ते बटण दाबून मतदारास मतदान करता यावे यासाठी बॅलटिंग युनिट सुरु (Activate) करील.

(३) त्यानंतर मतदार तात्काळ -

(अ) मतदान कक्षाकडे जाईल;

(ब) बॅलटिंग युनिटवर उमेदवारांची नावे व चिन्हे ज्या ठिकाणी दर्शविली आहेत, तेथे त्याला हव्या असलेल्या उमेदवारासमोरील बटण दाबून आपले मत / मते नोंदविल; आणि

(क) मतदान कक्षाच्या बाहेर येईल आणि मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) कोणताही मतदार, मत नोंदविण्यासाठी अनावश्यक उशीर लावणार नाही.

(५) एखादा मतदार मतदान कक्षात असल्यास अन्य कोणत्याही मतदारास मतदान कक्षात जाण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(६) वरील नमूद परिच्छेद १४ आणि १९ मधील तरतुदीनुसार एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यात आल्यानंतर वरील उप परिच्छेद (३) मध्ये विहित केलेली कार्यपध्दती अनुसरण्यास एखादया मतदाराने, त्यास मतदान केंद्राध्यक्षांने ताकीद दिल्यानंतरही सूचनांचे पालन करण्यास नकार दिल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी, मतदान केंद्राध्यक्षांच्या आदेशानुसार अशा मतदारास मतदान करु देणार नाही.

(७) वरील उप परिच्छेद (६) मध्ये नमूद केल्यानुसार एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती नाकारण्यात आल्यास "मतदान प्रक्रियेचा भंग"असा अभिप्राय नमुना व्हीएम-१ या मतदारांच्या नोंदवहीत मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाक्षरीसह नमूद करण्यात यावा.

**१७. अंध अथवा अपंग मतदारांनी मत नोंदविणे :** (१) एखादा मतदार त्याच्या अंधत्वामुळे अथवा अन्य शारिरीक अपंगत्वामुळे त्याला सहाय्य मिळाल्याशिवाय बॅलटिंग युनिटवरील चिन्हे ओळखून योग्य ते बटण दाबून मत नोंदविण्यास असमर्थ आहे, अशी मतदान केंद्राध्यक्षाची खात्री झाल्यास मतदारास २१ वर्षापेक्षा कमी वय नसलेला सहाय्यक त्याच्यासोबत मतदान कक्षात घेऊन जाण्यास व त्याच्या इच्छेनुसार मतदान करण्यास अनुमती देईल.

परंतु, मतदानाच्या दिवशी कोणत्याही व्यक्तीस अंध अथवा, अपंग मतदारास मदत करण्यासाठी एकापेक्षा जास्त मतदाराची सहाय्यक म्हणून काम करण्यास अनुमती देण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस या नियमाखाली वरीलप्रमाणे सहाय्यक म्हणून काम करण्याची अनुमती देण्यापूर्वी संबंधित व्यक्ती असे जाहीर करील की, ती व्यक्ती मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत गुप्त ठेवील, तसेच त्याने एकाच दिवशी एकापेक्षा जास्त मतदाराचा सहाय्यक म्हणून काम केलेले नाही.

(२) मतदान केंद्राध्यक्ष अशा सर्व बाबींच्या नोंदी व्हीएम-५ या नमुन्यात ठेवील.

**१८. मतदान करण्याची इच्छा नसलेला मतदार** :- एखादया मतदाराने त्याचा मतदार यादीतील क्रमांक नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत नोंदविल्यानंतर तसेच या आदेशाच्या परिच्छेद १४(१) मधील तरतुदीनुसार त्यामध्ये स्वाक्षरी केल्यानंतर अथवा अंगठयाचा ठसा उमटवल्यानंतर मतदान करावयाचे नाही असे ठरविल्यास, त्याच्या नावासमोर नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत तसा अभिप्राय मतदान केंद्राध्यक्ष लिहिल आणि अशा अभिप्रायासमोर संबंधित मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा त्याच्या अंगठयाचा ठसा उमटवील.

**१९. प्रदत्त मते :-** (Tender Ballot) (१) एखादा मतदार, मतदान करण्यास आल्यानंतर त्याच्या वतीने अन्य एखादया व्यक्तीने मतदान केले आहे असे आढळून आल्यास अशा मतदारास त्याची ओळख पटविण्यासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे त्याने समाधानकारकरित्या मतदान केंद्राध्यक्षास दिल्यास त्यास बॅलटिंग युनिटवर मतदान करण्यास अनुमती देण्याऐवजी, त्यास राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यानुसार व भाषेतील अथवा भाषेतील तपशील समाविष्ट असलेली प्रदत्त मतपत्रिका (Tender Ballot Paper) देण्यात येईल. **(प्रदत्त मतपत्रिका कोणत्या आकाराची असावी असा प्रश्न उपस्थित होणार असल्यामुळे असे नमूद करण्यात येते की, बॅलटिंग युनिटवर घट्ट चिकटविण्यासाठी ज्याप्रकारची मतपत्रिका छापली जाणार आहे. त्याचप्रकारची मतपत्रिका प्रदत्त मतपत्रिका म्हणून वापरण्यात यावी म्हणजेच बॅलटिंग युनिटवर लावलेली मतपत्रिका व प्रदत्त मतपत्रिका या एकच असतील. मात्र प्रत्येक प्रदत्त मतपत्रिकेच्या पाठीमागे "प्रदत्त मतपत्रिका" असा शिक्का मारलेला असेल.)**

(२) प्रत्येक मतदार त्यास प्रदत्त मतपत्रिका देण्यापूर्वी नमुना व्हीएम-२ मध्ये स्वतःचे नाव लिहिल.
(३) प्रदत्त मतपत्रिका मिळाल्यानंतर असा मतदार त्वरीत, -
(अ) मतदान कक्षाकडे जाईल;
(ब) त्याला देण्यात आलेल्या मतपत्रिकेवर त्याला देण्यात आलेल्या उपकरणाच्या सहाय्याने त्याला ज्या उमेदवारास मतदान करावयाचे आहे त्याच्या नावासमोर "x" अशी खूण करील;
(क) स्वतःचे मत उघड होणार नाही, अशारितीने मतपत्रिकेची घडी करील;
(ड) मतदान केंद्राध्यक्षास आवश्यक वाटल्यास मतपत्रिकेवरील विभेदक चिन्हाची खूण दाखवील;
(ई) मतदान केंद्राध्यक्षास मतपत्रिका देईल व मतदान केंद्राध्यक्ष ती मतपत्रिका त्यासाठी ठेवलेल्या विशिष्ट पाकिटात ठेवील; आणि
(फ) मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) एखादा मतदार अंधत्व अथवा अन्य शारिरीक अपंगत्वामुळे मतदान करण्यास सहाय्य मिळाल्याशिवाय मत नोंदविण्यास असमर्थ असल्यास मतदान केंद्राध्यक्ष **त्याला वरील पध्दती अनुसरुन** परिच्छेद १७ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार त्याच्या इच्छेनुसार सहायक देऊन मतदान करण्याची अनुमती देईल.

**२०. मतदान सुरु असताना मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्षाने प्रवेश करण्याबाबत :-**

(१) मतदान केंद्राध्यक्ष त्याला जेव्हा जेव्हा आवश्यकता वाटेल अशावेळी, मतदान सुरु असताना परंतु मतदान कक्षात कोणीही मतदार नाही अशावेळी, मतदान कक्षात प्रवेश करील आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स सुरक्षित असून, त्याला कोणत्याही प्रकारे बिघडविण्यात आलेले नाही याची खात्री करील.

(२) एखादा मतदार मतदान कक्षात प्रवेश केल्यानंतर तो बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहे अथवा मतदान कक्षात आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ थांबलेला आहे, असे मतदान केंद्राध्यक्षास आढळून आल्यास तो मतदान कक्षात प्रवेश करील आणि मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व विहित पध्दतीनुसार सुरु राहण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलील.

(३) मतदान केंद्राध्यक्ष ज्या ज्या वेळी मतदान कक्षात या नियमाखाली प्रवेश करील तेव्हा तो आपल्या सोबत मतदान प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास सोबत येण्याची अनुमती देईल.

२१. **मतदान बंद करणे** :- (१) राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळेस मतदान बंद करण्याची दक्षता, मतदान केंद्राध्यक्ष घेईल आणि त्यानंतर कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश करण्याची अनुमती देणार नाही.

परंतु, मतदान बंद होण्याच्या वेळेस जितके मतदार, मतदान केंद्रात असतील त्या सर्वांना आपले मत नोंदविण्याची अनुमती विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन देण्यात येईल.

(२) मतदान बंद होण्याच्यावेळी एखादा मतदार मतदान केंद्रात होता किंवा कसे? या विषयी कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास त्याबाबतचा निर्णय मतदान केंद्राध्यक्ष घेईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

२२. **नोंदविलेल्या मतांचा हिशेब** :- (१) मतदान बंद झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष नमुना व्हीएम-३ मध्ये मतदान नोंदविलेल्या मतांचा हिशेब तयार करील आणि **"नोंदविलेल्या मतांचा हिशेब" (Balat Paper Account)** असे लिहिलेल्या वेगळया पाकिटात तो ठेवील.

(२) मतदान बंद झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्ष प्रत्येक मतदान प्रतिनिधीस व्हीएम-३ या नमुन्यातील नोंदविलेल्या मतांच्या **हिशेबाच्या (Ballat Paper Account)** नमुन्याची स्वतः साक्षांकित केलेली सत्यप्रत देईल आणि ती दिल्याची पोहोच संबंधित मतदान प्रतिनिधींकडून घेईल.

२३. **मतदान बंद झाल्यानंतर मतदान यंत्र मोहोरबंद (Seal) करणे** :- (१) मतदान बंद झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिट बंद करील व ते बॅलटिंग युनिट अथवा युनिट्सपासून वेगळे करील, जेणेकरुन बॅलटिंग युनिट अथवा युनिट्समध्ये आणखी कोणतीही मते नोंदविली जाणार नाहीत.

(२) राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स त्यानंतर मोहोरबंद केली जातील आणि सुरक्षित ठेवली जातील, तसेच ती मोहोरबंद करण्यासाठी अशा प्रकारे सील चिकटविण्यात येतील, जेणेकरुन सील तोडल्याशिवाय कोणतेही युनिट उघडता येणार नाही.

(३) मतदान केंद्रात उपस्थित असलेले जे मतदान प्रतिनिधी अशा सीलवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांना सीलवर सही करण्याची अनुमती देण्यात येईल.

२४. **इतर पाकिटे मोहोरबंद करणे** :- (१) मतदान केंद्राध्यक्ष वेगवेगळया प्रकारच्या पाकिटात खालील बाबी ठेवील :-

(अ) चिन्हांकित मतदार यादी;
(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही ;
(क) नमुना व्हीएम-२ मधील प्रदत्त मते (Tender Votes) व त्यांची यादी ठेवण्यात आलेले पाकीट;
(ड) विहित नमुन्यांत आव्हानित मतांची यादी; (List of Challenged Votes) आणि
(ई) राज्य निवडणूक आयोगाने सूचना दिल्यानुसार सीलबंद करावयाचे अन्य कोणतेही कागदपत्र ठेवलेले पाकीट.

(२) मतदान केंद्राध्यक्ष शिक्का (सील) वापरुन वरील सर्व पाकीटे मोहोरबंद करण्यात येतील आणि त्यावर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यापैकी जे उपस्थित असतील व त्यावर स्वाक्षरी करु इच्छित असतील त्यांना स्वाक्षरी करण्याची अनुमती देण्यात येईल.

२५. **निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मतदान यंत्रे पाठविणे** :-

(१) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे त्यांनी सूचना दिलेल्या स्थळी खालील बाबी पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील :-

(अ) मतदान यंत्र;

(ब) नमुना व्हीएम-३ मधील नोंदविलेल्या मतांचा हिशेब;

(क) या आदेशाच्या परिच्छेद २३ मध्ये नमूद केलेली मोहोरबंद पाकीटे; आणि

(ड) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली सर्व कागदपत्रे.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीस सुरुवात होईपर्यंतच्या कालावधीत मतदान यंत्रे, पाकीटे व अन्य कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांच्या वाहतुकीची योग्य ती व्यवस्था करील.

२६. **मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती** : (१) मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीच्या अनुषंगाने एखादया मतदान केंद्रावरील मतदान स्थगित करावे लागल्यास वरील परिच्छेद २२ ते २५ मधील तरतुदी, शक्य असेल तोवर, वरील तरतुदीनुसार मतदान बंद झाले असे समजून लागू होतील.

(२) उपरोक्त तरतुदींमध्ये शिफारस केल्यानुसार मतदान सुरु झाल्यानंतर ज्या मतदाराने मतदान स्थगित होण्यापूर्वी मतदान केले आहे त्यांना उपरोक्त नियमांच्या तरतुदीनुसार पुन्हा मतदान करता येणार नाही.

(३) जेव्हा वरीलप्रमाणे स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरु होईल त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास चिन्हांकित मतदार यादी, नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही इत्यादी सीलबंद केलेली कागदपत्रे व नवीन मतदान यंत्र पुरवील.

(४) मतदान केंद्राध्यक्ष उपरोक्त नमूद सीलबंद पाकीटे मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडील आणि त्यापैकी चिन्हांकित मतदार यादीचा स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरु करताना मतदारांच्या नावावर खुणा करण्यासाठी वापर करील.

(५) या आदेशाचे परिच्छेद ४ ते २५ मधील तरतुदी स्थगित केलेले मतदान पुन्हा घेण्यासाठी स्थगितीपूर्वी जशा लागू होत्या तशा लागू होतील.

२७. **मतदान यंत्राची तपासणी व निरीक्षण** :- (१) ज्या मतदान केंद्रावर एकापेक्षा जास्त मतदान यंत्रे वापरण्यात आलेली आहेत अशा मतदान केंद्रावरील कंट्रोल युनिट्सची निवडणूक निर्णय अधिकारी तपासणी व निरीक्षण करील आणि अशा यंत्रावरील मतमोजणी एकत्रितरित्या करण्यात येईल.

(२) वरील उप परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार एखादया कंट्रोल युनिटवरील नोंदविण्यात आलेल्या मतांची मतमोजणी करण्यापूर्वी उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी यांना मतमोजणी टेबलवर मतदान यंत्राचे पेपर सील तसेच अन्य महत्वपूर्ण सील यांची तपासणी करुन ती समाधानकारकरित्या सुरक्षित आहेत, याबाबत त्यांची खात्री करुन घेता येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात (Tampered with) आलेले नाही, याची खात्री करुन घेईल.

(४) एखादे मतदान यंत्र बिघडविण्यात आले आहे आणि त्यामुळे त्यामध्ये नोंदविलेल्या मतांच्या आकडेवारीत फरक झाला असल्याची शक्यता आहे, निवडणूक निर्णय अधिकारी याची अशी खात्री झाल्यास, तो अशा बिघडविण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या मतांची मतमोजणी करणार नाही, आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार नव्याने मतदान घेण्याची कार्यपध्दती अनुसरील.

२८. **मतमोजणी** :- (१) कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात आलेले नाही, याची खात्री झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील "रिझल्ट-१" हे योग्य ते बटण दाबून त्या

यंत्रावर किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, यांची संख्या पाहील आणि त्या मतदान यंत्रावर प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते त्यासाठी योजना करण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या डिस्प्ले पॅनेलवर दाखवील.

(२) प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते वरीलप्रमाणे मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील डिस्प्ले पॅनेलवर दाखविण्यात आल्यानंतर -

(अ) व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते वेगळयाने नमूद करण्यात येतील;

(ब) व्हीएम-४ या नमुन्यातील प्रपत्र पूर्णपणे लिहून झाल्यानंतर आणि त्यावर मतमोजणी पर्यवेक्षक आणि उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांच्या त्यावर स्वाक्ष-या घेण्यात येतील; आणि

(क) व्हीएम-४ या नमुन्यात सर्व संबंधित बाबी भरुन झाल्यानंतर रिझल्ट्स शीट मधील निर्णय जाहीर करण्यात येईल.

**२९. काढता येणारी मेमरी सीलबंद करणे :-**

(१) मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेली उमेदवारनिहाय मते किती आहेत? याची खात्री करुन ती व्हीएम-४ या विहित नमुन्यात नमूद केल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी (Detachable Memory) मतदान यंत्रामधून बाहेर काढील, सीलबंद करील व त्यावर स्वाक्षरी करुन स्वत:चा शिक्का उमटवील. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यावर सही करावयाची इच्छा असेल अथवा अंगठयाचा ठसा उमटविण्याची इच्छा असेल त्यांना तशी परवानगी देईल. परंतु, काढता येणा-या मेमरीमधील मते पुसली जाणार नाहीत याची दक्षता घेईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी वरीलप्रमाणे सीलबंद केलेल्या काढता येणा-या मेमरीला त्यासाठी विशेषत: तयार केलेल्या खोक्यामध्ये ठेवील. तसेच खोक्यावर खालील तपशील

नमूद करण्यात येईल :-

(क) ग्रामपंचायतीचे नाव व मतदार संघ (प्रभाग/जागा क्रमांक)

(ख) मतदान केंद्र क्रमांक अथवा नाव जेथे ती काढता येणारी मेमरी उपयोगात आणली गेली आहे;

(ग) काढता येणा-या मेमरीचा अनुक्रमांक;

(घ) मतदानाची तारीख; आणि

(ङ) मतमोजणीची तारीख

३०. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणूकीशी संबंधीत कागदपत्रे यांचा ताबा :-

(१) निवडणूकीमध्ये वापरण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी संबंधित जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील.

(२) जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे त्यांच्या ताब्यात खालील बाबी सुरक्षितपणे ठेवतील.

(अ) चिन्हांकित मतदार यादी असलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ मध्ये ठेवलेली मतदार नोंदवही असलेले पाकीट.

(क) नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक उमेदवारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब ठेवलेले पाकीट.

(ड) निवडणूकासंदर्भातील अन्य कागदपत्र.

**३१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणूकीसंबंधी अन्य कागदपत्रे सादर करणे अथवा त्यांचे निरीक्षण :-**

(१) जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या खालील बाबी :-

(अ) चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम १ या नमुन्यात ठेवलेल्या मतदार नोंदवही असलेले पाकीट.

या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाहीत अथवा त्यांचे निरिक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

(२) उपरोक्त परिच्छेद २९ मधील तरतुदीनुसार सीलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या काढता येणा-या मेमरी असलेली सिलबंद पाकीटे व Boxes जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील व ती शासकीय कोषागार किंवा उपकोषागारामध्ये ठेवण्यात येतील व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाही, त्याचे निरिक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाही.

(३) राज्य निवडणूक आयोग आदेश देईपर्यंत जिल्हाधिकारी अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या ताब्यात असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची काढता येणारी मेमरी जशीच्या तशी ठेवली जातील व ती अन्य कोणत्याही निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या अनुमतीशिवाय वापरता येणार नाहीत. जरी सील केलेली मेमरी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागामध्ये कोणतीही निवडणूक याचिका दाखल न झाल्यास ही मेमरी तीन महिन्याच्या अवधीनंतर राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा ठिकाणी परत करण्यात येईल. तसेच या मेमरीमधील माहिती नष्ट करण्यात येईल.

(४) ज्या मतदार संघाच्या ( प्रभागाच्या / जागेच्या बाबत) कोणतीही निवडणूक याचिका अथवा अन्य कोणत्याही न्यायालयात रिट याचिका प्रलंबित नसल्यास अन्य निवडणूक कागदपत्र ठेवलेली पाकीटे संबंधित नियमांतील तरतुदीनुसार नष्ट करता येतील.

**३२.** या आदेशानुसार विहित करण्यात आलेले सर्व नमुने खालील अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे राहतील.

# अनुसूची
## नमुना व्हीएम-१
## (पहा परिच्छेद १४)
## मतदार नोंदवही

............................ ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-..................... तालुका .................) प्रभाग क्रमांक / नांव......................... मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.......................................................

| अ.क्र. | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| इत्यादी | | | |

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना व्हीएम-२**
**(पहा परिच्छेद १९)**
**प्रदत्त मतांची यादी**

......................................... ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-.................... तालुका ..................) प्रभाग क्रमांक / नांव...........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव........................................................

| अ.क्र. | मतदाराचे नांव | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |
| इत्यादी. | | | | |

दिनांक ....................                                        मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नमुना व्हीएम-३**
**(पहा परिच्छेद २२)**
**भाग-एक- नोंदविलेल्या मतांचा हिशेब**

................................ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-..................... तालुका ..................) प्रभाग क्रमांक / नांव...........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.....................................................
कंट्रोल युनिटचा क्रमांक............................................................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ..........................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या

२. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकूण मतदारांची संख्या

३. परिच्छेद १८ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या

४. परिच्छेद १६ नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या

५. मतदान यंत्रामध्ये नोंदविल्या गेलेल्या एकूण मतदारांची संख्या

६. वरील अनुक्रमांक-५ मध्ये दाखविलेल्या एकूण मतांची संख्या =
(अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही
आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे,

७. परिच्छेद १९ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या

८. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या

| | अनुक्रमांक पासून | पर्यंत |
|---|---|---|
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | .. ........... | ............ |
| (ब) मतदारांना दिलेल्या | .............. | ............ |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | .............. | .............. |

९. कागदी मोहोरांचा (पेपर सील) हिशेब
१.पुरविल्या गेलेल्या कागदी मोहोरांचे
अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या ..................

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या ..................

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

४.न वापरलेल्या कागदी मोहोरांची संख्या ..................
(जे निवडणूक निर्णय अधिका-यास परत केले)
(क्रमांक - २ वजा ३)

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या, ..................
(असल्यास)

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या
१............................
२............................
३............................
४............................
५............................

दिनांक- ......................
ठिकाण- ......................

मतदान केंद्राध्यक्षाची सही
मतदान केंद्र क्रमांक..........

**नमुना व्हीएम-४**
**(पहा परिच्छेद २८)**
**भाग- दोन - मतमोजणीचा निकाल**

.......................... ग्रामपंचायत निवडणूक / पोटनिवडणूक
(जिल्हा-..................... तालुका .... .................) प्रभाग क्रमांक / नांव..........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव........................................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ..........................................
काढता येणा-या मेमरीचा क्रमांक..............................................................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ...........................

| अ.क्र. (१) | उमेदवाराचे नांव (२) | नोंदविलेल्या मतांची संख्या (३) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| एकूण | | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे अथवा काही फरक येतो किंवा कसे,

ठिकाण- ....................
दिनांक- ......................

मतमोजणी पर्यवेक्षकाची सही................

उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधीचे/मतमोजणी प्रतिनिधीचे नांव — पूर्ण सही............

१.
२.
३.
४.
५.
६.

ठिकाण- .................
दिनांक- ................

निवडणूक निर्णय अधिका-याची सही

## नमुना व्हीएम-५
## (पहा परिच्छेद १७)
## अंध व अपंग मतदारांची यादी

.................................ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-...................... तालुका .................)

प्रभागक्रमांक/नांव..........................

मतदानकेंद्राचा क्रमांक व नांव.......................................................................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक. | मतदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

दिनांक- .....................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

-----oooooo-----

**STATE ELECTION COMMISSION**

New Administrative Building, Opp.Mantralaya, Madam Cama Road, Mumbai-४०० ०३२. Dated २७th January, १९९५.

ORDER

XX

CONSTITUTIN OF INDIA

No.SEC.१०९५/CR-२६/९५/PR/ - In exercise of the powers conferred by clause (१) of Article २४३K of the Constitution of India, read with sub-sections (१)(२) and (३) of Section १०A of the Bombay Village Panchayat Act,१९५८ (Bom.III of १९५९) (hereinafdter referred to as "the said Act") and rule ४४ of the Bombay Village Panchayats Election Rules,१९५९ and of all other powers enabling me in this behalf, and supersession of Order No.SEC/VP/EL/११८/९४, dated the ११th October १९९४ and Order No.SEC/VP/EL/२३६/९४, dated the २५th November १९९४, I, D.N.Chaudhari, State Election Commissioner, Maharashtra, hereby :-

(a) delegate the powers under section, sub-sections and clauses of the Act, and of the rules, sub-rules and clauses of the Bombay Village, Panchayats election Rules, १९५९ and of the Bombay Villavge Panchayat (Number of Members, Division into Wawrds and Reservation of Seats) rules, १९६६ to or, as the case may be, authorise, for the purpose of and to the extent specified in column (२) of the Schedule hereto, the Officers of the State Government as shown against each of them in column (३) of the said Schedule; and

(b) direct that these officers shall exercise the powers subject to my superintendent, direct and control and without prejudice to the provision of sub-section (४) of Section १०A of the said Act.

**Schedule**

**PART I**

**The Bombay Villavge Panchayats Act, १९५८**

| Sr.No. | Sections Sub-sections and Clauses of the Act | Officer of the State Government |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | Section १०, Sub-section (१), clause (b) for division of a village into wards | The collector |
| २. | Section १०, sub-section (२), determining the seats to be reserved for persons belonging to the Scheduled Castes, the Scheduled Tribes, Backward Class of Citizens and women | The Collector |
| ३. | Section १० Sub-Section (३) Publishing the names of the Elected members | The Collector |
| ४. | Section १२, sub-section (२) designating the officer who shall maintain a list of voters | The Collector |
| ५. | Section १३A, being an officer to whom notice in writing signed by a person who is elected to more than one seat in a Village Panchayat, shall be addressed. | The Collector |

## PART II

The Bombay Village Panchayats Election Rules, १९५९

The Bombay Village Panchayats (Number of Members, Division into Wards and Reservation of Seats) Rules, १९६६.

| Sr.No. | Rules Sub-Rules and Clauses thereof | Officer of the State Government |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **(A) The Bombay Village Panchayats Election Rules,१९५९** | |
| १. | Rule ३, sub-rule (१), designating the officer who shall maintain the list of voters of the each ward of the village (See sub-section (२) of section १२ of the Act) | The Collector |
| २. | rule ३, sub-rule (५), giving a public notice of the places where copies of the relevant list of voters are kept open for public inspection. | The Tahsildar |
| ३. | Rule ४, determining the ward or wards in which seats shall be reserved for the Scheduled Castes, the Schedule Tribes, Backward Class of citizens and women | The Collector |
| ४. | Rule ६, appointing the Returning Officer, one or more Polling Officers to assist the Returning and Presiding Officer. | The Tahsildar |
| ५. | Rule ७, Sub-Rule (१) clauses (a) to (e), issue and order appointing the last date for making nominations, the date for the scrutiny of nominations, the last date for the withdrawal of candidates, the date on which and the time during which a poll shall, if necessary, be taken and the date or dates and the time and place for the counting of votes. | The Tahsildar |
| ६. | Rule ७, sub-rule (२), giving at publish written notice Form AA. | The Tahsildar |
| ७. | Rule ७, sub-rule (२A), appointing any other conspicuous public place in the village for affixing the order issued under sub-rule (१) and of the notice given under sub-rule (२). | The Tahsildar |
| ८. | Rule ७, sub-rule (३), change of the dates, hours and place or places appointed under sub-rule (१). | The Collector |
| ९. | Rule ७, sub-rule (४), -- | |
| | (a) to make an order changing any dates | The Tahsildar |
| | (b) an officer to whom the copy of the order shall be sent | The Collector |
| १०. | Rule १४A, the officer to whom the Returning Officer shall report the fact of the death of the candidate | The Tahsildar |
| ११. | Rule ३१, sub-rule (२), the Officer who whom the Returning Officer shall report the circumstances of all adjournment of Poll | The Tahsildar |
| १२. | Rule ३१A, sub-rule (१), the officer to whom the Returning Officer shall report the error or irregularities in procedure likely, to vitiate the poll. | The Tahsildar |
| १३. | Rule ३७, publication of the names of the elected members | The Collector |
| १४. | Rule ४१, sub-rule (१), the officer whose previous sanction shall | The Tahsildar |

be necessary to destroy the ballet papers

| | | |
|---|---|---|
| १५. | Rule ४१, sub-rule (२), subject to the previous approval of the State Election Commission, giving directions to destroy other relating to election. | The Collector |

**(B) The Bombay Village Panchayats (Number of Members)(Division into Wards & Reservation of Seats) Rules,१९६६.**

| | | |
|---|---|---|
| १. | Rule २A deciding on the basis of the population in a Panchayat area, the number of members to be elected in each Panchayat. | The Collector |
| २. | Rule ५, sub-rules (१) and (२) --- | |
| | (a) publication in Form ﺮA਼in accordance with the provisions of this rule, the number of members of a Panchayat, the number of wards, the number of members which shall be elected from each ward and the ward or the wards in which seats are reserved for Scheduled Castes, Scheduled Tribes, Backward Class of citizens and women; and | The Collector |
| | (b) causing a general notice in ﺮForm B਼to be affixed and announcement to be made, and considering the objections, if any, received. | The Collector |

२. In exercising the powers as aforesaid, the officer concerned shall, send reports in respect thereof to, endorse copies of various notices, forms and communications to and, whereever necessary, obtain directions and approval of, the State Election Commissioner.

Sd/-
D.N.CHAUDHARI,
State Election Commissioner,
Maharashtra.

# जोडपत्र

# जोडपत्र (Appendix)



| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | अधिसूचना / नोटीस नमुना -अअ | १ |
| २) | नामनिर्देशित पत्राचा नमूना | २ ते ५ |
| ३) | हमीपत्राचा नमूना | ६ |
| ४) | वैधरित्या नामनिर्देशित उमेदवारांची यादी-- नमुना | ७ |
| ५) | उमेदवारी मागे घेण्याची नोटीस -- नमुना | ८ |
| ६) | निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी. | ९ |
| ७) | हरकत घेतलेल्या मतांची यादी. (List of Challenged Votes) (नमुना ड) | १० |
| ८) | अंध व अपंग मतदारांची यादी (List of Blind & Infirm Voters) | ११ |
| ८अ) | अंध व अपंग मतदाराच्या मदतनिसाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र. | १२ |
| ९) | प्रदत्त मतपत्रिकांची यादी (List of Tendered Votes) (नमुना क) | १३ |
| १०) | मतपत्रिकांचा हिशेब (Ballat Paper Account) (नमुना इ) | १४ |
| ११) | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी. (Presiding Officer's Dairy) | १५ ते १७ |
| ११अ) | मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी) | १८ ते २० |
| १२) | मतदान सुरु करतांनाचे घोषणापत्र. | २१ |
| १२अ) | मतदान सुरु करतांनांचे घोषणापत्र (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी) | २२ |
| १३) | मतदान बंद करतांनाचे घोषणापत्र. | २४ |
| १३अ) | मतदान बंद करतांनांचे घोषणापत्र. (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी) | २५ |
| १४) | मतांचे विवरणपत्र. | २६ ते २७ |
| १५) | निकालपत्राचा नमुना. | २८ |
| १६) | निवडणूक निकालाबाबचे प्रगटन (Declaration) | २९ |
| १७) | EVM टपाली मतपत्रिका नमूना. | ३० |
| १८) | EVM नमूना मतपत्रिका | ३१ ते ३२ |
| १९) | B.U. & C.U. बंद करतांना करावयाचे प्रतिज्ञापत्र | ३३ |
| २०) | मतमोजणीची अंतिम स्थिती. | ३४ |
| २१) | अंतिम निकालपत्र. | ३५ |
| २२) | मतदार नोंदवही -- नमुना व्हीएम-१ | ३६ |
| २३) | प्रदत्त मतांची यादी -- नमुना व्हीएम-२ | ३७ |
| २४) | नोंदविलेल्या मतांचा हिशेब -- नमुना व्हीएम-३ | ३८ ते ३९ |
| २५) | मतमोजणीचा निकाल -- नमुना व्हीएम-४ | ४० |
| २६) | अंध व अपंग मतदारांची यादी -- नमुना व्हीएम-५ | ४१ |

# जोडपत्र १

१६ (नमुना अअ)
१४ (निवडणुकीची नोटीस)
(नियम ७ (२) पाहा)

याद्वारे नोटीस देण्यात येत आहे की, --

(१) -------------प्रभागातील----------------ग्रामपंचायतीच्या (सदस्यांची) निवडणूक घेण्यात यावयाची आहे.

(२) निवडणुका घेण्यासाठी--------------- यांची (येथे पदनाम नमूद करावे) निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे:

(३) नामनिर्देशनपत्रे उमेदवारांकडून किंवा अशा उमेदवारांनी याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या त्याच्या प्रतिनिधीमार्फत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे-----------पेक्षा उशीर नसेल अशा कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टीच्या दिवसाव्यतिरिक्त) ----------ते----------------------या वेळात-------------- येथे (ठिकाणी) स्वाधीन करण्यात येतील;

(४) नामनिर्देशनपत्राचे नमूने उपरोक्त ठिकाणी व वेळात मिळतील.

(५) ---------------येथे (ठिकाणी) -----------------दिवशी (तारीख) -----------वाजता (वेळ) नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येईल;

(६) उमेदवारी मागे घेण्याची नोटीस उमेदवारांकडून जातीने किंवा त्याने याबाबतीत लेखी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींकडून वरील खंड (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात-----------------रोजी मध्यान्होत्तर ३.०० पूर्वी स्वाधीन करण्यात येईल;

(७) निवडणूक लढविण्यात आल्यास मतदान दिनांक ----------रोजी ते -------------या वेळामध्ये घेण्यात येईल.

ठिकाण :---------------
दिनांक :---------------

राज्य निवडणूक आयुक्तांनी
प्राधिकृत केलेला अधिकारी

# जोडपत्र-२

परिशिष्ट-१

## नमुना "अ"

(नियम ८ पहा)

## नामनिर्देशन पत्र

**ग्रामपंचायतीचे नांवः----------------तालुकाः---------------जिल्हाः-----------------**

सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन--------

उमेदवारास ज्या प्रभागासाठी नामनिर्देशित करण्यात आले असेल त्या प्रभागाचे नांव ----------------------

आरक्षणाची वर्गवारी -------------------------------------------------------------------------------

उमेदवाराचे संपूर्ण नांव------------------------------------------------------------------------

स्त्री किंवा पुरुष---------------------------------------------------------------------------

वय----------------------------------------------------------------------------------------

पत्ता---------------------------------------------------------------------------------------

निवडणूक लढवित असलेले आरक्षणाची वर्गवारी ---------------------------------------------

योग्य त्या रकान्यात (    ) अशी खूण करावी.

| | | | |
|---|---|---|---|
| अनुसूचित जाती | अनुसूचित जाती स्त्री | अनुसूचित जमाती | अनुसूचित जमाती स्त्री |
| नागरीकांचा मागास प्रवर्ग | नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री | सर्वसाधारण | सर्वसाधारण स्त्री राखीव |

उमेदवार ज्या अनुसूचित जातीचा / अनुसूचित जमातीचा / नागरीकांच्या मागासप्रवर्गाचा असेल त्या अनुसूचित जातीचे / अनुसूचित जमातीचे / नागरीकांच्या मागासप्रवर्गाचे नाव -----------------------------------

ज्या प्रभागाच्या मतदार यादीत उमेदवाराचे नाव आहे व उमेदवारास ज्या प्रभागात मतदान करण्याचा हक्क आहे त्या प्रभागाचे नाव-------------------- मतदार यादीतील त्याचा अनुक्रमांक -------------------------------

मी याव्दारे असे घोषित करतो की, निवडून आल्यास सदस्य म्हणून काम करण्यास मी तयार आहे.

दिनांकः

-----------------------------------------

(उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

## भाग - २

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र क्रमांक एक

ग्रामपंचायतीचे नाव -----------प्रभाग क्र. ---------------------------- निवडणूक ------------------

मी, श्री / श्रीमती -------------------------------------- याद्वारे असे घोषित करतो की, माझी या नामनिर्देशनास संमती असून, -

(अ) माझ्या वयाची ----------------वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी मी अपात्र नाही.

(क) मी या ग्रामपंचायतीचा ठेकेदार नाही.

(ड) मी ग्रामपंचायतीच्या नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी शिल्लक ठेवलेली नाही.

--------------------------

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

=============

## उमेदवाराने करावयाचे घोषणापत्र क्रमांक दोन

(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा नागरिकांच्या मागासप्रवर्गातील उमेदवाराने स्वतः करावयाचे प्रतिज्ञापत्र)

मी, याद्वारे असे घोषित करतो की, मी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात --------------------- या

*अनुसूचित जाती / अुनसूचित जमाती / नागरिकांचा मागासप्रवर्गामधील व्यक्ती आहे.

-------------------------

दिनांक : (उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा)

(*लागू नसेल ते खोडावे.)

टिपाः- (१) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिती नागरीकांचा मागासवर्ग यांच्याकरीता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने नामनिर्देशनपत्रासोबत महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन), अधिनियम २००० च्या तरतुदींना अनुसरुन सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र यांची सत्यप्रत जोडावी. तसेच

(२) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्यावेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र व जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करावे.

(३) राखीव जागेवर निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या ज्या उमेदवारांजवळ जात पडताळणी समितीने दिलेले प्रमाणपत्र नसेल अशा उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रासोबत जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत किंवा पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा व जातप्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून ४ महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.

==============

## भाग-३

**सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन---------**

**ग्रामपंचायतीचे नांवः----------------------प्रभाग क्रमांक ------- तालुकाः---------जिल्हाः------------**

सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------------------ आरक्षणाची वर्गवारी --------------------------------
उमेदवाराचे नाव ---------------------------------------------------------------------------------
नामनिर्देशनपत्र अनुक्रमांक ------------------------------

हे नामनिर्देशनपत्र, *उमेदवाराने / उमेदवाराच्या लेखी प्राधिकृत प्रतिनिधी श्री / श्रीमती ------------------------------ ------------------यांनी आज दिनांक------------------रोजी -----------वाजता माझ्याकडे माझ्या कार्यालयात समक्ष सुपूर्द केले.

दिनांक वेळ ठिकाण निवडणूक निर्णय अधिका-याची सही व शिक्का

## भाग - ४

***नामनिर्देशनपत्र छाननीच्या वेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने दिलेला निर्णय***

मी, श्री. / श्रीमती ------------------------- मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ च्या नियम ११ व १२ नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून, पुढीलप्रमाणे निर्णय देत आहे :-

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------

दिनांक : (निवडणूक निर्णय अधिकारी यांची सही)

x

## भाग - ५

(नामनिर्देशनपत्र मिळाल्याची पावती व छाननीची नोटीस)

(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)

**सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन--------**

**ग्रामपंचायतीचे नावः----------------------प्रभाग क्रमांक ------- तालुकाः------------जिल्हाः------------**

सार्वत्रिक / पोटनिवडणूक सन ------------------------ आरक्षणाची वर्गवारी -------------------------
उमेदवाराचे नाव ---------------------------------------------------------------------------
नामनिर्देशनपत्र अनुक्रमांक ------------------------------

हे नामनिर्देशनपत्र उमेदवाराने / उमेदवाराच्या लेखी प्राधिकृत प्रतिनिधी श्री. / श्रीमती ---------------------- -------------------- यांनी आज दिनांक ------------------रोजी ------------वाजता माझ्याकडे माझ्या कार्यालयात समक्ष सुपूर्द केले.

सर्व नामनिर्देशनपत्रांची छाननी -----------------(दिनांक) रोजी ------------(वेळ) वाजता-------------------- ---------(ठिकाण) येथे करण्यात येईल.

---------------------

(निवडणूक निर्णय अधिका-यांची सही)

दिनांक :

परिशिष्ट-२

## हमीपत्र

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------------------ (स्वत:चे नाव) श्री.------- ---------------------------------------वडीलांचे / पतीचे नाव यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय------ --वर्षे, राहणार ----------------------------(पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो / करते की,

१. मी,--------------------------------------------------ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग क्र.------- ---मधून ------------------ या राखीव जागेकरीता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

२. माझ्याजवळ जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे मी जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत/पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत जोडला असून जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

३. निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल, आणि मी ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह/अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

माझेसमक्ष

निवडणूक निर्णय अधिकारी /सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

# जोडपत्र-३

## हमीपत्र

(नामनिर्देशनपत्रासोबत परिशिष्ट मध्ये समाविष्ट केलेले आहे)

मी, श्री./श्रीमती ------------------------------------------------------- (स्वतःचे नाव) श्री.------- -------------------------------------वडीलांचे / पतीचे नाव यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय------ --वर्षे, राहणार ----------------------------(पत्ता) खालीलप्रमाणे हमीपत्र करतो / करते की,

४. मी,------------------------------------------------ग्रामपंचायत निवडणुकीसाठी प्रभाग क्र.------ ---मधून ----------------- या राखीव जागेकरीता नामनिर्देशनपत्र सादर करीत आहे.

५. माझ्याजवळ जात पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र नसल्यामुळे मी जातपडताळणी समितीकडे जातीचे प्रमाणपत्र तपासणीसाठी सादर केलेल्या अर्जाची सत्यप्रत/पडताळणी समितीकडे तसा अर्ज केल्याबाबतचा पुरावा नामनिर्देशनपत्रासोबत जोडला असून जात प्रमाणपत्राचे वैधता प्रमाणपत्र निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतची हमी या हमीपत्राद्वारे देत आहे.

६. निवडून आल्याच्या दिनांकापासून चार महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर केल्यास माझी निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द होईल, आणि मी ग्रामपंचायत सदस्य राहण्यास निरर्ह/अपात्र ठरेन, याची मला जाणीव आहे.

स्थळ :

दिनांक : उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा

माझेसमक्ष

निवडणूक निर्णय अधिकारी /सहायक निवडणूक निर्णय अधिकारी

# जोडपत्र-४

वैधरित्या नामनिर्दिष्ट केलेल्या उमेदवारांची यादी
(नियम ब-१२ (३) पहा)

ग्रामपंचायत----------------तालुका-------------------जिल्हा--------------------

| वार्ड क्रमांक | अ.क्र. | उमेदवारांचे संपूर्ण नाव | जागेचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक :-------------

-------------------- ग्रामपंचायत

## जोडपत्र-५

## उमेदवारी मागे घेण्याची नोटीस

**(नियम १३ पहा)**

ग्रामपंचायतीचे नाव :-----------------------------प्रभाग क्रमांक------------ ची निवडणूक,

निवडणूक निर्णय अधिकारी,
-----------------------यास

मी, श्री / सौ. ------------------------------वरील ग्रामपंचायत निवडणुकीसाठी वैधपणे नामनिर्दिष्ट उमेदवार असून याद्वारे अशी सूचना देतो / देते की, मी आपली उमेदवारी मागे घेत आहे.

ठिकाण :

दिनांक :

वैधपणे नामनिर्दिष्ट उमेदवाराची सही

---

ही सुचना (दिनांक)---------------रोजी------------(वाजता)

-------------------------------------(नाव) यांनी मला माझ्या कार्यालयात आणून दिली.

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिकारी

---

## उमेदवारी मागे घेण्यासंबंधीच्या सुचनेची पावती

(सुचना देणाऱ्या इसमास द्यावी)

ग्रामपंचायतीचे नाव : -------------------प्रभाग क्रमांक --------- च्या निवडणुकीसाठी वैधपणे नामनिर्दिष्ट उमेदवार श्री. -------------------------------------यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याबद्दलची सुचना त्यांनी मला माझ्या कार्यालयात दिनांक------------ रोजी ---------वाजता आणून दिली.

दिनांक :

निवडणूक निर्णय अधिकारी

# जोडपत्र-६

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी सन --------
(नियम १४ (१) पहा)

ग्रामपंचायतीचे नाव---------------------------- प्रभाग क्रमांक -----------

तालुका----------------जिल्हा-------------------

| अ.क्र. | उमेदवाराचे संपूर्ण नाव | उमेदवारास दिलेले निवडणूक चिन्ह | जागेचा तपशिल | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक :------------- ------------------- ग्रामपंचायत

# जोडपत्र-७

## हरकत घेतलेल्या मतांची यादी

(नियम २९ पहा)

| मतदाराचे नाव | मतदाराच्या यादीतील मतदाराचा क्रमांक | मतदाराची सही किंवा अंगठयाची निशाणी व त्याचा पत्ता | ओळख पटवून देणाऱ्याचे नाव - कोणी असल्यास | हरकत घेणाऱ्या इसमाचे नाव | अनामत ठैवलेली रक्कम | प्रत्येक बाबतीत अध्यासी अधिकाऱ्याचे आदेश | अनामत ठेवलेली रक्कम परत देण्यात येईल तेव्हा उक्त रक्कम मिळाल्याबद्दल हरकत घेणाराची सही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ग्रामपंचायतीचे नाव---------------- प्रभाग क्रमांक -------------

तालुका--------------जिल्हा------------------ अध्यासी अधिकाऱ्याची सही

# जोडपत्र-८

## अंध व अपंग मतदारांची यादी

...............................ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-..................... तालुका .................)

प्रभागक्रमांक/नांव.........................

मतदानकेंद्राचा क्रमांक व नांव...................................................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक | मतदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक- .....................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

# जोडपत्र-८अ

## अंध व अपंग मतदाराच्या मदतनिसाने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र.

(--------------------------ग्रामपंचायत --------------------प्रभागातील समाविष्ट असलेल्या) -------

---------ग्रामपंचायत प्रभागातील मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नाव -------------------

मी, ---------------------------------------------------------------------------(वडिलांचे नाव)

--------------------------------------वय ---------राहणार ----------------- याद्वारे जाहीर करतो की,

(अ) आज दिनांक -------------- रोजी मी कोणत्याही मतदान केंद्रावर दुसऱ्या कोणत्याही मतदाराचा सोबती म्हणून काम केलेले नाही आणि

(ब) -----------------------------------यांच्या वतीने नोंदवलेले मत गुप्त ठेवीन.

सोबत्याची स्वाक्षरी

ग्रामपंचायतीचे नाव : ----------------------------------प्रभाग क्रमांक --------------------

तालुका ------------------------ जि. -----------------------

# जोडपत्र-९

## प्रदत्त मतांची यादी
## (पहा परिच्छेद १९)

........................................ ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-.................... तालुका ..................) प्रभाग क्रमांक / नांव...........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.......................................................

| अ.क्र. | मतदाराचे नांव | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |
| इत्यादी. | | | | |

दिनांक .....................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

## जोडपत्र-१०

मतपत्रिकांचा हिशोब
(नियम ३० (३) पहा)

-------------------------ग्रामपंचायतीसाठी निवडणूक

(वार्ड) प्रभाग क्र :----------------------

मतदान केंद्र --------------------------

| अनुक्रमांक | एकूण संख्या |
|---|---|
| १. मतदान केंद्रावर मतदार केंद्राध्यक्षास मिळालेल्या मतपत्रिकेची संख्या | |
| २. मतदारांना दिलेल्या मतपत्रिकांची संख्या | |
| ३. न वापरण्यात आल्यामुळे परत केलेल्या मतदान पत्रिकांची संख्या | |
| ४. रद्द करण्यात आलेल्या मतदान पत्रिकांची संख्या | |
| ५. वापरलेल्या प्रदत्त मतदान पत्रिकांची संख्या | |
| ६. मतदान पेट्यातील मतदान पत्रिकांची संख्या | |

दिनांक :-

ग्रामपंचायतीचे नाव :----------------------------------- प्रभाग क्रमांक -------------------

तालुका ------------------------ जिल्हा ------------------------

# जोडपत्र ११

## मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी. (Preciding Officer's Dairy)

१) ग्रामपंचायतीचे नाव :------------------------------------

२) प्रभाग क्रमांक ------------------------------

३) मतदानाची तारीख -------------------------

४) मतदान केंद्राचा क्रमांक --------------------

(एक) सरकारी किंवा निम सरकारी इमारत.
(दोन) खाजगी किंवा निम सरकारी इमारत.
(तीन) तात्पुरता मंडप.
यापैकी कोणत्या ठिकाणी आहे ते.

५) स्थानिक भागातील मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक केली असल्यास, त्यांची संख्या :

६) यथोचितरित्या नेमलेल्या मतदान अधिकाऱ्याच्या गैरहजेरीत, एखाद्या मतदान अधिकाऱ्याची नेमणूक केली असल्यास ती, नेमणूक केली असल्यास, ती नेमणूक व अशा नेमणुकीची कारणे.

------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------

७) वापरलेल्या मतपेट्यांची संख्या :

८) वापरलेल्या कागदी मोहरांची संख्या :

९) मतदान प्रतिनिधींची संख्या व जे उशीरा आले त्यांची संख्या :

१०)ज्या उमेदवारांनी मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधींची नेमणूक केली त्या उमेदवारांची संख्या :

११) (एक) मतदार यादीच्या चिन्हांकित प्रतीनुसार दिलेल्या मतपत्रिकांची संख्या :

मतदार केंद्रावर प्रत्यक्ष देण्यात आलेल्या मतपत्रिकांची संख्या :

पहिल्या मतदान
अधिकाऱ्याची सही

मतपत्रिका ताब्यात आलेल्या
अधिकाऱ्याची सही

१२)मतदान केलेल्या मतदारांची संख्या

पुरुष :
स्त्रिया :
एकूण :

१३)आक्षेपित मते :

स्वीकारलेल्या आक्षेपांची संख्या :
नाकारलेल्या आक्षेपाची संख्या :
जप्त केलेली रक्कम रुपये :

१४) निवडणूक कार्य प्रमाणपत्र (नि.का.प्र.) सादर केल्यानंतर मतदान केलेल्या व्यक्तीची संख्या :

१५) सोबत्यांच्या मदतीने मतदान केलेल्या मतदारांची संख्या :

१६)प्रदत्त मते :

१७) मतदारांची संख्या :

अ) ज्यांच्याकडून वयासंबंधीचे प्रतिज्ञापत्र घेतले.

ब) ज्यांनी प्रतिज्ञापत्र देण्याचे नाकारले.

१८) मतदान तहकुब करणे आवश्यक झाले काय, तसे असल्यास, अशा तहकुबीची कारणे.

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------

१९)दिलेल्या मतांची संख्या
सकाळी ७ ते सकाळी ९
सकाळी ९ ते ११
दुपारी ११ ते दुपारी १
दुपारी १ ते दुपारी ३
दुपारी ३ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत.

२०) मतदान संपतेवेळी दिलेल्या चिठ्ठयांची संख्या :

२१)निवडणूक विषयक अपराधांची तपशीलवार नोंद खालील प्रकारच्या प्रकरणांची संख्या :

अ) मतदान केंद्रापासून शंभर मीटरच्या परिसरात प्रचार करणे :
ब) मतदारांबाबत तोतयेगिरी :
क) मतदान केंद्रावरील सुचना, यादी किंवा इतर कागदपत्र लबाडीने खराब करणे, नष्ट करणे, किंवा काढून टाकणे :
ड) मतदारांना लाच देणे :

इ) मतदारांना आणि इतर व्यक्तींना धाकदपटशा दाखविणे :

२२) पुढील गोष्टीमुळे मतदानात खंड पडला होता काय किंवा अडथळा आला होता काय :

१) दंगा
२) उघड हिंसाचार
३) नैसर्गिक आपत्ती
४) इतर कोणतेही कारणे
वरील गोष्टींबाबत तपशील द्यावा.

२३) पुढील गोष्टींमुळे मतदानास बाध आला किंवा काय त्याबद्दलचा तपशिल द्यावा :

१) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली मतपेटी केंद्राध्यक्षाच्या ताब्यातून बेकायदेशीररित्या बाहेर नेण्यात आली.

अ) अकस्मात नष्ट झाली वा गहाळ झाली किंवा हेतूपुर्वक नष्ट करण्यात किंवा गहाळ करण्यात आली.

ब) खराब करण्यात आली किंवा तीत ढवळाढवळ करण्यात आली.

२) एखाद्या व्यक्तीने मतपत्रिकावर बेकायदेशीरपणे खुणा करुन त्या मतपेटीत टाकल्या. तपशील द्यावा.

२४) उमेदवारांनी केलेल्या गंभीर स्वरुपाच्या तक्रारी असल्यास :

२५) कायदा व सुव्यवस्था यांचा भंग झालेल्या प्रकरणांची संख्या :

२६) मतदान केंद्रावर झालेल्या चुका व नियमबाह्य गोष्टी आसल्यास, त्याबद्दलचा अहवाल :

२७) मतदानाच्या सुरुवातीपूर्वी, आणि जरुर तर, मतदान चालू असतांना मतदानाची नोंद केलेल्या मतपत्रिका टाकण्यासाठी नवीन मतपेटी ठेवण्याच्या वेळी आणि मतदान संपल्यानंतर आवश्यक त्याप्रमाणे प्रतिज्ञापने केलीत का?

मतदान केंद्राध्यक्ष

स्थळ : मतदान केंद्र क्रमांक ------------------------

दिनांक : ग्रामपंचायत ------------------------------

## जोडपत्र ११अ

**मतदान केंद्राध्यक्षाची दैनंदिनी. (Preciding Officer's Dairy)**
**(इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी)**

१) ग्रामपंचायतीचे नाव :---------------------------------------

२) प्रभाग क्रमांक ------------------------------

३) मतदानाची तारीख -------------------------

४) मतदान केंद्राचा क्रमांक --------------------

(एक) सरकारी किंवा निम सरकारी इमारत.
(दोन) खाजगी किंवा निम सरकारी इमारत.
(तीन) तात्पुरता मंडप.
यापैकी कोणत्या ठिकाणी आहे ते.

५) स्थानिक भागातील मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक केली असल्यास, त्यांची संख्या :

६) मूळ मतदान अधिकारी गैरहजर असल्यास त्याच्या जागी नेमणूक केलेल्या मतदर्झिन अधिकाऱ्याची नेमणूक आणि गैरहजेरीचे कारण---------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

७) मतदान यंत्र

(१) वापरलेल्या नियंत्रण युनिटांची संख्या :

(२) वापरलेल्या नियंत्रण युनिटांचे अनुक्रमांक :

(३) वापरलेल्या मतदान युनिटांची संख्या :

(४) वापरलेल्या मतदान युनिटांचे अनुक्रमांक :

७) (१) वापरलेल्या कागदी मोहरांची संख्या :

(२) वापरलेल्या कागदी मोहरांचे अनुक्रमांक :

८) मतदान प्रतिनिधींची संख्या आणि उशीरा पोचलेल्या मतदान प्रतिनिधींची संख्या :

९) मतदान केंद्रावर मतदान प्रतिनिधी नेमलेल्या उमेदवारांची संख्या :

१०) (१) मतदान केंद्राला दिलेले एकूण मतदार

(२) मतदार यादीच्या चिन्हांकीत केलेल्या प्रतीनुसार मतदान करण्यास परवानगी दिलेल्या

मतदारांची संख्या :

(३) मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-३) नुसार प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या :

(४) मतदान यंत्रानुसार नोंद झालेल्या मतांची संख्या :

पहिल्या मतदान
अधिकाऱ्याची सही

मतपत्रिका ताब्यात आलेल्या
अधिकाऱ्याची सही

११) ज्यांनी मतदान केले त्या मतदारांची संख्या

पुरुष :
स्त्रिया :
एकूण :

१२) आव्हानित मते :

परवानगी दिलेल्यांची संख्या :
परवानगी न दिलेल्यांची संख्या :
रक्कम फेडली रु.------------------

१३) निवडणूक सेवा दाखला सादर करुन मतदान केलेल्या मतदारांची संख्या

१४) सहकाऱ्याच्या आधाराने मतदान केलेल्या मतदारांची संख्या :

१५) दुबार मतांची संख्या :

१६) मतदारांची संख्या :

अ) वयाविषयी घोषणापत्रे घेतली ते----------

ब) ज्या कोणी अशी घोषणापत्रे देण्यास नकार दिला ते ---------------

१७) जर मतदान तहकुब करण्याची खरोखर गरज होती तर तहकुबीची कारणे.

------------------------------------------------------------------------------------------

१८) नोंदणी केलेल्या मतांची संख्या
सकाळी ७.३० ते सकाळी ९.३०
सकाळी ९.३० ते ११.३०
दुपारी ११.३० ते दुपारी १.३०
दुपारी १.३० ते दुपारी ३.३०
दुपारी ३.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत.

१९) मतदान करतेवेळी वाटलेल्या मतदार स्लीपांची संख्या :

२०) निवडणूक गुन्हा प्रकरणांची संख्या :

अ) मतदान केंद्राच्या शंभर मीटरच्या आत प्रचार करणे :
ब) मतदाराची तोतयेगिरी :
क) मतदान केंद्रावरील नोटीसांची यादी किंवा वा इतर कागदपत्र वाटप, खराब करणे, नष्ट करणे
ड) मतदारांना लाच देणे :
इ) मतदारांना आणि इतर व्यक्तींना भिती घालणे :
फ) मतदान केंद्रे ताब्यात घेणे :

२१) मतदानात अडथळा आला:

१. दंगल :
२. हिंसाचार :
३. नैसर्गिक आपत्ती :
४. मतदान केंद्र ताब्यात घेणे :
५. मतदान यंत्रात बिघाड :
६. इतर कारणे :
कृपया वरील मुद्दे विस्तृतपणे द्या

२२) मतदान केंद्रावर मतदान यंत्राकडून मतदान खराब झाले :

अ) मतदान केंद्राध्यक्षांच्या ताब्यातून अनधिकृतपणे बाहेर नेले :
ब) अपघाती वा जाणीवपूर्वक हरवले वा नष्ट केले :
क) बिघडले वा हस्तक्षेप केला :

२३) गंभीर तक्रार जर उमेदवार / प्रतिनिधीने केल्यास :

२४) कायदा व सुव्यवस्थेचा भंग करणाऱ्या प्रकरणांची संख्या :

२५) मतदान केंद्रावरील चुका आणि अनियमितपणा घडल्यास :

२६) मतदानास आरंभ होण्याआधी, मतदान चालू असतांना गरज पडल्यास (जेव्हा नवे मतदान यंत्र वापरतात) आणि मतदानाच्या शेवटी गरज भासते, तसे घोषणापत्र केले :

मतदान केंद्राध्यक्ष

स्थळ : प्रभाग क्रमांक ------------------------

दिनांक : ग्रामपंचायत ------------------------------

ही डायरी मतदान यंत्रे आणि इतर मोहरबंद कागदपत्रांबरोबर निवडणूक अधिकाऱ्याकडे **पाठवायला हवी.**

# जोडपत्र-१२

## मतदान सुरु करतांनाचे घोषणापत्र

----------------------ग्रामपंचायत प्रभाग क्र.-----------------यासाठी मतदान केंद्राचा अनुक्रमांक व नाव ---
-----------------मतदानाचा दिनांक -------------- मी याद्वारे घोषित करतो की,

१. मतदानासाठी वापरावयाची मतपेटी रिकामी आहे हे मी उपस्थित प्रतिनिधी व इतर व्यक्तींना दाखविले आहे.

२. मतपेटी पक्की बंद करण्यासाठी वापरलेल्या कागदी प्रतिनिधींच्या सह्या घेतल्या आहेत.
(कागदी मोहोर वापरली नसेल तेव्हा हे लागु असणार नाही)

३. उपस्थित मतदान प्रतिनिधी व इतर व्यक्ती यांना मी असे दाखवून दिले आहे, मतदानाच्या वेळी वापरावयाच्या मतदार याद्याच्या चिन्हांकित प्रति टपालाने मतपत्रिका पाठविण्यासाठी व निवडणूक कार्य प्रमाणपत्रासाठी केलेल्या खुणा व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारच्या खुणा केलेल्या नाहीत, आणि,

४. मतदान केंद्रात वापरावयाच्या मतपत्रिकांच्या अनुक्रमांकाचा पहिला व शेवटचा अनुक्रमांक लिहून घेण्यास मी मतदान प्रतिनिधींना अनुमती दिली आहे.

मतदान केंद्राध्यक्ष
मतदान केंद्र क्रमांक-------------
ग्रामपंचायत--------------------

मतदान प्रतिनिधींच्या सह्या :-

१. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
२. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
३. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
४. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
५. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
६. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
७. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
८. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
९. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)

ह्या प्रतिज्ञापनावर सही करण्यास पुढील मतदान प्रतिनिधींनी नकार दिला.

१. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
२. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
३. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
४. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)

मतदान केंद्राध्यक्ष
मतदान केंद्र क्रमांक-------------
ग्रामपंचायत--------------------

# जोडपत्र-१२अ

## मतदान सुरु करतांनाचे करावयाचे घोषणापत्र
## (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी)

............ .................... ...................ग्रामपंचायत, सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ________

प्रभाग क्र. ....... ....... मतदानाची तारीख............

मी, याद्वारे असे घोषित करतो की-

१. मी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित असलेल्या इतर व्यक्ती यांच्यासमोर असे प्रात्यक्षिक करुन दाखविले आहे की,-

(अ) अभिरुप मतदान घेऊन, मतदान यंत्र हे व्यवस्थित काम करण्याच्या स्थितीत आहे आणि त्यात याआधीच कोणतीही नोंदविलेली मते नाहीत.

(ब) मतदानाच्या वेळी वापरण्यात येणा-या मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीवर टपाल मतपत्रिका आणि निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र देताना केलेल्या खुणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही खुणा नाहीत.

(क) मतदानाच्या वेळी वापरण्यात येणा-या मतदार नोंदवहीमध्ये (नमुना व्हीएम-१) कोणत्याही मतदाराच्या संबंधात कोणतीही नोंद नाही.

२. मी, मतदान यंत्रातला नियंत्रण युनिटचा निकाल विभाग सुरक्षित करण्यासाठी लावलेल्या कागदी मोहोरांवर स्वतःची स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

३. मी, विशेष खूणचिठ्ठीवर नियंत्रण विभागाचा (युनिट) अनुक्रमांक लिहिला आहे, आणि मी विशेष खूण चिठ्ठीच्या मागील बाजूवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधीच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

४. मी, पट्टी मोहोरवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तसेच तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

५. मी, विशेष खूण चिठ्ठीचा पूर्ण मुद्रित अनुक्रमांक वाचला आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधींना सदर अनुक्रमांक लिहून घेण्यास सांगितले आहे.

स्वाक्षरी...................... (मतदान केंद्राध्यक्ष)

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरीः

(१).................या उमेदवाराचा (२)................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या फॉर्मची प्रमाणित प्रत दिली नाहीः-

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

**दिनांक** स्वाक्षरी...................... (मतदान केंद्राध्यक्ष)

# जोडपत्र-१२ ब

## मागाहून दुसऱ्या मतदान यंत्राचा वापर करताना मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापन

..................ग्रामपंचायत, सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ______

प्रभाग क्र........ ...............

मतदान केंद्र क्रमांक.........                    मतदानाची तारीख............

मी, याद्वारे असे घोषित करतो की-

मी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित असलेल्या इतर व्यक्ती यांच्यासमोर असे प्रात्यक्षिक करुन दाखविले आहे की,-

१. अभिरुप मतदान घेऊन, मतदान यंत्र हे व्यवस्थित काम करण्याच्या स्थितीत आहे आणि त्यात याआधीच कोणतीही नोंदविलेली मते नाहीत.

२. मी, मतदान यंत्रातला नियंत्रण युनिटचा निकाल विभाग सुरक्षित करण्यासाठी लावलेल्या कागदी मोहोरांवर स्वतःची स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

३. मी, विशेष खूणचिठ्ठीवर नियंत्रण विभागाचा (युनिट) अनुक्रमांक लिहिला आहे, आणि मी विशेष खूण चिठ्ठीच्या मागील बाजूवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधीच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

४. मी, पट्टी मोहोरवर माझी स्वाक्षरी केली आहे आणि तसेच तेथे उपस्थित असलेल्या व स्वाक्षरी करण्याची इच्छा असलेल्या उमेदवारांच्या/मतदान प्रतिनिधींच्या त्यावर स्वाक्ष-या घेतल्या आहेत.

५. मी, विशेष खूण चिठ्ठीचा पूर्ण मुद्रित अनुक्रमांक वाचला आहे आणि तेथे उपस्थित असलेल्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधींना सदर अनुक्रमांक लिहून घेण्यास सांगितले आहे.

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी:

स्वाक्षरी....................... (मतदान केंद्राध्यक्ष)

(१)................या उमेदवाराचा          (२)................या उमेदवाराचा

(३)................या उमेदवाराचा          (४)................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या फॉर्मची प्रमाणित प्रत दिली नाही:-

(१)................या उमेदवाराचा          (२)................या उमेदवाराचा

(३)................या उमेदवाराचा          (४)................या उमेदवाराचा

दिनांक          स्वाक्षरी....................... (मतदान केंद्राध्यक्ष)

## जोडपत्र-१३

## मतदान बंद करतानाचे घोषणापत्र

मतदान संपल्यावर मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या व खाली सही केलेल्या मतदान प्रतिनिधींना मी, मतपत्रिकांच्या हिशोबाच्या नोंदीची प्रत्येकी १ अनुप्रमाणित प्रत दिली आहे.

मतदान केंद्राध्यक्ष
मतदान केंद्र क्रमांक-------------
ग्रामपंचायत--------------------

मतपत्रिकांच्या हिशोबाच्या नोंदीची अनुप्रमाणित प्रत मिळाली.
मतदान प्रतिनिधींच्या सह्या :-

१. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
२. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
३. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
४. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
५. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
६. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
७. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
८. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
९. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)

मतदान संपल्यावर उपस्थित असणाऱ्या पुढील मतदान प्रतिनिधीची मतपत्रिकांच्या हिशोबाची अनुप्रमाणित प्रत घेण्यास व त्यासाठी पोच देण्यास नकार दिला म्हणून त्यांना मतपत्रिकांच्या हिशोबाची अनुप्रमाणित प्रत देण्यात आली नाही.

१. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
२. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
३. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)
४. ------------------------------------ (---------------------------या उमेदवाराचा)

मतदान केंद्राध्यक्ष
मतदान केंद्र क्रमांक-------------
ग्रामपंचायत--------------------

दिनांक
तालुका------------जि.-------------

# जोडपत्र-१३अ

## मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापन

## (इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापराचे वेळी)

**................ ग्रामपंचायत सार्वत्रिक/पोटनिवडणूक सन ........**

**प्रभाग क्र. .............. मतदान केंद्र क्र. .................**

मी, मतदान संपल्यावर मतदान केंद्रावर जे मतदान प्रतिनिधी हजर होते आणि ज्यांनी खाली स्वाक्षऱ्या केलेल्या आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतच्या आदेशाच्या नियम २१ नुसार व्हीएम-३ भाग-एक मध्ये नोंदविलेल्या मतांचा हिशेब यामधील प्रत्येक नोंदीची प्रमाणित प्रत दिलेली आहे.

तारीख............ स्वाक्षरी...........

वेळ........... मतदान केंद्राध्यक्ष

नोंदविलेल्या मतांचा हिशेब (व्हीएम -३ भाग-एक) यामधील नोंदीची प्रमाणित प्रत मिळाली.

(१)................या उमेदवाराचा (२)................या उमेदवाराचा

(३)................या उमेदवाराचा (४)................या उमेदवाराचा

(५)................या उमेदवाराचा (६)................या उमेदवाराचा

(७)................या उमेदवाराचा (८)................या उमेदवाराचा

(९)................या उमेदवाराचा

मतदान संपल्यावर उपस्थित असलेल्या खालील मतदान प्रतिनिधींनी नमुना व्हीएम-३ च्या भाग-१ ची प्रमाणित प्रत घेण्यास आणि त्याची पावती देण्यास नकार दिला म्हणून त्यांना त्या नमुन्याची प्रमाणित प्रत दिली नाही:-

(१)................या उमेदवाराचा (२)................या उमेदवाराचा

(३)................या उमेदवाराचा (४)................या उमेदवाराचा

(५)................या उमेदवाराचा (६)................या उमेदवाराचा

(७)................या उमेदवाराचा (८)................या उमेदवाराचा

(९)................या उमेदवाराचा

दिनांक स्वाक्षरी..................... (मतदान केंद्राध्यक्ष )

# जोडपत्र-१४

## मतांचे विवरणपत्र

..................ग्रामपंचायत, सार्वत्रिक /पोट निवडणूक सन _______

प्रभाग क्र............. मतदानाचा दि. ................ तालुका...............जिल्हा.....................

**आरक्षणाची वर्गवारी :- ------------------------**

| **अ.क्र** | **मतदान केंद्राचा क्रमांक** | **उमेदवारांना मिळालेली मते** | | | | **एकूण वैध मते** | **अवैध मते** | **एकूण मतांची संख्या** | **प्रदत्त मतांची संख्या** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उमेदवाराचे नाव | | | | | | | |
| | | अ | ब | क | ड | | | | |
| **१** | **२** | **३** | | | | **४** | **५** | **६** | **७** |
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | |
| इत्यादी | | | | | | | | | |

| १ | २ | ३ | | | | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्व मतदान केंद्रावर नोंदविण्यात आलेली एकूण मते | | | | | | | | | |
| टपाली मतपत्रिकांद्वारे नोंदविण्यात आलेली मते | | | | | | | | | |
| एकूण मते | | | | | | | | | |

दिनांक :-

ठिकाण :-

निवडणूक निर्णय अधिकारी

## जोडपत्र-१५

## निकालपत्राचा नमुना

ग्रामपंचायत---------------------- प्रभाग क्रमांक-----------------ता.--------------------

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | उमेदवारास मिळालेल्या वैध मतांची संख्या |
|---|---|---|
| | | |
| १) | | |
| २) | | |
| ३) | | |
| ४) | | |
| ५) | | |
| ६) | | |
| ७) | | |
| ८) | | |
| ९) | | |
| १०) | | |

मिळालेल्या वैध मतांची एकूण संख्या : ---------------------------------------

मिळालेल्या अवैध मतांची एकूण संख्या : ---------------------------------------

प्रदत्त मतांची एकूण संख्या : ---------------------------------------

एकूण : ---------------------------------------

मी असे जाहीर करतो की, ग्रामपंचायत--------------------ता.-----------------मधून खालील उमेदवार वैधरित्या निवडून आले आहेत.

निवडून आलेल्या उमेदवाराचे नाव

१.

२.

३.

निवडणूक निर्णय अधिकारी

ग्रामपंचायत--------------प्रभाग क्र.---------

दिनांक :

## जोडपत्र-१६

## निवडणूक निकालाबाबतचे प्रगटन (Declaration)

मुंबई ग्रामपंचायत निवडणूक नियम १९५९ चे सुधारीत नियम १९६६ चे नियम ३६ अन्वये मला मिळालेल्या अधिकारानुसार श्री.------------------------------------ निवडणूक निर्णय अधिकारी असे जाहीर करतो की, ग्रामपंचायत ------------------ तालुका ----------------------जि.-------------- करीता बिनविरोध / निवडणूक लढवून / निवडून आलेल्या सदस्यांची नावे खाली दिलेल्या परिशिष्टात दाखवल्याप्रमाणे आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी
ग्रामपंचायत ---------------------

### परिशिष्ट

| ग्रामपंचायत | प्रभाग क्रमांक | एकूण जागा | निवडून आलेल्या सदस्यांची नावे | जागेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी
ग्रामपंचायत ------------------------

दिनांक :---------------

# जोडपत्र १७
# टपाली मतपत्रिका

| |
|---|
| ............. ग्रामपंचायत<br>सार्वत्रिक/ पोट निवडणूक, प्रभाग क्र.......<br>टपाली मतपत्रिका<br>मतदार यादीचा भाग क्र..............<br>मतदाराचा अनुक्रमांक ............... |
| |
| |
| |
| .......................................................................................................................... |
| |
| |
| .......................ग्रामपंचायत<br>सार्वत्रिक/ पोट निवडणूक, प्रभाग क्र .......<br>टपाली मतपत्रिका |
| आवळे श्रीरंग |
| बोरसे चंद्रकांत |
| चांदेकर मनिषा |

टपाली मतपत्रिकेवर तसेच स्थळप्रतीवर अनुक्रमांक ज्याप्रमाणे सोयीचे असेल त्याप्रमाणे पुढील अथवा मागील बाजूस डाव्या बाजूला छापण्यात यावा.

# जोडपत्र १८ EVMनमूना मतपत्रिका

| | |
|---|---|
| 1. आसरे विलास अनंत |  |
| 2. भाकरे चंद्रकांत |  |
| 3. दांडेकर संजय प्रमोद |  |
| 4. काले सुखाराम |  |
| 5. गदे अनिल विकास |  |
| 6. इराले डी |  |
| 7. खान नुरुदिन |  |
| 8. भाने तुकाराम मारुती |  |

No

| | |
|---|---|
| 1. आसरे विलास अनंत |  |
| 2. ठाकरे चंद्रकला |  |
| 3. दांडेकर संजय प्रमोद |  |
| 4. फाटे सुखाराम |  |
| 5. गाडे अनिल विकास |  |
| 6. हराळे डी |  |
| 7. खान नुरुद्दिन |  |
| 8. माने तुकाराम मारुती |  |

## जोडपत्र-१९

### मतदान यंत्र बंद करतांनाचे करावयाचे प्रतिज्ञापत्र

**................. ग्रामपंचायत निवडणूक सन ........**

**प्रभाग क्र. ..............**

मी, मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट व मतदान युनिट यांच्या वहन पेटयांवर माझी मोहोर लावली आहे व मतदान संपल्यावर मतदान केंद्रावर जे मतदान प्रतिनिधी हजर होते त्यांना त्यांची मोहोर लावण्यास परवानगी दिली.

दिनांक............ स्वाक्षरी...........

वेळ........... मतदान केंद्राध्यक्ष

खालील मतदान प्रतिनिधींनी त्यांची मोहोर लावली:-

मतदान प्रतिनिधींची स्वाक्षरी

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(१).................या उमेदवाराचा (२).................या उमेदवाराचा

(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

(५).................या उमेदवाराचा (६).................या उमेदवाराचा

खालील मतदान प्रतिनिधींनी त्यांची मोहोर लावण्यास नकार दिला अथवा त्यांची मोहोर लावण्याची इच्छा नव्हती:-

(१).................या उमेदवाराचा (२).................याउमेदवाराचा
(३).................या उमेदवाराचा (४).................या उमेदवाराचा

दिनांक

स्वाक्षरी......................

मतदान केंद्राध्यक्ष

## जोडपत्र-२०

## मतमोजणीची अंतिम स्थिती दर्शविणारे प्रपत्र

..................ग्रामपंचायत, सार्वत्रिक /पोट निवडणूक सन ______

प्रभाग क्र............. मतदानाचा दि. ............... तालुका...............जिल्हा.....................

| अ.क्र | मतदान केंद्राचा क्रमांक | उमेदवारांना मिळालेली मते | | | | एकूण वैध मते | अवैध मते | एकूण मतांची संख्या | प्रदत्त मतांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | | | | |
| १. | | | | | | | | | |
| २. | | | | | | | | | |
| ३. | | | | | | | | | |
| ४. | | | | | | | | | |
| इत्यादी | | | | | | | | | |
| सर्व मतदान केंद्रावर नोंदविण्यात आलेली एकूण मते | | | | | | | | | |
| टपाली मतपत्रिकांद्वारे नोंदविण्यात आलेली मते | | | | | | | | | |
| एकूण मते | | | | | | | | | |

दिनांक :-

ठिकाण :-

निवडणूक निर्णय अधिकारी

# जोडपत्र-२१
## निवडणूक निकाल

-----------------------------.ग्रामपंचायत निवडणूक सन --------------------

प्रभाग क्र. ...........तालुका...............जिल्हा......................

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | मिळालेली वैध मते |
|---|---|---|
| १ | | |
| २ | | |
| ३ | | |
| ४ | | |
| इत्यादी | | |

एकूण वैध मते..................

एकूण अवैध मते................

एकूण प्रदत्त मते................

.......................................................................................वरील उमेदवारांपैकी खालील व्यक्ती वैधरित्या निवडून आल्याचे मी जाहीर करतो

श्री................................................

संपूर्ण पत्ता........................................

ठिकाण:-

दिनांक:-

निवडणूक निर्णय अधिका-याची स्वाक्षरी

# जोडपत्र-२२

## नमुना व्हीएम-१
## (पहा परिच्छेद १४)
## मतदार नोंदवही

............................ ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-..................... तालुका .................) प्रभाग क्रमांक / नांव.......................... मतदान केंद्राचा क्रमांक व

नांव......................................................

| अ.क्र. | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठयाचा ठसा | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| इत्यादी | | | |

दिनांक :

मतदान केंद्राध्यक्षाची सही

# जोडपत्र-२३
## नमुना व्हीएम-२
## (पहा परिच्छेद १९)
## प्रदत्त मतांची यादी

........................................ ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-.................... तालुका ..................) प्रभाग क्रमांक / नांव...............................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव.........................................................

| अ.क्र. | मतदाराचे नांव | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |
| इत्यादी. | | | | |

दिनांक .....................                                        मतदान केंद्राध्यक्षाची सही

# जोडपत्र-२४

## नमुना व्हीएम-३

## (पहा परिच्छेद २२)

## भाग-एक- नोंदविलेल्या मतांचा हिशेब

................................ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-...................... तालुका .................) प्रभाग क्रमांक / नांव..........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव....................................................
कंट्रोल युनिटचा क्रमांक...........................................................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ............................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या

२. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकुण मतदारांची संख्या

३. परिच्छेद १८ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या

४. परिच्छेद १६ नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या

५. मतदान यंत्रामध्ये नोंदविल्या गेलेल्या एकूण मतदारांची संख्या

६. वरील अनुक्रमांक-५ मध्ये दाखविलेल्या एकुण मतांची संख्या =
(अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही
आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे,

७. परिच्छेद १९ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या

८. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या

| | अनुक्रमांक पासून | अनुक्रमांक पर्यंत |
|---|---|---|
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | ............... | ............ |
| (ब) मतदारांना दिलेल्या | ............... | ............ |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | ............... | ............ |

९. कागदी मोहोरांचा (पेपर सील) हिशेब
१.पुरविल्या गेलेल्या कागदी मोहोरांचे

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या .................

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या ................

अनुक्रमांक
पासून..............पर्यंत..................

४.न वापरलेल्या कागदी मोहोरांची संख्या ................
(जे निवडणूक निर्णय अधिका-यास परत केले) अनुक्रमांक
(क्रमांक - २ वजा ३) पासून..............पर्यंत.................

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या, .................
(असल्यास) अनुक्रमांक
पासून..............पर्यंत.................

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्ष-या
१.............................
२.............................
३.............................
४.............................
५.............................

दिनांक- ..................... मतदान केंद्राध्यक्षाची सही
ठिकाण- ..................... मतदान केंद्र क्रमांक..........

# जोडपत्र-२५

## नमुना व्हीएम-४
## (पहा परिच्छेद २८)
## भाग- दोन - मतमोजणीचा निकाल

.......................... ग्रामपंचायत निवडणूक / पोटनिवडणूक
(जिल्हा-..................... तालुका .... .................) प्रभाग क्रमांक / नांव..........................

मतदान केंद्राचा क्रमांक व नांव......................................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ........................................
काढता येणा-या मेमरीचा क्रमांक...........................................................
मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ...........................

| अ.क्र. (१) | उमेदवाराचे नांव (२) | नोंदविलेल्या मतांची संख्या (३) |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| एकुण | | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे अथवा काही फरक येतो किंवा कसे,

ठिकाण- ....................
दिनांक- ......................

मतमोजणी पर्यवेक्षकाची सही...............

उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधीचे/मतमोजणी प्रतिनिधीचे नांव — पूर्ण सही............

१.
२.
३.
४.
५.
६.

ठिकाण- .................
दिनांक- ................

निवडणूक निर्णय अधिका-याची **सही**

# जोडपत्र-२६

## नमुना व्हीएम-५
## (पहा परिच्छेद १७)
## अंध व अपंग मतदारांची यादी

...............................ग्रामपंचायत निवडणूक/पोटनिवडणूक

(जिल्हा-..................... तालुका .................)

प्रभागक्रमांक/नांव..........................

मतदानकेंद्राचा क्रमांक व नांव......................................................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक | मतदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचे पूर्ण नांव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |

दिनांक- .....................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

-----oooooo-----

राज्य निवडणूक आयोगाच्या इलेक्ट्रॉनिक
मतदान यंत्रावरील मतमोजणी.

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/ग्रापनि/२००७/प्र.क्र.१५ /का.८
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ०१/०८/२००७

### आदेश

राज्य निवडणूक आयोगाने इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया या केंद्र शासनाच्या उपक्रमाद्वारे विकसित करुन घेतलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये मतदान करण्यासंबंधी सविस्तर कार्यपध्दती निश्चित करणारे आदेश क्र. रानिआ/ २००७/ प्र.क्र.३/का.८, दि. २८/३/२००७ निर्गमित करण्यात आले आहेत. या आदेशात जोडलेल्या प्रपत्रात व्हीएम -४, भाग-२ हा मतमोजणीच्या निकालाचा नमुना आहे.

२. ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये प्रत्येक प्रभागातून कमीत कमी दोन व जास्तीत जास्त तीन सदस्य निवडून देण्याची तरतूद असल्याने राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/ २००७/ प्र.क्र.३/का.८, दि. २८/३/२००७ च्या परिच्छेद १५ मधील तरतुदीनुसार बॅलेट युनिटवरील "END" बटन चालू राहील. END बटनावर काळी कॅप सतत झाकलेली राहिल याची खात्री मतदान केंद्राध्यक्षांनी करावी.

३. "END" बटनाचा वापर अपवादात्मक परिस्थितीत काही मतदारांनी करण्याची शक्यता आहे. "END" बटनाचा वापर करतांना मतदारांनी मतदान केंद्राध्यक्षाला "END" बटनाचा वापर करायचा आहे असे सूचित करणे अपेक्षित आहे. तरीही काही मतदार केंद्राध्यक्षांना सूचित न करता "END" बटनाचा वापर करण्याची शक्यता आहे. त्यामुळे मतदानासाठी आलेले एकूण मतदार व त्या पदाकरीता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या यामध्ये तफावत येण्याची शक्यता आहे. मतदान यंत्र निकाल दाखवतांना प्रत्येक पदाकरीता झालेले मतदान प्रथम दाखवेल व त्यानंतर उमेदवारांमध्ये त्या मतांची विभागणी कशाप्रकारे झालेली आहे हे दर्शविल. मतमोजणीच्यावेळी ही तफावत पुढीलप्रमाणे दिसेल.

(१) मतदान यंत्रावर **tO** असे दिसेल, यामध्ये एकूण किती मतदार मतदानास येऊन गेले याचा आकडा दिसेल.

(२) त्यानंतर मतदान यंत्रावर **t1** असे दिसेल, त्यामध्ये पहिल्या मतपत्रिकेवरील उमेदवारांकरीता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या दिसेल. अर्थात पहिल्या मतपत्रिकेवरील सर्व उमेदवारांना मिळालेल्या एकूण मतांची बेरीज ही **t1**, च्या आकड्याशी जुळेल.

(३) दोन मतपत्रिका असल्यास त्यानंतर मतदान यंत्रावर **t2** असे दिसेल त्यामध्ये दुसऱ्या मतपत्रिकेवरील उमेदवारांकरीता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या दिसेल. अर्थात दुसऱ्या मतपत्रिकेवरील सर्व उमेदवारांना मिळालेल्या एकूण मतांची बेरीज ही **t2**, च्या आकड्याशी जुळेल.

(४) तीन मतपत्रिका असल्यास, त्यानंतर **t3** असे दिसेल त्यामध्ये तिसऱ्या मतपत्रिकेवरील उमेदवारांकरीता प्रत्यक्ष मतदान केलेल्या मतदारांची संख्या दिसेल. अर्थात तिसऱ्या मतपत्रिकेवरील सर्व उमेदवारांना मिळालेल्या एकूण मतांची बेरीज ही **t3**, च्या आकड्याशी जुळेल.

शक्यता अशी आहे की, "END" बटनाचा वापर केल्यामुळे **tO, t1, t2, t3** यांची आकडेवारी एकमेकांशी जुळणार नाही. ही बाब सर्व उमेदवारांना मतदान यंत्रे सील करतांनाच स्पष्ट करुन द्यावी म्हणजे नंतर वाद निर्माण होणार नाही.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

पीएसमीना /8/07
(पी. एस. मीना)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व तहसिलदार.

F:\VillagePanchayats\contng on evm.doc/acgp

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.३७/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- २३ डिसेंबर, २००४.**

## आ दे श

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या वेळी ब-याचदा नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याच्या तारखेनंतर एकच उमेदवार शिल्लक राहिल्याने उमेदवार बिनविरोध निवडून आला असे जाहीर करण्यात येते. उमेदवार अर्ज भरताना अनेक उमेदवार अर्ज भरतात परंतु, नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्यावेळी एक उमेदवार सोडून अन्य सर्व उमेदवार अर्ज मागे घेतात. अशा वेळी तो उमेदवार इतर उमेदवारांवर दबाव आणून उमेदवारी अर्ज मागे घेण्यास लावतो, ही शक्यता नाकारता येत नाही. तरी यापुढे असे प्रसंग घडल्यास राज्य निवडणूक आयोगाला त्याबाबतचा सविस्तर अहवाल तात्काळ पाठविण्यात यावा व राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्यानंतरच त्या उमेदवाराला विजयी घोषित करण्यात यावे.

सही/-xxx
**( नन्द लाल )**
**राज्य निवडणूक आयुक्त,**
**महाराष्ट्र**

प्रति:-
१. सर्व महानगरपालिका आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
४. सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
५. राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी